बुधवार
२८
जानेवारी २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : १९
अंक : ३२३
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग

# अजिंक्य भारत



भारत आणि न्यूझीलंड उर्वरित सामन्यांसाठी संघात मोठे बदल (पान ७ वर)

## ट्रम्प यांच्या टॅरिफवरचा तोड!

# भारताची युरोपियन युनियनसोबत ऐतिहासिक 'मदर ऑफ ऑल डील्स!



नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था

**भारत आणि युरोपियन युनियनमध्ये आज मुक्त व्यापार कराराची घोषणा करण्यात आली आहे. भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील 'मदर ऑफ ऑल डील' या करारावर स्वाक्षरी करण्यात आल्याने भारतासाठी हा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. भारत आणि युरोपियन युनियनमधील हा करार म्हणजे 'सर्व करारांची जननी' असल्याचा उल्लेख पंतप्रधान मोदींनी केला आहे.**

भारत आणि युरोपियन युनियनमधील करारानंतर युरोपियन युनियनच्या अध्यक्षा उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी भारताचं कौतुक केलं. तसेच भारताने केलेल्या प्रगतीमुळे युरोप खूप आनंदी असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. तसेच 'जेव्हा भारत यशस्वी होतो तेव्हा जग अधिक समृद्ध होतं', असं म्हणत उर्सुला व्हॉन डेर लेयेन यांनी भारताचं कौतुक केलं आणि भारत आणि युरोपियन युनियनमधील 'मदर ऑफ ऑल डील'चे फायदे सांगितले आहेत. १८ वर्षांच्या वाटाघाटींनंतर मंगळवारी भारत आणि युरोपियन युनियन यांनी मुक्त व्यापार करार केला. मंगळवारी १६ व्या भारत-युरोपियन युनियन शिखर परिषदेत भारत आणि युरोपियन युनियनच्या नेत्यांनी याची घोषणा केली. हा करार २०२७ मध्ये लागू होण्याची अपेक्षा आहे. या करारानंतर, आणि - कारसारख्या युरोपियन कारवरील कर ११०% वरून १०% पर्यंत कमी केला जाईल. याव्यतिरिक्त, युरोपमधून भारतात आयात होणाऱ्या दारू आणि वाईनवरील कर कमी केला जाऊ शकतो. सध्या, युरोपियन देशांमधून वाइनवर १५०% कर लादला जातो. तो २०-३०% पर्यंत कमी केला जाईल. भारत ही जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे, तर युरोपियन युनियन ही दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. एकत्रितपणे, त्यांचा जागतिक च्या अंदाजे २५% आणि जागतिक व्यापाराच्या जवळजवळ एक तृतीयांश वाटा आहे.

**९० टक्के वस्तूंवर शुल्क नाही :** भारतीय निर्यातीमध्ये देखील मोठी उसळी मिळण्याची आशा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही मदर ऑफ ऑल डील आहे असं सांगितलं. या डीलमुळे दोन्ही देशांची चीन आणि अमेरिकेवरील अवलंबत्व कमी होण्यास मदत होणार आहे. युरोपीयन संघाच्या मते या डीलमध्ये भारताला निर्यात केल्या जाणाऱ्या जवळपास ९० टक्के युरोपीयन युनियनच्या वस्तूंवर शुल्क लागणार नाही. या डीलनंतर आशा आहे की २०३२ पर्यंत युरोपातून भारताला होणारा निर्यात दुप्पट केला जाईल. या डीलमुळे भारतात रोजगाराच्या नव्या संधी देखील उपलब्ध होणार आहेत. अनेकाना थेट किंवा अप्रत्यक्षरित्या रोजगार मिळणार आहे. या डीलमुळे अनेक वस्तू देखील स्वस्त होण्याची शक्यता आहे. भारत आणि युरोपियन युनियनच्या या डीलनंतर अनेक गोष्टींचे दर कमी होणार आहेत. यात कार, रसायनांचा समावेश आहे. तसेच वाईन, बीअर आणि ड्रिंक्स संदर्भातील उत्पादने स्वस्त होण्याची शक्यता आहे. या करारामुळे मद्य, खाद्य उत्पादन, रसायन, मशिनरी, फार्मास्युटिकल्स आणि एअरो स्पेसशी संबधित प्रमुख गोष्टींचे दर कमी होण्याची शक्यता आहे.

**आम्ही उशीराने, पण मजबूत करार करतो- काजा कल्लास :** युरोपियन कमिशनच्या उपाध्यक्षा काजा कल्लास म्हणाल्या, की जेव्हा त्या जगभरातील विविध देशांना भेट देतात तेव्हा त्यांना असे दिसते की अधिक देश युरोप सोबत भागीदारी करू इच्छितात.

त्या म्हणाल्या, की युरोप विश्वासार्ह आहे आणि आजच्या काळात त्याचे खूप महत्त्व आहे. युरोप करार करण्यासाठी वेळ घेतो, परंतु एकदा ते झाले की ते त्यांचा आदर करते आणि त्यांची अंमलबजावणी करते. युरोप आपल्या आश्वासनांचे आणि करारांचे पालन करतो आणि हेच त्याला खास बनवते.

युरोप आणि भारत अनेक क्षेत्रात एकत्र काम करू शकतात. यासाठी सुरक्षा, संरक्षण, परराष्ट्र धोरण, सागरी सुरक्षा आणि सायबर सुरक्षा यासारख्या क्षेत्रांची ओळख पटवण्यात आली आहे. या मुद्द्यांवर चर्चा सुरू होत आहे, कारण माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी अचूक माहिती आवश्यक आहे.

**करारामुळे ₹ ४३,००० कोटींचे शुल्क कमी होईल - लेयन :** युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन म्हणाल्या, की हा करार जगाला स्पष्ट संदेश देतो की सहकार्य हे जागतिक आव्हानांवर सर्वोत्तम उत्तर आहे. हा मुक्त व्यापार करार भारत आणि युरोपच्या पुरवठा साखळ्यांना जोडेल आणि संयुक्त उत्पादन क्षमता मजबूत करेल. यामुळे दरवर्षी सुमारे ₹४ अब्ज (₹४३.५ हजार कोटी) शुल्क कमी होईल आणि भारत आणि युरोपमधील लाखो लोकांसाठी चांगल्या नोकऱ्या निर्माण होतील.

### युरोपियन युनियनमध्ये भारताची गुंतवणूक ₹४ लाख कोटींपेक्षा जास्त

भारत-युरोपियन युनियन बिझनेस फोरममध्ये पंतप्रधान मोदींनी सांगितले, की युरोपियन युनियनमध्ये भारताची गुंतवणूक आता जवळजवळ ४० अब्ज युरो (₹४३६,००० कोटी) पर्यंत पोहोचली आहे. त्यांनी स्पष्ट केले, की भारतीय आणि युरोपियन कंपन्या संशोधन, उत्पादन आणि सेवांसह प्रत्येक क्षेत्रात एकत्र काम करत आहेत आणि यामध्ये व्यावसायिक नेते महत्त्वाची भूमिका बजावतात.

### पृथ्वीवरील दुर्मिळ खनिजांचे शस्त्रीकरण - मोदी

भारत-ईयू बिझनेस फोरममध्ये पंतप्रधान मोदींनी विश्वास व्यक्त केला, की व्यवसाय या मुक्त व्यापार कराराद्वारे सादर केलेल्या संधींचा पुरेपूर फायदा घेतील. भारत-युरोपियन युनियन व्यापार करारामुळे भारतातील उत्पादन वाढेल आणि देशातील सेवा आणि संबंधित क्षेत्रांचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास मदत होईल. सर्व करारांची जननी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मुक्त व्यापार करारामुळे जागतिक व्यवसाय आणि गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास आणखी दृढ होईल'', असं मोदींनी म्हटलं आहे. त्यांनी नमूद केले की, भारताच्या इतिहासातील सर्वात मोठा मुक्त व्यापार करार भारत आणि युरोपियन युनियनमध्ये होत आहे आणि आज एक मोठ्या प्रमाणात भारत-ईयू बिझनेस फोरम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये अनेक आघाडीच्या सीईओंनी हजेरी लावली होती. हे सर्व जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाही देशांमधील वाढत्या आणि मजबूत सहकार्याचे प्रदर्शन करते. त्यांनी सांगितले, की हा करार भारत आणि ईयू दोघांच्याही प्राधान्यांशी सुसंगत आहे आणि व्यापार भागीदारीला देखील फायदा देईल. मोदी म्हणाले, की आजच्या जगात, व्यापार तंत्रज्ञान आणि पृथ्वीवरील दुर्मिळ खनिजांचे शस्त्रीकरण केले जात आहे आणि दबाव आणण्यासाठी वापरले जात आहे, म्हणून भारत आणि ईयूने त्यांचे अवलंबित्व कमी करण्यासाठी एकत्र काम केले पाहिजे. त्यांनी सांगितले, की दोन्ही बाजू बाह्य अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि इलेक्ट्रिक वाहन बॅटरी चिप्स आणि औषधी कच्चा माल यासारख्या क्षेत्रात विश्वसनीय पुरवठा साखळी तयार करण्यासाठी एकत्र काम करू शकतात. त्यांनी सांगितले, की भारत आणि ईयू दोन्ही संरक्षण उद्योग आणि नवीन तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करत आहेत आणि व्यवसायांना संरक्षण, अवकाश, दूरसंचार आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सारख्या क्षेत्रात भागीदारी वाढविण्याचे आवाहन केले. पंतप्रधानांनी सांगितले, की शाश्वत भविष्य देखील भारत आणि ईयूसाठी एक सामायिक प्राधान्य आहे. त्यांनी ग्रीन हायड्रोजन, सौर ऊर्जा आणि स्मार्ट ग्रिड्स सारख्या क्षेत्रात संशोधन आणि गुंतवणूक वाढविण्याचे आवाहन केले. यासोबतच, लहान मॉड्यूलर रिॲक्टर, शाश्वत वाहतूक, पाणी व्यवस्थापन, वर्तुळाकार अर्थव्यवस्था आणि शाश्वत शेती यासारख्या क्षेत्रात एकत्र काम करण्यावरही भर देण्यात आला.

### डीलमधील प्रमुख मुद्दे

व्यापार आणि शुल्कातील कपात युरोपियन निर्यातदारांची बचत: या करारामुळे युरोपियन युनियनमधील निर्यातदारांना दरवर्षी सुमारे ४ अब्ज युरो शुल्काची बचत होईल.

**मद्य आणि पेये :** बिअरवरील टॅरिफ कमी करून ५०% करण्यात आला आहे, तर वाईन (शराब) वरील टॅरिफमध्ये ४०% कपात केली जाणार आहे.

**वाहन क्षेत्र :** कार आणि कमर्शियल वाहनांवरील शुल्क ११०% वरून थेट १०% पर्यंत कमी केले जाईल. मात्र, यासाठी दरवर्षी २,५०,००० वाहनांचा कोटा निश्चित करण्यात आला आहे.

खाद्यपदार्थ आणि रसायने

**खाद्यतेल :** जैतूनचे तेल , मार्जरीन आणि इतर वनस्पती तेलांवरील शुल्क पूर्णपणे रद्द करण्यात येईल.

**प्रोसेस्ड फूड :** फळांचे रस आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांवरील शुल्कही आता इतिहास जमा होईल.

**रसायन उद्योग :** युरोपियन युनियनमधील जवळपास सर्वच रासायनिक उत्पादनांवरील टॅरिफ समाप्त केले जातील.

औद्योगिक आणि वैद्यकीय क्षेत्राला मोठा दिलासा

**मशिनरी :** यंत्रसामग्रीवर आतापर्यंत असलेले ४४% पर्यंतचे शुल्क मोठ्या प्रमाणात कमी किंवा रद्द केले जाईल.

**औषधे आणि आरोग्य :** औषधे आणि वैद्यकीय उत्पादनांवरील ११% पर्यंतचे शुल्क जवळपास संपुष्टात आणले आहे.

**विमान आणि अवकाश क्षेत्र :** एअरक्राफ्ट आणि स्पेसक्राफ्टवर लागणारा टॅरिफ आता शून्य करण्यात आला आहे.

इतर महत्त्वाच्या तरतुदी

**९०% मालावर सवलत :** भारतात निर्यात होणाऱ्या युरोपियन युनियनच्या ९०% पेक्षा जास्त वस्तूंवरील शुल्क एकतर रद्द केले जाईल किंवा लक्षणीयरीत्या कमी केले जाईल.

**पर्यावरण मदत :** ग्रीनहाऊस गॅस उत्सर्जन कमी करण्यासाठी भारताला मदत म्हणून युरोपियन युनियन पुढील दोन वर्षांत ५०० दशलक्ष युरोची मदत देईल.

**बौद्धिक संपदा संरक्षण :** युरोपियन युनियनच्या ट्रेडमार्क, डिझाइन, कॉपीराइट आणि व्यापार गुपितांसाठी आता अधिक कडक सुरक्षा प्रदान केली जाईल.

**रोजगार आणि छोटे उद्योग :** या करारामुळे नवीन व्यापाराच्या संधी आणि रोजगाराची निर्मिती होईल, तसेच लघु आणि मध्यम उद्योगांना मोठी मजबुती मिळेल.

## थोडक्यात

### आमच्याकडे संविधानाचे शस्त्र आहे- चित्रा वाघ



**मुंबई :** गायिका अंजली भारती यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केलं होतं. त्यांच्या त्या विधानावर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी सडेतोड उत्तर दिलं आहे. आमच्याकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचं शस्त्र आहे, कायदेशीर प्रहार कसा करायचा हे आम्हाला चांगलंच माहीत आहे, अशा शब्दांमध्ये त्यांनी उत्तर दिले आहे. एक्सवर पोस्ट करून त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. अंजली भारती नावाच्या बाईचा आताच एक व्हिडीओ पाहिला आणि तळपायाची आग मस्तकात गेली. राजकीय विरोध असू शकतो पण भर कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या पत्नीवर बलात्कार करा.. अशी चिथावणी देणे.. ती सुद्धा एका बाईने? अंजली भारती नावाच्या या बाईच्या बुद्धीची कीव करावी तितकी कमी आहे.

### सोनिया गांधी राऊतांना वंदनीय झाल्या का?

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बाळासाहेब ठाकरे, अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, आनंद दिघे वंदनीय आहेत. संजय राऊत तुम्हाला नेमकं कोण वंदनीय आहे? असा परखड सवाल भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी मंगळवारी केला. ज्या सोनिया गांधी यांच्यावर करप्शन क्वीन म्हणून स्व. बाळासाहेब ठाकरे यांनी टीका केली होती, त्या सोनिया गांधी उबाठा गट आणि राऊतांसाठी वंदनीय झाल्या आहेत. राहुल गांधी, एमआयएम हे राऊतांसाठी परमपूज्य झाले आहेत अशी बोचरी टीकाही बन यांनी केली. कोण कुणाचे अंगवस्त्र आहे यावर हीन भाषेत बोलण्याऐवजी सत्यस्थिती काय आहे हे जनतेला ठाऊक आहे.

## मुंबईचा महापौर : भाजपने शिंदे गटाला दिला मोठा प्रस्ताव!

मुंबई, दि. २७ वृत्तसंस्था

राज्यात नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांमध्ये एकूण २९ महापालिकांसाठी मतदान झाले असून, बहुतेक ठिकाणी भारतीय जनता पक्ष (भाजपा) हा सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे; मात्र जागा जास्त मिळाल्या तरीही अनेक महापालिकांमध्ये भाजपला बहुमत गाठता आलेले नाही. त्यामुळे सत्ता स्थापन करण्यासाठी भाजप आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना यांच्यात युती होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबई, ठाणे, जळगाव यासारख्या प्रमुख शहरांमध्ये हे दोन्ही पक्ष एकत्र येऊन सत्ता प्रस्थापित करू शकतात.

या पार्श्वभूमीवर मुंबईचा महापौर कोण होणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित आहे; मात्र आता भाजपने शिंदे यांच्या शिवसेनेकडे एकत्रित गट स्थापनेचा प्रस्ताव पाठवला असून, यामुळे लवकरच महापौर निवड प्रक्रिया मार्गी लागू शकते.



महापालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर शिंदे यांच्या पक्षाने भाजपाकडे अडीच वर्षांसाठी महापौरपदाची मागणी केली होती. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दावोस दौऱ्यावर असल्याने महापौर निवडीची प्रक्रिया रखडली होती. आता फडणवीस परतल्यानंतर महायुतीच्या गोटात हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. भाजपाने शिंदे शिवसेनेला एक मोठा प्रस्ताव पाठवला आहे, ज्यामुळे दोन्ही पक्षांच्या संबंधात नवे वळण येऊ शकते. भाजपने शिंदे गटाला एकत्रितपणे गट स्थापन करून त्याची नोंदणी करण्याचा प्रस्ताव दिला आहे. यामुळे मुंबई महापालिकेत महापौर निवडताना आणि कारभार चालवताना दोन्ही पक्षांची ताकद एकत्र राहील, तसेच बहुमताचा आकडा अधिक भक्कम होईल. या प्रस्तावात भाजपाने गटनेतेपद स्वतःकडे ठेवण्याची आणि शिंदे शिवसेनेकडे प्रतोद पद देण्याची तयारी दाखवली आहे. यामुळे दोन्ही पक्षांना फायदा होऊ शकतो, कारण एकत्रित गटामुळे (पान २ वर)

### शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा पेच कायम!

**नवी दिल्ली :** संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादाची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली. न्यायालयाने आता या प्रकरणासाठी १८ फेब्रुवारी ही नवी तारीख निश्चित केली असून, यामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांपूर्वी सुनावणी घेण्याची ठाकरे गटाची मागणी फेटाळली गेली.

यापूर्वी २१ जानेवारी रोजी होणारी सुनावणी अरावली पर्वताच्या प्रकरणामुळे टळली होती. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिलेले नाव आणि चिन्ह, तसेच विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाविरोधात दाखल याचिकांवर आता एकत्रित सुनावणी होईल. वारंवार मिळणाऱ्या तारखांमुळे ठाकरे गटाने नाराजी व्यक्त केली असून, निवडणुकांचे निकाल लागल्यानंतरच आता या न्यायालयीन लढाईचा पुढचा अंक पाहायला मिळेल. साधारण तीन-साडेतीन तीन वर्षांपूर्वी शिवसेना पक्षात फूट पडली आणि शिवसेना शिंदे गट व उद्धव ठाकरे गट असे दोन गट पडले. मूळ शिवसेना कोणाची ?

## सर्वोच्च न्यायलयाची महाराष्ट्र सरकारला नोटीस

### 'तो' अहवाल रद्द करण्याची याचिकेत मागणी

नवी दिल्ली, दि. २७ वृत्तसंस्था



बांठिया आयोगाच्या कायदेशीर वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला मंगळवारी नोटीस बजावली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मागासवर्गीयांना राजकीय आरक्षण देण्यात अपयशी ठरल्यामुळे बांठिया आयोगाचा अहवाल सुध्दा रद्द करण्यात यावा अशी मागणी याचिकाकर्त्यांनें केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी युथ फॉर इक्वॅलिटी फाउंडेशनच्या याचिकेवर महाराष्ट्र शासनाला नोटीस बजावली आहे.

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ डी (६) आणि २४३ टी (६) नुसार राजकीयदृष्ट्या मागासलेल्या वर्गांची ओळख पटवण्यासाठी एक नवीन आयोग स्थापन करण्याचे निर्देश देण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र सरकारने बांठिया आयोगाच्या अहवालानुसार आरक्षण लागू केले आहे; मात्र हा निर्णय राजकीय मागासलेपणाचा शास्त्रशुध्द अभ्यास न करता आणि के. कृष्णमूर्ती विरुद्ध भारत सरकार प्रकरणात न्यायालयाने दिलेल्या ट्रिपल टेस्टची पूर्तता न करता घेण्यात आला आहे, असे याचिकाकर्त्यांनें न्यायालयात सांगितले आहे. न्यायालयाने ट्रिपल टेस्टच्या आदेशात म्हटले आहे, की राज्याने राजकीय मागासलेपणाची सखोल चौकशी करण्यासाठी एक समर्पित आयोग नियुक्त करावा, प्रत्यक्ष कमी प्रतिनिधित्वाच्या आधारावर प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी आरक्षणाची व्याप्ती निश्चित करावी आणि एकूण आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही याची खात्री करावी; मात्र महाराष्ट्र सरकारने नवीन आणि समकालीन अभ्यास करण्याऐवजी पूर्वीच्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग आणि अन्य मागास वर्गाचा डाटा तसेच २०२२ च्या बांठिया आयोगाच्या अहवालानुसार कारवाई केली, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

## लढतीचे चित्र स्पष्ट | राज्यात बिनविरोध पॅटर्न सुरूच!

# मतदानाआधीच महायुतीचे २२ उमेदवार विजयी

रायगड, दि. २७ वृत्तसंस्था

**राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज अखेरचा दिवस होता. त्यामुळे १५ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती निवडणुकांमधील अंतिम लढतीचे चित्र स्पष्ट झालं असून, आता सर्वत्र प्रचाराचा धुरळा उडण्यास सुरुवात होणार आहे.**



कोकणात महायुतीने विजयी खाते उघडले असून, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकी आधीच महायुतीचे तब्बल २१ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामध्ये, रायगड जिल्ह्यातील महाड पंचायत समितीत सवाने धामणे गणातून अनिल जाधव बिनविरोध आल्याने महायुतीचे एकूण २२ उमेदवार बिनविरोध झाले आहेत.

शिंदेसेनेचे महाड पंचायत समिती निवडणुकीत सवाने धामणे पंचायत समिती गणातून उभे असलेले अनिल जाधव यांच्या विरोधात असलेल्या उमेदवारांनी शेवटच्या दिवशी माघारी घेतल्याने अनिल जाधव हे बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे शिंदेसेनेने आपला पहिला बिनविरोध विजय मिळवत रायगडमध्ये जल्लोष केला आहे. मंत्री भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले यांनी शिवसैनिकांना पेढा भरवत आनंद साजरा केला आहे. सिंधुदुर्गात भाजपचे १९ तर शिंदेसेनेचे २ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे, मतदानापूर्वी या उमेदवारांनी विजयाचा गुलाल उधळला आहे. राज्यात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता; मात्र निवडणुकांपूर्वीच काहींनी विजयाचा गुलाल उधळला आहे.

### 'सातारा गॅझेटियर' लवकरच लागू होणार!

**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून प्रलंबित असलेले 'सातारा गॅझेटियर' लवकरच लागू करण्याचे संकेत दिलेत. मंत्रालयात पार पडलेल्या मराठा आरक्षण उपसमितीच्या बैठकीत यासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर हैदराबाद गॅझेटियर लागू झाले असले तरी सातारा गॅझेटियरची प्रतीक्षा होती. आचारसंहितेच्या तांत्रिक अडचणींमुळे हा निर्णय प्रलंबित होता, मात्र आता राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका संपताच याची अंमलबजावणी केली जाणार आहे. यामुळे मराठा समाजातील पात्र उमेदवारांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षणाचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर होणार असून, समाजातील संभ्रम दूर करण्यास मदत होणार आहे.

## जैश आणि अल-कायदाचा हस्तक फैजान शेख अटकेत

### घातपाताचा मोठा कट उधळून लावण्यात पोलिसांना यश

नवसारी, दि. २७ वृत्तसंस्था



गुजरात दहशतवादविरोधी पथकाने एका मोठ्या गुप्त मोहिमेद्वारे दहशतवादी कारवायांमध्ये गुंतलेल्या फैजान शेख याला अटक केली आहे. आरोपी फैजान हा जैश-ए-मोहम्मद आणि अल-कायदा यांसारख्या धोकादायक दहशतवादी संघटनांच्या विचारसरणीने कट्टरपंथी बनला होता. त्याच्या अटकेमुळे गुजरातमध्ये रचला जाणारा एक मोठा घातपाताचा कट वेळेत उधळून लावण्यात पोलिसांना यश आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फैजान शेख हा मूळचा उत्तर प्रदेशातील रामपूर जिल्ह्यातील नरपत नगरचा रहिवासी आहे. तो गेल्या काही काळापासून नवसारीच्या चारपुल परिसरात आपली ओळख लपवून राहत होता. गुजरात एटीएस त्याच्या संशयास्पद हालचालींवर गेल्या अनेक दिवसांपासून लक्ष ठेवून होती. अखेर ठोस पुरावे मिळाल्यानंतर एटीएसने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे, की फैजान शेख हा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करून जैश आणि अल-कायदाच्या कट्टरपंथी विचारसरणीचा प्रचार करत होता. तो केवळ (पान २ वर)

## पान 1 वरून...

### मुंबईचा महापौर : भाजपने ...

विरोधकांना आव्हान देणे सोपे होईल.

**शिंदे गटाची स्वतंत्र गट नोंदणी रखडली :** एकनाथ शिंदे यांच्या नगरसेवकांनी आज (२७ जानेवारी २०२६) स्वतंत्रपणे गट नोंदणी करण्याची तयारी केली होती. मात्र, ही प्रक्रिया लांबणीवर पडली आहे. भाजपाच्या एकत्रित गट स्थापनेच्या प्रस्तावामुळे शिंदे गट आता यावर विचार करत आहे. जर हा प्रस्ताव मान्य झाला, तर मुंबई महापालिकेत महायुतीची सत्ता अधिक मजबूत होईल आणि महापौर निवड लवकर होऊ शकते.

### जैश आणि अल-कायदाचा ....

स्वतः कट्टरपंथी बनला नव्हता, तर ऑनलाइन माध्यमातून इतर तरुणांनाही हिंसाचारासाठी चिथावणी देण्याचे काम करत होता. त्याच्या सोशल मीडिया अकाउंट्सवरून आक्षेपार्ह मजकूर जप्त करण्यात आला आहे. एटीएसच्या प्राथमिक तपासात असे उघड झाले आहे, की फैजानने हत्येच्या उद्देशाने बेकायदेशीर शस्त्रे आणि दारुगोळा मिळवला होता. त्याने ही शस्त्रे कोठून मिळवली आणि त्याचे स्थानिक पातळीवर कोणाशी संबंध आहेत, याचा तपास आता सुरक्षा यंत्रणा करत आहेत. या अटकेमुळे एक संभाव्य टार्गेट किलिंग किंवा मोठा हल्ला टळल्याचे बोलले जात आहे. सुरक्षा यंत्रणा आता फैजानच्या संपर्कात असलेल्या इतर लोकांचा शोध घेत आहेत. वेळेत केलेल्या या कारवाईमुळे मोठा धोका टळला आहे; मात्र या प्रकरणाची व्याप्ती मोठी असू शकते, त्यामुळे तपास सुरू आहे, असे एटीएस गुजरातच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# सर्वार्थाने आत्मनिर्भर भारत घडविण्याची जबाबदारी युवा पिढीने स्वीकारावी:कुलगुरू

## अकोला कृषी विद्यापीठात 'आव्हान चान्सलर्स ब्रिगेड २०२५-२६' राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिराचा भव्य समारोप

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**अकोला, दि. २७ :**युवकांचा देश म्हणून संपूर्ण विश्वावर आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या भारताची युवा शक्ती आता शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक व अध्यात्मिक दृष्ट्या अधिक सक्षम व संस्कारित होत असून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणाऱ्या देशाचे उज्ज्वल भवितव्य घडविण्यासाठी ती सज्ज आहे, असे आशादायी प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा कुलपती मा. आचार्य देवव्रत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व विद्यापीठांतील (कृषी व अकृषी) विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण करणे, कौशल्य व नेतृत्वगुण विकसित करणे, तसेच नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्तीमुळे होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान व सामाजिक अव्यवस्था टाळण्यासाठी सक्षम स्वयंसेवकांची फौज उभारण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित "महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिर आव्हान (चान्सलर्स ब्रिगेड) २०२५-२६" या सात दिवसीय राज्यस्तरीय निवासी शिबिराचे आयोजन अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात करण्यात आले होते.

१७ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या शिबिराच्या समारोपप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या सात दिवसीय शिबिरात विद्यार्थ्यांना वैयक्तिक व कौटुंबिक आपत्कालीन सुरक्षितता, सामुदायिक ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन, भूकंप, वीज पडणे, चक्रीवादळ, भूस्खलन, जंगलातील वणवा आदी प्रसंगी काय करावे व काय करू नये याचे सखोल व कृतियुक्त प्रशिक्षण देण्यात आले. या ज्ञानाचा समाजहितासाठी प्रभावी उपयोग करावा, असे आवाहनही कुलगुरू डॉ. गडाख यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना केले. डॉ. शरद गडाख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समारोपीय सत्रास एनडीआरएफ पुणेचे कमांडंट दीपक तिवारी, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य शिवराम घोडके, संचालक शिक्षण डॉ. देवानंद पंचभाई, संचालक संशोधन डॉ. शामसुंदर माने, संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. अरविंद सोनकांबळे, निरीक्षण समितीचे सदस्य डॉ. सतीश कोलते, डॉ. हेमंत वऱ्हातकार, डॉ. रामेश्वर कोठावळे, डॉ. मिलिंद काळे, वित्तीय व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. तानाजी चौगुले, भास्कर पाथरे, कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे, सहयोगी अधिष्ठाता निम्न कृषी शिक्षण डॉ. राजेंद्र काटकर, विद्यापीठ अभियंता इंजि. सुनील थोटांगे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे आदी मान्यवरांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

### सहभागी विद्यापीठे

या शिबिरात मुंबई, अमरावती, नागपूर, सोलापूर, नांदेड, राहुरी, परभणी, दापोली, नागपूर (पशु व मत्स्य विज्ञान), सातारा, वर्धा, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अकोला, रामटेक, गडचिरोली, कोल्हापूर, नाशिक, लोणेरे, मुंबई (होमी बाबा), सिंध नॅशनल, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक आदी राज्यातील प्रमुख विद्यापीठांनी सहभाग नोंदविला.

# सेंट स्टीव शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांचे 'ऑपरेशन सिंदूर' थीमवर भावनिक सादरीकरण



**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**नवी मुंबई, दि. २७ :** सेंट स्टीव शाळेत ७७वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष कार्यक्रमाची मुख्य थीम 'ऑपरेशन सिंदूर' असून, लहान विद्यार्थ्यांनी या विषयावर आधारित भावनापूर्ण व प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लेझीम डान्स, डंबेल ड्रिल डान्स तसेच देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. शिस्तबद्ध हालचाली, जोशपूर्ण नृत्य आणि देशप्रेम जागवणाऱ्या गीतांमुळे संपूर्ण परिसर देशभक्तीमय झाला होता. या कार्यक्रमाला शाळेचे ट्रस्टी फीडल थॉमस तसेच शिक्षकवर्गाची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन करून कार्यक्रम यशस्वी केला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध व प्रेरणादायी ठरला असून, विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, एकता आणि राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव निर्माण करण्याचा उद्देश यशस्वीरीत्या साध्य झाल्याचे दिसून आले.

# हक्काच्या पैशांसाठी बळीराजा आक्रमक; अकोल्यात शेतकऱ्याचा आत्मदहनाचा इशारा

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. २७ :** शासकीय हमीभाव केंद्रावर सोयाबीन विकून वर्ष उलटले तरी पैसे न मिळाल्याने, बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथील एका हताश शेतकऱ्याने आत्मदहनाचा इशारा दिला आहे. श्री. बाबुराव शिवशंकर माळी (रा. झाडेगाव, ता. शेगाव) असे या शेतकऱ्याचे नाव असून, त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे यासंदर्भात लेखी निवेदन सादर केले आहे.

बाबुराव माळी यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांनी त्यांचे सोयाबीन अंदुरा (ता. बाळापूर, जि. अकोला) येथील नाफेड केंद्रावर विक्रीसाठी नेले होते. या व्यवहाराच्या सर्व रीतसर पावत्या त्यांच्याकडे आहेत. मात्र, विक्री करून एक वर्ष उलटून गेले तरी अद्याप त्यांच्या बँक खात्यात सोयाबीनचे पैसे जमा झालेले नाहीत.

प्रशासकीय कारवाई झाली, पण शेतकरी मदतीपासून वंचित

या प्रकरणाबाबत माळी यांनी मार्च २०२५ मध्ये जिल्हाधिकारी आणि पणन विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. त्यानंतर प्रशासनाने अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनीवर गुन्हे दाखल करून तिला काळ्या यादीत टाकले. मात्र, कंपनीवर कारवाई झाली असली तरी, प्रत्यक्ष शेतकऱ्याला त्याचे हक्काचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. "प्रशासकीय कारवाईचा मला शेतकरी म्हणून काहीच फायदा झाला नाही," अशी खंत त्यांनी पत्रात व्यक्त केली आहे. येत्या ३० जानेवारी २०२६ पर्यंत जर सोयाबीनचे पैसे खात्यावर जमा झाले नाहीत, तर अंदुरा ॲग्रो प्रोड्युसर कंपनीसमोर आत्मदहन करणार असल्याचे माळी यांनी निवेदनात म्हटले आहे. या घटनेला अंदुरा ॲग्रो कंपनीसह, नाफेडचे राज्य प्रमुख आणि पणन महासंघाचे अधिकारी जबाबदार असतील, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# हिंद-दी-चादर समागम कार्यक्रमात दुसऱ्या दिवशी भाविकांची अलोट गर्दी

## बोले सो निहाल सत श्री अकाल च्या जयघोषात लाखो भाविकांनी घेतले दर्शन

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**नांदेड, दि. २७ ::**'हिंद-दी-चादर' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे आयोजित भव्य कार्यक्रमात मान्यवरांसह लाखो भाविकांनी "वाहे गुरु" व "बोले सो निहाल सत श्री अकाल" च्या जयघोषात श्री गुरु ग्रंथसाहिबजी यांचे पावन दर्शन घेतले.

आज दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच मोदी मैदान येथे दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला आहे. गदेशातील विविध राज्यातून आलेल्या सर्व धर्माच्या भाविकांनी शांतता, शिस्त व श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेत आहेत. आयोजकांच्यावतीने चोख व्यवस्था करण्यात आली असून स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम सुरळीतपणे सुरू आहे. भाविकांच्या भोजनासाठी भव्य लंगरची व्यवस्था केली असून भाविक याचा लाभ घेताना दिसून येत आहेत. गुरुद्वारातर्फे भाविकांसाठी अखंड कीर्तन सुरू आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी भाविकांसाठी लोकसहभागातून चहा, अल्पोपहार, ज्यूस, विविध स्टॉल उभारण्यात आलेले आहेत.

# अकोला केमिकल्स कंपनी विरोधात प्रदुषणाचे उपोषण अखेर स्थगीत



**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :** दि.२३.०१.२०२६ पासुन अकोला केमिकल्स कं.लि. या उद्योगातील दुषीत पाणी व वायू प्रकरणी सुरु केलेले उपोषण गृहराज्य मंत्री तथा अध्यक्ष महाराष्ट्र प्रदुषण नियामक मंडळ मुंबई ना. योगेश कदम यांनी प्रकाशभाऊ पोहरे, मा.आ. गोपीकिषन बाजोरीया व आ. नारायणराव गव्हाणकर यांच्या मध्यस्थी नंतर त्यांनी त्वरित कंपनी विरोधात कार्यवाहीचे आदेश निर्गमित करण्याचे आश्वास्त केल्या नंतर जगदीश मुरुमकार व सुरेश मुरुमकार व गावकरी शिवणी शिवर यांचे मार्फत सुरु केलेले आमरण उपोषण उपोषण करत्यांना उसाचा रस देवून पूर्ण कार्यवाही होई पर्यंत स्थगीत करण्यात आले व प्रदुषण मंडळ अकोला व विभागीय कार्यालय अमरावती यांनी महाराष्ट्र प्रदुषण मंडळ मुंबई यांचे कडे कंपनीवर पुढील कार्यवाही करिता दिलेला अहवाल आणखी सकारात्मक रित्या दुरुस्ती करून पाठविण्यात येईल असे विभागीय प्रादेशिक अधिकारी पाटील अमरावती यांनी यावेळी सदर उपोषण स्थळी सर्वांसमोर घोषीत केले व येथील मर्केप्टन या विषारी वायुबाबत नव्याने खुलासा करून पाठवितो, असे सांगीतले. उपोषण थांबविण्याची विनंती केली व नंतर त्यांनी उपोषण करत्यांचे आभार व्यक्त केले यावेळी श्री विठ्ठल सरप जिल्हा शिवसेना नेते यांनी मुख्यकार्यालय मुंबई यांच्याशी संपर्क साधुन महत्वाची भूमिका पार पाडली यासाठी धनंजय मिश्रा पत्रकार, अण्णा ताले, शेख साबीर यांनीही परिश्रम घेतले या प्रसंगी कृष्णाभाऊ अंधारे, राहुल दातकर, दीपक गावंडे, सुधीर साकरकार, दिवाकर गावंडे, अभिषेक मुरुमकार, पंकज साबळे (मनसे प्रमुख), आशिष पवित्रकार (नगरसेवक), गिरीश गोखले, प्रदीप गुरुकुद्दे, योगेश अग्रवाल (शिवसेना नेते) इत्यादी सह शिवणी शिवर गावांतील नागरीक मुरूमकार बांधव अनेक पत्रकार बंधु अनेक वाहिन्याचे प्रतिनिधी हे उपस्थित होते.

# नागरिकांनी वाहतूक नियामांचे पालन करावे-सुमय्या अली



**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :** अकोला आरटीओ कार्यालय येथे गणतंत्रदिवस मोठया उत्साहने साजरा करणयात आला या कार्यक्रमात सुमय्या अली राष्ट्रीय अध्यक्ष नारी शक्ति सेवा फाउंडेशन यांचे सामाजिक कार्यांची तसेच त्यांना मिळालेले अनेक पुरस्कारांची दखल घेउण सुमय्या अली यांचा जंगी सत्कार करणयात आला या वेळी सुमय्या अली हया आपल्या भाषणात म्हणालया की नगरीकांनी वाहतुक चालवतांना वाहतुक नियामांचे पूर्णपणे पालन करने अत्यंत गरजेचे आहे जेने करूण मोठया प्रमाणात अपघातावर आढा बसवता येईल ज्या वेळेला वाहतुक पोलीस गाळया अढवतात तेव्हा बरेशशे लोका मला फोन करतात की मॅम पोलीसवाल्यांनी आमची गाळी अढवली तेव्हा माझा एकच प्रश्न असते कि पहले मला हे सांगा की तुम्हीं कोणत्या नियमांचा उलंघण केला आहे तेव्हा समोरचा म्हणते की मॅम माझ्या जवळ लायसेंस नाही आहे तेव्हा मी त्यांना स्पष्ट पणे सांगते की गाड़ी चालवणयाकरीता सर्व प्रथम लाइसेंस आवश्यक आहे तसेच इतर नियमांचे पालण करणे सुद्धा अत्यंत गजचे आहे कार्यक्रमाला लाभलेले प्रमुखपाहुणे तसेच आलेले सर्व महिला व पुरुषांनी सुमय्या अली यांचे मणापासून कौतुक केले या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आरटीओ मोटर इंस्पेक्टर त्रिवेणी गॅलींडे, डॉक्टर रेखा पाटील, दीपमाला भटकर शिक्षण विस्तार अधिकारी जिल्हा परिषद आदि मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्र संचालन पल्लवी डोंगरे यांनी तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक सहायकनिरीक्षक प्रियंका राउत आणि आभार प्रदर्शन मनीषा पांचाळ सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक यांनी केले या वेळी महिला व पुरुष सैकडोंच्या संख्याने उपस्थित होते.

# संत तुकाराम महाराज बीजोत्सवानिमित्त कीर्तन महोत्सवाचे आयोजन

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**





**अकोला, दि. २७ :** गायत्री नगर मध्ये अकोला : स्थानिक कौलखेड रोड, गायत्री नगर, अकोला येथील संत तुकाराम महाराज बीजोत्स सेवा समितीची बैठक गायत्री मंदिराच्या प्रांगणात नुकतीच घेण्यात आली असून सर्वानुमते मागील पाच वर्षाप्रमाणे याही वर्षी संत तुकाराम महाराज बिजोसवाच्या शुभ-परवावर म्हणजेच दिनांक ५ मार्च ते १३ मार्च दरम्यान भव्य दिव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन ह भ प प्रशांत महाराज ताकोते यांच्या मार्गदर्शनात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सोहळ्यात स्वच्छता व पारदर्शकता वाख्याण्याजोगी असून अकोला शहरच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील भाविकांना उत्सुकता आहे. बैठकीला समितीचे सर्व कार्यकर्ते मंडळी व नव्याने सदस्यत्व घेतलेले मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कीर्तन महोत्सव सोहळा नऊ दिवसाचा असून दररोज महाराष्ट्रातील ख्यात्म नाम कीर्तनकारांचे कीर्तने आयोजित करण्यात आली आहे.

विशेष म्हणजे हा बीजेचा सोहळा होळी, धुलीवंदनाला लागून असल्यामुळे धुलीवंदन न खेळता यादरम्यान कीर्तन महोत्सव आध्यात्मिक वातावरणात परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने मोठ्या उत्साहात करण्यात येतो. या सोहळ्यामध्ये श्री संत तुकाराम महाराज बीज उत्सव श्री संत एकनाथ महाराजांची षष्ठी व तिथीनुसार शिवजयंती असा त्रिवेणी संगम येत असून यावर्षी नामांकित कीर्तनकाराची कीर्तने होणार आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संत तुकाराम महाराज बीज उत्सव सेवा समिती गायत्री नगर कौलखेड यांनी केले आहे.

# हरविलेल्या बालकांचा सोशल मीडियामुळे लागला शोध

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. २७ :** शासकीय बालगृह अकोला येथील प्रवेशित २ बालके ही सरस्वती शाळा तुकाराम चौक येथून दिनांक १० जानेवारी २०२६ पासून हरवली होती शाळेच्या आजुबाजूच्या परिसरात रेल्वे स्टेशन बस स्थानक या भागात शोधा शोध करण्यात आला तसेच या बालकांच्या नातेवाईकां सोबत संपर्क साधण्यात आला मात्र बालके न मिळून आल्याने खदान पोलिस स्टेशन येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

पोलीस यांनी सुद्धा त्यांचा शोध घेतला मात्र शोध लागत नव्हता तेव्हा वृत्तपत्रात बालके हरविल्याची बातमी प्रकाशित करण्यात आली ती बातमी व्हॉट्सअँप फेसबुक अशा विविध माध्यमांद्वारे व्हायरल करण्यात आली सूर्योदय बालगृह चे अधीक्षक श्री शिवराज पाटील यांनी सुद्धा ती बातमी व्हॉट्सअँप फेसबुक वर टाकली तेव्हा त्यांना पुणे येथून फोन आला ही बालके पुणे येथील संस्थेत आहेत तेव्हा शिवराज पाटील यांनी तात्काळ ही माहिती बाल कल्याण समिती अकोला, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, शासकीय बालगृह च्या अधीक्षक, खदान पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांना भ्रमणध्वनी द्वारे दिली व आज दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी अकोला पोलिस यांचे माध्यमातून अकोल्यात आली व बालकल्याण समिती अकोला यांचे आदेशाने त्यामधील एका बालकास पुन्हा शासकीय बालगृह येथे दाखल करण्यात आले आणि एका बालकास पालकाच्या स्वाधीन करण्यात आले.

# मराठा पाटील समाज संवाद पदयात्रेचा वाडेगावात भव्य समारोप

**अकोला :** मराठा पाटील समाजात वैचारिक प्रबोधन, सामाजिक संवाद आणि एकतेची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित मराठा पाटील समाज संवाद पदयात्रेचा आज प्रजासत्ताक दिनी, २६ जानेवारी २०२६ रोजी वाडेगाव येथे भव्य व प्रेरणादायी समारोप होत आहे.ही संवाद पदयात्रा स्व. राजदत्त गुरुदत्त मानकर, संस्थापक अध्यक्ष, मराठा पाटील समाज संघ तालुका बाळापूर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित करण्यात आली असून, १७ जानेवारी २०२६ रोजी काजीखेड येथून तिचा प्रारंभ झाला. तालुक्यातील विविध गावांतून मार्गक्रमण करत समाजातील प्रश्न, अपेक्षा, अडचणी व उपायांवर संवाद साधत ही पदयात्रा आज वाडेगाव येथे दाखल होत आहे.

आज सकाळी ९.०० वाजता योगेश पाटील भटकर यांच्या निवासस्थानावरून टाळमृदुंगाच्या गजरात, वारकरी परंपरेची अनुभूती देणारी संवाद पदयात्रा (दिंडी) वाडेगावच्या प्रमुख मार्गांवरून निघणार असून, तिचा समारोप श्री जागेश्वर मंदिर, वाडेगाव येथे होणार आहे.स्व. राजदत्त मानकर यांच्या प्रथम जयंती दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात समाजातील सर्व स्तरांतील बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या संवेदना व्यक्त कराव्यात, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. समाजहितासाठी अखंड कार्यरत असलेल्या स्व. मानकर यांच्या विचारांना आणि कार्याला ही पदयात्रा एक भावपूर्ण मानवंदना ठरत आहे. समारोप कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले असून, हा कार्यक्रम समाजबंध अधिक दृढ करणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# थंडीच्या कडाक्यात निराधारांना मायेची ऊब

## श्री छत्रपती प्रतिष्ठानकडून ब्लँकेटचे वाटप

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अकोला, दि. २७ :**सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असणाऱ्या अकोल्यातील श्री छत्रपती प्रतिष्ठान व रक्तमित्र संघटनने यावर्षी देखील आपला सामाजिक बांधिलकीचा वारसा जपत थंडीच्या कडाक्यात निराधारांना मदतीचा हात दिला आहे. अकोला शहरातील हिवाळ्यातील वाढती थंडी लक्षात घेता, १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत श्री छत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने शहरातील विविध भागात रस्त्याच्या कडेला आणि मंदिराबाहेर आसरा घेणाऱ्या सुमारे १५० निराधार व्यक्तींना ब्लँकेट आणि खाद्यपदार्थांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत रेल्वे स्टेशन परिसर, टॉवर चौक, मध्यवर्ती बस स्थानक, अशोक वाटिका चौक, सिंधी कॅम्प पुलाखालील भाग, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, रिझर्व माता मंदिर आणि शहरातील इतर मुख्य रस्त्यांच्या कडेला राहणाऱ्या गरजूंचा शोध घेऊन त्यांना ब्लँकेट प्रदान करण्यात आले. समाजातील उपेक्षित घटकांना रात्रीच्या थंडीपासून संरक्षण मिळावे या उदात्त हेतूने हे अभियान राबवण्यात आले. या संपूर्ण सेवाकार्यात श्री छत्रपती प्रतिष्ठान अकोलाचे सर्व पदाधिकारी आणि सहकारी मित्र परिवाराने मोलाचे सहकार्य व श्रमदान केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल प्रतिष्ठानचे अध्यक्ष विपुल माने यांनी सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले असून, संस्थेच्या वतीने वर्षभर असेच विविध सामाजिक उपक्रम राबविले जातील असा मानस व्यक्त केला आहे.

**मेळावा** | लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघाचा ५३ वा विचारमंथन मेळावा संपन्न

# परीक्षेपुरते पाठांतर हे गुणवंत होण्याचे लक्षण नाही- प्रकाश अंधारे

**अजिंक्य भारत। प्रतिनिधी**




**अकोला, दि. २७ :** महापुरूषांच्या जीवनावर भाषणं करणारांना नंतर त्यातली माहिती विचारली तर सांगता येत नाही. शाळांमधील २० ते ३० टक्के विद्यार्थ्यांना लिहता वाचता येत नाही. दर १० वर्षांनी अभ्यासक्रम आणि अध्ययन तंत्र बदलल्यानंतर अगोदरची फलनिष्पत्ती काय ते सुध्द बघितलं जात नाही.अशा शिक्षणात नुसती परीक्षेपुरती प्रश्नांची उत्तरे पाठ करून यश मिळवणे ही गुणवंत होण्याची लक्षणे नाहीत.या विद्यार्थ्यांना गुणवंत नव्हे तर मार्कवंत म्हणावे लागेल. ही अधोगती विषद करणारे वास्तवतावादी प्रतिपादन निवृत्त उपशिक्षणाधिकारी व शिवाजी शिक्षण संस्थेचे सनियंत्रण अधिकारी,शैक्षणिक सेवाव्रती,प्रकाश अंधारे यांनी केले. लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ या अ.भा.समाजाभिमुख राष्ट्रीय संघटनेचा ५३ वा विचारमंथन मेळावा स्थानिक जठारपेठेतील जैन रेस्ट्रो येथे नुकताच संपन्न झाला त्यावेळी अध्यक्षपदावरून ते बोलत होते.लोकस्वातंत्र्यचे व्यापक संघटन,उपक्रम व पत्रकार आणि समाज कल्याणाच्या सातत्यपूर्ण प्रवासाचा त्यांनी यावेळी गौरव केला. याप्रसंगी साहित्यिक व शैक्षणिक सेवाव्रती प्रा.डॉ.सुहास उगले हे प्रमुख अतिथी म्हणून तर लोकस्वातंत्र्यचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संजय देशमुख,कादंबरीकार पुष्पराज गावंडे, डॉ.निलेश पाटील,पत्रकार हाजी सज्जाद हुसैन, प्रा.डॉ.किरण वाघमारे यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सर्वप्रथम लोकस्वातंत्र्यचे सामाजिक अधिष्ठाण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,कर्मयोगी संत गाडगे बाबा यांना वंदन अभिवादन करण्यात आले,वहिद जवान,आत्महत्याग्रस्त शेतकरी,महिला बळी,दिवंगत पत्रकार,आपत्ती व अपघात बळींना यावेळी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.प्रदिप खाडे यांनी अतिथी आणि प्रमुख उपस्थितांचा सविस्तर परिचय दिला.अतिथींचे पुरस्कारांनी सन्मान करण्यात आले.तथा पत्रकार दिन कार्यक्रमानंतर उर्वरीत पत्रकारांना सुध्दा लोकस्वातंत्र्य प्रभावी पत्रकारिता सेवा गोरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.स्व किसनराव हुंडीवाले बहूचर्चित हत्या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून सत्याची बाजूने महत्वपूर्ण भुमिका घेतल्याबद्दल ॲड.नितीन धूत यांचा यावळी सत्कार करण्यात आला.संजय देशमुख यांनी दिनदर्शिका जाहिराती,झालेला खर्च आणि पत्रकार दिनाच्या कार्यक्रमाला पदाधिकारी आणि सभासदांच्या सहयोगातून झालेल्या रू.३० हजारांच्या खर्चाचा आढावा सादर केला. यावेळी प्रा.सुहास उगले, पुष्पराज गावंडे,डॉ.निलेश पाटील,हाजी सज्जाद हुसैन, प्रा.डॉ. किरण वाघमारे,सी.ए.तुषार तल्हार यांनी सुध्दा संघटनेच्या सेवाभावी प्रवासाला आणि शिस्त आणि कल्पकतेला कौतुकास्पद संबोधून शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे संचलन दिपाली बाहेकर यांनी तर आभारप्रदर्शन पुष्पराज गावंडे यांनी केले. व्यवस्थापन सतिश देशमुख,पंजाबराव वर,सागर लोडम, श्रीकृष्ण माळी यांनी पाहिले.

## महत्त्वाचे

### पाकिस्तानकडून शस्त्रांची जमवाजमव

नवीदिल्ली:पाकिस्तान हा भारताविरोधात नेहमीच काहीतरी कुरापत्या करत असतो. सध्या एक मोठी अपडेट समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार पाकिस्तान शस्त्रांची जमावजमव करत आहे.पाकिस्तान भारताविरोधात नेमहीच काहीतरी कुरापत्या करत असतो. ऑपरेशन सिंदूरनंतरही पाकिस्तानच्या भूमिकेत अद्याप बदल झालेला नाही. असे असतानाच आता पाकिस्तानातून एक मोठी आणि महत्त्वाची माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार पाकिस्तानची काही विमानं शस्त्र आणण्यासाठी थेट चीनमध्ये गेली होती. या विमानांत एअरक्राफ्ट मिसाईल्स आणि अन्य शस्त्र पाकिस्तानात नेण्यात आलेल्याचे बोलले जात आहे.भारताने हल्ले केलाच तर उत्तरादाखल आपण तयार असावे, असा हेतू या कथितपणे शस्त्रास्त्र खरेदीमागे असल्याचे बोलले जात आहे. पाकिस्तानी वायूसेनेची -७८ ही व रिफ्यूलिंग विमाने चीनमधून जाऊन आल्याचे बोलले जात आहे.

### मदर ऑफ ऑल डील्सने अमेरिकेचा जळफळाट !

**नवीदिल्ली:**भारत आणि युरोपीय संघ यांच्यातील मुक्त व्यापार करार वाटाघाटी पूर्ण झाल्या आहेत, ज्याला मदर ऑफ ऑल डील्स म्हटले जात आहे. अमेरिकेने रशियाकडून तेल खरेदी केल्याने भारतावर टॅरिफ लादले आहेत, ज्यामुळे जागतिक व्यापार संबंधात तणाव वाढला आहे.भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात दीर्घकाळ चाललेल्या मुक्त व्यापार करार वाटाघाटी अखेर पूर्ण झाल्या आहेत. सर्व जगाचं लक्ष याकडे लागलेलं होतं. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणांमुळे जगभरातील अनेक देशांसोबतच्या व्यापार संबंधांमध्ये तणाव वाढलेला असतानाच, अशा वेळी हे पाऊल उचलण्यात आले आहे. रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल अमेरिकेने भारतावर जोरदार आरोप केले आहेत.भारत आणि युरोपियन युनियनमधील वाटाघाटी २००७ साली सुरू झाल्या. आता, हा करार ''कायदेशीर छाननीसाठी'' तयार आहे असं दोन्ही बाजूंकडून सांगण्यात आलं आहे. २७ जानेवारी म्हणजे आजच याची औपचारिक घोषणा होऊ शकते.

### आईकडून ११ वर्षीय मुलाचा गळा चिरून खून

**पुणे :** पुणे शहरात विविध गुन्ह्यात वाढ झालेली असताना पुण्यातील वाघोली येथे धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातील वाघोली परिसरात मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. एका आईनं स्वतःच्या ११ वर्षांच्या मुलाचा गळा चिरून खून केला आहे. तर १३ वर्षांच्या मुलीवरही प्राणघातक हल्ला करण्यात आला असून, सुदैवानं ती मुलगी बचावली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी आईला ताब्यात घेतलं आहे तर जखमी मुलीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेत ११ वर्षांचा मुलगा साईराज संतोष जायभाय याचा जागीच मृत्यू झाला. तर १३ वर्षांची मुलगी धनश्री संतोष जायभाय गंभीर जखमी झाली असून तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर परिसरात प्रचंड तणावाचं वातावरण आहे. वाघोलीत अवघ्या दोन दिवसांत घडलेली ही दुसरी निर्दयी घटना असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ही घटना वाघोली येथील बाईफ रोड परिसरात घडली आहे. सोनी संतोष जायभाय, मूळ रहिवासी कंधार, जिल्हा नांदेड, सध्या वाघोली येथे बायफ रोडवर वास्तव्यास असलेल्या महिलेनं हे कृत्य केलं आहे.

# रशियाचा पुन्हा अमेरिकेला दणका

## भारताला दिली बंपर ऑफर, डोनाल्ड ट्रम्प यांचा जळफळाट

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**



रशियाने भारताला बंपर ऑफर दिली आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, रशियाने आता सर्वात मोठ्या सवलतीत भारताला कच्चे तेल विकण्यास सहमती दर्शवली आहे. रशिया आणि युक्रेन यांच्या सुरू असलेल्या युद्धामुळे अमेरिकेने रशियावर अनेक निर्बंध लावलेले आहेत. यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत रशियाचा माल खरेदी करण्यास कोणताही देश तयार नाही. अमेरिकेने रशियन तेल खरेदी केल्यामुळे भारतावर अतिरिक्त २५ टक्के कर लादला आहे. त्यामुळे भारताने रशियन तेलाची खरेदी कमी केली आहे. मात्र आता रशियाने भारताला बंपर ऑफर दिली आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार, रशियाने आता सर्वात मोठ्या सवलतीत भारताला कच्चे तेल विकण्यास सहमती दर्शवली आहे. ही ऑफर भारताने स्वीकारल्यास डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रशियाने भारताला फ ेब्रुवारी महिन्यासाठी उरल क्रूडवर प्रति बॅरल अंदाजे १० डॉलर्सची सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. ही सवलत गेल्या वर्षीपेक्षा ३ ते ५ डॉलर्स प्रति बॅरल जास्त आहे. २०२२ नंतर पहिल्यांदाच रशियाने भारताला इतके स्वस्त तेल देण्यास सहमती दर्शवली आहे. या सवलतींसह रशिया भारतीय रिफायनरीजना पुन्हा अधिक तेल खरेदी करण्यास प्रवृत्त करत आहे, मात्र आता भारत अमेरिकेच्या सूचनांना डावलून रशियाकडून तेलाची खरेदी करणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

कच्च्या तेलावर मोठी सूट देण्याच्या निर्णयामागे मोठे कारण आहे. अमेरिकेने रशियन दिग्गज कंपन्या ल्युकोइल आणि रोझनेफ्टवर आतापर्यंतचे सर्वात कठोर निर्बंध लादले आहेत, यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर रशियाला व्यापार करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच अमेरिकेने भारतावर दबाव टाकून रशियन तेलाची खरेदी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

सध्या रशियन तेलाला खरेदीदार नाही, त्यामुळे भारताना पुन्हा आपल्याकडे वळवण्यासाठी रशियाने भारताला ही ऑफर दिली आहे.

### भारत पर्यायाच्या शोधात

रशियाकडून तेल खरेदीत सवलत मिळत असतानाही भारत सध्या दुसऱ्या देशाकडून तेल खरेदीच्या विचारात आहे. भारतातील सर्वात मोठी रिफायनरी, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, रशियाऐवजी ब्राझीलकडून तेल खरेदी करत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार इंडियन ऑइलने ब्राझिलियन कंपनी पेट्रोब्रास आणि इतर देशांकडून ७ दशलक्ष बॅरल तेल खरेदी केले आहे.

## भारताचा जवळचा मित्र असलेला मुस्लिम देश बनला इराणची ढाल

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**

मध्य पूर्वेमध्ये कधीही युद्ध भडकेल अशी स्थिती आहे. अमेरिकन नौदलाचा अब्राहम लिंकन कॅरियकर स्ट्राइक ग्रुप हिंद महासागरात पोहोचला आहे. या अशा कठीण काळात एक मुस्लिम देश इराणची ढाल बनला आहे. थेट अमेरिकेला ललकारण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे.

इराण आणि अमेरिकेमध्ये तणाव सतत वाढत चालला आहे. या दरम्यान आखातामधील एक मुस्लिम देशाने मोठा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे अमेरिकेची गोची होऊ शकते. इराण विरुद्ध कुठल्याही सैन्य कारवाईसाठी आम्ही आमचं हवाई क्षेत्र, जमीन किंवा समुद्री भागाचा अमेरिकेला वापर करु देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका सोमवारी या देशाने घेतली. सौदी अरेबियाचा कडवा स्पर्धक आणि भारताचा जवळचा मित्र संयुक्त अरब अमीरातने आपला निर्णय जाहीर केला आहे. आमची भूमिका तटस्थतेची राहील असं ने स्पष्ट केलय. क्षेत्रात शांतता आणि स्थिरतेसाठी कटिबद्ध आहोत असही यूएईने म्हटलय. दुसऱ्याबाजूला इराणसोबत तणाव वाढलेला असताना अमेरिकेचा अब्राहम लिंकन कॅरियकर स्ट्राइक ग्रुप हिंद महासागरात सेंटकॉम समुद्री क्षेत्रात पोहोचला आहे.

इराणचे ड्रोन स्वार्म अब्राहम लिंकन आणि सोबत असलेल्या स्ट्राइक ग्रुपसाठी धोकादायक ठरु शकतात असा अमेरिकी ड्रोन एक्सपर्टने इशारा दिला आहे.

अब्राहम लिंकन सध्या इराणविरुद्ध कुठल्याही संभाव्य कारवाईसाठी पूर्णपणे तयार नाहीय असं अमेरिकी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं. अमेरिका इराणमधील परिस्थितीवर बारीक लक्ष ठेऊन आहे.

## शेजारील देशात भीषण गृहयुद्ध, उठाव दडपण्यासाठी आकाशातून पॅरामोटरद्वारे नागरिकांवर हल्ले

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**



गृहयुद्धात नागरिक आणि विरोधकांवर हल्ला करण्यासाठी म्यानमारच्या लष्कराने पॅरामोटर्स आणि जायरोकॉप्टर सारख्या कमी दर्जाच्या उड्डाण यंत्रांचा वापर केला आहे.

आपला शेजारील देश म्यानमार म्हणजे ब्रह्मदेशातील गृहयुद्धाने घातक वळण घेतले आहे. सोमावारी जारी झालेल्या एका बातमीनुसार ब्रह्मदेशातील लष्करी राजवटीने ( जुंटा ) आता नागरिकांवर आणि सरकार विरोधी ताकदींवर आकाशा हल्ला करण्यासाठी आपली क्षमता वाढवण्याचा निर्णय घेतला आहे.यासाठी पॅरामोटर आणि जायरोकाप्टर सारख्या कमी तांत्रिक फ्लाईंग मशीनींचा वापर विरोधकांवर हल्ला करण्यासाठी केला आहे. यामुळे आकाशात अचानक गोळ्यांचा वर्षाव केला जात असून त्यात अनेक जण ठार होत आहे. या विषयी मानवी अधिकार संघटना 'फोर्टिफाय राईट्स'ने सैन्य या मशीनद्वारे अक्षरशः मृत्यू बरसवत असल्याची टीका केली आहे.

सायलेंट किलींग पॅरामोटर वास्तविक एक पॅराग्लायडर असून याच्या मागच्या बाजूला एक प्रोपेलर लावलेला असतो. तर जायरोकाप्टर एक छोटे दोन आसनी विमान असते ज्यात हेलिकॉप्टरसारखे फिरणारे पंखे असतात.हल्लयाच्या वेळी हे पॅरामोटर चालक नेहमी आपले इंजिन बंद करतात आणि लक्ष्याच्या जवळ गेल्यानंतर गुपचुप ग्लाईड करत खाली येतात. जमीनीवर आंदोलकांना याचा पत्ता लागण्याच्या आधीच बेसावध असलेल्या लोकांवर बॉम्बचा वर्षाव याद्वारे केला जात आहे. फोर्टिफाय राईट्सचे सदस्य चिट सेंग यांनी सांगितले की लष्कराने नागरिकांना ठार करण्यासाठी हा नवा आणि स्वस्तातला प्रकार शोधला आहे.

## महाभयंकर हल्ला: समुद्र रक्ताने लालेलाल; युद्धनौकेवर बॉम्बचा वर्षाव कुणी दिला अमेरिकेला गंभीर इशारा?

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**




अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव वाढलेला आहे. दोन्ही देशांमध्ये कोणत्याही क्षणी युद्ध पेटण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांकडून युद्धाची तयारी सुरू असल्याचे पहायला मिळत आहे.

गेल्या काही काळापासून अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव वाढलेला आहे. दोन्ही देशांमध्ये कोणत्याही क्षणी युद्ध पेटण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांकडून युद्धाची तयारी सुरू असल्याचे पहायला मिळत आहे. अशातच आता इराणने संपूर्ण जगाला एक मोठा संदेश दिला आहे. इराणी अधिकाऱ्यांनी राजधानी तेहरानमधील एंगेलाब स्क्वेअरमधील एका मोठ्या बिलबोर्डवर एक पोस्टर लावले आहे. यातून अमेरिकेला गंभीर इशारा दिला आहे. या पोस्टरमध्ये नेमकं काय आहे .इराणमध्ये लागले पोस्टर्स

इराणने तेहरानमध्ये लावलेल्या पोस्टरमध्ये एक अमेरिकन विमानवाहू जहाज दाखवण्यात आले आहे. या जहाजावर लढाऊ विमाने जळत आहेत आणि या जहाजावर स्फोट होत आहेत. या जहाजावर अनेक मृतदेह पसरलेले दिसत आहेत. तसे समुद्रात रक्त पसरलेले दिसत आहे. या रक्तामुळे अमेरिकन ध्वजाच्या पट्ट्यांसारखे चित्र तयार झाल्याचे दाखवण्यात आले आहे. या पोस्टरवर लिहिले आहे की, 'जर तुम्ही वारा पेरला तर तुम्हाला वावटळीचा सामना करावा लागेल.' याचाच अर्थ तुम्ही आम्हाला त्रास दिला तर आम्ही तुम्हाला महाभयंकर वेदना देऊ.

इराणकडून हे पोस्टर अशावेळी आले आहे, जेव्हा अमेरिकन नौदलाचे यूएसएस अब्राहम लिंकन विमानवाहू जहाज आणि त्याच्यासोबतच्या अनेक युद्धनौका इराणच्या दिशेने रवाना झाल्या आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी याबाबत बोलताना म्हटले होते की, 'या जहाजांची तैनाती एक सावधगिरीचा उपाय म्हणून करण्यात येत. मात्र आम्हाला कदाचित त्याचा वापर करावा लागणार नाही.'

अमेरिकेने इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांची हत्या करण्याची धमकी दिली आहे. यावर इराणनेही कठोर भूमिका घेत अमेरिकेला गंभीर इशारा दिलेला आहे. रेव्होल्यूशनरी गार्ड कमांडरने अलीकडेच इशारा दिला आहे की आमचे सैन्य पूर्वीपेक्षा जास्त तयार आहे आणि त्यांचे बोट ट्रिगरवर आहे'. यातून असे स्पष्ट होते की इराणी सैन्यही युद्धासाठी तयार आहे. आता दोन्ही देश आगामी काळात काय निर्णय घेतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## या ठिकाणी दोन महिने होत नाही रात्र, २४ तास असतो उजेड



**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**


जगातील असं एक ठिकाण जिथे दोन महिने कधीच होत नाही अंधार. २४ तास दिसतो सूर्य. कुठे आहे हे अनोखं ठिकाण?

सर्वजण लहानपणापासून एकच गोष्ट ऐकत आलो आहोत, दिवसानंतर रात्र येते आणि सूर्य मावळला की अंधार पसरतो. मात्र, जगात एक असा देश आहे जिथे तब्बल दोन महिने सूर्य मावळतच नाही.ना पूर्ण रात्र होते, ना घनदाट अंधार. मध्यरात्रीही आकाशात सूर्य दिसत राहतो आणि आजूबाजूला मंद उजेड पसरलेला असतो. सोशल मीडियावर सध्या या अनोख्या देशाची मोठी चर्चा सुरू असून लोक याला निसर्गाचा अद्भुत चमत्कार म्हणत आहेत.

हा अनोखा देश म्हणजे नॉर्वे. नॉर्वेला जगभरात 'मिडनाइट सन' म्हणजेच अर्ध्या रात्रीचा सूर्य यासाठी ओळखले जाते. दरवर्षी काही महिन्यांसाठी नॉर्वेमध्ये जणू वेळच थांबल्यासारखा भास होतो. येथे संध्याकाळ होते पण पूर्ण अंधार कधीच होत नाही.

## भीषण अग्नितांडव; १५ तासांनंतरही आग अनियंत्रित; ८ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**



कारखाना आणि डेकोरेटर गोदामला लागलेल्या आगीमुळे ८ जाणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. तर २० जण अद्याप बेपत्ता आहेत... कारखाण्यात असेल्या ज्वलशील पदार्थांमुळे आगीने रौद्र रुप घेतलं... अद्याप आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.प्रजासत्ताक दिनाची सकाळ अत्यंत भयानक ठरली. कारखाना आणि डेकोरेटर गोदामला लागलेल्या आगीने काही तासांत भीषण रुप घेतलं. गेल्या १५ तासांपासून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. पण आग नियंत्रणात आली नसल्याची माहिती मिळत आहे. या भीषण अग्नीतांडवमध्ये ८ जणांचा मृत्यू झाला असून २० जण बेपत्ता आहे बेपत्ता लोकांचे नातेवाईक आता पोलिसांत तक्रार दाखल करत आहेत. ही भीषण आग कोलकात्याच्या दक्षिणेकडील बाहेरील आनंदपूर येथील एका सुक्या अन्नाच्या गोदामात सोमवारी पहाटे लागल्याची माहिती समोर येत आहे. आग विझवण्यासाठी बारा अग्निशमन दलाच्या गाड्या अथक परिश्रम घेत आहेत. गोदामांमध्ये मोठ्या प्रमाणात ज्वलनशील पदार्थ असल्याने आग वेगाने पसरली. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, आग इतकी भीषण होती की आत अडकलेल्या लोकांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सापडलेले मृतदेह इतके जळालेले आहेत की त्यांची ओळख पटवणे सध्या अशक्य आहे. ढिगारा साफ करण्यासाठी जेसीबी मशीन आणि रोबोटिक कॅमेरे वापरले जात आहेत.बेपत्ता कर्मचारी पंकज हलदार यांच्या नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्री ३:३० वाजता पंकजने फोनवरून सांगितले होतं की, ''कारखान्याचा मुख्य दरवाजा बाहेरून बंद आहे आणि आम्ही भिंत तोडून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहोत.'

## अमेरिकेविरोधात ५७ देश एकवटले, चीनमध्ये ठरला प्लॅन?

### कोणत्याही क्षणी, जगभरात मोठी खळबळ




**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**

मोठी बातमी समोर येत आहे, मध्यपूर्वेत तणाव निर्माण झालेला असतानाच आता अमेरिकेविरोधात ५७ देश एकवटले आहेत. त्यामुळे जगभरात तणाव वाढण्याची शक्यता असून, चीनमध्ये महत्त्वाची बैठक पार पडली आहे.

अमेरिकेनं आपल्या धोरणांमध्ये केलेल्या बदलामुळे गेल्या काही दिवसांपासून चीन आणि अमेरिकेमधील तणाव प्रचंड वाढला आहे. तसेच इराणमध्ये जो उठाव झाला, त्यामुळे मध्य पूर्वेत सध्या वातावरण चांगलंच तापलं आहे. इराणमधील वातावरण अस्थिर करण्यामागे अमेरिकेचा हात असल्याचा आरोप इराणकडून सातत्याने होत आहे, तर अमेरिकेकडून देखील इराणला सातत्याने हल्लयाची धमकी देण्यात येत आहे. या सर्वांचा फायदा आता चीनने घेण्यास सुरुवात केली आहे. चीनने मोठा डाव खेळला आहे. चीनचे उपराष्ट्रपती आणि परराष्ट्र मंत्री वांग यी यांची सोमवारी ५७ देश सहभागी असलेल्या इस्लामिक सहकार्य संघटना च्या महासचिवांसोबत बिजिंगमध्ये एक महत्त्वाची बैठक पार पडली, मध्यपूर्वे त निर्माण झालेलं अस्थिर वातावरण आणि चीन व अमेरिकेमध्ये सुरू असलेला संघर्ष या पार्श्वभूमीवर ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.चीनचं परराष्ट्र मंत्रालय आणि सरकारी न्यूज एजन्सी शिन्हुआ यांनी दिलेल्या माहितीनुसार ही बैठक अशा वेळी झाली आहे, की सध्या मध्य पूर्वेमध्ये प्रचंड तणाव आहे. कोणत्याही क्षणी युद्धाला सुरुवात होऊ शकते अशी परिस्थिती आहे. तसेच इराणच्या अधिकाऱ्यांनी अमेरिकेला उघड -उघड इशारा दिलेला आहे की, इराणवर एक जरी हल्ला झाला तरी ते आमच्याविरोधात युद्धा सुरुवात झाली असं मानलं जाईल, या सर्व पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीच्या एक दिवस आधीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठं विधान केलं होतं. अमेरिका आपलं आणखी मोठ्या संख्येनं नौदल इराणच्या दिशेनं रवाना करणार आहे.

तसेच इराणने पुन्हा अण्वस्त्र कार्यक्रम सुरू करू नये, यासाठी देखील ट्रम्प यांच्याकडून इराणला इशारा देण्यात आला होता, दरम्यान त्यानंतर आता ही बैठक पार पडली आहे. त्यामुळे जर अमेरिकेनं इराणवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला तर कोणत्याही क्षणी अमेरिकेवर देखील हल्ला होण्याची शक्यात व्यक्त केली जात आहे.दरम्यान चीनच्या परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार या बैठकीमध्ये मध्य पूर्वेत सध्या निर्माण झालेल्या स्थितीवर चर्चा करण्यात आली, मध्य पूर्वेतील प्रश्न हा युद्धानं न सोडवता शांतता आणि चर्चेच्या माध्यमातून सोडवला जावा, अशी चीनची भूमिका असल्याचं चीनच्या परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

## जग विनाशाकडे | इराण होणार बेचिराख; गुप्त रिपोर्टमुळे जगात खळबळ!

# ३६० विमाने, ३६०० मिसाईल, अमेरिकन सैन्य सज्ज

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**



अमेरिका कधीही इराणवर हल्ला करू शकते. इस्रायल, जॉर्डन, सौदी अरेबिया, युएई आणि स्पेनकडून याबाबतचे संकेत मिळाले आहेत. त्यामुळे कोणत्याही क्षणी युद्ध पेटण्याची शक्यता आहे

जगात लवकरच आणखी एक युद्ध पेटण्याची शक्यता आहे. इराण आणि अमेरिकेतील तणाव वाढला आहे. आता अमेरिका कधीही इराणवर हल्ला करू शकते. इस्रायल, जॉर्डन, सौदी अरेबिया, युएई आणि स्पेनकडून याबाबतचे संकेत मिळाले आहेत. ओमानच्या आखातात अब्राहम लिंकन है अमेरिकन लढाऊ जहाज तैणात करण्यात आले आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला करण्यासाठी ३६० विमाने आणि ३६०० क्षेपणास्त्रे तयार केली आहेत. आता इराणजवळ गुप्तचर विमानांच्या फेऱ्याही वाढल्या आहेत. अमेरिकन सैन्य इराणवर हल्ले करण्याचा सराव करत आहे आणि आता कधीही इराणवर हल्ला होणार असल्याची माहिती एका अहवालातून समोर आली आहे. याचा परिणाम संपूर्ण जगावर होण्याची शक्यता आहे.

अमेरिका कधीही इराणवर हल्ला करण्याची शक्यता

समोर आलेल्या माहितीनुसार डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी हिंदी महासागरापासून अनेक देशांच्या भूमीपर्यंत टप्पा निश्चित करण्यात आला आहे. अमेरिकेने यापूर्वी कधीही मध्य पूर्वेत इतके मोठे लष्कर तैनात केले नव्हते. आता इराणसोबत तणाव वाढल्याने अमेरिकेने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे इराणवर कधीही हल्ला होऊ शकतो. इस्रायली माध्यमांनी दिलेल्या बातम्यानुसार, अमेरिकेची लष्करी तयारी पूर्ण झाली आहे. सैन्य इराणवर हल्ले करण्याचा आणि प्रतिहल्ले हाणून पाडण्याचा सराव करत आहे.

इराणला घेरण्याचा प्रयत्न सुरू

अमेरिकेने तीन महिने व्हेनेझुएलाची नाकेबंदी केली होती, त्यानंतर ३ जानेवारी २०२६ रोजी निकोलस मादुरोविरुद्ध कारवाई केली होती. आता अमेरिका इराणविरुद्ध अशाच प्रकारच्या कारवाईची तयारी सुरू आहे. अमेरिकन नौदलाचे इराणविरुद्धचे ऑपरेशन फुल ब्लॉकेड सुरू झाले आहे. इराणी नौदलाला बॅकफूटवर ढकलण्याचा प्रयत्न केले जात आहेत. यामुळे इराणवरील दबाव वाढेल आणि ते त्यांच्या अणुकार्यक्रमाबाबत अमेरिकेला अपेक्षित असा निर्णय घेतील यासाठी हा प्रयत्न सुरू आहे.

अमेरिकेची दुसरी योजना म्हणजे इराणवर जलद आणि निर्णायक हल्ला करणे आणि खामेनीविरुद्ध मोठी कारवाई करणे ही आहे. यामुळे इराणमध्ये सत्ता बदल होईल जेणेकरून इराणचा अणुकार्यक्रम थांबवता येईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र हल्ला करायचा की फक्त दबाव वाढवायचा याबाबत लवकरच निर्णय होणार आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

## संपादकीय...

# सोने गहाण ठेवून कर्ज घेण्याची प्रवृत्ती वाढली!

जागतिक अस्थिरतेच्या काळात भारत व युरोपियन युनियन यांच्यातील द्विपक्षीय करार झाला असताना दुसरीकडे इराण आणि युएस यांच्यातील अस्पष्टता कायम राहिल्याने एकूणच युएस व जागतिक गुंतवणूकदार साशंक राहिल्याने आज चांदीच्या दरात नवा ऐतिहासिक उच्चांक गाठला गेला आहे. म्हणजेच २००८ मध्ये जागतिक मंदी असलेल्या दरानंतर आज प्रथमच ऐतिहासिक वाढ झाल्याने चांदीने नवी रेकॉर्ड ब्रेक वाढ नोंदवली आहे. गुडरिटर्न्स संकेतस्थळावरील माहितीनुसार, चांदीच्या प्रति ग्रॅम दरात १० रूपयाने, प्रति किलो दरात १०००० रूपयाने वाढ झाली आहे. त्यामुळे प्रति ग्रॅम चांदी ३७० रूपयांवर, प्रति किलो चांदी ३७०००० रूपयांवर पोहोचली आहे. संकेतस्थळावरील माहितीनुसार, मुंबईसह प्रमुख शहरातील चांदीचे सरासरी प्रति १० ग्रॅम दर ३७०० व प्रति किलो दर ३७००० रूपयांवर पोहोचले आहेत. भारतीय कमोडिटी बाजारातील एमसीएक्समध्ये (चांदीचे दर थेट ८% उसळल्याने भारतीय सराफा बाजारात चांदीचे दर ३६१५५५ रूपयांवर पोहोचले. जागतिक स्तरावर चांदीच्या सिल्वर फ्युचर निर्देशांकात संध्याकाळपर्यंत २.८९% घसरण झाली आहे. गेल्या पाच दिवसांत चांदीच्या दरात तुफान वाढ झाली आहे. जागतिक भूराजकीय अस्थिरतेचे धक्के अर्थकारणाला बसणे साहजिक असते आणि ते गृहितही असते; मात्र अमेरिकेच्या, विशेषतः तेथील राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनमानी धोरणामुळे ते तीव्रतेने जाणवू लागले असून, शेअर बाजार किंवा सोने-चांदी बाजारातील चढउताराचे ते एक मुख्य कारण ठरले आहे. ज्यावेळी जगात युद्धाचे व अस्थिरतेचे ढग पसरू लागतात, तेव्हा शेअर बाजारात घसरगुंडी होत असते. उलट अशा उतरत्या काळात लोक किंवा गुंतवणूकदार सुरक्षितता म्हणून सोने आणि चांदी खरेदी करू लागतात. कारण संकटाच्या वेळी सोन्या-चांदीचा आपल्याला अधिक उपयोग आहे, अशी जनभावना असते. त्यामुळे अमेरिका आणि ग्रीनलँडमधील विषय तापला असताना निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे सोने-चांदी तेजीत होती. ग्रीनलँड ताब्यात घेण्यासाठी अमेरिका बळाचा वापर करणार नाही, असे आश्वासन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत दिले. त्यामुळे लगेचच शेअर बाजारात उत्साह संचारल्याचे दिसून आले; मात्र ग्रीनलँडचे संरक्षण केवळ अमेरिकाच करू शकते, असेही त्यांनी सूचित केले. त्यांचा पवित्रा आक्रमक आहे. म्हणूनच सोने-चांदी बाजारावर या वक्तव्याचा कोणताही परिणाम न होता उलट बाजार वधारला. अमेरिकेचे नवीन विस्तारवादी धोरण आणि त्यामुळे वाढत्या भूराजकीय तणावामुळे सेन्सेक्स १०६६ अंशांनी कोसळून तो ८२ हजारांखाली गडगडला होता. तो आता सावरताना दिसतो. ही अस्थिरता तूर्त तरी काहीशी निवळत चालली असल्याचा अर्थ त्यातून काढता येतो. त्यापूर्वी अमेरिकेने इराणला धडा शिकवण्याची भाषा केली, तेव्हादेखील सराफ बाजारात तेजीचेच वातावरण होते. गेल्या गुरुवारी सोने दीड लाखापार गेले आणि एकाच दिवसात २२,६६० रुपयांची वाढ झाल्याने चांदी ३ लाख ३० हजारांच्या पार गेली. सोन्याने जीएसटीसह प्रति दहा ग्रॅम १,५५,००० रुपयांची सीमा पार केली. नवीन वर्षात आतापर्यंत चांदीच्या भावात ८७ हजार रुपयांची वाढ झाली. चांदीची चमक दिवसेंदिवस वाढत चालली असून, सिल्व्हर एक्स्चेंज ट्रेडेड फंडानेही उच्चांकी पातळी गाठली. मार्च महिन्यातील चांदीच्या फ्युचर्समध्ये ३ टक्क्यांची वाढ झाली असून, त्याने प्रति किलोग्रॅम ३,१८,७२९ रुपयांचा ऐतिहासिक विक्रम गाठला. अमेरिका आणि युरोपीय युनियनमधील तणाव वाढल्यामुळे चांदीची भरधाव तेजी सुरू आहे. चालू आर्थिक वर्षातील सर्वोत्तम कामगिरी करणारा मौल्यवान धातू म्हणून चांदीने स्थान मिळवले. आंतरराष्ट्रीय बाजारात स्पॉट चांदीने तर ९५ डॉलरची विक्रमी पातळी गाठली. सिल्व्हर ईटीएफ ७ टक्क्यांहून अधिक वाढून प्रति युनिट ३०८.३७ वर पोहोचला. अन्य कंपन्यांचे काही ईटीएफ प्रत्येकी ५ टक्क्यांनी वधारले. जगातील विविध देशांच्या मध्यवर्ती बँका आपापल्या गंगाजळीतील सोन्याचा साठा वाढवत आहेत. त्यामुळे मागच्या तीन आठवड्यांत सोन्याच्या किमतीत २४,२०० रुपयांची वाढ झाली. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलच्या ताज्या अहवालानुसार, भारतीय रिझर्व्ह बँकेने २०२५ मध्ये केवळ ४.०२ टन सोने खरेदी केले. गेल्या आठ वर्षांचा विचार करता, ते फारच कमी आहे. २०२४ मध्ये रिझर्व्ह बँकेने ७२ टन सोने खरेदी केले होते. या गोष्टीचा देखील बाजारपेठेवर परिणाम होत असतो. रिझर्व्ह बँकेकडे एकूण ८८० टन सोने आहे. नोव्हेंबर २०२५ पर्यंत रिझर्व्ह बँकेच्या परकीय चलनसाठ्यातील सोन्याचे मूल्य १०० अब्ज डॉलर्सपेक्षाही जास्त आहे. भारताच्या एकूण सुवर्णसाठ्यापैकी ५२ टन सोने देशात सुरक्षित आहे. तर ३४८ टन सोने बँक ऑफ इंग्लंड आणि बँक फॉर इंटरनॅशनल सेटलमेंट यांच्याकडे सुरक्षित ठेवण्यात आले आहे. सोन्याच्या किमतीचा विचार करता २०२२ पासून दरात १७५ टक्क्यांची वृद्धी झाली. २०२५ मध्ये सोन्याच्या किमती ६५ टक्क्यांनी वधारल्या. सुरक्षित गुंतवणुकीच्या वाढत्या मागणीमुळे सोन्याचे दर गगनाला भिडले. जागतिकीकरणामुळे विविध घटनांचा वेगवेगळ्या बाजारपेठांवर लगेचच परिणाम होत असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरीकडे, भावातील तेजीमुळे सोने तारण ठेवून मोठ्या प्रमाणावर कर्ज उचलले जात आहे. सोने तारण कर्जावरील एनपीएमध्ये २८ टक्क्यांची वाढ झाली असून, येणे कर्जांत २७ टक्क्यांची वाढ झाली आहे. या थकबाकीमध्ये व्यापारी बँकांचा वाटा सिंहाचा आहे. त्यांची ही थकित रक्कम २०४० कोटी रुपये असून, वित्तीय कंपन्यांची थकबाकी ४७८४ कोटी रुपये आहे. भविष्यात असेच घडत राहिल्यास या बँका व कंपन्या संकटात येऊ शकतात. बँकांनी आणि एनबीएफसीजनी ११ लाख कोटी रुपयांवर सोने तारण कर्जे दिली आहेत. रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँका व एनबीएफसीजनी गोल्ड लोन्सबद्दलची आपली धोरणे व ती देण्याची प्रक्रिया यांचा फेरआढावा घेण्याची सार्थ सूचना केली आहे. याबाबत बाहेरील व्यक्तींची वा कंपन्यांची सल्ला-सेवा घेण्यात येणार असेल, तर त्यावर सोने तारण कर्ज देणाऱ्या बँकेने अथवा एनबीएफसीने नियंत्रण ठेवले पाहिजे, अशी सूचना रिझर्व्ह बँकेने केली आहे. संबंधितांनी या सूचनेचे पालन केले पाहिजे.



## लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

### अर्थसंकल्प

ह्या देशाच्या अर्थसंकल्पाचे
सुरू होते आहे अधिवेशन
वारे वाहील का विकासाचे
विचारते भारतीय जन मन



देशाच्या संसदेत घडू द्या
चर्चा जनतेच्या प्रश्नांची
नेत्यांनो हातून होऊ द्या
उपरती विकास कामांची

आखाडा नकोच संसदेचा
भलेही करा प्रश्नांची सरबत्ती
वारसा संसदीय आयुधांचा
प्रगतीचा धावू द्या राजहत्ती

## ।। अभंगवाणी ।।
- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

घे तुझ्या ऐकूनी
अंतरीची हाक ।
ब्रम्हांडी नाहक
शोधू नये ।।

आसक्ती विरक्ती
खेळ मदारीचा ।
माकड मनाचा
उड्या मारी ।।

जगाच्या मायेला
भूलूनी तू जावे ।
आणि स्वीकारावे
वास्तवाला ।।


मनाला अशक्त
आसक्ती करते ।
विरक्ती करते
सशक्त हो ।



## सप्तरंग
डॉ. विनय व. दांदळे
मो. ९८२२२ ३१७६९

# कुंपणात अल्याड - पल्याड...

कुंपण नेहमी जमिनीवर उभं राहतं असं नाही. काही कुंपणं विचारांमध्ये उभी राहतात, काही नात्यांमध्ये,
आणि काहीअगदी शांतपणेमनाच्या किनाऱ्यावर. ती दिसत नाहीत, म्हणून टोचत नाहीत असं नाही. उलट, न दिसणारी कुंपणं अधिक बोचरी असतात.
ती रक्त काढत नाहीत, पण श्वास अडवतात. माणूस बाहेरून जितका सुरक्षित दिसतो, आतून तितकाच कोरडा होत जातो, कारण त्याने स्वतःभोवती हळूहळू कुंपण उभं केलंय - ते कुंपण म्हणजे
अनुभवांच्या भीतीचं,
अपमानांच्या आठवणींचं,
आणि ''लोक काय म्हणतील'' या एका अजिंक्य वाक्याचं....
या कुंपणाच्या आत अडकलेली हवा
आजही वाहू पाहत आहे प्रत्येक दिशेला....
कुंपण ही माणसाने शोधलेली अत्यंत प्रामाणिक गोष्ट आहे.
ती खोटं काहीच सांगत नाही.
ती उघडपणे उभी राहते आणि सर्वकाही सांगते पण अडचण तेव्हा होते,
जेव्हा कुंपण माणसाच्या बाहेरून हळूहळू आत सरकायला लागतं.
लहानपणी कुंपण केवळ शेताभोवती असतं.
आणि मन मात्र मोकळं असतं मोकळ्या आभाळासारखं.
तेव्हा प्रश्न विचारायला परवानगी असते,
चुकायला मोकळीक असते, रडायलाही स्वातंत्र्य असतं. तेव्हा कुणी म्हणत नाहीहे तुझ्या वयाला शोभत नाही. पण
जसजसं वय वाढतं,
तसतसं मनाला कुंपण लागायला लागतं.
हे करू नकोसलोक काय म्हणतील.
असं बोलू नकोसप्रतिष्ठेला धक्का बसेल.
असं वाटून घेऊ नकोसकमकुवत वाटशील.
हळूहळू भावना शिस्तीत बसतात.
विचारांना ओळी आखल्या जातात.
आणि मनाला शिकवलं जातंअवकाशात उडायचं नाही.
आपण म्हणतो, ''मी मोकळा आहे.''
पण मनाच्या अंगणात फिरताना लक्षात येतंप्रत्येक पावलागणिक काटेरी तार.
आजचा माणूस कुंपणांचा अभियंता झाला आहे. तो कुंपण उभं करतो विचाराभोवती,
संबंधांभोवती, श्रद्धांभोवती, अगदी सत्याभोवतीसुद्धा.
आपलं मत म्हणजे आपलं राज्य.
आणि त्या राज्याला प्रवेश नाहीवेगळ्या मतांना. मग संवाद संपतो. फक्त वाद उरतो.
आणि वादाचं रूपांतर हळूहळू द्वेषात होतं.
कुंपण हे केवळ विभागणी करत नाही,
ते संवेदना बोथट करतं.
आज आपण माणसाला माणूस म्हणून नाही, तर बाजू म्हणून पाहतो.
या कुंपणाच्या आतलाआपला.
त्या कुंपणाच्या बाहेरचापरका.
मग माणूस हरवतो, आणि भूमिका उरतात.
आपण घरं सुरक्षित करतोहे योग्य आहे.
पण मनाला कुलूप घालतोहे धोकादायक आहे. कारण कुलूप लावलेलं मन हळूहळू श्वास घ्यायला विसरतं.



मनाला ऑक्सिजन लागतो
संवादाचा, संवेदनांचा, प्रश्नांचा.
पण प्रश्न विचारणाऱ्यांना आज
''अडचणीचे लोक'' म्हटलं जातं.
संवेदनशील माणसाला ''कमकुवत'' ठरवलं जातं. आणि गप्प बसणाऱ्यांना ''समजूतदार.'' गप्प बसणं म्हणजे समजूतदारपणा नाही.
कधीकधी ती आत्महत्या असतेहळूहळू होणारी. आज अनेक माणसं जिवंत आहेत,
पण आतून निस्तेज.
त्यांच्या डोळ्यांत हवा नाही.
त्यांच्या शब्दांत ओल नाही.
ते सुरक्षित आहेतपण जिवंत नाहीत.
कुंपण सुरक्षितता देतं,
पण वाढ रोखतं. शेतात कुंपण गरजेचं असतं, पण पेरणीसाठी जमीन उघडी ठेवावी लागते. तसंच मनाचं आहे.
सतत बंद ठेवलेलं मन काही पिकवत नाही
ना विचार, ना कविता,
ना माणुसकी. आपण जखमा लपवण्यासाठी कुंपण उभं करतो. पण जखमा मोकळ्या हवेत भरतात, कुंपणाआड नाही. भीती ही कुंपणाची वीट असते.
आणि अनुभव त्यावरची सळई.
ज्याने फसवणूक अनुभवली,
तो विश्वासाभोवती कुंपण उभं करतो.
ज्याने अपमान सोसला,
तो आत्मसन्मानाभोवती भिंत बांधतो.
हळूहळू हे कुंपण इतकं उंच होतं
की त्यापलीकडचं आकाश दिसेनासं होतं.
आणि एक दिवस वारा येतो.
तो कुणाच्या परवानगीशिवाय येतो.
तो कुंपण ओळखत नाही.
तो विचारतो, ''तू अजून आहेस का?''
मन म्हणतं, ''हो पण थकलोय.''
वारा सांगतो ''मी वाहतो म्हणून जिवंत आहे. तू थांबलास म्हणून कोरडा झालास.
तेव्हा पहिल्यांदा जाणवतं
आपण कुंपणात नाही, आपण कुंपण झालो आहोत. इतरांसाठी. स्वतःसाठी.
सगळी कुंपणं तोडणं अशक्य आहे.
आणि तसं करायलाही नको.
पण एखादं दार उघडायला हवं.
संवादासाठी. स्वीकारासाठी.
चुकांसाठी. कारण माणूस चुकत नाही तेव्हा तो दगड होतो.
आणि दगड सुरक्षित असतो,
पण संवेदनाहीन.
कुंपणांच्या या काळात
आपल्याला बंड करायचं आहे
अस्तित्वाचं, संवेदनांचं,
माणूसपणाचं. मनाचं दार उघडून
हवेला आत येऊ द्यायचं आहे.
कारण हवा अडकली की सगळं कुजतं
विचार, नाती, आणि शेवटी
माणूस. कधीतरी थांबून स्वतःला
विचारायला हवं आपण कुणाला दूर
ठेवण्यासाठी कुंपण उभं केलं,
की स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी?
कारण फरक फार सूक्ष्म आहे,
आणि परिणाम फार खोल.
कुंपण उभं राहतं तेव्हा
आत-बाहेर असं जग विभागलं जातं,
पण हळूहळू आतलंच जग
अवकाश विसरू लागतं.
हवा थांबते. ओल सुकते.
आणि माणूस जिवंत राहतो
पण फक्त सवयीने.
कदाचित सगळी कुंपणं तोडणं धाडसाचं असेल, पण एखादी फट तरी ठेवणं गरजेचं आहे.
हवेसाठी. संवादासाठी.
आणि माणूस म्हणून माणसाशी जोडलेलं राहण्यासाठी. कारण कुंपण टिकवता येतं आयुष्यभर, पण आत अडकलेली हवा जास्त काळ तग धरू शकत नाही.
आणि एक दिवस ती निघून जाते मागे
उरतात फक्त सुरक्षित भिंती आणि त्यांच्यात
अडकलेलं एक शांत, कोरडं
मनुष्यपण.

# वर्गमित्रांची वाटचाल : सन्मानातून उमटलेला अभिमान



**डॉ. विलास खर्चे, कुलगुरू,**
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी



**गजानन शेळके**
पोलीस उपअधीक्षक



## अभिमानास्पद
प्रा. डॉ. सुहास उगले
अकोला

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील कृषी महाविद्यालयीन जीवनात एकत्र शिकलेले, एकाच महाविद्यालयातून स्वप्नांची बीजे रोवणारे दोन मित्र आज वेगवेगळ्या क्षेत्रांतून समाजजीवन समृद्ध करत सन्मानित झालेले पाहताना मनापासून आनंद आणि अभिमान वाटतो.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून डॉ. विलास खर्चे यांची राज्यपालांमार्फत झालेली नियुक्ती ही त्यांच्या शैक्षणिक प्रज्ञेची, अस्सल संशोधननिष्ठेची आणि प्रशासकीय कौशल्याची पावती आहे. कृषी शिक्षण, शेतीला फायदेशीर ठरणारे उत्कृष्ट संशोधन व विस्तारकार्य यांचा समन्वय साधत त्यांनी विद्यापीठीय परंपरेला आधुनिकतेची जोड दिली आहे. शेतकरी, विद्यार्थी आणि संशोधक यांच्यातील दुवा अधिक बळकट करण्याचा त्यांचा दृष्टिकोन प्रेरणादायी ठरतो.

दुसरीकडे, महाराष्ट्र शासनाच्या पोलीस उपअधीक्षक पदावर कार्यरत असलेले गजानन शेळके यांनी आपल्या कर्तव्यपालनाला सामाजिक संवेदनशीलतेची जोड दिली आहे. विविध ठिकाणी केलेल्या कार्यकाळात त्यांनी वाहनांच्या प्रचंड ध्वनी प्रदूषण निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर सायलेन्सरविरोधात कठोर भूमिका घेत प्रत्यक्ष रोलर खाली सायलेन्सर नष्ट करून कायद्याचा धाक निर्माण केला आणि समाज व्यवस्था सुरळीत होण्यासाठी कठोर परिश्रम घेतले.

कोरोना काळात ज्येष्ठ नागरिकांना आधार देण्यासाठी राबवलेली त्यांची नवउपक्रमशीलता विशेष उल्लेखनीय आहे.

या समाजोपयोगी कार्याची दखल घेत प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला त्यांना जाहीर झालेला राष्ट्रपती पोलीस पदक हा केवळ वैयक्तिक नव्हे, तर संपूर्ण समाजाचा गौरव आहे.

एकाच महाविद्यालयातून घडलेली ही दोघांची अभिमानास्पद वाटचाल, दोन वेगळी क्षेत्रे आणि समान मूल्यनिष्ठा शिक्षणातून घडलेली माणुसकी, कर्तव्यभावना आणि समाजप्रती बांधिलकी हेच या मैत्रीचे खरे यश सांगतात. आज त्यांच्या सन्मानातून अकोल्याच्या कृषी महाविद्यालयाची कथा पुन्हा एकदा उजळून निघाली आहे.



## कृषी जगत
अशोक वानखेडे
मो. 9403493100

# शेती निष्ठेला स्वालंबाची संगत हवी...



शेतकऱ्याची खरी दैना का होत आहे? सत्यशोधनातून या विषयावर थोडाफार प्रकाश टाकण्याचा वास्तविक विचार केला तर, काहीजण. सातबारावर राहून शेती न करता रिकामे राहून काहीतरी मोफत मिळवण्याच्या प्रयत्नात असतात. पण जे शेतीनिष्ठ हाडामासाचे अहोरात्र काम करून कष्ट आणि शेतीतून समृद्धी मिळवण्याचे प्रयत्न करीत राहतात. तेव्हा मात्र त्यांना त्यांच्या मिळालेल्या कष्टातून पदरात पडलेलं थोडी तोडीमोडीच आर्थिक प्राप्तीची यश पाहून शेतीपासून खरा शेतकरी दूर जातो आहे आणि काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याच्या हातातलं यश हे रिकामे हात प्राप्त करून घेतात हे असे कालचक्र चालले तर समुद्रातले पाणी सुद्धा देशाच्या राजकारणाला कमी पडणार आहे. या धोरणामुळेच आता शेतकऱ्याची पण शेती करण्याची किंवा शेतावर कष्ट करण्याची इच्छा कमी होताना दिसते.

जोपर्यंत मोफत अन्नपुरवठा, मोफत स्वयंपाकाचा गॅस, मोफत वीज, आणि इतर कोणत्याही मोफत योजना सत्ताप्राप्तीच्या धोरणात्मक बाबी प्रशासनस्थरातूनच बंद होत नाहीत तोपर्यंत शेतीसाठी कितीही हायटेक तंत्रज्ञान योजना अवलंब केल्या तरीही शेतकऱ्याची शेती करून शेतकऱ्याची समृद्धी होणार नाही त्यामुळेच शेतीसाठीची निष्ठाही स्वावलंबी होण्याची प्रवृत्ती शेतकरी स्वीकारणार नाही. देशातील कोणताही समाज असो त्याला ज्या गोष्टीची गरज आहे, ते प्राप्तीसाठी तो मेहनत करेल अन्यथा त्याशिवाय वंचित राहील. ही प्रगतीसाठीची समानता जोपर्यंत देशात घर करणार नाही आणि गरिबांना श्रीमंत करण्यासाठी श्रीमंतांना गरीब करून उपयोग नाही. हे खऱ्या अर्थाने जोपर्यंत समाज समजून घेणार नाही. आणि जो काम न करता काही मिळवतो त्यासाठी दुसऱ्या कोणालातरी मेहनत करावी लागते, हे प्रतिबिंब समाजाला कळल्याशिवाय सध्या होत असलेले राजकीय सत्तेचे धोरण नष्ट होणार नाही. आजच्या घडीला त्याच्या कष्टाचे फळ मिळत नाही तो एकमेव घटक म्हणजे या कृषिप्रधान देशातील बळीराजा होय. देशात कोणतेही सरकार आपल्या नागरिकांना मोफत काहीही देऊ शकत नाही. जोपर्यंत ती दुसऱ्या नागरिकां कडून करून घेत नाही. रिकाम्या हाताने कष्ट करणाऱ्या हातात त्या गोष्टीचा दाम देणे गरजेचे आहे. धनाची विभाजन करून संपत्ती वाढवता येत नाही हे अर्थसंपत्ती बळकट करण्याचे सूत्र समजून घेण्याची गरज आहे. हे असेच सुरू राहिले तर, राष्ट्र अर्थकारण पतनाची सुरुवात होण्यास वेळ लागणार नाही. सत्ता, निष्ठेची कृषी संस्कृती, साम्राज्य किंवा सत्तेच्या पतनाच हे पहिल्या टप्पा असू शकते. जिथे शेतीची प्रभुता व ताकद आणि शेतकरी महत्त्व कमी होऊ लागते तेव्हा देशाचे अंतर्गत दुर्बलता चुकीचे निर्णय किंवा देशातील श्रमशक्ती कमी होण्यास सुरुवात होते. ज्यामुळे हळूहळू पूर्णविनाश किंवा पडझड होते. राजकीय अस्थिरता, आर्थिक नष्टता, सामाजिक आणि सांस्कृतिक नष्टता, बदलती परिस्थिती आणि मुख्य म्हणजे शेती संस्कृतीची निष्ठा विकासात्मक कार्यक्षम नेतृत्व अभावी योग्य निर्णय घेतल्या जात नसल्यामुळे शेती निष्ठा पतनाची सुरुवात ही प्रगती कडून अधोगती कडे जाण्याचा प्रक्रियेला प्रारंभ होण्याचे चिन्ह दिसत आहेत.

ज्या राष्ट्रात मेहनती विना कोणतीही गोष्ट प्राप्त होत असेल हे खऱ्या अर्थाने समृद्ध कृषी प्रधान राष्ट्राच्या पतनाची खऱ्या अर्थाने सुरुवात होत असल्याची चाहूल लागते. अशा वेळेस जाणकार शेतकऱ्यांनी या सत्ताप्राप्तीच्या वेडेपणाला थांबवले पाहिजे.

आजच्या घडीला सर्व राजकीय पक्ष या शर्यतीत सामील आहेत. प्रत्येकांचा राजकीय धोरणामध्ये मोफत वाटपाचे वेडे ध्येयधोरण सामील असतेच. भविष्यात हे थांबवण्यासाठी आपण सर्वतोपरी स्वावलंबन होण्याचा प्रयत्न सर्व स्तरातून स्वीकार करणे पर्यायी हेच एकमेव धोरण ठरले तरच देशात शेतकरी हा शेती करण्यासमोर येईल. सर्वांना ज्या गोष्टीची गरज आहे तिच्यासाठी निष्ठेने मेहनत करावी, अन्यथा त्या गोष्टीशिवाय जीवन जगा, आता स्वातंत्र्याला स्वालंबाची सांगड घालून देण्याचे धोरण समोर येण्याची आज खरी गरज आहे.

(क्रमशः)




## प्रासंगिक
रवींद्र दांडगे
अंजनगाव (सुर्जी)

# तिसरी मुंबई : भारतीय प्रजासत्ताकाची सभ्यता

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथे जाऊन महाराष्ट्रासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणण्याचे प्रयत्न केले. ''तिसरी मुंबई'' उभारण्याची घोषणा ही त्या प्रयत्नांचे प्रतीक मानली जाते. जागतिक भांडवल, स्मार्ट सिटी, पायाभूत सुविधा, जागतिक ज्ञान, तंत्रज्ञानाचा वापर आणि गतिमान विकास हा प्रयत्न आज महाराष्ट्राच्या भविष्यासाठी आश्वासक म्हणून मांडला जात आहे. मात्र २६जानेवारी १९५० रोजी भारताला प्रजासत्ताक बनवणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न उपस्थित होतो की हा विकास कोणत्या सभ्यतेला पुढे नेणारा आहे जे की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न होते.

दावोस हे जागतिक अर्थसत्तेचे प्रतीक आहे. तिथे या विकासाचा अर्थ हा गुंतवणूकदारांचा विश्वास, नफा, स्पर्धा आणि बाजार मिळवून देणें हा होतो. तर राज्यांची भूमिका ही 'सुविधादाता' म्हणून असते.ती जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विकासदृष्टीकोन याच



जागतिक चौकटीत बसतो. यात आर्थिक वेग आहे, पण सामाजिक न्यायाचा प्रश्न दुय्यम ठरण्याचा धोका कायम असतो. हजारो वर्षा आधीची सभ्यता ही विषमता जपणारी रचना होती. भारतीय समाजाची पारंपरिक सभ्यता ही जन्मावर आधारित दर्जा देणारी, श्रमाला कमी लेखणारी, जमीन व साधनसंपत्ती काहीं भांडवल दारांच्या हाती केंद्रीत करणारी अशी राहिली आहे. शहरांची रचना देखील याच सभ्यतेचे प्रतिबिंब होती श्रीमंत मध्यभागी होते तर गरीब कडेला होते. अशा प्रकारची सुविधा काहींसाठी दिली जात होती तर असुरक्षितता ही बहुसंख्यांसाठी होती. तिसरी मुंबई ही रायगड, कोकण, पेण या भागातील शेतकरी, मच्छीमार, आदिवासी यांच्या जमिनीवर उभी राहत आहे. त्यामुळे या लोकांचे विस्थापन होईलच. या विस्थापनाला विकासाची किंमत म्हटले जात असेल तर हे नवीन विकसित शहर गुंतवणूकदारांसाठी केवळ कामगार म्हणून बघितले जात असेल तर ती आधीच्या विषम सभ्यतेचीच आधुनिक आवृत्ती ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानिक चौकटीला अनुसरून असलेली नवी सभ्यता ती कशी असू शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली संविधानिक चौकट ही जुन्या सभ्यतेला पर्याय म्हणून उभी राहिली पाहिजे. ती या चौकटीची मूलतत्त्वे होती की जन्माऐवजी नागरिकत्व, परंपरेऐवजी हक्क सत्तेपेक्षा मानवी प्रतिष्ठा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने असे शहर म्हणजे केवळ आर्थिक केंद्र नव्हे, तर प्रजासत्ताक केंद्र व्हावे. म्हणूनच त्यांनी संविधानिक नैतिकतेवर भर दिला कायदा नव्हे, तर न्यायभावना महत्त्वाची असली पाहिजे.

आज प्रश्न असा उपस्थित होत आहे की तिसरी मुंबई दावोसच्या भांडवलकेंद्री सभ्यतेतून उभी राहणार की बाबासाहेबांच्या संविधानिक चौकटीतून नवी नागरी सभ्यता घडवणार जर नियोजनात स्थानिक लोकांचा सहभाग नसेल, कामगारांना सुरक्षितता, संघटन आणि हक्क नसेल, पुनर्वसन म्हणजे केवळ घर, प्रतिष्ठा नसेल स्त्री, दलित, दुर्बल घटक शहराच्या कडेला ढकलले जात असतील तर संविधान केवळ कागदावर राहील.एवढे मात्र निश्चित. २६ जानेवारी हा दिवस फक्त ध्वजवंदनाच्या दिवसापुरता मर्यादित न राहता तो प्रश्न विचारण्याचा दिवस ठरला पाहिजे. लोकशाही मध्ये सरकारला प्रश्न विचारणारे पाहिजे असतात तेव्हाच लोकशाही बळकट होईल. आपला विकास संविधानिक पद्धतीने होत आहे का? हा प्रश्न विरोधकांनी विचारला पाहिजे. तिसरी मुंबई हा प्रकल्प नसून आपला देश कोणती सभ्यता स्वीकारतो आहे याचा निर्णय घेणे आज महत्वाचे आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसमोर आज दोन मार्ग उपलब्ध आहेत दावोसच्या आंतरराष्ट्रीय बाजारकेंद्रीय सभ्यतेचे प्रतिनिधित्व करण्याची किंवा बाबासाहेबांच्या संविधानिक, नागरिक केंद्रीय सभ्यतेचा विस्तार करण्याची. तिसरी मुंबई उभी राहीलच.पण ती फक्त गुंतवणूकदारांचे शहर न ठरता नागरिकांचे प्रजासत्ताकीय शहर उभे होणे हे अधिक महत्वाचे आहे. आज आपण २६ जानेवारीचा आत्मा जपतो आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न हे हा देश प्रजासत्ताक रहावा.आत्मनिर्भर व विकसित भारताच्या जडणघडणीत देशाचा विकास हा माणसासाठी असावा, माणूस विकासासाठी नव्हे.हाच संदेश आज प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने तुमच्या आमच्यापर्यंत पोहचला जावा. सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

# शाहीद-दिशाचे ‘आशिकों की कॉलोनी’ गाणे आकर्षण!



चित्रपटातील ‘आशिकों की कॉलोनी’ या नव्या गाण्यात शाहीद कपूर आणि दिशा पटानीची फ्रेश केमिस्ट्री प्रेक्षकांना भुरळ घालत आहे. ग्लॅमरस लूक, रोमँटिक मूड आणि दमदार डान्स मूव्हसमुळे हे गाणं सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. बॉलिवूडमध्ये पुन्हा एकदा रोमँटिक म्युझिकचा धडाका पाहायला मिळतोय. ओ रोमियो चित्रपटातील आशिकों की कॉलोनी गाणे रिलीज झाले आहे. शाहिद कपूर आणि दिशा पटानी यांची फ्रेश केमिस्ट्री या गाण्यात पाहायला मिळतेय. ‘ ’ या आगामी चित्रपटातील हे गाणं रिलीज होताच सोशल मीडियावर व्हायरल झालं आहे.

या गाण्यात शाहीद कपूरचा चार्म आणि दिशा पटानीचा ग्लॅमरस अवतार पाहायला मिळतो. दोघांची फ्रेश केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतेय.दिशा पटानी नेहमीप्रमाणे तिच्या फिटनेस, ग्रेस आणि डान्स मूव्हसने लक्ष वेधून घेत आहे. तर शाहीद कपूरचा सहज, रोमँटिक अंदाज पुन्हा एकदा चाहत्यांना आवडताना दिसतोय. या दोघांची जोडी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीनवर दिसत आहे. साजिद नाडियाडवालाचा आगामी चित्रपट ओ रोमियोचा ट्रेलरदेखील सिनेरसिकांच्या पसंतीस उतरला होता. आता चित्रपटातील गाणे देखील व्हायरल होत आहे. आशिकों की कॉलोनी हे दुसरे गाणे आहे. फुल-ऑन डान्स नंबर असून दिशा पटानीवर चित्रीत करण्यात आले आहे. नव्वदच्या दशकातील रंगीन बॉलीवूड वाईब्स असणाऱ्या या गाण्याला मॉडर्न संगीत दिले आहे. सूर जुनेच असले तरी मॉडर्न स्टाईल गाणे फुल मूड ऑन फ्रेश करणारे आहे. विशाल भारद्वाज यांचे संगीत, गुलजार यांचे बोल, मधुबंती बागची, जावेद अली यांचा जादूई आवाज आणि शाहिददिशाची फ्रेश केमिस्ट्री पाहायला मिळते. ओ रोमियोचे दिग्दर्शन निर्माते विशाल भारद्वाज यांनी कले आहे. शाहिद कपूर, तृप्ती डिमरी मुख्य भूमिकेत असून नाना पाटेकर, फरीदा जलाल, विक्रांत मेसी, तमन्ना भाटिया, अविनाश तिवारी या कलाकारांच्या महत्वाच्या भूमिकेत आहेत. हा बहुप्रतीक्षित चित्रपट १३ फेब्रुवारी रोजी चित्रपटगृहात रिलीज होणार आहे.

# ‘बॉर्डर-२’ने चार दिवसांतच प्रतिस्पर्ध्यांची हवा काढली!




सनी देओल स्टारर बॉर्डर-२ बॉक्स ऑफिसवर उतरताच धुमाकूळ घातला आहे. निर्मात्यांनी या आठवड्यातच प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर चित्रपट रिलीज केला आहे. त्यामुळे त्याचा फायदा बॉक्स ऑफिसवर गल्ला जमवण्यासाठी होत आहे. रिलीज झाल्यापासून पहिल्या दोन दिवसातच तुफान कमाई करण्याच बॉर्डर २ यशस्वी ठरला. विकेंडला रविवारी कमाईची गती कायम राहिली. तर २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाचा फायदा देखील चित्रपटाला झाला.

मीडिया रिपोर्टनुसार, १९९७ चा वॉर ड्रामा बॉर्डरचा हा सीक्वेल आहे. ५१ कोटी रुपये तिसऱ्या दिवसाची कमाई ठरली आहे. प्रत्येक तासाला कमाईचे आकडे वाढलेले दिसतात. प्रजासत्ताक दिनी जबरदस्त कमाई केली, देशांतर्गत ५९ कोटींहून अधिक रुपयांची कमाई चित्रपटाने केली आहे.

ओपनिंग डेला बॉर्डर २ ने ३० कोटींचा गल्ला जमवला होता. दुसऱ्या दिवशी बॉक्स ऑफिसवर ३६.५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. पहिल्या दिवसाची कमाई पाहता आदित्य धरच्या धुरंधर चित्रपटाचे रेकॉर्ड मोडले. तर चौथ्या दिवशी रेड-२ आणि सिकंदरलाही बॉर्डरने मागे टाकले आहे. रिलीजच्या अवघ्या चार दिवसांतच, युद्धपट बॉर्डर २ ने आंतरराष्ट्रीय स्तरावर २५० कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. रिपोर्टनुसार, २ ची रविवारी २५ जानेवारी रोजी एकूण ३१.४६% हिंदी ऑक्युपेंसी () ठरली आहे. तर पहिल्या आठवड्यात भारतात १८० कोटी रुपये कमाई केली आहे. या चित्रपटाचे सकाळचे अनेक शो रद्द होऊनही बॉर्डर २ ने चांगली सुरुवात केली होती. रविवारनंतर वर्ल्डवाईड मार्केटमध्ये चित्रपटाची कमाई ४.३ दशलक्ष डॉलर्सच्या आसपास पोहोचली आहे.

## चंदेरी दुनिया

# अभिनेता विजयच्या जन नायकनला मोठा धक्का; सेन्सॉर प्रमाणपत्राचा आदेश हायकोर्टाकडून रद्द





दाक्षिणात्य सुपरस्टार विजयचा पूर्णवेळ राजकारणात प्रवेश करण्यापूर्वीचा शेवटचा चित्रपट मानला जाणाऱ्या जन नायकनच्या प्रदर्शनाचा मार्ग खडतर झाला आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या चित्रपटाच्या सेन्सॉर प्रमाणपत्राबाबतचा वाद पुन्हा एकदा एकल न्यायमूर्तींकडे फेरविचारासाठी पाठवला आहे. यामुळे या चित्रपटाच्या प्रदर्शनाला सध्या तरी स्थगिती मिळाली आहे.

जन नायकन चित्रपट ९ जानेवारी रोजी पोंगल सणाच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार होता. मात्र, सेन्सॉर बोर्डान चित्रपटाला प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. याविरोधात निर्मात्यांनी (केव्हीएन प्रॉडक्शन) उच्च न्यायालयात धाव घेतली होती. चित्रपट निर्मात्यांच्या मते, १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रमाणपत्रासाठी अर्ज केला होता. सुरुवातीला १६+ श्रेणीत प्रमाणपत्र देण्याचे मान्य करण्यात आले होते. सेन्सॉर बोर्डाने सुचवलेले बदल निर्मात्यांनी २४ डिसेंबर रोजी पूर्णही केले होते.मात्र, ५ जानेवारी रोजी सेन्सॉर बोर्डाने एक ई-मेल पाठवून कळवले की, हा चित्रपट आता पुनरावलोकन समितीकडे पाठवण्यात आला आहे. लष्कराचे चुकीचे चित्रण आणि धार्मिक भावना दुखावणारा मजकूर असल्याच्या तक्रारीमुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे बोर्डाने स्पष्ट केले. एकल न्यायमूर्तींनी चित्रपटाला त्वरित सेन्सॉर प्रमाणपत्र देण्याचे आदेश दिले होते. मात्र, या आदेशाविरोधात सेन्सॉर बोर्डाने खंडपीठाकडे दाद मागितली होती.

मद्रास उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती मनिंद्र मोहन श्रीवास्तव आणि न्यायमूर्ती अरुल मुरुगन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी झाली. सेन्सॉर प्रमाणपत्र मिळण्यापूर्वीच निर्मात्यांनी प्रदर्शनाची तारीख जाहीर केल्याबद्दल न्यायालयाने कडक शब्दांमध्ये ताशेरे ओढले. यावर निर्मात्यांनी धुरंधर २ या चित्रपटाचे उदाहरण देत, अशी प्रथा असल्याचे सांगितले. मात्र, खंडपीठाने निर्मात्यांवर न्यायालयीन प्रक्रियेवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा ठपका ठेवत पूर्वीचा आदेश स्थगित केला. तसेच एकल खंडपीठाने चित्रपटातील मजकुराच्या गुणवत्तेवर भाष्य करण्यात घाई केली. मूळ याचिकेतील त्रुटी सुधारण्याची संधी याचिकाकर्त्यांना देऊन या प्रकरणावर पुन्हा विचार होणे आवश्यक असल्याचेही खंडपीठाने स्पष्ट केले.

राजकारणात पूर्णवेळ सक्रिय होण्यापूर्वी अभिनेता विजय याचा हा शेवटचा चित्रपट असल्याने याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सेन्सॉर बोर्डाकडून होणाऱ्या विलंबावर भाष्य करताना विजयने एका राजकीय सभेत आक्रमक पवित्रा घेतला होता. ‘‘मी कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही, हा चेहरा दबावासमोर झुकणारा वाटतो का?’’ असा सवाल करत त्याने आगामी निवडणुकीला लोकशाही युद्ध संबोधले होते. दरम्यान,यापूर्वी १५ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयानेही निर्मात्यांची याचिका फेटाळून लावली होती. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या स्थगिती आदेशात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला होता.

# ओळख पक्ष्यांची : खंड्या



या प्रतिमेत दोन पायड किंगफिशर (सेरिल रुडिस) एका तारेवर बसलेले दिसतात. हे पक्षी आफ्रिका आणि आशियामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात आणि त्यांच्या विशिष्ट काळ्या-पांढऱ्या पिसांसाठी आणि अनोख्या शिकार पद्धतींसाठी ओळखले जातात. इतर काही किंगफिशरपेक्षा वेगळे, ते मासे आणि क्रस्टेशियन्सवर राहतात आणि नेहमी पाणवठ्यांजवळ आढळतात. शिकार करताना पाण्यावर गतिहीन घिरट्या घालण्याच्या त्यांच्या क्षमतेसाठी ते उल्लेखनीय आहेत, ज्यामुळे ते हवेच्या प्रवाहाशिवाय हे करण्यास सक्षम असलेले जगातील सर्वात मोठे पक्षी बनतात.ते बहुतेकदा जोड्या किंवा लहान गटात राहतात आणि नदी किंवा तलावाच्या बंधाऱ्यांवरील बिळांमध्ये घरटे बांधतात .

(छायाचित्र:चंद्रकांत पाटील)

# राशी-भविष्य

**मेष:** आजची भांडवली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला आदर मिळेल. व्यवसाय वाढीमुळे तुमच्या योजनांनुसार काम होईल. तुम्हाला श्वसनाच्या समस्या येऊ शकतात.

**वृषभ:** वेळेवर महत्त्वाची कागदपत्रे सांभाळा; सामाजिक कार्यात तुम्हाला आदर मिळेल. कायमस्वरूपी मालमत्ता खरेदी करण्यात घाई करू नका. कौटुंबिक समस्या सुटतील.

**मिथुन:** आजचा दिवस सर्जनशील असेल. नवीन करार आणि करारांमुळे तुमचा नफा वाढेल. दिवस दैवी कार्यात घालवला जाईल. सार्वजनिक कल्याणाच्या तुमच्या भावनेमुळे तुमची प्रतिष्ठा वाढेल.

**कर्क:** धर्मादाय कार्यात पैसा गुंतवला जाईल. सामाजिक कार्यामुळे तुम्हाला चांगली प्रसिद्धी मिळेल आणि तुमचा प्रभाव वाढेल. व्यवसाय चांगला होईल. कुटुंबाच्या पाठिंब्याने कामे सहज पूर्ण होतील.

**सिंह:** कामाच्या मोठ्या ताणात यश तुमचे मनोबल वाढवेल. अनोळखी लोकांवर विश्वास ठेवू नका; तुमची फसवणूक होऊ शकते. कामाच्या ठिकाणी वाढ होण्याची शक्यता आहे.

**कन्या:** आनंद आणि समृद्धी वाढेल. आर्थिक गुंतवणुकीबाबत विचारपूर्वक निर्णय घेतल्यास फायदा होईल. कमी बोला आणि चांगले बोला. स्व-अभ्यासात तुमची आवड वाढेल. कुटुंब आणि समाजात तुमचे महत्त्व वाढेल.

**तूळ:** व्यवसायात सुरू असलेल्या गुंतागुंतीमुळे तुम्ही त्रस्त असाल. तुम्ही कुटुंबातील सदस्यासह एखादे विशेष कार्य पूर्ण करण्यासाठी पवित्र स्थळांना भेट द्याल.

**वृश्चिक:** दिवसाच्या सुरुवातीला राग येईल. जर गोष्टी तुमच्या इच्छेनुसार झाल्या नाहीत तर तुम्ही कुटुंबातील सदस्यांवर नाराज व्हाल. तुम्हाला नवीन नोकरीची ऑफर मिळेल. धार्मिक आवड वाढेल.

**धनु:** गुंतवलेल्या निधीतून मिळणारा नफा उशिरा होईल. तुमच्या मुलांसाठी निर्णय घेण्यास तुम्ही संकोच कराल. बिघडणारी आर्थिक परिस्थिती बांधकाम कामाच्या गतीवर परिणाम करू शकते.


**मकर:** कमी वेळात मोठ्या नफ्याच्या मागे लागू नका. कठोर परिश्रम करा. तुमचे पराक्रम वाढतील. व्यवसायात नवीन योजना सुरू केल्या जातील. घाई हानिकारक ठरेल.

**कुंभ:** आज, विशेष प्रगतीशील योग तुमच्या मनात आनंद आणतील. तुम्ही तुमचे मन भक्तीत गुंतवण्याचा प्रयत्न कराल. कामाच्या ठिकाणी अनुकूल परिणामांसाठी सक्रियता आवश्यक आहे.

**मीन:** आळस सोडून काम करा. रखडलेले प्रकल्प यशस्वी होतील. भांडवली गुंतवणुकीमुळे अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 291



**चार अक्षरी**
- अभिनय
- उठाठेव
- उदो उदो
- उपवन
- कार्तिकेय
- घनघोर
- दशरथ
- नटवर
- यमदूत
- लाजाहोम
- लीलावती
- विदूषक
- विनिमय
- सनातन

**पाच अक्षरी**
- करमणूक
- तिरकमठा
- दोलायमान
- परशुराम
- वामन मूर्ति
- सासूरवास

**सहा अक्षरी**
- घागर फुंकणे
- प्रसव वेदना
- विजयादशमी

**सात अक्षरी**
- अथ पासून इति
- नामकरण विधी


(उत्तर पुढील अंकी)

**संकेत शब्द:–**

**दोन अक्षरी**
- कथा
- कर
- कान
- टक
- टीक
- ठेका
- दर
- दोष
- नग
- नस
- परी
- पावा
- पैज
- माघ
- माळी
- मोर
- याग
- रज
- रत
- रव
- लक्ष
- वन
- विद्या
- विना
- वेणू
- सवे
- साय
- साव
- हम
- क्षय


**तीन अक्षरी**
- अनाथ
- असंख्य
- इतिश्री
- ओनामा
- ओहोटी
- उदय
- कलम
- कानन
- केसर
- गमक
- घामोळी
- जलद
- तिरीप
- दांभिक
- नकली
- निथळ
- परम
- प्रवर
- फाटक
- फुंकर
- मोगरा
- मोहन
- वचक
- वलय
- वारस
- शुश्रुषा
- सवाष्ण
- सागर
- सासरा
- संकट
- सदर

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 672



**–: आडवी विधाने :–**

1) श्री दत्तात्रयांचा जन्मोत्सव दिन
4) किंचित ओले, ओलसर
6) अन्न न मिळण्यासारखी परिस्थिती
9) मऊ पदार्थाचा आघात
11) मायाळू, प्रेमळ
12) जंगलात पेटलेली आग
13) दोन टेकड्यांमधील खोल भगदड
14) लाक्षणिक अर्थाने आयुष्यात स्थिरता नसणे, अरण्यात राहणे
17) प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात वाढलेले नदीतील पाणी
18) सुगंधी द्रव्याचा लेप
19) खेळाडूंचा गट
20) बलरामाची बायको, सत्ताविसावे नक्षत्र
21) उत्कृष्ट, चांगल्या प्रतीचे
22) प्रसन्न, वर देणारा
24) प्रतिकार, विषावर उपाय
25) हल्ला, भडिमार
27) विरजलेले दूध
28) अपराध, कुकर्म
30) आत्मश्लाघाशून्य नायकाच्या प्रकारापैकी एक, कठीण प्रसंगी गंभीरपणे वागणारा
32) वात 33) भ्राता, बंधू
34) बकरा
35) पौर्णिमा
36) नीरज
38) कापसाची एकवीस पदरांची वात
40) कावळयाचे ओरडणे
43) येणारे, प्राप्ती
44) महिन्याचा विसावा भाग, सूर्य, चंद्र यांच्यामध्ये 12 अंश अंतर पडणारा काळ
47) पत्रातील वर्तमान, तोंडी सांगितलेली माहिती
49) झोपण्याची खोली
51) खुप, भरपूर
52) मध, गोड, पुष्परस
53) नवीनच आलेला
54) कोरडे
55) महादेवाच्या देवालयाबद्दल प्रसिद्ध, मध्य प्रदेश येथील प्राचीन जगप्रसिद्ध शिल्पे
57) दरबाराचा फारशी पत्रव्यवहार करणारा चिटणीस, मुनशी यावरुन पडलेले नाव
60) आपले खाद्य अर्धवट गिळून नंतर ते पुन्हा तोंडात आणून चघळीत बसणे
63) देणगी, नवरदेव
64) खोकला
66) हिमतुषार
67) वाद, भांडण
68) फळाच्या आतील मगजदार भाग
69) नियंत्रण करणारा
71) नम्र, लय पावलेला
73) मकई
74) पाठीच्या हाडांची गाठ
75) कमी करणे, काढून टाकणे
76) विचारविनिमयासाठी जमलेली मंडळी
77) रानरेडा
78) उपभोक्ता, रमणारा

**–: उभी विधाने :–**

1) धीराचा, निश्चयी ताज्या दमाचा
2) सांभाळून ठेवणे, काळजीपूर्वक रक्षण
3) नदीचा काठ, शर
4) वांती, उलटी
5) बिछान्याची गुंडाळी
6) ज्या व्यक्तीसाठी समारंभ आयोजित केला ती व्यक्ती
7) जतन करणे, रक्षण
8) सुटी, परवानगी
10) पावलांचा आवाज
15) घसघशीत
16) नवऱ्याची दुसरी बायको
18) ऊद व एखादा सुगंधी पदार्थ यांचे मिश्रण लावलेली कांडी
21) परतंत्र, दुसऱ्याच्या ताब्यात असलेला
23) सावकाश काम करणारा
26) पुत्रत्वाच्या रुपाने एखाद्याच्या मांडीवर दिलेला
28) सात पूर्णांक तीन चतुर्थांश
29) चांदी
31) जमिनीचा मऊपणा व भुसभुशीतपणा
32) शक्तिशाली, मजबूत
33) अंश, खंड, हिस्सा
34) नि:शब्द
35) थोर सत्पुरुषाची प्रतिवार्षिक मृत्यूतिथी
37) एक तृणधान्य
39) प्रेत, मृतदेह
41) वर्गासंबंधी
42) अपक्व स्थितीत वाळलेला खजूर
45) शुभाशुभ चिन्ह
46) समय, काळ
47) ज्या तापात गळ्याजवळ बारीक पुळया येतात तो ताप
48) दाणेदार
49) रात्रीच्या भोजनानंतर थोडेसे मंदगतीने फिरणे
50) जो स्त्री नव्हे पुरुषही नाही असा मनुष्य, दुबळा पुरुष
51) हत्तीच्या सोंडेचे अग्र, अजमेरजवळील एक तीर्थक्षेत्र
52) रोजंदारीने काबाडकष्ट करणारा
55) खाज, मस्ती, प्रबळ इच्छा
56) गलबतावरील दिशा ओळखण्याचे यंत्र
58) माणिकाचा एक प्रकार
59) दुसऱ्यांशी मिळून काम करणे, सहकार्य
61) करकर वाजू नये, झिजू नये इ. साठी गाडा, रहाट इत्यादिकांच्या अवयवास लावण्यात येणारे तेल
62) भयामुळे होणारा कंप
65) अनेक दिवस चालणारा यज्ञ
70) तत्वांश, अर्क
72) पर्वत, दागिना
74) एक वजन किंवा माप

(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

महत्त्वाचे

## ...म्हणून पत्नीने केले पतीवर चाकूने वार

**भंडारा :** बायकांचे डोकं कुठल्या गोष्टींवरून संतापेल आणि त्या कधी आक्रमक होतील याचा खरंच काही नेम नाही, याचं जिवंत उदाहरण म्हणजे भंडाऱ्यात घडलेली एक घटना. अत्यंत किरकोळ अशा वादातून पत्नीने पतीवर चक्क चाकूने वार केल्याची घटना तुमसर तालुक्यातून समोर आली आहे.पती-पत्नी दोघेही त्यांच्या मित्र परिवारासोबत सिनेमागृहात चित्रपट पाहण्यासाठी गेले. बायांनी समोरच्या रांगेत बसायचे आणि पुरुषांनी मागच्या रांगेत असे ठरले. अर्थात हे सहजच होते. मात्र एका दांपत्याचे यावरून गणित बिघडले. नवऱ्याने जवळ बसावे असे पत्नीला वाटत असावे त्यामुळे तिला त्याचा राग आला आणि घरी आल्यावर दोघांमध्ये यावरून वाद झाला. किरकोळ कारणावरून झालेला हा वाद अगदी विकोपाला गेला आणि पत्नीने पतीवर चक्क चाकू नये वार केले. यात पती जखमी झाला असून गोबरवाही पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.प्रकरण असे की काल गणराज्य दिनानिमित्त सुट्टी होती त्यामुळे मित्रांनी त्यांच्या कुटुंबासोबत चित्रपट पाहण्याचा बेत आखला. तुमसर तालुक्यातील नाकाडोंगरी येथील दांपत्य त्यांच्या मित्रपरिवारासह चित्रपट पाहण्यास गेले.

## व्हॉट्सअॅप 'बाबा'ने महिलेला फसवले, सायबर पोलिसांत गुन्हा दाखल

**भंडारा :** ''तुझ्या आयुष्यात अडचणी आहेत नातेसंबंध बिघडले आहेत पूजा-पाठ केला तर सगळं ठीक होईल'' अशा शब्दांच्या जाळ्यात अडकवत एका अज्ञात इसमाने महिलेची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार भंडारा जिल्ह्यात उघडकीस आला आहे. सायबर गुन्ह्याच्या अनेक घटना घडत असताना अशाप्रकारे सायबर गुन्हेगारांना बळी न जाण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.दिनांक ५ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत व्हॉट्सअॅप क्रमांकावर स्वतः चे नाव बसीम अली खान (बाबा) असल्याचे सांगून फिर्यादी महिलेशी संपर्क साधला. तिच्या वैयक्तिक आयुष्यातील अडचणी आणि मित्रासोबतच्या नातेसंबंधांवर तोडगा काढण्यासाठी पूजा-पाठ व धार्मिक विधी करण्याचे आमिष दाखवण्यात आले. टप्प्याटप्प्याने पैसे उकळले.या तथाकथित 'बाबा'ने विश्वास संपादन करत विविध बँक खात्यांमध्ये टप्प्याटप्प्याने एकूण ४ लाख ३५ हजार २०० रुपये जमा करण्यास फिर्यादी महिलेला प्रवृत्त केले. पूजा पूर्ण झाल्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याने, आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने सायबर पोलिसांकडे धाव घेतली. फिर्यादीच्या लेखी तक्रारीवरून पोलीस स्टेशन सायबर, भंडारा येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध कलम ३१८(४) भा.न्या.संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(ब) व ६६(क) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# बाबासाहेबांचे नाव घ्यायला लाज वाटते काय?-विजय वडेट्टीवार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर , दि. २७ :** प्रजासत्ताक दिनाच्या भाषणात मंत्री गिरीश महाजन यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव न घेतल्याने राज्याच्या राजकारणात नवा वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणावरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका करत, ''बाबासाहेबांचे नाव घ्यायला लाज वाटते काय?'' असा थेट सवाल गिरीश महाजन यांना केला. ते नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.



वडेट्टीवार म्हणाले की, ज्यांचा बाबासाहेबांना विरोध होता, जे संविधान निर्मितीच्या काळात संविधानालाच विरोध करत होते, त्यांनाच आज सत्तेची खुर्ची लाभली आहे. आंबेडकरांचे नाव घ्यायला यांना लाज वाटते, ही गंभीर बाब आहे. या देशात राहण्याचा आणि सत्तेत बसण्याचा अधिकार संविधानामुळेच मिळतो. ज्यांच्या मनात संविधानच नाही, त्यांना सत्तेवर बसण्याचा अधिकार आहे का, असा सवालही त्यांनी केला. बाबासाहेबांचे नाव टाळणे हा अपघात नसून जाणीवपूर्वक केलेला प्रकार असल्याचा आरोप त्यांनी केला.

देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा होत असताना नाशिकमध्ये मात्र या भाषणामुळे वाद पेटला. ध्वजवंदनानंतर मंत्री गिरीश महाजन यांनी केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख न केल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. वन विभागातील माधवी जाधव या महिला कर्मचाऱ्याने यावर आक्षेप घेत थेट माध्यमांसमोर आपला संताप व्यक्त केला.

या घटनेनंतर राजकीय वातावरण तापले असून सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले आहेत. निवडणुकीच्या काळात बाबासाहेबांच्या नावाचा आणि प्रतिमेचा वापर केला जातो; मात्र त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करण्याची वेळ आली की सत्ताधारी मौन पाळतात, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. हा प्रश्न केवळ एका भाषणापुरता मर्यादित नसून सत्ताधाऱ्यांच्या विचारधारेवर प्रकाश टाकणारा असल्याचेही ते म्हणाले.

> चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता स्थापन होईल आणि काँग्रेसचाच महापौर होईल. ते कसे होईल, हे येणारा काळ सांगेल. कोण कोणाला भेटले, ते आम्हालाही भेटून गेले आहेत. भाजपने मुस्लिम लीगसोबत युती केली तर ती योग्य ठरते; मात्र आम्ही केली तर चालत नाही, हे कसे? अचलपूरमध्ये भाजपने सत्तेसाठी युती केली. आम्ही स्वीकृत नगरसेवक पदासाठी केली तर त्यात चूक काय?'' असा सवालही वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.

यावेळी वडेट्टीवार यांनी स्थानिक राजकारणावरही भाष्य केले. चंद्रपुरात काँग्रेस सत्ता स्थापन करणार असल्याचा दावा त्यांनी केला. मुंबई महापालिकेतील सत्तास्थापनेबाबत सत्ताधाऱ्यांमध्ये अद्याप एकमत नसून अंतर्गत वाद आणि पदांसाठी संघर्ष सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी व शेतमजुरांच्या प्रश्नांवर सरकारने यापूर्वीही फसवणूक केल्याचा आरोप करत, नाशिकमधील शेतकरी मोर्चा सरकारचे पितळ उघडे पाडणारा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## तब्बल चार दशकानंतर बिनागुंडातील नक्षली दहशतीचे प्रतीक जमीनदोस्त

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली , दि. २७ :** जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात शांतता आणि लोकशाही प्रस्थापित करण्याच्या दिशेने जिल्हा पोलिस दलाने पुन्हा एकदा एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. भामरागड उपविभागातील बिनागुंडा येथे पोलीस मदत केंद्र स्थापन केल्यानंतर अवघ्या २४ तासांत, ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून पोलिसांनी नक्षलवाद्यांच्या दहशतीचे प्रतीक असलेले स्मारक जमीनदोस्त केले.

बिनागुंडा या भागात नक्षली विचारसरणीचा प्रभाव मोडीत काढण्यासाठी जिल्हा पोलिसांनी अलीकडेच २४ जानेवारी रोजी नवीन मदत केंद्र कार्यान्वित केले होते. या केंद्राच्या परिसरात आणि विनोबा प्राथमिक आश्रमशाळेजवळ हे नक्षलवादी स्मारक वर्षानुवर्षे उभे होते.



नक्षलवाद्यांच्या उपस्थितीचा आणि भयाचा हा दर्शनी पुरावा नष्ट करण्यासाठी अपर पोलीस अधीक्षक कार्तिक मधिरा आणि उपअधीक्षक अमर मोहिते यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीत विशेष मोहीम आखण्यात आली. स्मारकाच्या परिसरात स्फोटके असण्याची शक्यता लक्षात घेता, सी-६० कमांडोज आणि बीडीडीएस (बॉम्ब शोधक व नाशक) पथकाने अत्यंत सतर्कतेने ही कारवाई पार पाडली.दहशतीची स्मारके नव्हे, तर विकासाची केंद्रे उभारण्यावर आमचा भर आहे,असा स्पष्ट संदेश या कारवाईतून पोलीस दलाने दिला आहे. या धडक कृतीमुळे स्थानिक स्तरावर प्रशासनावरील लोकांचा विश्वास वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मागील वर्षभरात नक्षलग्रस्त भागात उभारण्यात आलेल्या नेलगुंडा, कवंडे, तुमरकोठी आणि फुलणार या नवीन पोलीस ठाण्यांमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. एकेकाळी जिथे नक्षलवाद्यांच्या भीतीपोटी लोक समोर येण्यास घाबरत होते, तिथे आज शालेय विद्यार्थी आणि स्थानिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तिरंग्याला मानवंदना दिली. देशभक्तीपर गीतांच्या सुरावटीत पार पडलेल्या या सोहळ्याने अतिदुर्गम गावांमधील जनजीवन मुख्य प्रवाहाशी जोडले जात असल्याचे अधोरेखित केले.

## सेवाग्राम येथील महात्मा गांधी आर्युविज्ञान संस्थेतील कर्मचारी उपोषणावर, संस्थेतील वैद्यकीय सेवा ठप्प पडण्याची भीती

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**वर्धा , दि. २७ :**सेवाग्राम येथील महात्मा गांधी आर्युविज्ञान संस्थेतील विविध कर्मचारी विविध मागण्यांसाठी उपोषणास बसले आहे. वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय चालविणाऱ्या या संस्थेतील प्रयोगशाळेचे कर्मचारी हे आंदोलन करत आहे.

कर्मचाऱ्यांच्या मते संस्थेने प्रयोगशाळा तांत्रिक सहायक म्हणून त्यांना नियूक्त केले. मात्र, जाहिरातीत मात्र प्रयोगशाळा तंत्रज्ञ असा उल्लेख होता. तिच नियूक्ती मिळावी, तीन वर्षाची सेवा झाल्याने सेवेत नियमीत करण्यात यावे, प्रयोगशाळा तंत्रज्ञाची वेतन श्रेणी लागू करावी, अशी त्यांची



मागणी आहे.

निवड झालेल्या ११ कर्मचाऱ्या पैकी दोघांनाच तंत्रज्ञ म्हणून नियूक्ती मिळाली आहे. नियुक्तीच्या आदेशात २ वर्षाचा परिविक्षा कालावधी नमूद होता. मात्र, पुढे कोणतेही कारण न देता १ वर्षाचा कालावधी वाढवण्यात आला. तो सुध्दा कर्मचाऱ्यांनी पूर्ण केला. वैद्यकीय शिक्षण खात्यात प्रयोगशाळा सहायक तंत्रज्ञ असे पद नाही. या संस्थेत तंत्रज्ञ म्हणूनच कर्मचारी कार्यरत आहेत. सहायक म्हणून कोणाचीही आजवर नियुक्ती झालेली नाही. त्यामुळे संस्थेने आमची दिशाभूल करीत आर्थिक नुकसान केले, असा कर्मचाऱ्यांचा आरोप आहे. न्याय मिळावा म्हणून संस्थेच्या अधिष्ठात्यांना १ जानेवरीस पत्र देण्यात आले. मात्र, प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर संस्था सचिव व अध्यक्षांना पण पत्र दिले. पण कुठेही न्याय मिळाला नाही. त्रस्त होउन शेवटी उपोषणास बसलो आहे, असे आंदोलक सुमेध पाटील, स्वप्नील वरघणे, शोएब खान, सारिका कांबळे, प्रतिभा देवतळे यांनी नमुद केले. जोपर्यंत मागण्या पुर्ण होत नाही. तोपर्यंत हे उपोषण सुरू राहणार आहे. यामुळे संस्थेतील वैद्यकीय सेवा ठप्प पडण्याची भीती व्यक्त होत आहे.

## येल्लूर येथून मुखेडची लालपरी तीर्थयात्रेसाठी रवाना

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**मखेड , दि. २७ :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मुखेड आगारातून हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे एसटी संगे तीर्थयात्रा योजना अंतर्गत मौजे येल्लूर येथून लालपरी रवाना करण्यात आली. मुखेड आगाराचे आगार प्रमुख सुभाष पवार यांनी या योजनेचा पहिला प्रयोग सुरू केला आहे.

सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी नाळ जोडून त्यांच्या श्रद्धेला सुरक्षिततेची आणि परवडणाऱ्या खर्चाची जोड देणारी ही लोकाभिमुख योजना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने साकारली आहे. दि. २३ जानेवारी २०२६ पासून ही योजना राज्यातील २५१ आगारांमध्ये एकाच वेळी राबविण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने योजनेला प्रतिसाद देत मुखेड आगार प्रमुख सुभाष पवार यांनी पहिल्याच दिवशी म्हणजे दि. २३ जानेवारी रोजी तालुक्यातील मौजे येल्लूर येथून तीर्थयात्रेसाठी लालपरीचा शुभारंभ केला. यावेळी आगार प्रमुख सुभाष पवार यांच्या हस्ते तीर्थयात्रा बसचा शुभारंभ करून प्रवाशांना शुभेच्छा देण्यात आल्या.

सदर गाडी येल्लूर येथून तुळजापूर, पंढरपूर, शिंगणापूर, देहू-आळंदी, जेजुरी, ज्योतिबा, कोल्हापूर, प्रतापगड, रायगड, गणपतीपुळे, नाणीज, नाशिक, त्रंबकेश्वर, सप्तगिरी, शिर्डी, परळी वैजनाथ येथे दर्शन करून परत मुखेडयेल्लूर येथे येणार आहे.

यावेळी आगार प्रमुख म्हणाले की, महामंडळाची ही योजना प्रवाशांना योग्य दरात विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घडवण्यासाठी सुरू करण्यात आलेली विशेष सेवा आहे. महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्रे आणि शक्तीपीठांचे दर्शन घडविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. गावातील एखाद्या गटप्रमुखाने ४५ प्रवाशांची यादी व प्रवासाच्या ठिकाणांची माहिती दिल्यास मंजुरीनंतर लालपरी गाडीची व्यवस्था करण्यात येईल. सदर गाडीत ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना, अमृत ज्येष्ठ योजना (७५ वर्षांपेक्षा जास्त वय), तसेच दिव्यांग व्यक्तींना सवलती लागू आहेत.

## गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांवर लाठीचार्ज; आश्वासनानंतर आंदोलन मागे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भंडारा , दि. २७ :** गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांकडे शासन सातत्याने दुर्लक्ष करीत असल्याने न्यायहक्कांसाठी २६ जानेवारी रोजी प्रकल्पग्रस्तांनी पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले. आंदोलन करुनही कोणतीही दखल न घेतल्याने प्रकल्पग्रस्तांनी राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करुन प्रकल्पग्रस्तांवर लाठीचार्ज केला. अखेरीस अधिकाऱ्यांनी आश्वासनाचे पत्र दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले. गणतंत्रदिनी दिवसभर सुरू असलेल्या या आंदोलनामुळे प्रशासनाच्या नाकीनऊ आले होते.



गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या पूनर्वसनाचे अनेक प्रश्न दशकांपासून रेंगाळलेले आहेत. यामध्ये वाढीव मोबदला, गावठाणांमधील नागरी सुविधा व इतर प्रलंबित मागण्यांचा समावेश आहे. धरणाच्या बॅकवॉटरमुळे अनेक गावे प्रभावित झाले आहेत. परंतु, त्यांना प्रकल्पग्रस्तांचा दर्जा नाही. त्यामुळे ही गावे लाभापासून वंचित आहेत. पूनर्वसन झालेल्या अनेक गावांमध्ये नागरी सुविधांची वाणवा आहे. त्यामुळे २७ गावांचे पूर्णपणे पूनर्वसन करुन मोबदला द्यावा, या मागणीसाठी वारंवार निवेदने देऊनही केवळ आश्वासने मिळत असल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र असंतोष आहे. डिसेंबर २०२५ मध्ये गोसेखुर्द प्रकल्पग्रस्तांनी कारधा येथील वैनगंगा नदीच्या पात्रात जलसमाधी आंदोलन सुरू केले होते. त्यावेळी पालकमंत्र्यांनी दूरध्वनीवरून आंदोलकांशी संवाद साधला आणि विधिमंडळ अधिवेशनानंतर पुढील आठवड्यात समिती सदस्यांसोबत निर्णायक बैठक घेण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, बराच काळ लोटूनही कोणतीही बैठक न झाल्याने अखेरीस २६ जानेवारी रोजी राष्ट्रीय महामार्गावरील पिपरी पूनर्वसन येथील पाण्याच्या टाकीवर प्रकल्पग्रस्त चढून भाऊ कातोरे, अभिजित लेंडे, दिलीप मडामे या प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन सुरू केले. सोबतच शेकडो प्रकल्पग्रस्तांनी राष्ट्रीय महामार्ग अडवून ठेवला. जोपर्यंत पालकमंत्री येऊन बैठक घेत नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच ठेवण्याचा पवित्रा प्रकल्पग्रस्तांनी घेतल्याने प्रशासन खळबळून जागे झाले.

## मालची येथील दलित अत्याचार विरोधात मोर्चा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कुही, दि. २७ :** कुही तालुक्यातील बानोर ग्रामपंचायत अंतर्गत मौजाः मालची येथिल २३/१/२०२६ ला बोरकर, परिवाराचे घर ग्रामपंचायत बानोर येथील सरपंच बंडुजी नरुले व सचिव बी.बी. भोयर. यांनी पूर्ण उध्वस्त केलेले असून त्यांचे उदरनिर्वाहाचे साधने भांडीकुंडी कपडे लते जप्त करून परिवाराला उघड्यावर पाडलेले आहे जातीय शुद्ध भावनेवरून हा अत्याचार केला असून वंचित बहुजन आघाडीने यांची दखल घेऊन आरोपीवर अनुसूचित जातीय अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे कलम असून गुन्हा दाखल करावा त्याला घर बांधुन मिळावे उदरनिर्वाह करीता दहा लाख रुपये द्यावे,गुन्हेगारावर एफआयआर दर्ज करावा या मागणी करीता दि.२९/१/२०२६ रोजी भिम नगर कुही ते तहसिल कार्यालयावर मोर्चाचे आयोजन वंचीत बहुजन आघाडी व अन्य आंबेडकर संघटना-समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने करण्यात आले असुन बहुसंख्य सोबत दलीत अत्याचारांच्या विरोधात मोर्चात सहभागी व्हावे असे आव्हान अजय साहारे,जिल्हाअध्यक्ष यांच्या वतीने करण्यात आले आहे,



## चाचेरकर टोळी विरोधात अखेर मकोका

**नागपूर :** महापालिका निवडणूकीदरम्यान मतदानाच्या अगदी पूर्वसंध्येला माजी नगरसेवक भुषण शिंगणे यांच्यावर गोरेवाडा येथे प्राणघातक हल्ला झाला. शिंगणे हे निवडणूकीत मतदारांना पैसे वाटत असल्याचा आरोप करत महिला प्रतिस्पर्धी उमेदवाराचा पती गणेश उर्फ घुई चाचेरकर टोळीने हा हल्ला घडवून आणला. दरम्यान झालेल्या निवडणूकीत शिंगणे यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यामुळे हा पराभव जिव्हारी लागताच गृहमंत्रालयाने चाचेरकर टोळीचे पंख छाटणे सुरू केले आहे.या मारहाण प्रकरणात गुन्हेगारी इतिहास असलेल्या गणेश उर्फ घुई चाचेरकरसह त्याचे १४ साथिदार अशा १५ जणांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हागारी नियंत्रण कलमांतर्गत (मकोका) कारवाईचे आदेश मंगळवारी जारी करण्यात आले. शिंगणे यांचा झालेला पराभव जिव्हारी लागल्याने प्रजासत्ताक दिन आटोपताच गृहमंत्रालयाने चाचेरकर टोळीविरोधात मकोकाचे आदेश बजावले, असे सांगितले जात आहे.चाचेरकरसह आशिष भड, निलेश अन्ना, योगेश दिलीप कापसे, राहूल राठोरकर, पियुष राजेंद्र भोंगाडे, सुमित नरेश जामगडे, चैतन्य पांडूरंग इवनाते, तरुण विनोद बमनेरे, सुधीर भाऊजी धुमाळे, रोशन दिलीप परतेकी, निलेश उर्फ नितीन कृष्णाजी बागडे, मंगेश रमेश मांगे, अंकूश विजय कोचे, अमित विजय मेश्राम अशी शिंगणे हल्ला प्रकरणात मकोका अंतर्गत कारवाई झालेल्या चाचेरकर टोळीतील सदस्यांची नावे आहेत.

**चर्चा** | चंद्रपूर महापालिकेत महापौरपदाचा पेच

# वडेट्टीवार यांनी घेतली उद्धव ठाकरे यांची भेट

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. २७ :** चंद्रपूर महापालिकेत सत्ता स्थापनेसाठी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी मातोश्री वर दोन्ही नेत्यांमध्ये अडीच वर्षे शिवसेना व अडीच वर्ष काँग्रेसने महापौरपद वाटून घेण्यासंदर्भात ३० मिनिट चर्चा झाली.

चंद्रपूर महापालिकेत काँग्रेस २७ सदस्यासह सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. भाजप २३, शिवसेना ६, अपक्ष २, वंचित २, शिवसेना शिंदे १, बसप १, एमआयएम १ तथा जनविकास सेनेचे ३ नगरसेवक आहेत. संख्याबळ अधिक असले तरी काँग्रेस पक्षात विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार व खासदार प्रतिभा धानोरकर



यांच्यात वाद आहे. महापौर खासदार धानोरकर यांच्या गटाचा आणि आमदार विजय वडेट्टीवार गटाला स्थायी समिती सदस्य तर गट नेता प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या गटाचा आहे. मात्र वडेट्टीवार गटाचे माजी शहर अध्यक्ष रामू तिवारी यांनी धानोरकर यांच्या गटातील ५ नगरसेवक गळाला लावले आहेत. त्यामुळे सध्या वडेट्टीवार गटाकडे १९ नगरसेवक झाले आहेत. अशातच वडेट्टीवार यांनी मुंबईत उद्धव ठाकरे यांची मुंबईत भेट घेतली.

वडेट्टीवार व ठाकरे या दोन्ही नेत्यांमध्ये सत्तास्थापन करण्यासंदर्भात चर्चा झाली. दरम्यान शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गिरे यांनी महापौर पद देणाऱ्या पक्षाला पाठिंबा देणार असे जाहीर केले आहे. ठाकरे व वडेट्टीवार यांच्या भेटीत याच विषयावर चर्चा झाली असे सांगण्यात येत आहे. चर्चेदरम्यान चंद्रपूर शिवसेना जिल्हाप्रमुख संदीप गिर्हे उपस्थित होते. दरम्यान सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ठाकरे व वडेट्टीवार यांच्यात अडीच वर्षे महापौर काँग्रेस पक्षाचा तर अडीच वर्षे शिवसेनेचा यासोबत अडीच वर्षे स्थायी समिती अध्यक्ष दोन्ही पक्षाकडे असणार यावर सकारात्मक चर्चा दोन्ही नेत्यांमध्ये झाली.

चंद्रपूर महापालिका मध्ये महाविकास आघाडी म्हणून आम्ही चंद्रपूरच्या जनतेला ५ वर्षासाठी स्थायी सरकार देऊ अशी प्रतिक्रिया आमदार वडेट्टीवार यांनी दिली. भाजपचा महापौर होणार ही केवळ नेत्यांद्वारे पसरवण्यात आलेली अफवा आहे असे वडेट्टीवार म्हणावे. ठाकरे यांची भेट घेतली असली तरी अंतिम निर्णय काय होतो याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. दरम्यान या भेटीच्या वेळी संजय राऊत, अनिल परब तथा शिवसेनेचे इतरही नेते उपस्थित होते.

purple FINANCE
कार्यालय: पर्पल फायनान्स लिमिटेड, ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५१.
दूरध्वनी: ०२२-६९१६५१२३, वेबसाइट: www.purplefinance.in

मागणी सूचना

पर्पल फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी, ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५१ येथे आहे आणि भारतातील विविध ठिकाणी शाखा आहेत (यापुढे "पीएफएल" म्हणून संदर्भित) ही कंपनी कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत नोंदणीकृत कंपनी आहे. आणि पीएफएल ही SARFAESI कायद्याअंतर्गत सुरक्षित कर्जदार असल्याने आणि सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम २ सह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना / सह-कर्जदारांना सूचनांमध्ये नमूद केलेली रक्कम नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत अतिरिक्त व्याजासह परत करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली आहे, त्याव्यतिरिक्त, खाली सूचीबद्ध केलेल्या कर्जदारांच्या माहितीच्या उद्देशाने, कर्जदारांना या सार्वजनिक सूचनेद्वारे कळविण्यात येत आहे.

| क्र. क्र. | कर्जदार/सह-कर्जदार/लॅन/शाखेचे नाव | कोणत्या हितसंबंधाच्या संदर्भात सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | NPA तारीख | सूचना पाठविण्याची तारीख आणि थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | 1. विलास काबल पंचबुधे (कर्जदार) 2. वनिता विलास पंचबुधे (सह-कर्जदार) लॅन: PFLSLBHN0001014 शाखा : भंडारा | गावठाण मालमत्ता क्रमांक २५८, घर क्रमांक २५८, आरसीसी क्षेत्रफळ ३६०.०० चौ. फूट म्हणजेच ३३.४६ चौ. मीटर, मौजा - दावडीपार बाजार येथे स्थित, ग्रामपंचायत दावडीपार बाजाराच्या स्थानिक अधिकारक्षेत्रात, तह. भंडारा, जिल्हा भंडारा -४४१९२४ सीमा: पूर्व - प्रदीप पंचबुद्धे यांचे घर पश्चिम - प्रमोद तिजारे यांचे घर, दक्षिण - रस्ता, उत्तर - प्रभाकर मडावी यांचे घर | ०८-०१-२०२६ | १२-०१-२०२६ आणि रुपये.३४६६२४/- |

म्हणून, वर नमूद केल्याप्रमाणे कर्जदारांना/सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये त्यांना या सूचना प्रकाशित झाल्यापासून 60 दिवसांच्या आत संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराविरुद्ध वर दर्शविल्याप्रमाणे एकूण थकबाकीची रक्कम भरण्याचे आवाहन केले आहे. संबंधित कर्जदार/सह-कर्जदाराने एकूण थकबाकीची रक्कम पुढील व्याजासह भरण्यात अयशस्वी झाल्यास, पीएफएलला वर वर्णन केल्याप्रमाणे मालमत्तेवर सुरक्षा व्याज लागू करण्यासाठी कलम 13(4) अंतर्गत कारवाई करण्यास भाग पाडले जाईल, तसेच कायद्यानुसार आणि येथे बनवलेल्या नियमांनुसार इतर पद्धतीने नोटीस बजावण्यासाठी पावले उचलली जात आहेत. तुम्हाला सूचना देण्यात येते की, SARFAESI कायद्याच्या कलम 13(8) मध्ये तपशीलवार वर्णन केल्याप्रमाणे, सार्वजनिक लिलावासाठी किंवा विक्रीद्वारे हस्तांतरणासाठी खाजगी करारासाठी सूचना प्रकाशित होण्याच्या तारखेपूर्वी कधीही पीएफएलने केलेल्या खर्चासह संपूर्ण देय रक्कम, शुल्क आणि खर्च भरल्यानंतर सदर गहाणखत परत मिळवता येते. लक्षात ठेवा की SARFAESI कायद्याच्या S-13 (13) च्या अटींनुसार, तुम्हाला सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास आणि/किंवा व्यवहार करण्यास प्रतिबंधित केले आहे.

तारीख: २८/१/२०२६ | ठिकाण: भंडारा
अधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लिमिटेड

मणपुरम घर फायनान्स लि.
मनप्पुरम होम फायनान्स लिमिटेड पूर्वी मनप्पुरम होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड
CIN : U65923KL2010PLC039179
Regd ऑफिस: 8/596 A, पद्मप्रभा बिल्डिंग, श्रीरामा स्वामी मंदिराजवळ, चेरप्पू - थ्रीप्रयार रोड, थ्रीप्रयार, थ्रिसूर, केरळ 680567 | फोन नंबर: ०४८७-३५२०५०४, वेबसाइट: www.manappuramhomefin.com

ताबा सुचना (स्थावर मालमत्तेसाठी)

तर, मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड ("MAHOFIN") चे अधिकृत अधिकारी म्हणून, अधोस्वाक्षरीकर्ता हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट *[अधिनियम], २००२ (५४ ऑफ २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ९ सह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार आणि सह-कर्जदारांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याजाची परतफेड करण्याचे आवाहन करणारी मागणी सूचना जारी केली आहे. कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की अधोस्वाक्षरीकर्त्याने सदर नियमांच्या नियम ९ सह वाचलेल्या सदर *[अधिनियम] च्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना/तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारासाठी संबंधित प्रत्येक मालमत्तेसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेडच्या शुल्काच्या अधीन असेल:

| क्र. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक/शाखा | ज्या हितसंबंधासाठी स्थापन करण्यात आले आहे त्या सुरक्षित मालमत्तेचे वर्णन | मागणी पाठविण्याची सूचना आणि थकबाकीची तारीख | ताब्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनीता हेमराज इनवाटे, महेश हेमराज इनवाटे, / MHL00060037235/नागपूर | गावठाण जमीन असलेल्या घर क्रमांक ४१८ चा तो सर्व तुकडा आणि पार्सल, एकूण क्षेत्रफळ ७०४ चौ.फूट (६५.०० चौ.मी.) आणि त्यावरील आर.सी.सी. बांधकाम, मौजा-खैरी, वॉर्ड क्रमांक ०४, ग्रामपंचायतीच्या अधिकारक्षेत्रात - सेलोटपार/खैरी, तालुका- तिरोडा, जिल्हा: गोंदिया, महाराष्ट्र-४४१९११. पूर्व-घर क्रमांक ४१८/सिमेंट रोडने, पश्चिम-घर क्रमांक ४१८ च्या खुल्या जागेने, दक्षिण-श्री. राजू उईके यांच्या घराने, उत्तरेकडे-श्री. निरज लांडगे यांच्या घराने | १८-१०-२०२५ आणि रु.४३९४७९/- | २३-०१-२०२६ |
| 2 | पुष्पा मनोहर दोडेवार, अंबादास मनोहर दोडेवार, / MHL00060001960/नागपूर | मौजा करंजी (रस्ता), मलमट्टा/घर क्रमांक ९२२, प्रभाग क्रमांक ४, ७४९ चौ.फूट, पोस्ट करंजी येथे (रस्ता, ताह केळापूर, जि. यवतमाळ, कार्यालयाजवळ, केळापूर, पो. करंजी बीओ, यवत, ०५, पिनिएल, पूर्व महाराष्ट्र: ३४ पश्चिम-रोड, दक्षिण-अशोक भगत, उत्तर-पुष्पाबाई दोडेवार | १८-१०-२०२५ आणि रु.३५०५२९/- | २३-०१-२०२६ |
| 3 | गजानन अजबराव ठेंग, बेबी अजबराव ठेंग, अजबराव रामचंद्र ठेंग, गजानन दगडू सुरडकर, / NHL00500011803/Akola | मालमत्ता क्र. 34, मोजमाप 55.76 Sq.mt, ग्रामपंचायत- शेलगाव जहांगीर, ता. चिखली, जि. बुलढाणा, हनुमान मंदिराजवळ, चिखली, पो.कॉ. खंडाळा मकरध्वज, बुलढाणा, महाराष्ट्र, पिन: 443201. पूर्व- श्री. प्रताप ठेंग, पश्चिम रस्ता, दक्षिण- श्रीमती मंगलबाई ठेंग, उत्तर- रस्ता. | १८-१०-२०२५ आणि रु.३७०००५/- | २३-०१-२०२६ |
| ४ | कमलाबाई नारायणराव ठाकरे, मोहन नारायणराव ठाकरे, नारायणराव बापूराव ठाकरे, / MHL00060007251/Nagpur | घर क्रमांक 212 आणि मलमत्ता क्रमांक 173 (नमुना 8 नुसार), प्रभाग क्रमांक 03, मोजमाप क्षेत्र 900 चौ.फूट, पोस्ट-बेलोरा, ता-घाटंजी, जिल्हा-यवतमाळ, पाण्याच्या पंपाजवळ, यवतमाळ, पी.ओ. घाटंजी, यवतमाळ, महाराष्ट्र, पिन: 445301. East-House of Smt. कौसल्याबाई नामदेव चौधरी, वेस्ट-रोड, दक्षिण-गृहश्रीमती. चंद्रभागा घुले, श्री रामदास प्रधान यांचे उत्तर-घर | १८-१०-२०२५ आणि रु.३१२४८५/- | २३-०१-२०२६ |
| ५ | विद्या संजय हुमणे, संजय चरणदास हुमणे, / MLAP0006002451/नागपूर | राजेगाव बेअरिंग मौजा - राजेगाव येथील घर क्रमांक १८१ येथे असलेले संपूर्ण जमिनीचे तुकडे आणि पार्सल, सुमारे ४५० चौरस फूट (४१.८० चौरस मीटर) उघडे क्षेत्रफळ आणि त्यावरील बांधकामासह, सुमारे ४६२.०० चौरस फूट (४२.९२ चौरस मीटर) असलेले ग्रामपंचायत राजेगाव, तालुका आणि जिल्हा यांच्या अधिकारक्षेत्रात: भंडारा.महाराष्ट्र पिन: ४४१८०४. श्री श्याम मुंडले यांचे पूर्व-खुले क्षेत्र, पश्चिम-श्री राजकुमार वैद्य यांचे घर, दक्षिण-श्री देवदास देशपांडे यांचे घर, उत्तर-ग्रामपंचायत रस्ता | १८-१०-२०२५ आणि रु.१८४४३२/- | २३-०१-२०२६ |

तारीख: २८ जानेवारी २०२६ | ठिकाण: महाराष्ट्र
अधिकृत अधिकारी मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड

# भारत आणि न्यूझीलंड उर्वरित सामन्यांसाठी संघात मोठे बदल

## ५ सामन्यांच्या या मालिकेत भारतीय संघाची सध्या ३-० अशी विजयी आघाडी

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान सुरू असलेल्या टी-२० मालिकेतील उर्वरित दोन सामन्यांसाठी न्यूझीलंडच्या संघात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत. पाच सामन्यांच्या या मालिकेत भारतीय संघाने सध्या ३-० अशी विजयी आघाडी घेतली असून, मालिकेतील शेवटचे दोन सामने विशाखापट्टणम आणि तिरुवनंतपुरम येथे खेळवले जाणार आहेत.



न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने चौथ्या टी-२० सामन्यापूर्वी वेगवान गोलंदाज क्रिस्टियन क्लार्क आणि टिम रॉबिन्सन यांना संघातून मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात न्यूझीलंड क्रिकेटने सोशल मीडियाद्वारे माहिती दिली. बोर्डाने जाहीर केलेल्या निवेदनात म्हटलं की, ''क्लार्क आणि रॉबिन्सन मायदेशी परतणार असून त्यांच्या जागी जिमी नीशम, लॉकी फर्ग्युसन आणि टिम सीफर्ट आता संघात सामील झाले आहेत. तसेच, बिग बॅश लीगमध्ये () खेळत असलेला सलामीवीर फिन ॲलन २७ जानेवारी रोजी तिरुवनंतपुरममध्ये संघाशी जोडला जाईल.''२४ वर्षीय क्रिस्टियन क्लार्कने २१ जानेवारी रोजी नागपूरमध्ये भारताविरुद्ध पदार्पण केले होते. मात्र, आपल्या पहिल्याच सामन्यात त्याने ४ षटकांत ४० धावा देत केवळ एक बळी मिळवला. दुसरीकडे, टिम रॉबिन्सनने मालिकेतील पहिल्या सामन्यात १५ चेंडूंत २१ धावा केल्या होत्या. त्यानंतर दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यात त्यांच्या जागी मॅट हेन्री आणि टिम सीफर्ट यांना संधी देण्यात आली. एका सामन्यातील अपयशानंतर या दोन्ही खेळाडूंना संघातून बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे.

न्यूझीलंडचा आक्रमक फलंदाज फिन ॲलन सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. नुकत्याच संपलेल्या बिग बॅश लीगमध्ये त्याने पर्थ स्कॉचर्सकडून खेळताना ११ सामन्यांत ४६६ धावा कुटल्या. या हंगामात सर्वाधिक षटकार ठोकण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावे केला आहे. त्याच्या समावेशामुळे न्यूझीलंडची फलंदाजी अधिक भक्कम होण्याची शक्यता आहे. आगामी टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीनेही ॲलनची कामगिरी महत्त्वाची ठरेल.आतापर्यंत झालेल्या तिन्ही सामन्यांत भारतीय संघाने किवी संघावर पूर्णपणे वर्चस्व गाजवले आहे. गुवाहाटी येथे झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारताने १५४ धावांचे लक्ष्य अवघ्या १० षटकांत पूर्ण करून एकतर्फी विजय मिळवला होता. २८ आणि ३१ जानेवारी रोजी होणाऱ्या शेवटच्या दोन सामन्यांतही विजयी घोडदौड कायम राखण्याचा टीम इंडियाचा मानस असेल, तर दुसरीकडे न्यूझीलंडचा संघ सन्मानजनक पुनरागमन करण्यासाठी मैदानात उतरेल.

## महत्त्वाचे

### इटलीने आयर्लंडला पराभूत करून रचला इतिहास

इटलीने क्रिकेट जगतात धुमाकूळ घातला. सोमवारी झालेल्या तिसऱ्या आणि शेवटच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात वेन मॅडसेनच्या नेतृत्वाखालील इटलीने आयर्लंडचा तीन चेंडू शिल्लक असताना चार विकेट्सने पराभव केला. इटलीने केवळ मोठा धक्काच दिला नाही तर पहिल्यांदाच आयसीसी मान्यताप्राप्त पूर्णवेळ सदस्याचाही पराभव केला. दुबईमध्ये खेळल्या गेलेल्या सामन्यात, आयर्लंडने प्रथम फलंदाजी करताना १९.४ षटकांत १५४ धावा केल्या. प्रत्युत्तरात, इटलीने १९.३ षटकांत सहा गडी गमावून लक्ष्य गाठले. हा सामना खूपच रोमांचक होता.१५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इटलीची सुरुवात खराब झाली.

### सूर्यकुमार यादवच्या नशिबाबद्दल सुनील गावस्कर यांचं स्पष्ट मत

**रायपूर :** न्यूझीलंड विरुद्ध तिसऱ्या टी २० सामन्यात त्याने २६ चेंडूत ५७ धावा फटकावल्या. रायपूरच्या दुसऱ्या सामन्यात त्याने ३७ चेंडूत ८२ धावांची खेळी केली होती. मैदानावर सूर्यकुमार यादव न्यूझीलंडच्या गोलंदाजांची पिसं काढतोय. मैदानावर येताच त्याच्या बॅटमधून चौकार, षटकारांचा पाऊस सुरु होतो.मागच्या वर्षभरापासून आऊट ऑफ फॉर्म असलेल्या सूर्यकुमार यादवला सूर गवसला आहे. न्यूझीलंड विरुद्ध सुरु असलेल्या टी २० मालिकेत त्याने सलग दोन अर्धशतकं झळकवली आहेत. अगदी मोक्याच्या क्षणी सूर्यकुमार यादवला त्याचा फॉर्म परत मिळाला आहे. कारण पुढच्या महिन्यात ७ फेब्रुवारीपासून टी वर्ल्ड कप सुरु होतोय. मागच्या काही दिवसांपासून सूर्यकुमार यादववर चहूबाजूंनी बरीच टीका सुरु होती. आता सूर्याला त्याच्या खेळातली अचूकता आणि आत्मविश्वास परत मिळाला आहे.


वर्ल्ड कपच्या आधी अगदी मोक्याच्या क्षणी सूर्य कुमार यादव फॉर्ममध्ये परतल्याने क्रिकेट चाहत्यांनी सुद्धा सुटकेचा निश्वास सोडलाय. सूर्याच्या संघातील स्थानावर सुद्धा प्रश्नचिन्हे निर्माण करण्यात येत होतं. आता त्याला सूर गवसल्याने टीम मॅनेजमेंटची चिंता मिटली आहे.

## टी-२० वर्ल्डकपआधी केन रिचर्डसनने घेतली निवृत्ती

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**

आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला सुरुवात होण्याच्या काही दिवस आधी ऑस्ट्रेलियाचा अनुभवी वेगवान गोलंदाज केन रिचर्डसनने व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे.३४ वर्षीय रिचर्डसन हा २०२१मध्ये ऑस्ट्रेलियाने जिंकलेल्या टी-२० वर्ल्डकप विजेत्या संघाचा महत्त्वाचा सदस्य होता. त्याने या स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले होते आणि २०२२ च्या वर्ल्डकपमध्येही खेळला होता.

रिचर्डसनने आपली निवृत्ती इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करून जाहीर केली. त्यानंतर ऑस्ट्रेलियन क्रिकेटर्स असोसिएशनद्वारे अधिकृत निवेदन जारी केले. त्याने त्याच्या पोस्टमध्ये लिहिले कि,''मी २००९ मध्ये पदार्पण केलं होतं, तेव्हापासून ते आतापर्यंत मी या खेळासाठी सर्वकाही केलं आहे. आता माझ्या आयुष्यातील इतक्या सुंदर प्रवासाचा समारोप करण्याची हीच योग्य वेळ आहे.''



शरीर साथ देत नसल्याने आणि या वयात वेगवान गोलंदाजी करणे कठीण झाल्याने त्याने हा निर्णय घेतला आहे.केन रिचर्डसनने ऑस्ट्रेलियासाठी २५ वनडे आणि ३६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले. वनडेमध्ये त्याने ३९ विकेट्स घेतल्या (सरासरी ३१.७९), तर टी-२० मध्ये ४५ विकेट्स (सरासरी २३.५३) मिळवल्या.

## नॅट सायव्हर-ब्रंटचा ऐतिहासिक 'धडाका'!

### पहिल्या शतकासह मुंबईचा आरसीबीवर दिमाखदार विजय



**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**

महिला प्रीमियर लीग २०२६ च्या १६ व्या सामन्यात मुंबई इंडियन्सने टेबल-टॉपर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा () १५ धावांनी पराभव करत आपली ताकद दाखवून दिली आहे. वडोदरा येथील कोटांबी बीसीए स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात मुंबईची स्टार ऑलराउंडर नॅट सायव्हर-ब्रंट हिने ऐतिहासिक शतक झळकावून डब्ल्यूपीएलच्या इतिहासात नव्या पर्वाची सुरुवात केली.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने २० षटकांत ४ बाद १९९ धावांचा डोंगर उभा केला. या डावाचे मुख्य आकर्षण ठरली ती नॅट सायव्हर-ब्रंट. तिने अवघ्या ५७ चेंडूत नाबाद १०० धावा कुटल्या. डब्ल्यूपीएलच्या इतिहासातील हे पहिलेवहिले शतक आहे. आपल्या या स्फोटक खेळीत तिने १६ चौकार आणि १ षटकार लगावत सोफी डिव्हाईनचा ९९ धावांचा जुना विक्रम मोडीत काढला.२०० धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना आरसीबीची सुरुवात अत्यंत खराब झाली. मुंबईच्या भेदक माऱ्यापुढे केवळ ३१ धावांत आरसीबीने आपले ४ महत्त्वाचे फलंदाज गमावले. मधल्या फळीत नादिन डी क्लर्क (२८) हिने थोडा वेळ साथ दिली, पण तीदेखील १२ व्या षटकात बाद झाली.आरसीबीकडून यष्टिरक्षक फलंदाज ऋचा घोषने एकतर्फी झुंज दिली. ऋचाने अवघ्या ५० चेंडूत ९० धावांची तुफानी खेळी केली. तिने आरसीबीला विजयाच्या उंबरठ्यावर नेण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र दुसऱ्या टोकाकडून अपेक्षित साथ न मिळाल्याने आरसीबीला २० षटकांत ९ बाद १८४ धावांपर्यंतच मजल मारता आली.या विजयासह मुंबई इंडियन्सने प्लेऑफच्या शर्यतीत आपले स्थान अधिक भक्कम केले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर (२६ जानेवारी) मिळालेला हा विजय आणि सायव्हर-ब्रंटचे ऐतिहासिक शतक मुंबईच्या चाहत्यांसाठी दुहेरी आनंद घेऊन आले आहे.

## बांगला देशच्या हकालपट्टीनंतर वर्ल्डकपसाठी स्कॉटलंडचा संघ जाहीर

**लंडन : दि.२७ वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२६ साठी पात्र ठरलेल्या स्कॉटलंड क्रिकेट संघाने आपल्या १५ सदस्यीय खेळाडूंची घोषणा केली आहे. बांगलादेशच्या जागी या स्पर्धेत प्रवेश मिळवणाऱ्या स्कॉटलंडच्या संघात काही धक्कादायक आणि महत्त्वाचे बदल पाहायला मिळत आहेत. विशेष म्हणजे, या संघात अफगाणिस्तानमध्ये जन्मलेल्या एका वेगवान गोलंदाजासह न्यूझीलंडकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेल्या अनुभवी खेळाडूचा समावेश करण्यात आला आहे.आगामी विश्वचषकासाठी स्कॉटलंडच्या कर्णधारपदाची जबाबदारी अनुभवी फलंदाज रिची बेरिंग्टन याच्याकडे सोपवण्यात आली आहे. ओवेन डॉकिन्स यांच्या मार्गदर्शनाखाली हा संघ मैदानात उतरणार आहे. २००७ मधील पहिल्या टी-२० विश्वचषकाचा भाग असलेल्या स्कॉटलंडचा हा सहावा विश्वचषक ठरणार आहे.विशेष म्हणजे, २०२४ च्या विश्वचषकासाठी पात्र ठरू न शकलेला हा संघ २०२२ नंतर आता पुन्हा एकदा जागतिक व्यासपीठावर आपली ताकद दाखवण्यासाठी सज्ज झाला आहे.अफगाणिस्तानमध्ये



जन्मलेल्या या युवा वेगवान गोलंदाजाला स्कॉटलंडने प्रथमच राष्ट्रीय संघात स्थान दिले आहे. त्याच्या वेगवान माऱ्यामुळे संघाची गोलंदाजी अधिक धारदार होण्याची शक्यता आहे. न्यूझीलंडकडून १७ आंतरराष्ट्रीय टी-२० सामने खेळलेल्या ३४ वर्षीय टॉम ब्रूसने आता स्कॉटलंडकडून खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने किवी संघासाठी खेळताना दोन अर्धशतकांसह २७९ धावा केल्या आहेत. त्याच्या अनुभवाचा फायदा स्कॉटलंडच्या मधल्या फळीला होईल.बांगलादेशच्या जागी स्कॉटलंडला ग्रुप सी मध्ये स्थान देण्यात आले आहे. या गटात स्कॉटलंडसमोर वेस्ट इंडिज, इंग्लंड, इटली आणि नेपाळ या संघांचे तगडे आव्हान असणार आहे. विशेष म्हणजे, इटलीचा संघ या स्पर्धेच्या निमित्ताने प्रथमच विश्वचषक स्तरावर पदार्पण करणार आहे.या गटातील सलामीचा सामना ७ फेब्रुवारी रोजी कोलकात्याच्या ऐतिहासिक ईडन गार्डन्स मैदानावर खेळवला जाईल.


हा सामना वेस्ट इंडिज आणि स्कॉटलंड यांच्यात रंगणार आहे. दरम्यान, या गटातील बलाढ्य संघ असलेल्या वेस्ट इंडिजनेही सोमवारी आपला संघ जाहीर केला असून, आता सर्व संघांच्या नजरा या स्पर्धेवर खिळल्या आहेत.

# अर्थसंकल्पानंतर मध्यमवर्गाची झोप उडणार? तज्ज्ञांचा अंदाज काय?

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**

यंदाच्या अर्थसंकल्पातून सर्वसामान्यांना मोठी आशा आहे, त्यामुळे पगारदार आणि मध्यमवर्गीय करदात्यांचे याकडे लक्ष लागले आहे. मात्र यातून सर्वसामान्यांना दिलासा मिळण्याची शक्यता कमी आहे.

१ फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प सादर होणार आहे. या अर्थसंकल्पातून सर्वसामान्यांना मोठी आशा आहे, त्यामुळे पगारदार आणि मध्यमवर्गीय करदात्यांचे याकडे लक्ष लागले आहे. महागाई, वाढलेले ईएमआय आणि दैनंदिन खर्चामुळे सर्वसामान्यांना सरकारकडून आयकर सवलत



मिळण्याची अपेक्षा आहे. मात्र काही कर तज्ज्ञांचे मत आहे की यावेळी कर कपात अशक्य आहे. याचे कारण सांगताना त्यांनी म्हटले की, सरकारने गेल्या काही अर्थसंकल्पांमध्ये आधीच प्राप्तिकर प्रणालीत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत, त्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

कर तज्ञ दिनकर शर्मा यांनी फायनान्शियल एक्सप्रेससोबत बोलताना म्हटले की, सरकारला असं वाटत आहे की, वैयक्तिक आयकरातील बहुतेक प्रमुख बदल आधीच करण्यात आले आहेत. कमी स्लॅब दर, उच्च सवलती आणि सोपे नियम असलेली नवीन कर व्यवस्था ही दीर्घकालीन सुधारणा म्हणून पाहिली जाते. तसेच पायाभूत सुविधा, संरक्षण आणि सामाजिक योजनांवर सरकारने मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. त्यामुळे सरकारकडे कर कपातीसाठी पैसे उरलेले नाहीत. त्यामुळे करदात्यांना हवे असलेले महागाईशी सुसंगत असलेले स्लॅब, सुधारित सूट मर्यादा मिळण्याची शक्यता कमी झाली आहे.

ध्रुव ॲडव्हायझर्सचे दीपेश छेडा यांनी या अर्थसंकल्पाबाबत सांगितले की, गेल्या काही वर्षांत कॉर्पोरेट आणि वैयक्तिक करांवर मोठी सवलत देण्यात आली आहे. कॉर्पोरेट कर दर २५% पर्यंत कमी करण्यात आला असल्याने सरकारला मोठा महसूल तोटा झाला आहे. तसेच वैयक्तिक करदात्यांनाही नवीन कर व्यवस्थेचा फायदा झाला आहे. त्याचबरोबर ऑक्टोबर २०२५ मध्ये जीएसटी दर बदलण्यात आले आहेत, त्यामुळे सरकारला ४८००० कोटी रुपयांच्या महसूलावर पाणी सोडावे लागलेले आहे. त्यामुळे आता कर कपातीचा निर्णय होण्याची शक्यता कमी झाली आहे.

### मध्यमवर्गाला दिलासा मिळण्याची शक्यता

विनीत द्विवेदी यांनी याबाबत सांगितले की, सरकारची सध्याची प्राथमिकता कर सवलतीपेक्षा आर्थिक स्थिरता आणि गुंतवणूक-चालित वाढ ही आहे. वित्तीय तूट आर्थिक वर्ष २०२१ मध्ये ९.२% वरून आर्थिक वर्ष २४ मध्ये ५.६ % पर्यंत कमी झाली आहे. मात्र भांडवली खर्च विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात कर कपात करण्याऐवजी लहान, लक्ष्यित बदल केले जाण्याची शक्यता आहे. यामुळे मध्यमवर्गाला फारसा फायदा होण्याची शक्यता नाही.

व्यापार जगत

### पैशांचा ३-६-९ नियम माहिती आहे का? कधीही येणार नाही आर्थिक अडचण



मुंबई : तुम्ही नोकरी करत असाल किंवा व्यवसाय करत असाल तर पैशांचे नियोजन करणे खूप महत्त्वाचे आहे. आज आम्ही तुम्हाला पैशांचा ३-६-९ हा नियम सांगणार आहोत. याची माहिती जाणून घेऊयात.

**आणीबाणीचा निधी :** ३-६-९ हा नियम प्रामुख्याने कठीण काळात, जसे की नोकरी जाणे किंवा वैद्यकीय आणीबाणी, आर्थिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

**३ चा अर्थ :** तुमच्या मासिक खर्चाच्या किमान ३ पट रक्कम एका वेगळ्या खात्यात जमा असावी. जर तुमचा मासिक खर्च ५० हजार रुपये असेल, तर तुमच्याकडे १.५ लाख रुपये आपत्कालीन निधी म्हणून असावेत. हा निधी बॅचलर किंवा नवीन नोकरी सुरू केलेल्या लोकांसाठी योग्य आहे.

**६ चा अर्थ :** जर तुमच्यावर कुटुंबाची जबाबदारी असेल, तर तुमच्या मासिक खर्चाच्या किमान ६ पट रक्कम राखीव असणे आवश्यक आहे. यामुळे ६ महिन्यांपर्यंत तुमचे आयुष्य विनाअडथळा चालू शकते.

९ चा अर्थ : ज्यांच्यावर मोठे कर्ज (होम लोन) आहे किंवा ज्यांचे उत्पन्न अस्थिर आहे, अशा लोकांनी मासिक खर्चाच्या ९ पट रक्कम सुरक्षित ठेवली पाहिजे.

## आता भारतातील गरीबातील गरीब व्यक्तीलाही घेता येणार कार

### किमती होणार प्रचंड कमी, जाणून घ्या कोणती कार कितीला?

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**

मोठी बातमी समोर येत आहे, लवकरच भारत आणि युरोपियन संघमध्ये मोठा व्यापारी करार होणार आहे, या एफटीआयनंतर भारतामध्ये कार प्रचंड स्वस्त होणार आहेत, सामान्य लोकांना देखील कार सहज खरेदी करता येणार आहेत.

भारत आणि युरोपियन संघ मध्ये फ्री ट्रेड एग्रीमेंट होणार आहे. भारत आणि युरोपियन संघामध्ये होणारा हा मुक्त व्यापारी करार आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. याचा महत्त्वाचा फायदा म्हणजे हा करार झाल्यानंतर भारतामध्ये कार प्रचंड स्वस्त होणार आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार भारताने युरोपियन युनियनमधील देशांना एक मोठी ऑफर दिली आहे, ती म्हणजे युरोपमधून भारतात येणाऱ्या कारवरील टॅरिफ भारत मोठ्या प्रमाणात कमी करणार आहे. भारतानं दिलेल्या या ऑफरमुळे आता युरोपीयन संघ आणि भारतामधील मुक्त व्यापार करार लवकच होण्याची शक्यता आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या करारावर चर्चा सुरू आहे. मात्र आता आनंदाची बातमी म्हणजे लवकरच या करारावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.युरोपमधून येणाऱ्या कारवर सध्या परिस्थितीमध्ये भारतात तब्बल ११० टक्के टॅरिफ आहे, मात्र भारताकडून युरोपियन युनियनला ऑफर देण्यात आली आहे, मुक्त व्यापार करार अस्तित्वा आल्यानंतर भारत युरोपमधून येणाऱ्या सर्व प्रकारच्या कारवरील टॅरिफ कमी करून तो ४० टक्के इतका करणार आहे, तर काही कंपन्यांच्या कारला याही टॅरिफमध्ये विशेष सूट मिळून टॅरिफ १० टक्क्यांवर येण्याची शक्यता आहे. म्हणजे आता युरोपमधून येणाऱ्या कारवर ११० टक्के टॅरिफ ऐवजी अवघा दहा टक्के टॅरिफ लावला जाणार आहे.

## रिअल इस्टेटला उद्योगाचा दर्जा मिळेल का?

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**

या क्षेत्राने उद्योगाचा दर्जा, सिंगल-विंडो क्लिअरन्स आणि भूमी अभिलेखांचे डिजिटायझेशन करण्याची मागणी केली आहे, ज्यामुळे निधी सुलभ होईल आणि प्रकल्प वेगवान होतील.

यावेळी देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी येत आहे. अर्थसंकल्पाकडून प्रत्येक क्षेत्राकडून अपेक्षा असतात. यावेळी रिअल इस्टेट क्षेत्रालाही आशा आहे की सरकार त्याला उद्योगाचा दर्जा देईल. यासाठी या क्षेत्राने सरकारसमोर अनेक मागण्या ठेवल्या आहेत. यामध्ये जमिनीच्या नोंदी ऑनलाइन करणे, मंजुरी प्रक्रियेला गती देणे आणि घरांची मागणी पुन्हा सुरू करण्यासाठी सोपी एकल-खिडकी मंजुरी प्रणाली सुरू करणे यांचा समावेश



आहे. रिअल इस्टेट उद्योगामुळे त्यांना स्वस्त आणि दीर्घ मुदतीची कर्जे मिळू शकतील, कर्जावरील व्याज कमी होईल आणि पद्धतशीर वित्तपुरवठ्यासाठी अधिक पर्याय मिळू शकतील, असे उद्योग संस्था आणि बांधकाम व्यावसायिकांचे म्हणणे आहे. विकासकांचे म्हणणे आहे की ही मागणी बर् याच काळापासून प्रलंबित आहे आणि त्यांना या अर्थसंकल्पाकडून सतत धोरणात्मक पाठिंब्याची अपेक्षा आहे.जीडीपीमध्ये योगदान किती आहे?सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडचे संस्थापक आणि अध्यक्ष प्रदीप अग्रवाल म्हणाले की, रिअल इस्टेट क्षेत्र सध्या भारताच्या जीडीपीमध्ये सुमारे ७ टक्के योगदान देते आणि २०० हून अधिक जोडलेल्या क्षेत्रांना रोजगार देते. रिअल इस्टेटला उद्योगाचा दर्जा मिळाला तर मोठ्या संस्थांकडून निधी पुरवठा करणे सोपे होईल आणि हे क्षेत्र रोजगार आणि आर्थिक विकासात अधिक मजबूत भूमिका बजावू शकेल. योग्य धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास २०४७ पर्यंत भारताच्या जीडीपीमध्ये रिअल इस्टेटचे योगदान १५ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते.ट्रिबेका डेव्हलपर्स ग्रुपचे मुख्य कार्यकारी अधिकारी रजत खंडेलवाल म्हणाले की, हे क्षेत्र घर खरेदीदार आणि बांधकाम व्यावसायिक या दोघांनाही फायदा होईल अशा सातत्यपूर्ण धोरणांची अपेक्षा करीत आहे. ते म्हणाले की बांधकाम क्षेत्राला उद्योगाचा दर्जा देणे आवश्यक आहे कारण यामुळे दीर्घ कालावधीत भांडवल मिळवणे सोपे होईल, कर्ज स्वस्त होईल आणि बांधकाम व्यावसायिकांची काम करण्याची पद्धत अधिक प्रभावी होईल.

## थोडक्यात

### शटर तोडून सव्वा लाखाची चोरी

**कामठी :** जुनी कामठी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नेताजी चौक परिसरातील एका गॅस एजन्सीचे शटर उचकटून चोरट्याने १ लाख १२ हजार १४० रुपयांची रोकड लंपास केली. ही घटना २५ जानेवारीच्या रात्री घडली असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले आहे.

फिर्यादी जयप्रकाश प्रेमनारायण तिवारी (वय ६३ वर्ष, रा. माले रोड, कामठी) यांचे नेताजी चौक, मेन रोड येथे गॅस एजन्सीचे कार्यालय आहे. २५ जानेवारी रोजी रात्री त्यांनी नेहमीप्रमाणे कार्यालय बंद केले आणि घरी गेले. दरम्यान, कार्यालयाच्या शटरची एका बाजूची कडी तोडून आत प्रवेश केला आणि कॅश काउंटरमध्ये ठेवलेली १,१२,१४० रुपयांची रोकड चोरून नेली.

### सर्व धर्मीय पुन:विवाह परिचय मेळावा

**नागपूर :** राज्यस्तरीय सर्व जातीय,सर्व धर्मीय, विधवा, विधूर, घटस्फोटीत, अपंग, प्रौढ पुन:विवाह "पुन:रबंध" परिचय मेळावा महात्मा फुले शिक्षण संस्था रेशीमबाग नागपूर येथे २२ फेब्रुवारी २०२६ ला सकाळी ११ वाजता आयोजित केलेला आहे याअनुषंगाने रविवारी सर्व जातीय व सर्व धर्मीय समाज बांधवांची बैठक पार पडली. संबंधितांना नोंदणी १२ फेब्रुवारी नोंदणी करावी लागणार असून, शुल्क ५०० रुपये आहे यात परिचय पुस्तिका नि:शुल्क मिळणार आहे. अधिक माहितीसाठी संस्थेचे कार्याध्यक्ष व संयोजक प्रकाश देवते यांच्यासोबत (मोबाईल ९४२२८-०९६८८) संपर्क साधावा. याप्रसंगी प्रा.अरुण पवार, शेखर सावरबांधे, शुभाष घाटे, नगरसेवक शकील पटेल, प्रकाश देवते, गुलाब चिंचाटे, रविंद्र अंबाडकर, रमेश राऊत, प्रा. मुकेश घोळसे, गजेंद्र जाधव, नरेंद्र मोहिते, शालिकराम कुकडे, बाळासाहेब गायकवाड, शंकर चुरागळे, अजय तितरमारे, रोशन लांजेवार, विक्रांत अवधरे, सुरेश पाठक, चंदू धांडे, लता होलगरे, बंडू पारवे, गजानन देऊळकर, अरुण टिकले, संजय चौधरी, पुरुषोत्तम कुथे, सुरेंद्र टिंगणे, ओंकारेश्वर गुरव, आशिष खडके, स्वप्नील तोरणकर, राजेंद्र पाटील, मोहीत श्रीखंडे प्रा.पंकज कुरळकर,शोभा लेकुरवाळे उपस्थित होते.

# सलग चौथ्या दिवशी बँकांना टाळे

## ५ दिवसांच्या आठवड्यासाठी १० लाख कर्मचाऱ्यांचा देशव्यापी एल्गार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ : मागील शनिवारपासून नागपुरातील सरकारी बँका बंद होत असून, अनेक ग्राहकांचे व्यवहार ठप्प झाले आहेत एटीएममधून रक्कम काढण्याशिवाय अन्य काही व्यवहारांसाठी बँक सुरू असावीच लागते, अशा भावना अनेक ग्राहकांनी व्यक्त केल्या दरम्यान, नागपूरसह जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँकांचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाल्याचे वृत्त असून, सलग चार दिवस बँका बंद असल्याने कोट्यवधींचे व्यवहार खोळंबले आहेत.**




सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी मंगळवारी (२७ जानेवारी) 'युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स' या विविध बँक संघटनांच्या मध्यवर्ती संस्थेने हा संप पुकारला आहे. महिन्यातील सर्व शनिवारी सुट्टी देऊन आठवड्यातून केवळ ५ दिवस बँका सुरू ठेवाव्यात, अशी मुख्य मागणी पुढे केली आहे मार्च २०२४ मध्ये 'इंडियन बँक्स असोसिएशन'सोबत झालेल्या वेतन करारात यावर तत्वत: मान्यता मिळाली होती; परंतु सरकारने अद्याप याची अधिकृत अधिसूचना जारी केलेली नाही. या विलंबाचा निषेध करण्यासाठी सुमारे १० लाख कर्मचारी या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

**मोठा परिणाम**

नागपूरमधील किंग्सवे, सीताबर्डी आणि धरमपेठ यासह मेडिकल चौक, मानेवाडा रोड परिसरातील बँका आज बंद दिसून आल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक,कॅनरा बँक यांसारख्या सर्व सरकारी बँकांचा यात समावेश आहे.

### रोख व्यवहार

**सलग तीन दिवस सुट्ट्या (शनिवार, रविवार आणि प्रजासत्ताक दिन) व आजचा संप यामुळे बँकांच्या शाखांमध्ये रोख भरणा पूर्णपणे बंद आहे.याशिवाय धनादेश वटवण्याची प्रक्रिया थांबल्याने हजारो व्यापाऱ्यांचे व्यवहार रखडले आहेत.**




# प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यापीठात ध्वजारोहण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात भारतीय प्रजासत्ताक दिनाचा सोहळा जमनालाल बजाज प्रशासकीय भवनासमोरील हिरवळीवर सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी पार पडला. माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्या शुभहस्ते प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थितांनी ध्वजाला मानवंदना दिली.

यावेळी मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी दैदिप्यमान इतिहास असलेल्या विद्यापीठात ध्वजारोहण कार्यक्रमात सहभागी होण्याचे भाग्य मिळाले असल्याचे सांगितले. आपण सर्वांनी मोठ्या मेहनतीने विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला आहे. यापुढे देखील उच्च ज्ञानदानाचे कार्य करावे, असे आवाहन कुलगुरूंनी यावेळी केले. कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल,



मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा डॉ. राजश्री वैष्णव, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. मेधा कानेटकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. उमेश पलीकुंडवार, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ, आयक्यूएसी संचालक डॉ. नंदकिशोर करडे, माजी प्र-कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, आयआयएल संचालक डॉ. प्रकाश ईटणकर, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. समित माहोरे यांच्यासह पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे प्रमुख, शिक्षक कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# २०२८ पर्यंत जिल्ह्याचा विकास आराखडा तयार : पालकमंत्री

## प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय समारंभ उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** २०२८ पर्यंत नागपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा तयार असून, महानगरासह ग्रामीण भागाच्या प्रगतीला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. शासनाच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने जनतेचा सेवक म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी," असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

कस्तुरचंद पार्क येथे आयोजित प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खासदार श्यामकुमार बर्वे, प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र कुमार सिंगल, विशेष पोलीस महानिरीक्षक



संदीप पाटील, मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, नासुप्र सभापती संजय मीना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सुरक्षा आणि आधुनिकता: पालकमंत्री म्हणाले की, सावनेर आता 'सुरक्षा कवच' असलेले गाव म्हणून नावारूपास आले आहे. सीसीटीव्ही आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवले जात आहे. नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवलेल्या उपाययोजनांमुळे २०२५ मध्ये अपघाती मृत्यूंच्या संख्येत घट झाली आहे. शहरात अमली पदार्थ विरोधात 'ऑपरेशन थंडर' आणि सोशल मीडिया निगराणीसाठी 'गरुड दृष्टी' यांसारखे उपक्रम प्रभावी ठरत आहेत. शेतकरी व सर्वसामान्यांचे कल्याण: 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजने'अंतर्गत जिल्ह्यात १,२५० किमीच्या रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. थर्मल पॉवर स्टेशनच्या राखेवर प्रक्रिया करून रस्ते मजबूत करण्याचा पथदर्शी प्रकल्प नागपुरात सुरू आहे. तसेच, शहरातील १५ झोपडपट्ट्यांमधील २,२०५ धारकांसह ग्रामीण भागात ३० हजारांहून अधिक जणांना पट्टेवाटप करण्यात आले आहे. भविष्यातील दळणवळण: वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी १४८ किमीचा बाह्यवळण महामार्ग विस्तारित करण्यात आला आहे. मेट्रो आणि मुबलक इलेक्ट्रिक बसेसमुळे शहराची वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. तसेच तुरागोंदी, शिरूर, पलसाड आणि इटगाव येथील प्रस्तावित 'ट्रान्सपोर्ट प्लाझा'मुळे औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीला मोठी गती मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

## देशविदेशात उत्साह...



**नागपूर:** ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिन सोहळ्याचा आनंद आणि अभिमान विदेशातही दिसून येत आहे अनेकांनी आपल्या कुटुंबियांसह कार्यक्रमात उपस्थिती दर्शविली. १. फुटाळा तलाव परिसरात आयोजित 'वादळ भारताचे' कार्यक्रमात आपल्या भावना व्यक्त करताना जयंत नारायणराव भोसले. 2. ऑस्ट्रेलियातील ब्रिजबेन सिनर्जी मेरिटाईम येथे 'तिरंग्या'समवेत आपल्या सहकाऱ्यांसह चिफ इंजिनीअर रोशन शरदराव दुरुगकर 3. सिम्बॉयसिस संस्थेत कुटुंबियांसह डॉ. मोनाली गुल्हाने

(छायाचित्र साभार : अश्विनी दुरुगकर)

# महावितरणमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महावितरणच्या नागपूर परिमंडल कार्यालयामध्ये ध्वज फडकविण्याचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. 'प्रकाशदूत' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांनी यावेळी देशसेवेची आणि अखंडित वीज पुरवठ्याची शपथ घेतली.

महावितरणच्या काटोल रोड येथील 'विद्युत भवन' कार्यालयामध्ये मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. राष्ट्रगीतानंतर उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.



**७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त महावितरणच्या नागपूर परिमंडल कार्यालयात ध्वज फडकविताना मुख्य अभियंता दिलीप दोडके.**

या सोहळ्याला अधीक्षक अभियंता अमित परांजपे, मंगेश वैद्य, संजय वाकडे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव यांच्यासह वरिष्ठ व्यवस्थापक सुधीर टेकाम, कार्यकारी अभियंता हेमराज ढोके, संजय शृंगारे, चंदन तल्लरवार, धम्मदिप फुलझेले, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महानिर्मितीचे अधीक्षक अभियंता सतिश भानसे, रसायनशास्त्र अधीक्षक राजेश चिवाणे, महाव्यवस्थापक बाहुबली दोदल, कार्यकारी अभियंता सागर इंगळे, एस. आर. बोरकर आणि मोठ्या संख्येने अभियंते व कर्मचारी उपस्थित होते. नागपूर परिमंडलांतर्गत येणाऱ्या इतर विविध कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# नागपूरमध्ये विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात होणार

## मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांचा विश्वास

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** लोकप्रतिनिधी आणि नागपूर महानगरपालिका प्रशासनाच्या एकत्रित सहकार्याने शहरात विकासाच्या नव्या पर्वाला सुरुवात होत असल्याचे प्रतिपादन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले. नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयात आयोजित ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहळ्यात ध्वजारोहणानंतर ते बोलत होते.

या प्रसंगी अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्यासह मनपाचे सर्व उपायुक्त, मुख्य अभियंता, विविध विभागांचे प्रमुख, अग्निशमन दलाचे जवान आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



निवडणूक आणि लोकशाहीचा विजय आयुक्त डॉ. चौधरी यांनी नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका निवडणुकांचा उल्लेख करत, मतदारांनी बजावलेल्या कर्तव्याबद्दल त्यांचे आभार मानले. नागरिकांच्या या सक्रिय सहभागामुळेच महापालिकेचे कामकाज अधिक लोकाभिमुख होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधा अमृत योजना १ व २ अंतर्गत शहराच्या कानाकोपऱ्यात २४ बाय ७ पाणीपुरवठा पोहोचवण्यासाठी जलवाहिन्यांचे जाळे विस्तारण्यात येत असून टाक्यांची संख्याही वाढवली जात आहे. प्रदूषणाबाबत बोलताना त्यांनी नाग आणि पोहरा नदीच्या पुनरुज्जीवन प्रकल्पांसाठी पावले उचलली जात असल्याचे सांगितले. पर्यावरणपूरक वाहतूक आणि आरोग्य शहरात सध्या ५५० ई-बसेस धावत असून, यामुळे प्रदूषण नियंत्रणास मोठी मदत होत आहे. तसेच, १०० पेक्षा अधिक आरोग्यवर्धिनी केंद्रे आणि ६ नवीन इंग्रजी माध्यमाच्या शाळांद्वारे शिक्षण व आरोग्य सेवा बळकट केल्या जात आहेत. शहराच्या सौंदर्यीकरणासाठी रॉक गार्डन, ॲडव्हेंचर गार्डन यांसारख्या थीम बेस्ड गार्डनची निर्मिती सुरू आहे. प्रशासन आणि कर्मचारी कल्याण प्रशासकीय बळकटीकरणासाठी बऱ्याच काळापासून प्रलंबित असलेली ४०० कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. तसेच, सफाई कर्मचाऱ्यांसाठी ४०० घरांचे कार्यादेश देण्यात आले असून, लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. कार्यक्रमाचे संचालन मनीष सोनी व शुभांगी पोहरे यांनी केले.

# नागपुरात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

## मान्यवरांच्या उपस्थितीत विविध उपक्रमांचे आयोजन, उच्च न्यायालय ते एम्समध्ये देशभक्तीचा जागर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** नागपूर शहर आणि जिल्ह्यात देशभक्तीपूर्ण वातावरणात अतिशय उत्साहाने ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. केंद्रीय आणि राज्य शासनाच्या विविध कार्यालयांतर्फे तसेच निमशासकीय आणि खाजगी संस्थांनी देखील अत्यंत आदराने हा दिवस साजरा केला. संस्थांच्या प्रमुखांनी ध्वज फडकवल्यानंतर विविध राष्ट्रभक्तीपर गीतांची आणि सांस्कृतिक नृत्यांची सादरीकरण करण्यात आले या कार्यक्रमांतून प्रजासत्ताक दिनाची भावना दिसून आली.

नागपूर उच्च न्यायालयाच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनानिमित्त





न्या. मुकुलिका जवळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीतानंतर बँड पथकाने महाराष्ट्र गीत सादर केले. कार्यक्रमाला न्या. अनिल पानसरे, न्या. नितीन चांदवानी, न्या. निवेदिता मेहता, न्या. उज्वला फाळके, न्या. प्रफुल्ल खुबळकर, न्या. प्रवीण पाटील, न्या. नेरलीकर, न्या. राज वाकोडे, रजिस्ट्रार भूषण क्षीरसागर, हायकोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अभय सांबरे, उपाध्यक्ष ॲड. गणेश खानझोडे, सचिव ॲड. श्रीरंग भोंगाडे, माजी अध्यक्ष

**आयआयएम नागपूर**

भारतीय व्यवस्थापन संस्थातर्फे ७७ व्या प्रजासत्ताक दिन सोहोळ्यानिमित्त, आयआयएम नागपूर या संस्थेचे संचालक डॉ.भीमराय मेत्री यांच्या हस्ते सोमवारी भारतीय व्यवस्थापन संस्थेत राष्ट्रीय ध्वज फडकवण्यात आला.त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**एम्स नागपूर**

नागपूर येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेने (एम्स) देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला. एम्स नागपूरचे कार्यकारी संचालक आणि सीईओ प्रा. डॉ. प्रशांत जोशी यांनी राष्ट्रध्वज फडकवला. यानंतर सुरक्षा कर्मचाऱ्यांनी परेड केली.

**एनएडीटी नागपूर**

नागपूर येथील राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी या संस्थेत ७७ वा प्रजासत्ताक दिन अभिमानाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या संस्थेत भारतीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य (आयटीईसी) अभ्यासक्रमात शिकत असलेल्या २२ देशांतील सहभागी देखील कार्यक्रमात उपस्थित होते. भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन परिषद नागपूरच्या वतीने सीताबर्डी येथील मुख्य रस्ता कार्यालयात प्रजासत्ताक दिन देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. राष्ट्रपती आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त शिक्षिका माया सुरेश गेडाम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.


उपस्थित मान्यवरांनी देशाचे संविधान, लोकशाही आणि देशाची एकता व अखंडता टिकवून ठेवण्याचा सामूहिक संकल्प केला. यावेळी मिठाईचे वितरण करण्यात आले. भाजपा नागपूर व्यापारी सेलचे अध्यक्ष कैलास छाब्रिया, विदर्भ अध्यक्ष सुरेश गेडाम, रोशनी व्यवहारे, गोंदिया जिल्हाध्यक्ष राजीव अंबादे, युवा शहराध्यक्ष अनिकेत रंगारी, सांस्कृतिक सेल शहराध्यक्ष राधेश्याम राजपुत गजानन चकोले, नरेंद्र मारघडे, शाहिद शेख, महेंद्र जीवने, अल्ताफ शेख आदी उपस्थित होते.

# संजय महाकाळकर यांची गटनेतेपदी निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** चार वेळा नगरसेवक राहिलेले संजय मधुकर महाकाळकर यांची एकमताने 'गटनेता'म्हणून निवड करण्यात आली. निवडणूक काळात आणि निवडणुकीनंतरही काँग्रेसमधील नेते, कार्यकर्ते व नगरसेवक पूर्णपणे एकत्र असल्याचे वरिष्ठ नेत्यांनी म्हटले आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने विभागीय आयुक्त कार्यालयात नागपूर महापालिकासाठी 'नागपूर महाविकास आघाडी'ची नोंदणी केली आहे काँग्रेस हा नोंदणी करणारा पहिला प्रमुख राजकीय पक्ष ठरला आहे. काँग्रेसचे सर्व ३४ नगरसेवकांसह



नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे, विधानपरिषदेचे आमदार अभिजीत वंजारी, गिरीश पांडव, कुणाल राऊत तसेच काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येत उपस्थित होते.

अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ www.ajinkyabharat.com

## दगडी पूल परिसरातील दोन मालमत्ता मनपाकडून सील

**अकोला:** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी प्रशासनाने आता आक्रमक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. आज, २७ जानेवारी रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशान्वये आणि अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार व सहायक आयुक्त विठ्ठल देवकते यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर झोन अंतर्गत विशेष जप्ती मोहीम राबवण्यात आली. या कारवाईदरम्यान, दगडी पूल येथील वॉर्ड क्र. सी-३ मधील मालमत्ता क्र. २५० आणि २५१ चे मालक राजेंद्र तापडिया यांच्याकडे २०१७-१८ पासून आजवर एकूण ९,६१,९७३/- रुपये मालमत्ता कर थकीत असल्याने त्यांच्या दोन्ही मालमत्तांना सील ठोकण्यात आले. सदर कारवाईत सहायक कर अधीक्षक विठ्ठल देवकते, सहायक कर अधीक्षक पंकज जोगळेकर, कर वसुली लिपिक संतोष सूर्यवंशी, मोहन घाटोळ, राजानंद मेश्राम यांच्यासह मनपाच्या पथकाची उपस्थिती होती.

### महत्त्वाचे

## रेल्वेने चिरडून मृत्यू

**अकोला:** डाबकी रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गायगाव अकोला येथे खाली जाणाऱ्या रेल्वे मार्गावर एका अज्ञात पुरुषाचा रेल्वेने चिरडून मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी डाबकी रोड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. २६ जानेवारी २०२६ रोजी खाली जाणाऱ्या गाडीचे रेल्वे चालक राजेश्वर प्रसाद यांनी संपर्क यंत्रणेद्वारे की.मी. ५७५/०८ या ठिकाणी एका अज्ञात व्यक्तीचा रेल्वे अपघात झाल्याची माहिती दिली. सदर माहिती उप स्थानक व्यवस्थापक बी. के. सिंग यांनी पुढे कळविल्यानंतर जखमी संदर्भ नोंद प्राप्त झाली. त्यानुसार दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी पहाटे १:३७ वाजता डाबकी रोड पोलीस ठाण्यात अनोळखी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

## एमआयएम चे आंदोलन

**अकोला :** शिवसेना (शिंदे गट) कार्यकर्ते राजेश मिश्रा यांनी एमआयएमचे नेते व माजी खासदार इम्तियाज जलील यांच्याबद्दल वापरलेल्या अपमानास्पद भाषेच्या निषेधार्थ आज अकोल्यातील गांधी रोड परिसरात एमआयएमतर्फे तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर एमआयएमच्या शिष्टमंडळाने सिटी कोतवाली पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार दाखल केली. यावेळी पोलीस निरीक्षकांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन चौकशीअंती ३ दिवसांत योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. ''जर तीन दिवसांत संबंधित व्यक्तीवर कारवाई झाली नाही, तर यापेक्षाही मोठे आणि तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.'' बदनामी आणि द्वेषाचे राजकारण खपवून घेतले जाणार नाही, अशी भूमिका पक्षाने घेतली आहे. या आंदोलनात मोहम्मद मुस्तफा पहलवान, आसिफ अहमद खान, जावेद पठाण, इमरान खान रब्बानी, शेख अजीज, फारुख पहलवान, मोहम्मद रिझवान यांच्यासह चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महापौरसाठी भाजप आणि उबाठात थेट लढत

## उपमहापौरसाठी भाजप काँग्रेससह अपक्ष उमेदवार रिंगणात

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** अकोला महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदांसाठी २६ जानेवारी रोजी भाजप, उबाठा, काँग्रेस आणि अपक्ष उमेदवारांनी अर्ज दाखल केले. ३० जानेवारी रोजी विशेष सर्वसाधारण सभेत निवडणूक होणार असून अर्ज परत घेतल्यानंतर कोण मैदानात राहणार हे स्पष्ट होईल. मात्र, दोन्ही पदांसाठी होणारी लढत ही भाजप विरुद्ध आघाडी अशी दिसत आहे.

या निवडणुकीसाठी एकूण ४६ अर्ज वितरीत करण्यात आले होते, त्यापैकी २६ जानेवारी रोजी महापौर पदासाठी ५ आणि उपमहापौर पदासाठी ५ असे एकूण १० अर्ज प्राप्त झाले आहेत. महापौर पदासाठी एकूण ३ उमेदवारांनी ५ अर्ज दाखल केले आहेत. यामध्ये भाजपकडून दोन प्रमुख उमेदवारांनी मैदानात शड्डू ठोकला आहे. शारदा रणजित खेडकर यांनी दोन अर्ज दाखल केले असून, त्यांच्या अर्जावर सुचका म्हणून सुनिता अग्रवाल आणि विजय अग्रवाल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. भाजपच्याच ॲड. कल्पना संजय गोटफोडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर दुसरीकडे, शिवसेना (ठाकरे) पक्षाकडून सुरेखा मंगेश काळे यांनी दोन अर्ज दाखल करत भाजपला आव्हान दिले आहे. राजकीय वर्तुळातील चर्चेनुसार, भाजप पक्षश्रेष्ठींकडून अखेर शारदा खेडकर यांच्याच नावावर महापौर पदासाठी शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.

उपमहापौर पदासाठी ४ उमेदवारांनी ५ अर्ज दाखल केले आहे. भाजपकडून अमोल सुधाकर गोगे यांनी दोन उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यांच्यासोबतच भाजपकडून अमोल अवधूत मोहोकार यांनीही अर्ज भरला आहे. महाविकास आघाडीच्या बाजूने काँग्रेसचे आझाद खान अलियार खान रिंगणात आहेत. मात्र, या निवडणुकीत खऱ्या अर्थाने ट्विस्ट आला आहे तो म्हणजे आशिष गणेशराव पवित्रकार या अपक्ष उमेदवाराच्या अर्जामुळे. पवित्रकार यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. आता सर्वांचे लक्ष याकडे लागले आहे की, पवित्रकार आपला अर्ज मागे घेतात की निवडणूक रिंगणात कायम राहतात. तरी, संख्याबळ पाहता उपमहापौर पदी अमोल गोगे यांची निवड निश्चित मानली जात आहे.

महापौर पदासाठी


शारदा रणजित खेडकर


सुरेखा मंगेश काळे

उपमहापौर पदासाठी


अमोल गोगे


आजाद खान


आशिष पवित्रकार

### ३० जानेवारीला चित्र होणार स्पष्ट

■ महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांना या प्रक्रियेची आधीच सूचना देण्यात आली आहे. ३० जानेवारी रोजी होणाऱ्या सभेत अर्जांची छाननी आणि त्यानंतर आवश्यक असल्यास मतदान प्रक्रिया पार पडेल. अकोल्याच्या राजकारणात भाजप आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यात यशस्वी होते की विरोधक काही करिश्मा करतात, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

## शहर सुधार समिती गटाची नोंदणी



**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या ३० जानेवारी रोजी होणाऱ्या महापौर व उपमहापौर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. भाजपप्रणित आघाडीतील ४४ सदस्यांनी एकत्र येत शहर सुधार समिती नावाच्या गटाची नोंदणी विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे केली आहे. आज, २७ जानेवारी रोजी या प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा पार पडला. विभागीय आयुक्त कार्यालयातील सहआयुक्त नितीन कापडणीस यांच्या उपस्थितीत ही प्रक्रिया राबवण्यात आली. यावेळी शहर सुधार समितीमध्ये सामील असलेल्या सर्व ४४ सदस्यांना संमतीपत्राचे वाचन करून दाखवण्यात आले. या पत्रातील अटी व शर्तींशी सहमत असल्याचे सांगत सर्व सदस्यांनी त्यावर आपल्या स्वाक्षऱ्या केल्या. या नोंदणीमुळे महापौर निवडणुकीपूर्वी भाजपप्रणित आघाडीने आपली तटबंदी मजबूत केल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, या गटात केवळ भाजपचेच नव्हे तर विविध मित्रपक्षांच्या नगरसेवकांचाही समावेश आहे. यावेळी भाजप, शिवसेना, महानगर विकास समिती तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांतील नगरसेवक उपस्थित होते. या सर्वांनी एकत्र येत शहर सुधार समितीच्या माध्यमातून आपली वज्रमूठ कायम असल्याचे दाखवून दिले आहे.

# दोन आरोपींचा अटकपूर्व जामीन फेटाळला

## हिदायतउल्ला पटेल खून प्रकरण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** काँग्रेसचे नेते हिदायतउल्ला खान पटेल यांच्या खून प्रकरणात संशयित आरोपी मोहम्मद बहुजम्मा मो. आदील व संजय रामदास बोडखे या दोघांनी दाखल केलेले अटकपूर्व जामीन अर्ज अकोट सत्र न्यायालयाने फेटाळून लावले आहेत. या निर्णयामुळे प्रकरणाला महत्त्वाचे वळण मिळाले आहे.

अकोट येथील वि. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी अकोट ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दाखल अप. क्र. ०५/२०२६, भा.न्या.सं. कलम १०३(१), १०९, ३(५) अन्वये दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने दोन्ही आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केले.

या प्रकरणातील मृतक हिदायतउल्ला खान पटेल यांचे पुतणे फिर्यादी फतेह अली खान रफतउल्ला खान पटेल (रा. मोहाळा, ता. अकोट) यांनी ६ जानेवारी २०२६ रोजी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास फिर्यादी आपल्या घरासमोर उभे असताना इश्ताक पटेल व जावेद पटेल यांनी त्यांना बोलावले. ग्रामपंचायत कार्यालयाजवळ गेल्यावर त्यांना त्यांचे मोठे बाबा हिदायतउल्ला पटेल हे रक्तबंबाळ अवस्थेत दिसले.

फिर्यादीने विचारणा केल्यानंतर जखमी हिदायतउल्ला पटेल यांनी सांगितले की, मोहाळा येथील उबेद पटेल उर्फ काली पटेल याने मस्जिदीत नमाजानंतर वाचन करत असताना पाठीमागून येत गाल, पोट, छाती व गुप्तांगाजवळ चाकूने जीवघेणा हल्ला केला. तसेच हा हल्ला करण्यासाठी मोहम्मद बहुजम्मा मो. आदील, राजू विठ्ठलराव बोचे व संजय रामदास बोडखे यांनी उबेद पटेल यास चिथावणी दिल्याचा आरोपही जखमीने केला होता.

जखमी अवस्थेत हिदायतउल्ला पटेल यांना प्रथम अकोट येथील लोखंडे हॉस्पिटल, त्यानंतर धांडे हॉस्पिटल व पुढील उपचारासाठी अकोला येथील ओझोन हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याने प्रकरणाला खुनाचा गुन्हा म्हणून गंभीर स्वरूप प्राप्त झाले.

सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील ॲड. आर. आर. उर्फ गिराश यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, हा गुन्हा अतिशय गंभीर स्वरूपाचा असून आरोपींना अटकपूर्व जामीन दिल्यास तपासावर विपरीत परिणाम होऊ शकतो. युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने दोन्ही आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले.

## मंत्री गिरीश महाजन यांच्यावर ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक करा; वंचितचा अकोल्यात जोडे मारो निषेध

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि. २७ :** नाशिक येथे प्रजासत्ताक दिन सोहळ्यात राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नामोल्लेख टाळून त्यांचा अपमान केल्याच्या निषेधार्थ, अकोल्यात वंचित बहुजन आघाडी आक्रमक झाली आहे. नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यावर ॲट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करावी, या मागणीसाठी वंचितने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत तीव्र निदर्शनं केली.

''मंत्रिमंडळातून गिरीश महाजन यांची हकालपट्टी करून त्यांना तात्काळ अटक करावी, अन्यथा अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल,'' असा इशारा वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आला. या आंदोलनात जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, महिला जिल्हाध्यक्षा सौ. आम्रपालीताई खंडारे, जि.प. गटनेते ज्ञानेश्वर सुलताने, गजानन गवई, राजकुमार दामोदर यांच्यासह वंचित बहुजन आघाडी, महिला आघाडी आणि युवा आघाडीचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भिशीच्या नावाखाली कोट्यवधींचा आर्थिक अपहार?

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** भिशी (चिटफंड) योजनेच्या नावाखाली महिलांकडून मोठ्या प्रमाणात पैसे संकलित करून ते पैसे परत न देता तसेच कोणतीही शासकीय नोंदणी न करता बेकायदेशीर व्याजाच्या धंद्यात वापरून आर्थिक अपहार केल्याचा गंभीर आरोप खदान परिसरातील एका कुरीज कंपनीवर करण्यात आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व फसवणूकग्रस्त महिलांना न्याय द्यावा, अशी मागणी स्थानिक गुंतवणूकदार जया जयंत देशमुख यांनी केली आहे.

या गंभीर आर्थिक फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर जया देशमुख यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सदर कंपनीच्या संशयास्पद आर्थिक व्यवहारांची सविस्तर माहिती उघड करण्यात आली. जया देशमुख व त्यांच्या ओळखीच्या अनेक महिलांनी या कंपनीत विविध चिट (भिशी) ग्रुपमध्ये पैसे गुंतवले असून वीस लाख व पंधरा लाख रुपयांचे वेगवेगळे ग्रुप तयार करण्यात आले होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून भिशीचे ड्रॉ काढण्यास कंपनीकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. भिशीचा नियमित भरणा गेल्या ११ महिन्यांपासून करण्यात येत असतानाही कंपनीकडून कोणतीही पावती किंवा पासबुक देण्यात आलेले नाही. पावतीची मागणी केल्यास उडवा-उडवीची उत्तरे दिली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे ऑक्टोबर २०२५ मध्ये चालू असलेल्या भिशीचा ड्रॉ अद्यापपर्यंत काढण्यात आलेला नाही व कोणत्याही भिशीदाराला पैसे अदा करण्यात आलेले नाहीत. या संकलित पैशांचा वापर कंपनीकडून बेकायदेशीर व्याजाच्या व्यवहारांसाठी केला जात असल्याचा संशय असून, या संपूर्ण आर्थिक व्यवहाराची कोणतीही नोंद विक्रीकर विभाग किंवा अन्य शासकीय विभागाकडे करण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे हा प्रकार थेट आर्थिक फसवणुकीचा व नियमबाह्य व्यवहारांचा असल्याचे स्पष्ट होत आहे. आपल्यावर विश्वास ठेवून अनेक महिलांनी या कंपनीत लाखो रुपयांची गुंतवणूक केली आहे. मात्र ड्रॉ न झाल्यामुळे व पैसे परत न मिळाल्याने या महिलांकडून जया देशमुख यांच्यावर तगादा लावला जात असून मानसिक तणाव निर्माण झाला आहे. या प्रकारामुळे आपले व कुटुंबाचे आर्थिक व मानसिक नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## अर्चित चांडक यांना 'सर्वोत्तम पोलीस अधीक्षक' सन्मान

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. २७ :** अकोला जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरणारी मोठी बातमी समोर आली असून, महाराष्ट्र राज्यात व अमरावती परिक्षेत्रात अकोला जिल्हा पोलीस दलाने आपल्या कार्यक्षम, पारदर्शक व नागरिक-केंद्री कामगिरीद्वारे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील ३४ पोलीस जिल्ह्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात आले. या मूल्यमापनात अकोला पोलीस दलाने राज्यातील टॉप ३ पोलीस अधीक्षक कार्यालयांमध्ये आपले स्थान निश्चित केले असून, पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना 'सर्वोत्तम पोलीस अधीक्षक' म्हणून गौरविण्यात आले आहे.

अकोला पोलीस दलाला एकूण २०० पैकी १४८.७५ गुण प्राप्त झाले असून, ही कामगिरी संपूर्ण महाराष्ट्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये गणली जाते. विशेष म्हणजे, अमरावती परिक्षेत्रातील सर्वोत्कृष्ट पोलीस जिल्हा म्हणून अकोला जिल्हा पोलीस दलाची निवड झाली आहे. २६ जानेवारी २०२६ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयाकडून मूल्यमापन निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली. गणतंत्र दिनाच्या मुख्य शासकीय समारंभादरम्यान ही आनंदवार्ता सर्व अकोलेकरांसाठी जाहीर करण्यात आली. यावेळी ना.आकाश फुंडकर, कामगार मंत्री तथा पालकमंत्री, जिल्हा अकोला यांनी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## रेल्वे स्थानकावरून २३ वर्षीय तरुणी बेपत्ता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** चोरीच्या घटनांनंतर आता अकोला रेल्वे स्थानकावरून एका तरुणीच्या बेपत्ता होण्याची घटना समोर आली आहे. रेल्वे प्रवासादरम्यान २३ वर्षीय तरुणी अचानक गायब झाल्याने खळबळ उडाली असून, याप्रकरणी अकोला रेल्वे पोलिस ठाण्यात बेपत्ता व्यक्तीची तक्रार दाखल करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तेल्हारा येथील शेतकरी राजुद्दीन हे आपल्या २३ वर्षीय नात अर्शिया हिच्यासह २०६२६ भगत की कोठीकाचीगुडा एक्सप्रेसच्या जनरल डब्यातून नंदुरबार येथून अकोलाकडे प्रवास करत होते. दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ३.१५ वाजताच्या सुमारास दोघे अकोला रेल्वे स्थानकावर उतरले.

रेल्वे स्थानकातून बाहेर पडताना आजोबा पुढे चालत होते, तर अर्शिया त्यांच्या मागे येत होती. मात्र काही अंतर चालल्यानंतर मागे पाहिले असता अर्शिया दिसून आली नाही. त्यांनी आजूबाजूला शोध घेतला, मात्र ती आढळून आली नाही.

या घटनेनंतर राजुद्दीन यांनी अकोला रेल्वे पोलिस ठाण्यात धाव घेत बेपत्ताची तक्रार नोंदवली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी बेपत्ता व्यक्तीचा गुन्हा दाखल करून तरुणीचा शोध सुरू केला आहे. रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे कामही सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

तरुणीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास अकोला रेल्वे पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# बाबासाहेबांच्या 'वाचाल तर वाचाल' संदेशाचा अंगीकार करा - डॉ. सुगत वाघमारे

## टॉवर चौकात संविधान जागर; जि.प. सीईओ अनिता मेश्राम यांच्या हस्ते उद्घाटन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अकोला शहरात विविध सामाजिक उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. यामध्ये तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, अजिंक्य भारत आणि सम्यक संबोधी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने टॉवर चौकात राबवण्यात आलेला वाचन संस्कृती उपक्रम अकोलेकरांसाठी विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. यावेळी तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांनी ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वाचाल तर वाचाल हा महामंत्र दिल्याचे सांगून, आजच्या डिजिटल युगात वाचनाची ओढ कमी होत आहे. प्रत्येकाने जर वाचन संस्कृती अंगीकारली आणि संविधानाचे पालन केले, तरच आपण एक आदर्श नागरिक बनू शकतो,'' असे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे उमेश शिरसाट व श्वेता शिरसाट यांनी साकारलेली महात्मा ज्योतिबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा. नागरिकांनी या दांपत्यासोबत सेल्फी काढण्यासाठी मोठी गर्दी केली होती. तसेच, तिक्ष्णगत सोसायटीच्या वतीने 'तिक्ष्णगत नागरिक कर्तव्य' या माहितीपत्रकाचे वाटप करून जनजागृती करण्यात आली. तिक्ष्णगत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योजक डॉ. सुगत वाघमारे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारला गेला. कार्यक्रमाला ॲड. संजय सेंगर, तिक्ष्णगत संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार, महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर, बालसंरक्षण अधिकारी राजेश लाडुरकर, बालकल्याण समिती अध्यक्ष अनिता गुरव शिंदे, सम्यक संबोधी संस्थेचे उपाध्यक्ष अजय आठवले आणि प्रदीप अवचार यांची उपस्थिती होती.



### प्रत्येकाने संविधानाची मूल्ये जपावी - सीईओ मेश्राम

■ नागरिकांमध्ये वाचन संस्कृती वाढावी आणि संविधानाची मूल्ये रुजावीत या उद्देशाने टॉवर चौकात संविधानाच्या प्रास्ताविकेचे फलक आणि विविध पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या उपक्रमाचे उद्घाटन अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. ''प्रत्येक नागरिकाने संविधानाचे वाचन करून त्यातील मूल्ये जपावी, हीच खऱ्या अर्थाने देशाची सेवा आहे,'' असे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

## सम्यक संबोधीमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात



**अकोला:** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन संपूर्ण देशात उत्साहात साजरा होत असताना, अकोल्यातील सम्यक संबोधी सभागृह प्रांगणात अतिशय दिमाखदार सोहळा पार पडला. तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी, सम्यक संबोधी संस्था व अजिंक्य भारत यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ध्वजारोहण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुगत वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याला सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते. यात प्रामुख्याने संस्थेचे उपाध्यक्ष अजय आठवले, सचिव राहुल ओइंबे, तिक्ष्णगत संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकार, सदस्य एस. टी. वानखडे, सचिन पाटील, प्रशांत तेलगोटे, रवी शिरसाठ, परशुराम तेलगोटे, रवी डोंगरे, पंकज दांडगे यांच्यासह तिक्ष्णगत सोसायटी आणि अजिंक्य भारतचे सर्व पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महत्त्वाचे

### दिपक सदाफळे यांच्या कार्याचा गौरव



**पातूर/नंदापूर :** मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाउंडेशन संचालित संत गाडगे बाबा आपत्कालीन शोध व बचाव पथक, पिंजरचे संस्थापक अध्यक्ष दिपक सदाफळे व त्यांची टीम गेली २७ वर्षे महाराष्ट्रात अपघात, पूर, रुग्णसेवा आणि आपत्ती व्यवस्थापनात निरंतर सेवा देत आहे. २०२५ च्या मान्सून परिस्थितीत सदाफळे यांच्या टीमने अकोला जिल्ह्यासह इतर भागांतील पूरस्थितीत अनेकांचे प्राण वाचवले, बेपत्ता लोकांचा शोध घेतला व मृतदेह बाहेर काढले. या अलौकिक व निस्वार्थ कार्याची दखल अकोला जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. प्रजासत्ताक दिनानिमित्त लाल बहादूर शास्त्री स्टेडियम येथे आयोजित मुख्य शासकीय कार्यक्रमात अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते दिपक सदाफळे व त्यांच्या सहकाऱ्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या प्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते. मागील २७ वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या या सेवा कार्यामुळे दिपक सदाफळे समाजासाठी प्रेरणादायी ठरले आहेत.

### मूर्तिजापूर हायस्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा



**मूर्तिजापूर :** येथील मुर्तिजापूर हायस्कूलमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक अनिल देविकर होते. यांप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून अकोला एज्युकेशन सोसायटीचे संचालक विनायकराव वारे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर उपस्थित सर्वांनी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. तसेच इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत शिस्तबद्ध रितीने कवायतीचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमाला ज्यूबिली इंग्लिश स्कूलचे प्राचार्य भारती, पर्यवेक्षक दिनेश बकाले, एनसीसी अधिकारी मंगेश शिवणकर, माजी पर्यवेक्षिका अंजली केसाळे तसेच माजी शिक्षक मुकुंद दाणी यांची विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविनाश शेगोकार यांनी केले. या सोहळ्याला शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# डिजिटल युगातही सुकळी गाव नेटवर्कपासून वंचित!

## नेटवर्कअभावी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात; खासदारांना साकडे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**सुकळी, दि. २७ :** देश तंत्रज्ञानाच्या युगात वेगाने पुढे जात असताना, सुकळी गाव मात्र अद्याप मोबाईल नेटवर्कपासून वंचित असल्याचे विदारक वास्तव समोर येत आहे. पातूर तालुक्यातील या ग्रामीण भागात आजही कोणत्याही मोबाईल सेवा कंपनीचा टॉवर नसल्याने नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः ऑनलाईन शिक्षणाच्या काळात नेटवर्कअभावी विद्यार्थ्यांचे शिक्षण थेट धोक्यात आले आहे.

गावात एअरटेल, व्हीआय यासह कोणत्याही कंपनीचे नेटवर्क उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन क्लासेस किंवा शैक्षणिक माहितीसाठी गाव सोडून शहरात किंवा अन्यत्र जावे लागत आहे. यामुळे वेळ, पैसा आणि सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवरही याचा विपरीत परिणाम होत आहे.

या गंभीर समस्येबाबत गावकऱ्यांनी मतदारसंघाचे खासदार अनुप धोत्रे यांना वेळोवेळी निवेदने दिली आहेत. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही किंवा सकारात्मक बदल दिसून आलेला नाही, अशी नाराजी नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

डिजिटल इंडिया आणि स्मार्ट व्हिलेजसारख्या संकल्पना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरवायच्या असतील, तर सुकळीसारख्या गावांकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. अन्यथा, तंत्रज्ञानाच्या युगातही नेटवर्कवंचित गाव ही ओळख सुकळीच्या माथी कायम राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया जनसामान्यातून उमटत आहे.

❑ गावात नेटवर्क नसल्यामुळे ऑनलाईन क्लासेससाठी दररोज बाहेर जावे लागते. यामुळे वेळ आणि पैशांचा अपव्यय होतो, शिवाय सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांवर ही अन्यायकारक परिस्थिती आहे.

**- मयूर अंभोरे,** विद्यार्थी

❑ सुकळी गावात नेटवर्क टॉवर नसल्यामुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त आहेत. प्रशासन आणि मोबाईल कंपन्यांनी याकडे तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. गावात टॉवर उभारल्यास शिक्षण, व्यवसाय आणि दैनंदिन जीवनातील अनेक समस्या सुटू शकतात.

**- रवीकिरण वांडे,** नागरिक

## नरनाळा महोत्सव पोपटखेडलाच; डॉ. श्याम देशमुखांच्या पाठपुराव्याला यश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट दि. २७ :** अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या पर्वतरांगांमध्ये आयोजित होणारा नरनाळा महोत्सव अखेर शहानूर-पोपटखेड परिसरातच घेण्याच्या मागणीला यश आले आहे. वंदे मातरम फाउंडेशन (पोपटखेड) चे अध्यक्ष डॉ. श्याम देशमुख यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मागणी मान्य झाली असून, यामुळे परिसरातील आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

नरनाळा महोत्सवाचा मूळ उद्देश आदिवासी संस्कृतीचे जतन, वनसंवर्धन, गड-किल्ले दर्शन, जंगल भ्रमंती आणि दुर्गम भागातील जनजीवनाचे दर्शन घडवणे हा आहे. हा उद्देश साध्य होण्यासाठी महोत्सव शहानूर-पोपटखेड परिसरातच व्हावा, जेणेकरून स्थानिक आदिवासींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, अशी ठाम भूमिका डॉ. श्याम देशमुख यांनी मांडली होती. अकोटपासून शहानूरचे अंतर अवघे २२ किमी असल्याने पर्यटकांनाही या ठिकाणी पोहोचणे सोयीचे ठरणार आहे.

या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून योग्य ठिकाणीच महोत्सवाचे आयोजन करण्याबाबत निवेदन देण्यात आले होते. प्रशासनाने याला सकारात्मक प्रतिसाद देत मागणी मान्य केली आहे. या निर्णयामुळे अकोट तालुक्यातील जनसामान्य आणि आदिवासी समाजात समाधानाचे वातावरण आहे. मागणी मंजूर होताच डॉ. श्याम देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोपटखेड येथे महोत्सवाच्या तयारीला तात्काळ सुरुवात केली आहे.

## पालसोड्यात शेतकरी प्रशिक्षण शिबिर संपन्न




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. २७ :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग, राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान (अन्नधान्य पिके) व ग्राम विकास मित्र मंडळ, पालसोडा यांच्या संयुक्त विद्यमाने पालसोडा येथे पिक पद्धतीवर आधारित शेतकरी प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. हे प्रशिक्षण तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. या शिबिरात कृषी महाविद्यालय, नागपूर येथील संशोधन सहयोगी डॉ. आनंद वरघट, मंडळ कृषी अधिकारी के. व्ही. वानखेडे व उप कृषी अधिकारी अतुल राणे यांनी मार्गदर्शन केले. सहाय्यक कृषी अधिकारी संतोष राठोड यांनी उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, सकस व पौष्टिक अन्नधान्य निर्मिती तसेच हवामान बदलानुसार सुधारित पिक पद्धती अवलंबण्याचे आवाहन केले. डॉ. आनंद वरघट यांनी पिक फेरपालट, जमिनीचे आरोग्य, बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन व एकात्मिक कीड नियंत्रण याबाबत सविस्तर माहिती दिली. या कार्यक्रमासाठी ग्राम विकास मित्र मंडळाचे सुनील वानखेडे व नवनिर्वाचित नगरसेवक भूपेंद्र पिंपळे यांनी पुढाकार घेतला. यावेळी बाबाराव वानखेडे (पोलीस पाटील), रामेश्वर मुगल (सरपंच, गट ग्रामपंचायत सोनाला) यांच्यासह परिसरातील शेतकरी, युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची दिशा मिळाल्याने आगामी हंगामात उत्पादनवाढ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## मंगरुळपीरमध्ये महिला व विधवा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

**मंगरुळपीर :** मंगरुळपीर येथील स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे सभागृहात २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून हळदी-कुंकू व महिला सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शिवराज महिला मंडळ आणि भारतीय जनता पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विधवा व ज्येष्ठ महिलांचा साडी-चोळी देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे नियोजन रेखा अनिल गावंडे, लताताई पुरुषोत्तम चितलांगे, रूपाली मनोज खोडे, प्रतिभा चंद्रशेखर भोजने आणि अनिल विठ्ठलराव गावंडे यांनी केले होते. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून उषा श्यामभाऊ खोडे आणि आमदार श्याम खोडे यांनी उपस्थित राहून महिलांना सन्मानित केले.

या सोहळ्यात वॉर्ड क्र. १ मधील सुमारे १००० महिला सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे खास आकर्षण ठरलेल्या उखाणा स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या विजेत्या महिलांना पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले. शिवराज महिला मित्र मंडळाच्या वतीने उपस्थित सर्व महिलांसाठी अल्पोपहाराची (नाश्ता) उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

महिलांना समाजात सन्मान मिळावा आणि आपुलकीची भावना जपली जावी, हा उदात्त हेतू या कार्यक्रमातून साध्य झाला.

## महापुरुषांच्या अवमानावरून सावरखेड टोलनाक्यावर राडा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**सुकळी, दि. २७ :** २६ जानेवारी रोजी देशभरात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा होत असताना, पातूर तालुक्यातील मेडशीनजीक असलेल्या सावरखेड टोलनाक्यावर एका अप्रिय घटनेमुळे उत्साहावर विरजण पडले. प्रजासत्ताक दिनानिमित्त या टोलनाक्यावर ध्वजारोहणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमात शहीद भगतसिंग व भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी एका प्रवाशाने, प्रजासत्ताक दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा पूजन करणे अपेक्षित असताना त्यांची प्रतिमा का लावली नाही?असा सवाल उपस्थित केला. यावर टोलनाक्यावरील अधिकारी दीपक शिंदे यांनी अरेरावीची भाषा वापरत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल अवमानकारक शब्द वापरल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे आंबेडकर अनुयायांच्या भावना दुखावल्या गेल्या असून परिसरात तणाव निर्माण झाला.संतप्त नागरिकांच्या जमावाने टोलनाक्यावर धाव घेत तिथे तोडफोड केली.

या प्रकरणी टोल अधिकारी दीपक शिंदे यांच्याविरोधात पातूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २९९ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, स्थानिक नेते निर्भय पोहरे, दीपक धाडसे, जितेश सिरसाट आणि पोलिसांनी वेळीच मध्यस्थी केल्याने पुढील अनर्थ टळला.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन तडसे व रमेश खंडारे यांनी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन जमावाची समजूत काढली. खबरदारीचा उपाय म्हणून सध्या तिथे आरसीपी पथक तैनात करण्यात आले असून परिस्थिती नियंत्रणात आहे.

# दुचाकी चोरणारी टोळी गजाआड, दोघांना अटक

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. २७ :** शहरातील बसस्थानक परिसरातून दुचाकी चोरी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा ऑपरेशन प्रहार अंतर्गत मूर्तिजापूर शहर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मध्यप्रदेशातील दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

फिर्यादी अनंतराव गुणवंत तायडे (वय ३०, रा. कौलखेड जहाँगीर) यांनी ६ जानेवारी रोजी आपली हिरो स्प्लेंडर मोटारसायकल ( ३० ३८४४) बसस्थानक परिसरात उभी केली असता अज्ञात चोरट्यांनी ती लंपास केली होती. याप्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे दोन संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये संजय ब्रिजमोहन चौकसे (वय ३८, रा. तिल्लोर खुर्द, इंदूर) आणि दानीश खान दिलावर खान (वय १९, रा. दसरा मैदान, बडवा, जि. खरगोन) यांचा समावेश आहे. आरोपींकडून सुमारे ३० हजार रुपये किमतीची चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली.

ही कारवाई अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोलीस निरीक्षक अजित जाधव, पोलीस हवालदार सुरेश पांडे, सचिन दांदळे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन दुबे, गजानन खेडकर व कृष्णा येरमुले यांचा सहभाग होता.

वाहने सुरक्षित ठिकाणी उभी करावीत व संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## 'देश की बेटी की पुकार': प्रजासत्ताकदिनी शिवाजीनगरमध्ये 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ'चा प्रभावी जागर

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि. २७ :** दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून वृक्षमित्र तथा सामाजिक कार्यकर्ता सुनील गोहर यांनी समाजजागृतीचा आदर्श उपक्रम राबविला. २६ जानेवारी रोजी सकाळी शिवाजीनगर येथील वाल्मीकी चौक येथे आयोजित 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' अभियानाने परिसरात सकारात्मक संदेश पसरविला. या उपक्रमात चिमुकल्या मुलींसह उपस्थित नागरिकांनी हातात अर्थपूर्ण पोस्टर्स घेऊन सहभाग नोंदविला. ''वडिलांनी लाडाने मोठे केले, मला शिकू द्या, मला सुरक्षा द्या'', ''देश की बेटी की यही पुकार, बेटी को मिले सुरक्षा और सन्मान'' अशा घोषवाक्यांमधून मुलींचे शिक्षण, सुरक्षितता व सन्मानाचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. राष्ट्रध्वज हातात घेतलेल्या मुलांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास व आशा दिसून येत होती.

सुनील गोहर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, मुलींचे शिक्षण व संरक्षण हे केवळ कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे कर्तव्य आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' या अभियानाचा उद्देश मुलींचा जन्मदर वाढवणे, शिक्षणात समान संधी देणे आणि सामाजिक मानसिकतेत बदल घडवणे हा आहे.

या कार्यक्रमाला हरी खोडे, विजय सारवान, रामलाल चिंराडे, गुरुजी सारवान चौधरी, गुड्डू संकत, शाम गोडाले, मन्नू चावरे, मनोज गोहर, संजू गोडाले, अनिल जाधव यांची उपस्थिती लाभली. सातत्याने सामाजिक बांधिलकी जपत कार्य करणाऱ्या सुनील गोहर यांच्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

## वन्यप्राण्यांच्या त्रासामुळे शेतकरी आक्रमक; नरनाळा महोत्सवादरम्यान आंदोलनाचा इशारा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोट, दि. २७ :** जिल्ह्यातील शेतकरी महिलांनी आणि स्थानिक आंदोलनकर्त्यांनी नरनाळा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाबाबत गंभीर संताप व्यक्त केला आहे. लक्ष्मीकांत कौठकर यांच्या नेतृत्वाखालील ''मानव प्रजाती वाचवा'' आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले आहे.

आंदोलनकर्त्यांनी इशारा दिला आहे की, ३० जानेवारीपर्यंत त्यांच्या मागण्या पूर्ण न झाल्यास नरनाळा महोत्सवादरम्यान किल्ल्यावरून उडी मारून आंदोलन केले जाईल. ग्रामीण भागातील शेतकरी सध्या पिकांची हानी करणाऱ्या वाघ, बिबट्या, हरीण, नीलगाय आणि रानडुक्कर अशा वन्यप्राण्यांमुळे कमालीचे त्रस्त आहेत. रात्रीच्या वेळी शेतात काम करणे अत्यंत धोकादायक झाले असून, पिकांना पाणी देण्यासाठी एका मजुरासोबत त्याच्या संरक्षणासाठी पाच माणसांची गरज भासत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

आंदोलनकर्त्यांच्या मते, प्रशासन आणि वनविभाग सध्या नरनाळा महोत्सवाच्या तयारीत व्यस्त असून ग्रामीण भागातील या गंभीर परिस्थितीकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

२९ जानेवारीपर्यंत मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र होईल, असे आंदोलकांनी स्पष्ट केले. यावेळी छाया धुळे, माधुरी खिरोडकार, चंद्रकला रेळे, आशा नेमाडे, माधुरी बोबटकार, नीता थूटे,विशाखा कौठकर, गोदावरी इंगळे, प्रिया देऊळकार, किरण रेळे, प्रणिता मसुरकार, चंचल इंगळे, दिनेश गिर्हे, मनीष निमकर्डे, मोहन खिरोडकार, निलेश नेमाडे, रवींद्र भोपळे, जीवन नेमाडे, अमोल मसुरकार, विनोद धुळे, अफजल भास्कर, अनिल कौठकर, गोपाल निमकर्डे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## बार्टीमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा मंत्री धनंजय मुंडे यांना भेट



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २७ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या वतीने महाड (रायगड) येथे संपन्न झालेल्या दोन दिवसीय कार्यशाळेतील निर्णयानुसार, महाराष्ट्रातील सर्व आमदार आणि पालकमंत्र्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा भेट देण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक तथा सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे आणि विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुर्णाकृती पुतळा भेट स्वरुपात प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी वाशिम जिल्हा बार्टी प्रकल्प अधिकारी वसंत गव्हाळे, समतादूत प्रणिता दसरे (कारंजा लाड), विजय डांगे, श्वेता राऊत (मंगरूळपीर), तुकाराम वनारसे, साजिद पटेल (वाशिम), बंडू शिंदे आणि संघमित्रा गवई (मालेगाव) आदी उपस्थित होते.

## आलेगाव ग्रामपंचायतीत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**आलेगाव, दि. २७ :** येथील ग्रामपंचायतीत २६ जानेवारी रोजी ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सरपंच गोपाल गणपतराव महल्ले यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर सरपंचांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण पार पडले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर यांनी उपस्थितांना संबोधित केले. ते म्हणाले की, ''१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला आणि २६ जानेवारी १९५० रोजी देशात संविधान लागू झाले; म्हणूनच हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो.भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असून, देशासाठी बलिदान देणाऱ्या सर्व महापुरुषांना यावेळी अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक मुलांची शाळा, जिल्हा परिषद कन्या शाळा व जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या विद्यार्थ्यांनी काढलेली प्रभात फेरी ठरली. या प्रभात फेरीने संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, माजी जिल्हा परिषद सदस्य, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील, ग्रामपंचायत कर्मचारी, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका, गावातील प्रतिष्ठित नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, बुधवार, दि. २८ जानेवारी २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही सक्तीला शिक्षक संघटनांचा विरोध

**वाशिम :** फेब्रुवारी-मार्चमध्ये होणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही बंधनकारक करण्याच्या आणि केंद्र संचालकांची अदलाबदल करण्याच्या निर्णयाला शिक्षक संघटनांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. शासनाने या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी केली जात आहे. शिक्षक महासंघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांच्या मते, राज्यातील अनेक खासगी अनुदानित शाळांची आर्थिक स्थिती बेताची असल्याने सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे शक्य नाही. ग्रामीण भागात नेटवर्कअभावी ही यंत्रणा कार्यान्वित राहण्यात अडचणी आहेत. सीसीटीव्ही नसल्याच्या कारणावरून केंद्र बंद केल्यास विद्यार्थ्यांना लांबच्या केंद्रावर जावे लागेल, ज्याचा त्यांच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे वस्तुस्थितीचा विचार करून निर्णय घेण्याची मागणी होत आहे.

### देशी दारूचे दुकान हटवण्यासाठी महिला आक्रमक

**रिसोड :** शहरातील इंदिरानगर परिसरातील देशी दारूचे दुकान तत्काळ हटवण्यासाठी महिला व नागरिकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले असून, ३० दिवसांत कारवाई न झाल्यास बेमुदत उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांच्या मते, या दुकानामुळे परिसरात मद्यप्यांचा धिंगाणा वाढला असून महिला व शाळकरी मुलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. विशेष म्हणजे, या दुकानापासून १०० मीटर अंतरावर शाळा, रुग्णालय आणि वसतिगृहे आहेत. तरुण पिढी व्यसनाधीन होत असल्याने हे दुकान त्वरित बंद करण्याची मागणी सदानंद चोपडे, डॉ. अशोक इंगोले व अन्य नागरिकांनी केली आहे.

### अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांच्या विकासासाठी ४७२ कामांना मंजुरी

**वाशिम :** जिल्हा परिषद समाज कल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्त्यांमध्ये मूलभूत सोयी-सुविधा पुरवण्यासाठी ४७२ गावांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रस्ते, नाल्या, पथदिवे आणि समाजमंदिरांच्या कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या कामांना प्रशासकीय मान्यता दिली असून, यासाठी ३ हजार २३१ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. पायाभूत सुविधांची तीव्र गरज असलेल्या गावांना यात प्राधान्य देण्यात आले असून, यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

### रोजगार योजनेच्या अटी शिथिल करण्याची मागणी

**वाशिम:** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतील जाचक अटी, कागदपत्रांची पूर्तता आणि हमीदारांच्या नियमांमुळे सुशिक्षित बेरोजगारांना कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत. या अटी शिथिल करण्याची मागणी युवकांकडून होत आहे.

### शौचालय अनुदानाची प्रतीक्षा

मालेगाव : पंचायत समिती अंतर्गत वैयक्तिक शौचालयांचे काम पूर्ण करूनही अनेक महिन्यांपासून लाभार्थ्यांना अनुदान मिळालेले नाही. यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

# सर्वांच्या सहकार्यातून जिल्ह्याचा विकास करूया : पालकमंत्री

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** जिल्ह्याचा प्रगतीचा प्रवास आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच शक्य होईल. आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केल्यास वाशिम जिल्हा महाराष्ट्रातील एक आदर्श जिल्हा बनू शकतो. संविधानाच्या आदर्शांवर चालत आपण विकासाची नवी शिखरे गाठूया आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करूया, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांनी केले. भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त, २६ जानेवारी रोजी वाशिम येथील पोलीस कवायत मैदानावर त्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजवंदन करण्यात आले, त्या प्रसंगी ते बोलत होते.

या सोहळ्याला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, उपविभागीय पोलीस अधिकारी नवदीप अग्रवाल यांच्यासह विविध मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आपल्या भाषणात पालकमंत्री म्हणाले की, वाशिम जिल्ह्याने शेती क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी शेती, रोजगार, पाणी व्यवस्थापन, रस्ते, घरकुल योजना, महिला सक्षमीकरण, युवक कौशल्य विकास आणि ग्रामीण पायाभूत सुविधांवर विशेष भर दिला जात आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमुळे सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक



बदल घडत आहेत. विशेषतः जून ते सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने ४३१ कोटी रुपयांचे अनुदान वितरित करून खंबीर पाठबळ दिले आहे. तसेच सुधारित पीक विमा योजनेतून लाखो हेक्टर क्षेत्र संरक्षित करण्यात आले आहे.

प्रशासकीय यशाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, जिल्ह्याने यांत्रिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानात मोठी झेप घेतली आहे. ३६ हजार शेतकऱ्यांनी महाविस्तार एआय ॲपचा वापर सुरू केला आहे. शिक्षण क्षेत्रात स्कूल ट्रान्सफॉर्मेशन प्रोजेक्ट अंतर्गत १७५ शाळांचे रूपान्तरण करण्यात आले असून महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून ४० हजार महिला लखपती दीदी झाल्या आहेत. घरकुल योजनांतर्गत हजारो गरिबांना घरे उपलब्ध करून देण्यात आली असून सौर ऊर्जा प्रकल्पांची कामेही वेगाने पूर्ण होत आहेत. आरोग्य सेवेत जिल्हा रुग्णालयात एमआरआय व कॅथलॅब सारख्या सुविधा प्रगतीपथावर आहेत.

पालकमंत्र्यांनी पोहरादेवी आणि उमरी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत महसूल विभागाच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक केले. ध्वजवंदनानंतर त्यांनी परेडचे निरीक्षण केले, ज्यामध्ये पोलीस दल, होमगार्ड, एनसीसी आणि शालेय पथकांनी शिस्तबद्ध संचलन केले. यावेळी पालकमंत्र्यांच्या हस्ते वीरपत्नी पार्वतीबाई लहाने, वैशाली गोरे आणि मीराबाई नागुलकर यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा वार्षिक योजनेतून पोलीस विभागासाठी खरेदी केलेल्या २० नवीन बोलेरो वाहनांचे अनावरण करण्यात आले.

## चर्मकार समाजाच्या प्रलंबित मागण्यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कोंडोली, दि. २७ :** राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे सहसचिव गजानन मोतीराम घुबडे यांनी चर्मकार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री कार्यालयाचे उपसचिव अमोल पाटणकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केले. २६ जानेवारी रोजी मुंबई येथे हे निवेदन देण्यात आले. चर्मकार समाजाच्या विकासासाठी आणि न्याय्य हक्कांसाठी या मागण्यांची तातडीने पूर्तता करण्याची विनंती साहित्यिक व प्रबोधनकार गजानन घुबडे यांनी यावेळी केली.

या निवेदनात प्रामुख्याने गुरु रविदास यांच्या नावे स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यासाठी १०० एकर जमीन व आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात गुरु रविदास भवन बांधावे आणि बार्टीच्या धर्तीवर चर्मकार समाजासाठी स्वतंत्र कौशल्य विकास केंद्र सुरू करावे, असेही निवेदनात नमूद केले आहे. केंद्र सरकार आणि इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्र शासनाने देखील संत रविदासांचा उल्लेख अधिकृतपणे "गुरु रविदास" असाच करावा आणि त्यांच्या साहित्याला शालेय व महाविद्यालयीन अभ्यासक्रमात उचित स्थान द्यावे, याकडेही लक्ष वेधण्यात आले.



आर्थिक विकासाच्या दृष्टीने संत रविदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाची थकीत कर्ज प्रकरणे माफ करून महामंडळाच्या निधीत वाढ करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच गुरु रविदासांचे जन्मस्थळ राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करावा, जिल्हा स्तरावर गुरु रविदास पुरस्कार सुरू करावा आणि त्यांचा जन्मदिन शासकीय स्तरावर समता दिन म्हणून मोठ्या प्रमाणात साजरा करावा, अशा विविध मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांचे साहित्य विनामूल्य किंवा अल्प दरात उपलब्ध करून द्यावे, असेही श्री. घुबडे यांनी निवेदनात म्हटले आहे.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**कारंजा (लाड):** देशाचा ७७ वा प्रजासत्ताक दिन कारंजा नगर परिषद मुख्य कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नगर परिषदेचे उपाध्यक्ष ॲड. फिरोज शेकुवाले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी मुख्याधिकारी महेश वाघमोडे यांच उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर उपस्थितांना संबोधित करताना ॲड. फिरोज शेकुवाले म्हणाले की, "कारंजा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी सकारात्मक व जबाबदारीने योगदान देणे आवश्यक आहे." संविधानाच्या मूल्यांचे पालन करून एकता आणि बंधुता अधिक बळकट करण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला. या कार्यक्रमास नगर परिषदेचे सर्व नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अभिनेते गणेशपुरे सुकळीच्या रानात; ग्रामस्थांशी साधला संवाद!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उंबर्डा बाजार, दि. २७ :** येथून जवळच असलेल्या सुकळी (ग्राम) येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाअंतर्गत २७ जानेवारी रोजी सुप्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांनी भेट दिली. अभियानाची व्यापक प्रसिद्धी, ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आणि ग्रामविकासाच्या उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गणेशपुरे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून ग्रामविकासाच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत



आहे. यानिमित्त अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कालिदास तापी आणि सर्व विभाग प्रमुखांनी सुकळी गावाला भेट देऊन अभियानाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी पुढाकार घेतला. गटविकास अधिकाऱ्यांनीही गावाला या अभियानासाठी प्रोत्साहित केले आहे.

ग्रामपंचायत कार्यालयात सकाळी १० वाजता पार पडलेल्या या कार्यक्रमाला गटविकास अधिकारी पूनम राणे, सरपंच सविता वानखडे, ग्रामसेवक नरेश गजभिये, उपसरपंच कोकरे, सामाजिक कार्यकर्ते सुनील पाटील वानखडे, सिद्धार्थ पाटील, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिस्तबद्ध वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने ग्रामविकासाच्या मोहिमेला नवी गती मिळाली आहे.

## नवनिर्मित शासकीय निवासस्थानांचे थाटात लोकार्पण

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने, जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उभारण्यात आलेल्या नवनिर्मित शासकीय निवासस्थानांचे उद्घाटन पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते आज प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर उत्साहात पार पडले. अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षित आणि सर्व सोयींनी युक्त निवास व्यवस्था उपलब्ध करून दिल्यास, ते जनसामान्यांना अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि वेगवान सेवा देऊ शकतील, असा विश्वास पालकमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. पायाभूत सुविधांच्या विकासाला शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले असून, त्याचाच एक भाग म्हणून या इमारतींची उभारणी करण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

या सोहळ्याप्रसंगी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी नवनिर्मित निवासस्थानांच्या बांधकामाविषयी सविस्तर माहिती दिली. या इमारतींमध्ये आधुनिक जीवनशैलीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधांचा समावेश करण्यात आला आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित, प्रशस्त आणि सोयीस्कर वातावरण निर्माण झाल्यामुळे, प्रशासकीय कामकाजात सुलभता येईल. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील



मुख्य अधिकारी एकाच परिसरात वास्तव्यास असल्याने तातडीच्या प्रसंगी निर्णय प्रक्रिया आणि सेवा पुरवठा अधिक जलद होण्यास मदत होणार आहे.

सदर निवासस्थान संकुलामध्ये वीज, पाणी, अत्याधुनिक स्वच्छता व्यवस्था, अंतर्गत रस्ते आणि संरक्षक भिंत यांसारख्या आवश्यक नागरी सुविधांचा दर्जा राखण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या इमारतींची उभारणी वेळेत आणि गुणवत्तापूर्णरीतीने पूर्ण केली आहे. या उद्घाटन कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पोलीस अधीक्षक अनुज तारे, भाप्रसे परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील 'संवाद सभागृहाचे' उद्घाटन



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** नागरिक व पोलीस प्रशासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात स्थापन करण्यात आलेल्या 'संवाद सभागृहाचे' उद्घाटन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते आज दि.२६ रोजी उत्साहात करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, भाप्रसे परीविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, अप्पर पोलीस अधीक्षक लता फड,पोलीस उपविभागीय अधिकारी नवदीप अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शुभम जोशी, उपविभागीय अभियंता संचित शिंदे, शासकीय कंत्राटदार सुरेश दहात्रे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

या उपक्रमामुळे नागरिकांच्या तक्रारी, समस्या व सूचना थेट पोलीस प्रशासनापर्यंत पोहोचण्यास मदत होणार आहे.

उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, संवाद कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी एक स्वतंत्र व सुलभ व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारी संवेदनशीलतेने ऐकून त्यावर वेळेत कार्यवाही करावी. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नागरिक व पोलीस यांच्यातील परस्पर विश्वास आणि समन्वय अधिक बळकट होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अनूज तारे यांनी संवाद कार्यालयाच्या कार्यपद्धतीची माहिती दिली. या कार्यालयाच्या माध्यमातून दररोज ठराविक वेळेत नागरिकांच्या तक्रारी स्वीकारण्यात येणार असून संबंधित विभागांकडे तात्काळ पाठवून त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

संवाद कार्यालयाच्या उद्घाटनामुळे महिला सुरक्षा, सायबर गुन्हे, वाहतूक समस्या, सार्वजनिक सुरक्षितता तसेच इतर नागरी प्रश्नांवर त्वरित दखल घेण्याची यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे. नागरिकांनी निर्भयपणे आपले प्रश्न मांडावेत, असे आवाहन पालकमंत्र्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमास पोलीस विभागांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्वच्छ वसुंधरा** | स्वच्छता दूतांच्या कष्टाला तंत्रज्ञानाची आणि सन्मानाची जोड

## 'फ्री ऑफ कॉस्ट' प्रकल्पातून स्वच्छतेचा नवा अध्याय

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** विकास म्हणजे केवळ सिमेंट-काँक्रीटचे रस्ते नव्हे, तर आपल्या पुढच्या पिढीला श्वास घेण्यासाठी दिलेली शुद्ध हवा आणि राहण्यासाठी दिलेली स्वच्छ पृथ्वी होय. याच संवेदनशील विचारातून वाशिम नगरपालिकेने शहर स्वच्छतेच्या पलीकडे जात शाश्वत विकासाचे एक नवे दालन उघडले आहे. भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमयी पर्वावर, वाशिम येथील नाविन्यपूर्ण घनकचरा विलगीकरण प्रक्रिया केंद्राचे उद्घाटन राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते करण्यात आले. वाशिमच्या मातीला प्रदूषणमुक्त करण्याचा हा एक प्रामाणिक आणि संवेदनशील प्रयत्न आहे.

स्वच्छता दूतांच्या कष्टाला आधुनिकतेचा सन्मान

या कार्यक्रमाचे सर्वात संवेदनशील वैशिष्ट्य म्हणजे पालकमंत्र्यांनी प्रत्यक्ष कचरा विलगीकरण करणाऱ्या स्वच्छता



कर्मचाऱ्यांशी साधलेला संवाद. "शहराला स्वच्छ ठेवण्यासाठी आपला घाम गाळणाऱ्या या स्वच्छता दूतांचे आरोग्य आणि त्यांचा सन्मान आमच्यासाठी सर्वोच्च आहे," अशा शब्दांत ना. भरणे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित हे केंद्र या कर्मचाऱ्यांचे काम अधिक सुसह्य आणि सुरक्षित करणार आहे. टाकाऊतून टिकाऊ निर्माण करण्याच्या या प्रक्रियेत हाताने कचरा उचलण्याची वेळ येऊ नये, हा या प्रकल्पाचा मानवी दृष्टिकोन आहे.

भविष्यातील पिढीसाठी आरोग्य ठेव

फ्री ऑफ कॉस्ट तत्त्वावर चालणारा हा प्रकल्प केवळ प्रशासकीय यश नसून ती पर्यावरणाप्रती असलेली आपली नैतिक जबाबदारी आहे. या केंद्राच्या माध्यमातून ओल्या कचऱ्यातून सेंद्रिय खत तयार होईल, जे भूमातेचे पोषण करेल, तर सुक्या कचऱ्याचे शास्त्रीय वर्गीकरण करून पर्यावरणाची हानी टाळली जाईल. डम्पिंग ग्राऊंडच्या दुर्गंधीतून नागरिकांची मुक्तता आणि आजारांपासून मुलांचे संरक्षण, हा या प्रकल्पाचा मुख्य गाभा आहे.

प्रकल्पाची पाहणी करताना पालकमंत्र्यांनी आवाहन केले की, "जेव्हा एखादे शहर स्वतःचा कचरा स्वतः जिरवायला शिकते, तेव्हाच ते खऱ्या अर्थाने स्वावलंबी होते." जिजा ॲग्रिकल्चरचे संचालक राम डोरले आणि मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांच्या नियोजनातून साकारलेला हा प्रकल्प वाशिमच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरला आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी, ज्यांच्या हातांनी हे केंद्र चालणार आहे, अशा स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार करताना उपस्थितांचे डोळे कृतज्ञतेने भरून आले. विकासाचे हे पाऊल आता केवळ कागदावर न राहता वाशिमच्या घराघरांत स्वच्छतेचा संस्कार रुजवणारे ठरणार आहे.

# मोखा ग्रामसभेत सांडपाणी आणि देवगायांच्या प्रश्नावरून राडा

## २९ तारखेच्या मासिक सभेकडे गावकऱ्यांचे लक्ष

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**जानोरी मेळ, दि. २७ :** मोखा गट ग्रामपंचायतीची २६ जानेवारी रोजी झालेली ग्रामसभा गावकऱ्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे चांगलीच वादळी ठरली. सांडपाणी व्यवस्थापन आणि मोकाट देवगायांमुळे होणारे पिकांचे नुकसान या मुद्द्यांवरून ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरले. अखेर, हे सर्व प्रश्न २९ जानेवारीच्या मासिक सभेत निकाली काढण्याचे आश्वासन ग्रामसेवकांनी दिल्याने तूर्त हा वाद निवळला आहे.



ग्रामसभेत वॉर्ड क्र. २ आणि ३ मधील सांडपाण्याच्या डबक्यांचा प्रश्न प्रकर्षाने मांडण्यात आला. गेल्या तीन वर्षांपासून नाल्यांचे काम अर्धवट असल्याने पावसाचे पाणी आणि सांडपाणी थेट रस्त्यावर येत आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांच्या वाढत्या प्रभावामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने यापूर्वी प्रयत्न केले असले तरी, काही तांत्रिक अडचणींमुळे हे काम रखडल्याचे समोर आले आहे.

**शेतकऱ्यांचे नुकसान आणि आक्रमक मागणी**

दुसरीकडे, मोकाट देवगायांमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली. संध्याबाई ओमप्रकाश मोर यांच्या शेतातील दोन एकर तुरीचे पीक या गाईंनी फस्त केल्याचा आरोप करण्यात आला. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई मिळावी, यासाठी ग्रामपंचायतीने विशेष ठराव मंजूर करण्याची मागणी यावेळी लावून धरण्यात आली.

ग्रामसभेला सरपंच आणि ग्रामसेवक उपस्थित होते, मात्र आठपैकी केवळ एकच सदस्य हजर असल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. लोकप्रतिनिधींच्या या उदासीनतेमुळे गावाचे प्रश्न सुटणार कसे? असा सवाल उपस्थित करत नागरिकांनी सदस्यांच्या अनुपस्थितीवर ताशेरे ओढले. याशिवाय घरकुल योजना, घनकचरा व्यवस्थापन आणि जलजीवन मिशनच्या कामांमधील अनियमिततेवरही चर्चा करण्यात आली. आता सर्व प्रश्नांचे भवितव्य २९ तारखेच्या मासिक सभेवर अवलंबून असून, ग्रामपंचायत प्रशासन काय ठोस निर्णय घेणार, याकडे संपूर्ण गावाचे लक्ष लागले आहे.

# अंदुऱ्याचे आदर्श सरपंच संजय वानखडे यांचा सत्कार




अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अंदुरा, दि. २७ :** प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून भारतीय बौद्ध महासभा, बाळापूर तालुक्याच्या वतीने अंदुरा येथील सरपंच संजय वानखडे व त्यांच्या पत्नी माजी सरपंच सीमा वानखडे यांचा सहपत्नीक सत्कार करण्यात आला. भारताचे संविधान, हार व शाल देऊन तालुकाध्यक्ष राहुल इंगळे यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला.

सरपंच वानखडे यांनी आपल्या कार्यकाळात गावाचा कायापालट केला आहे. शाळांचे डिजिटलायझेशन, सुसज्ज दवाखाना, ५ रुपयांत २० लिटर शुद्ध पाणी आणि पूर्ण टॅक्स भरणाऱ्यांना मोफत पिण्याचे पाणी व मोफत आटा चक्की यांसारख्या अभिनव योजना त्यांनी राबवल्या. त्यांच्या या कार्याची दखल घेत भारतीय बौद्ध महासभेने त्यांना सन्मानित केले.

या कार्यक्रमाला पोलीस पाटील ज्ञानदेव रोहनकर, ग्रामसेवक इंगळे, तंटामुक्ती अध्यक्ष महेंद्रसिंग राजपूत, कोतवाल राजूभाऊ डाबेराव, राहुल भटकर, आकाश उमाळे, राम खारोडे, विजय राजपूत यांच्यासह अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, जिल्हा परिषद शाळा व स्वर्गीय जगदेवराव वराळे विद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठिकठिकाणी प्रजासत्ताक दिन उत्साहात

### सेंट पॉल्स अकॅडमी

**अकोट :** येथील श्री. जी. कॉलनीतील सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला परेड व बँड पथकाच्या तालावर प्रमुख पाहुण्यांचे आगमन झाले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या कोषाध्यक्षा रेखा चांडक होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून शारदा लाखोटिया, गजानन सावरकर (विस्तार अधिकारी, पंचायत समिती, अकोट) व जयश्री बिहाडे उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, पर्यवेक्षक रिंकू अग्रवाल, अभिजीत मेंढे, सारिका रेळे, वैशाली गावत्रे, प्रभुदास नाथे आदींची उपस्थिती होती. विद्यार्थिनींनी स्वागतगीताने पाहुण्यांचे स्वागत केले. याप्रसंगी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी संगीतमय कवायत सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. डंबेल्स व लेझीम पथकांचे सादरीकरण आकर्षणाचे केंद्र ठरले. तसेच विद्यार्थिनींच्या चमूने देशभक्तीपर गीते सादर केली. नर्सरी, ज्युनिअर केजी, सीनियर केजी तसेच इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी समयोचित भाषणे केली. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सामूहिक नृत्य सादर केले. यावेळी रश्मी बेराड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व पटवून देत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णाली सावरकर व श्लोक उगले यांनी केले, तर आभार जानवी धारपवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिलाष काळमेघ, प्रणव देंडवे, नितीन गावंडे, नारायण वानखडे, आनंद काळमेघ, अर्चना रायबोले, निर्मला पुंडकर, रचना सुपासे, कल्पना बिहाडे, भारती बगेले, सुदर्शन अंभोरे, प्रथमेश ठाकरे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.




### रुईखेड



**अकोट :** अकोट तालुक्यातील रुईखेड येथे नवयुवक शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेच्या संचालक तथा माजी मुख्याध्यापिका संगीता मानकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कलांचे सादरीकरण केले. वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच देशभक्तीपर गीतांवर आधारित शिस्तबद्ध कवायत संचलन सादर करण्यात आले.
कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून सेवानिवृत्त कर्मचारी छाया पन्नासे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल मांडवे यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष काळे यांनी केले. या कार्यक्रमाला मुख्याध्यापक निनाद मानकर, अनिता भराटे, किरण मानकर, वनिता सरोदे, संतोष काळे, विशाल मांडवे, मंजुषा साठे, अनिल ओखारे, प्रा. रूपेश गायगोले, प्रा. राहुल खंडारे, प्रशांत मानकर, संगीता पन्नासे, संगीता नाथे, प्रतिक्षा सदार, जान्हवी गाठेकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोशे, राजू पवार, मंदा पवार यांच्यासह विद्यार्थी, पालक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बाळापूर तालुका राष्ट्रभक्तीने दुमदुमला

**बाळापूर:** भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन बाळापूर शहर व तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध शासकीय कार्यालये, शाळा आणि ग्रामपंचायतींमध्ये गरिमामय ध्वजारोहण सोहळे पार पडले. सकाळी विद्यार्थ्यांनी काढलेल्या प्रभात फेऱ्यांनी आणि ''जय हिंद''च्या घोषणांनी शहर परिसरात चैतन्य निर्माण झाले होते.
दिवसाची सुरुवात सकाळी ७.२५ वाजता जिल्हा परिषद शाळा, नगर परिषद व शासकीय कार्यालयांतील ध्वजारोहणाने झाली. त्यानंतर सकाळी ८.२५ वाजता शहराच्या ऐतिहासिक जयस्तंभावर आमदार नितीन देशमुख यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आमदारांनी संविधानिक मूल्ये आणि लोकशाहीप्रती नागरिकांच्या कर्तव्यांचे महत्त्व विषद केले.
तसेच, राजस्व व वन विभागाच्या वतीने ओल्ड कॉटन मार्केट परिसरात सकाळी ९.१५ वाजता आयोजित कार्यक्रमात डॉ. संतोष येवलिकर यांच्या हस्ते तिरंगा फडकवण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार वैभव फारतारे, गटविकास अधिकारी भरत चव्हाण, विस्तार अधिकारी दिग्विजय चव्हाण, डॉ. सागर भागवत, नितीन निंबुलकर, सैय्यद एहसानुद्दीन, विनीत ताले, गंगाधर गुंठेकर यांच्यासह सर्व नायब तहसीलदार, महसूल कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुक्यातील सर्व कार्यक्रम शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न होऊन राष्ट्रभक्तीचा संदेश जनतेपर्यंत पोहोचला.



### सावरखेड ग्रामपंचायत



**बार्शीटाकळी :** तालुक्यातील पिंजर गावाजवळ असलेल्या मौजे सावरखेड येथील ग्रामपंचायत कार्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सौभाग्यवती वंदनाताई बाळासाहेब देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांमध्ये बाळासाहेब देशमुख, उपसरपंच प्रकाश पट्टेबहादूर, संगीता अंभोरे, सत्तेशीलाबाई प्रधान, अनिता देशमुख, नवीनकुमार देशमुख, ममता हिवराळे, संतोष देशमुख, सखाराम इंगळे, माधुरीताई देशमुख, गुणवंतराव देशमुख, ऐश्वर्या देशमुख, संजय प्रधान (रोजगार सेवक) तसेच ग्रामपंचायत अधिकारी एस. एस. नांदे यांचा समावेश होता.ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### मा. सारदा ज्ञानपीठ

**अकोला :** श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा मंडळ संचालित मा. सारदा ज्ञानपीठ, गीतानगर, अकोला येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. जयंत कावरे यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संस्थाध्यक्ष डॉ. जयंत कावरे, उपाध्यक्ष डॉ. सत्यनारायण बाहेती, उपाध्यक्ष पुरुषोत्तम राठी, संचालिका विद्याताई उमाळे, मुख्याध्यापक प्रशांत खत्री, उपमुख्याध्यापिका सावित्री विश्वकर्मा व व्यवस्थापक राहुल देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमात सामूहिक राष्ट्रगीत, वंदे मातरम् व महाराष्ट्र गीताचे गायन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, संस्कृत व इंग्रजी भाषेत प्रजासत्ताक दिनानिमित्त आपले विचार मांडले. संगीत शिक्षक रवींद्र वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली भक्ती मालोकार, आराध्या मालोकार, ऋतुजा भटकर व श्रावणी भगत यांनी देशभक्तीपर गीते सादर केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. जयंत कावरे यांनी, शिक्षकांनी व पालकांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन द्यावे,असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन भक्ती खोडके व सीमरन शेंडे यांनी केले, तर आभार तनवी खोडके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपमुख्याध्यापिका सावित्री विश्वकर्मा यांच्यासह शिक्षिका पद्मिनी शिंदे, पूनम गावंडे, मंजुषा शर्मा, दिपाली चव्हाण, किरण तायडे, योगिता सरनाईक, सुषमा दाभाडे, प्रतिभा दुधे, निकिता दुधे, कल्पना पोहरे, शिवानी बैस, स्वाती गावंडे, सीमा पारतवार, प्रीती शिंदे, कार्तिक झोंबाडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी अभिजित सर, वेदांत इंगळे, मुकेश अस्वारे, अश्विनी सरोदे, साधना गोपनारायण, नीता तायडे, ज्योती इंगळे, रेणुका दुधे व करुणा बागडे यांनी परिश्रम घेतले.




### परशुराम नाईक विद्यालय



**बोरगाव मंजू :** येथील परशुराम नाईक विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन प्रभातफेरी व विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सदस्य एस. जी. बोरगांवकर होते.या प्रसंगी संस्था अध्यक्ष किरण नाईक, सचिव एन. एस. गमे, शाळा समिती अध्यक्ष दीपक नाईक यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, पत्रकार आणि विविध विभागांचे प्राचार्य उपस्थित होते. अध्यक्ष एस. जी. बोरगांवकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. तसेच एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव जागृत करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. कॉपीमुक्त अभियान: प्राचार्य मनोज आगरकर यांनी १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना शपथ दिली. तंबाखूमुक्ती: उपमुख्याध्यापक गजानन पोहनकर यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीची शपथ दिली. असाक्षरमुक्त गाव: पर्यवेक्षक शंकर भदे यांनी गाव साक्षर करण्याबाबत शपथ दिली. दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाची प्रत देऊन सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट एनसीसी कॅडेट्सना स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले.

### जिल्हा परिषद



**अकोला :** भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन जिल्हा परिषद परिसरात अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा परिषद प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २७ कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी माया शिर्के, कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा) अतुल सोळंके, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) माहुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रतनसिंग पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी हरिनारायण परिहार यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. तापडिया नगर येथील स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या स्काऊट-गाईड पथकाने ध्वजसंचालन करून सलामी दिली. तसेच महाराष्ट्र माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर केले. संविधान दिनानिमित्त समाज कल्याण विभागामार्फत आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत अकोला जिल्ह्यातून प्रथम आलेल्या सुंदर भीमराव इंदोरे या विद्यार्थ्यास रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच दिव्यांग क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पंकज जगतराव जायले यांना प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कर्मचाऱ्यांना तंबाखूमुक्त भारत मोहिमेची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक गोपाल सुरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्काऊट-गाईड जिल्हा संघटक जयमाला जाधव, किरण लहाने तसेच बांधकाम, शिक्षण, कृषी व सामान्य प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## शिवर येथील एल.एन.पी. कॉन्व्हेंटमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

### महापुरुषांच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी वेधले लक्ष; प्रभात फेरीने गावकऱ्यांमध्ये जनजागृती




**शिवर :** स्थानिक एल.एन.पी. कॉन्व्हेंटमध्ये भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित प्रभात फेरीने संपूर्ण शिवर परिसराचे लक्ष वेधून घेतले. महापुरुषांच्या वेशभूषेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी या फेरीत सहभाग नोंदवून नागरिकांमध्ये राष्ट्रभक्तीचे स्फुरण चढवले.
समारंभाच्या सुरुवातीला संस्थेच्या उपाध्यक्षा आशाताई पिंजरकर यांच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजवंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव श्रीकांत पिंजरकर, सदस्य प्रशांत पिंजरकर, सदस्या शुभांगी पिंजरकर, प्रमिला माळोकार, मुख्याध्यापक नरेंद्र पाटोळे तसेच पालक प्रतिनिधी विकास रंगभाळे, रत्ना इंगोले, दिवाकर प्रधान, पवन कांबळे व विशाल राकेश यांची प्रमुख उपस्थिती होती. ध्वजवंदनानंतर विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या स्मृतींना अभिवादन करून प्रभावी मनोगते व्यक्त केली. यावेळी सादर करण्यात आलेली परेड, समूह नृत्य आणि देशभक्तीपर गीतांनी संपूर्ण परिसर मंत्रमुग्ध झाला होता. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन शिक्षिका प्रणाली हुंडीवाले यांनी केले, तर आभार अंकिता यमगवळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक निखिलेश ढोरे, विशाल इंगळे, तसेच शुभांगी घुगरे, अपेक्षा भोलवणकर, अश्विनी भोलवणकर, सरिता बढे, नीलिमा देशमुख, साक्षी उपासे, सोनिया विश्वकर्मा, श्रुती टापरे, काजल भागवत, माधुरी चंद्रे आणि सपना राऊत यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्याला माजी विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

❑ भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास हा हुतात्म्यांच्या बलिदानाची गाथा आहे. उद्याचा सक्षम नागरिक घडवण्यासाठी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, आपले अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. तरच त्यांच्या मनात देशाप्रती खरी आपुलकी निर्माण होईल.

**- श्रीकांत पिंजरकर**
संस्थेचे सचिव

❑ आपल्या मनोगतात पालकांच्या उपस्थितीवर भर दिला. ''हा कार्यक्रम आपल्या पाल्यांचा आणि आपला आहे, त्यामुळे पालकांनी शालेय उपक्रमांना आवर्जून उपस्थित राहून मुलांचा उत्साह वाढवावा, असे आवाहन पालक विकास रंगभाळे यांनी केले.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलडाणा, बुधवार, दि.२८ जानेवारी २०२६



## महत्त्वाचे

### जेसीआयच्या नवनिर्वाचित अध्यक्षांचा पदग्रहण सोहळा

**खामगाव :** जेसीआय खामगाव जय अंबेचे नवनिर्वाचित अध्यक्ष जेसी डॉ. आनंद राठी यांचा पदग्रहण सोहळा गुरुवार, २२ जानेवारी २०२६ रोजी शहरातील देवजी खिमजी मंगल कार्यालय येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून अकोला येथील स्त्रीरोगतज्ञ डॉ. कल्पना भागवत उपस्थित होत्याा. गेस्ट ऑफ ऑनर म्हणून जेसीआय झोन १३ चे अध्यक्ष जेसी सौरभ गट्टानी, तर प्रमुख वक्त्या म्हणून संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा व राष्ट्रीय समन्वयक महिला जेसी जेएफएम डॉ. शालिनी राजपूत उपस्थित होत्याा. झोन १३ चे उपाध्यक्ष जेसी साकेत गोयनका यांनी स्थापना अधिकारी म्हणून भूमिका बजावली. कार्यक्रमाची सुरुवात कुमारी प्रिशा राठी हिच्या गणेश वंदनेने व दीपप्रज्वलनाने झाली. मावळते अध्यक्ष एचजीएफ ॲड. दिनेश वाधवानी यांनी वार्षिक अहवाल सादर केला. त्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष जेसी डॉ. आनंद राठी यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात आली. सचिव जेसी मंगेश राऊत व कोषाध्यक्षा जेसी सुरभी गोयनका यांनीही पदभार स्वीकारला.

### दुचाकी लंपास

**खामगाव :** स्थानिक नांदुरा रोडवरील स्मार्ट बाजार समोरुन अज्ञात चोरट्याने दुचाकी लंपास केल्याची घटना २४ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास घडली. याबाबत अज्ञात चोरट्याविध्द खाम गाव शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे येथील शिवाजी वेस भागातील ऋषिकेश दिपक लकडे हा स्मार्ट बाजार येथे मजूर म्हणून असून त्याने आपली एमएच २८ ६८८३ क्रमांकाची दुचाकी स्मार्ट बाजार समोर उभी करुन ठेवली होती. ही दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली आहे. सदर दुचाकीला चाबी ऋषिकेश लकडे याने ठेवली होती. ही संधी साधून चोरट्याने दुचाकी लंपास केल्याचे ऋषिकेश लकडे याने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. खामगाव शहर पोलिसांनी करीत आहे. अज्ञात चोरट्याविरुध्द कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अधिक तपास खाम गाव शहर पोस्टेचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद शेळके

### गणेशपूर ग्रा.पं.तर्फे शिक्षकांचा सत्कार

**खामगाव :** ग्रामपंचायत गणेशपूर सरपंच प्रमिला ताई तेल्हारकर, ग्रामपंचायत सदस्य एजाज देशमूख, ग्रामसेवक चेके आणि इतर ग्रामपंचायत सदस्य यांच्या तर्फे उत्कृष्ट शिक्षक म्हणून जिल्हा परिषद हायस्कूल चें जेष्ठ शिक्षक भागवत उत्तमराव मोरे, श्रीमती सत्यशीला उमाकांत वाघमारे जिल्हा परिषद केंद्रीय मराठी प्राथमिक शाळा आणि शबीना अमीर हमजा पटेल जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा यांना प्रजासत्ताक दिना निमित गौरवान्वित करण्यात आले. त्याच बरोबर सेवानिवृत्त झालेले केंद्रप्रमुख गवारगुरू सर आणि अशोक मादणकर सर यांचा देखील ग्रामपंचायत तर्फे यथोचित सत्कार करण्यात आला, कार्यक्रमाचे बहारदार संचलन डॉ शिवाजीराव देशमूख यांनी केले.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १९५० - २०२५ |
| गहू | २२०० - २४०० |
| तुर | ५१०० - ७७०० |
| हरभरा | ३८०० - ५३०० |
| सोयाबीन | ४८०० - ६१५० |
| उडीद | ४००० - ६३५० |
| मुग | ५५०० - ५५०० |
| मका | १६०० - १६०० |

# खामगाव परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## एकाच रात्री वाडी, माक्ता-कोक्ता, पाहुरजिरा येथे सारवळी चोरी; बाप-लेक गंभीर जखमी, ८२ हजारांचा ऐवज लंपास

अजिंक्य भारत / प्रतिनिधी



**खामगाव दि.२७ :** खामगाव शहर व परिसरात चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एकाच रात्री वाडी, माक्ता-कोक्ता आणि पाहुरजिरा या भागात तब्बल आठ घरांना चोरट्यांनी लक्ष्य केले. वाडी येथील वृंदावन नगरात तर जबरी चोरी करताना चोरट्यांनी धारदार शस्त्राने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात बाप-लेक गंभीर जखमी झाले असून ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला आहे.

वाडी येथील वृंदावन नगरात राहणाऱ्या अंगणवाडी सेविका सौ. संतोष मनोज अग्रवाल (वय ४६) यांनी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत ही घटना उघडकीस आली आहे. फिर्यादीनुसार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी रात्री फिर्यादी कुटुंब हॉलच्या मागील खोलीत झोपलेले होते, तर त्यांची सासू हॉलमध्ये झोपली होती. २७ जानेवारीच्या मध्यरात्री सुमारे ३ ते ३.३० वाजताच्या सुमारास सासूच्या ओरडण्याचा आवाज आल्याने सर्वजण हॉलमध्ये धावले असता २० ते २५ वयोगटातील तीन अनोळखी चोरटे घरात आढळून आले. चोरट्यांना पाहताच आरडाओरड सुरू झाली. यावेळी फिर्यादीचे पती मनोज अग्रवाल यांनी चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता एका चोरट्याने टामी व धारदार शस्त्राने त्यांच्या हातावर वार केला. या हल्ल्यात ते जखमी झाले. त्यानंतर फिर्यादीचा मुलगा मयंक याने एका चोरट्यास पकडले असता दुसऱ्या चोरट्याने मयंक याच्यावर धारदार शस्त्राने वार करून त्याला गंभीर जखमी केले. चोरट्यांनी फिर्यादीच्या सासूच्या गळ्यातील सोन्याची पोथ हिसकावून घेतली तसेच कपाटातील ३० हजार रुपये रोख व सोन्या-चांदीचे दागिने, असा एकूण सुमारे ८२ हजार रुपयांचा ऐवज घेऊन पोबारा केला. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात तीन अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३०९ (६), ३३५ (४) व ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामकृष्ण पवार हे पोलिस कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. जखमी बाप-लेकावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता बसस्थानक परिसरातील कॅमेऱ्यात चार चोरटे कैद झाल्याचे आढळून आले. घटनेनंतर चोरटे बसस्थानक परिसरात शेकोटी करून बसले होते. पोलिसांना पाहताच त्यांनी तेथून पळ काढला. या वेळी एका चोरट्याने त्याच्याजवळील पिशवी तेथेच टाकून दिली. या पिशवीतून पोलिसांनी सोन्याची पोथ, टामी तसेच आरोपींच्या चपला जप्त केल्या आहेत.

**संशयित चोरटे सीसीटीव्हीत कैद; पोलिसांना पकडण्याचे आवाहन**

शहर व परिसरात सलग घडलेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाडी, माक्ता-कोक्ता व पाहुरजिरा भागात सक्रिय असलेले संशयित चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून त्यांचे फुटेज पोलिसांकडे उपलब्ध आहे. बसस्थानक परिसरातील कॅमेऱ्यात चार संशयित चोरटे दिसून आले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. सीसीटीव्हीत कैद झालेल्या संशयितांची ओळख पटल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन शहर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

चोरट्यांचा माग काढण्यासाठी श्वान पथक व ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. पोलिस तपासात असेही निष्पन्न झाले आहे की, वाडी येथील घटनेपूर्वी जलंब येथे चोरीचा प्रयत्न करण्यात आला होता, तसेच पाहुरजिरा येथून दुचाकी चोरी करण्यात आली आहे. वाडी परिसरातही दोन ठिकाणी चोरीचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. सलग झालेल्या चोरीच्या घटनांमुळे खामगाव व परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड दहशत पसरली असून, रात्रीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुढील तपास एपीआय विकास पाटील करीत असून पोलिस विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच सीसीटीव्हीत कैद झालेल्या चोरट्यांची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## एमआयएमच्यावतीने लोटांगण आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२७ :** नगरपरिषदच्या कार्यपद्धतीविरोधात एमआयएम पक्षाच्या वतीने नगर परिषद कार्यालयासमोर लोटांगण आंदोलन करण्यात आले. नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांनी आतापर्यंत देण्यात आलेल्या निवेदन, तक्रारी व स्मरणपत्रांवर कोणतीही कार्यवाही न केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. एमआयएमचे पदाधिकारी मोहम्मद आरिफ अब्दुल लतीफ पहलवान यांनी सांगितले की, नगर परिषदेला वेळोवेळी लेखी निवेदने सादर करण्यात आली.

मात्र प्रशासनाने जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष केले. दि.१९ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आलेल्या लोटांगण आंदोलनावरही नगर परिषदेकडून कोणतेही उत्तर अथवा पत्र देण्यात आलेले नाही. यापूर्वी झालेली धरणे आंदोलने, ढोल-ताशा आंदोलन तसेच बेशरम झाड आंदोलन यांचीही प्रशासनाने दखल घेतलेली नाही, असे त्यांनी नमूद केले. यावेळी रस्ते, नाल्या, स्वच्छता, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत नागरी सुविधांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला. नगर परिषदेकडून केवळ टेंडर प्रक्रिया व आर्थिक व्यवहारांवर लक्ष केंद्रित केले जात असून, जनतेच्या दैनंदिन समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. मुख्याधिकारी डॉ. शेळके यांची सर्वांगीण चौकशी तसेच त्यांच्या राहत्या घराचीही चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले.

## शेगाव येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.२७ :** दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी संत गजानन महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगाव येथे प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात व राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे कार्यकारी प्राचार्य धोत्रे यांच्या शुभहस्ते ध्वजावंदन करण्यात आले.

यावेळी राष्ट्रगीतापूर्वी भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करून उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी संविधान शपथ घेतली. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने संतनगरी शेगाव परिसरात वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 'गो ग्रीन फाऊंडेशन' या संस्थेचा औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे सन्मान करण्यात आला. संस्थेचे कार्यकारी प्राचार्य धोत्रे यांच्या हस्ते गो ग्रीन फाऊंडेशनला सन्मानपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला.गो ग्रीन फाऊंडेशन यांच्या सहकार्याने संस्थेच्या परिसरात ५०० च्या जवळपास देशी वृक्षांची लागवड करून 'रोटरी वन' तयार करण्यात आले असून या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी संस्थेला मोलाचे सहकार्य करण्यात आले आहे. या पर्यावरणपूरक कार्यामुळे संस्थेचा परिसर अधिक सुंदर व हरित झाला असल्याने त्यांचा सन्मान करण्यात आला. या प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी गटनिर्देशक आदरणीय बोदडे सर, सर्व निर्देशक वृंद, कार्यालयीन कर्मचारी तसेच प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिनी विद्यार्थिनींचा सहभाग



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२७ :** उपसंचालक सामाजिक वनीकरण विभाग व श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने पोलीस परेड मैदानावर चित्ररथाचे सादरीकरण करण्यात आले. झाडे लावावी, वृक्षतोड थांबवावी व पर्यावरण रक्षण करावे असे संदेश या चित्ररथाच्या रॅलीतून देण्यात आले. बुलढाणा जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, स्थानिक आमदार व विविध अधिकारी व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने समारंभाला उपस्थित होते. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संजीवनी शेळके यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय हरित सेनेचे प्रमुख शिक्षक राजेंद्र शिरसाट, मिलिंद मोरे, शिवनारायण गवई सहभागी झाले. सामाजिक वनीकरणाचे विभागीय वन अधिकारी विपुल राठोड, सहाय्यक वनसंरक्षक पूजा पानसरे, वन क्षेत्रपाल पी आर तोंडी लायता, वनपाल ए.ए.गीते, वनरक्षक लक्ष्मी जाधव व अश्विनी तेलंगे यांच्या प्रयतामुळे पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा चित्ररथ प्रभावी ठरला.

## देशाची सुरक्षा गरिबांच्या पोरांच्या खांद्यावर- निवृत्ती महाराज

**लोणार दि.२७ :** श्री संत सद्गुरू शंकर बाबा यांच्या जन्म उत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या भव्य कीर्तन सोहळ्यात प्रसिद्ध समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी आपल्या खास शैलीत समाजव्यवस्थेवर भाष्य केले. या कीर्तनात त्यांनी शेतकरी, सैन्य दल आणि कौटुंबिक संस्कारांवर प्रकाश टाकला.

देशाचे रक्षण आणि धर्म टिकवण्याचे काम श्रीमंतांपेक्षा गरिबांनीच अधिक केले आहे, असे महाराज म्हणाले. त्यांनी नमूद केले की, सीमेवर लढणारा जवान हा बहुतांश वेळा कष्टकरी शेतकऱ्याचा मुलगा असतो. आमदारांची किंवा मोठ्या अधिकाऱ्यांची मुले मिलिट्रीत जाण्यापेक्षा सामान्य शेतकऱ्याची मुलेच देशाचे रक्षण करताना दिसतात, असे त्यांनी परखडपणे मांडले. गावातील अखंड हरिनाम सप्ताहाचे महत्व सांगताना त्यांनी नमूद केले की, ३६ वर्षांची सप्ताहाची परंपरा असणे हे भाग्याचे लक्षण आहे. सप्ताहातील जेवण हे केवळ अन्न नसून तो प्रसाद असतो, त्यामुळे प्रत्येकाने तो आवर्जून घ्यावा, असा सल्ला त्यांनी दिला. श्रीमंतांच्या तुलनेत शेतकऱ्यांच्या घरातील आदरातिथ्य कसे श्रेष्ठ असते, याचे त्यांनी विनोदी पण वास्तववादी वर्णन केले. पुढे बोलताना त्यांनी तरुणांना आणि पालकांना आवाहन केले, कीर्तनाच्या उत्तरार्धात महाराजांनी तरुण मुलींना आपल्या वडिलांच्या कष्टाची आणि इज्जतीची जाणीव ठेवण्याचे आवाहन केले. वडिलांचा शर्ट फाटका असला तरी त्याांना समाजात ताठ मानेने जगता येईल असे वागा,'' असा मोलाचा सल्ला त्यांनी उपस्थित तरुणाईला दिला. या कीर्तन सोहळ्याला ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. इंदुरीकर महाराजांच्या विनोदी कोट्यांनी आणि मार्मिक उदाहरणांनी श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. तसेच शेवटी आयोजकांनी सांगितले जास्तीत जास्त भाविकांनी २८ जानेवारी रोज बुधवारला श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे सांगितले .

## चार लाख तीस हजार विद्यार्थ्यांनी घेतला देशभक्तीपर कवायतीत सहभाग

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२७ :** राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या निर्देशानुसार महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये आज देशभक्तीपर गीतांच्या तालावर सामूहिक कवायतीचे आयोजन करण्यात आलेले होते. या उपक्रमास बुलढाणा जिल्ह्यात प्रचंड प्रतिसाद मिळाला असून जिल्ह्यातील चार लाख तीस हजार ७०४ विद्यार्थ्यांनी सामुदायिक कवायतीत सहभाग नोंदवला यासोबत १७०१३ शिक्षकांनी शाळा शाळांमधून या कवायतीचे दिमाखदार आयोजन केले.

जिल्ह्याचे मुख्य शासकीय कवायत संचलन बुलढाणा पोलीस कवायत मैदानावर प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी सकाळी साडेनऊ वाजता आयोजित करण्यात आले होते. या संचालनात बुलढाणा शहरातील सात शाळांमधील २००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अत्यंत शिस्तीत आणि दिमाखदार सोहळा बुलढाणा शहरवासीयांनी अनुभवला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माननीय जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण पार पडले. त्यानंतर सामुदायिक कवायत घेण्यात आली या प्रसंगी आमदार मान.संजय गायकवाड, शहराच्या नगराध्यक्ष मान.पूजाताई गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, म.पोलीस अधीक्षक निलेश तांबे, सर्व उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख, बुलढाणा शहरातील सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी प्राथमिक माध्यमिक व योजना कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. बुलढाणा पंचायत समितीचे शिक्षण विभागाचे सर्वाधिकारी कर्मचारी यांच्या अथक परिश्रमातून हा कार्यक्रम अतिशय चांगल्या रीतीने संपन्न झाला.

**उपक्रम** डॉ.शिवानंद भानुसे यांचा नवा आदर्श

## रुढी परंपरेला फाटा देत रक्षाविसर्जनासह वृक्षारोपण

अंजिक्य भारत / प्रतिनिधी



**देऊळगाव दि.२७ :** बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा तालुक्यात विझोरा येथील माजी सरपंच नारायणराव सखाराम भानुसे यांच्या पती व सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, व्याख्याते डॉ.शिवानंद नारायणराव भानुसे यांच्या मातोश्री चंद्रलेखा भानुसे यांचे १७ जानेवारी २०२६ रोजी ६९ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी अत्यंत साध्या पद्धतीने जिजाऊ वंदना सादर करून केला. त्यानंतर पाचव्या दिवशी रक्षाविसर्जनासह सर्व विधी पूर्ण करून, विविध झाडांचे रोपण, गोडजेवण करून,पाचव्या दिवशीच सर्व विधी संपन्न केले. रूढी परंपरेला व अंधश्रद्धेला, फाटा देत डॉ.शिवानंद भानुसे कुटुंबियांनी नवा आदर्श घालून दिला आहे. कारण जुन्या परंपरेप्रमाणे १३, १४ दिवस सर्व भाऊबंद, सगेसोयरे अडकून पडत होते. अनेक ठिकाणी लग्न व इतर कार्य सर्व खर्च करून स्थगित करावे लागत होते. अनेक जण महत्वाची कामे बाजूला ठेवून थांबत होते. त्यामुळे अनेक जण अडचणीत येत होते. हे योग्य नव्हते. त्यामुळे पाचव्या दिवशीच हे केलं पाहिजे. असे विचार मराठा सेवा संघाचे पुरोगामी विचार ज्यांनी अंगीकारले असे सुप्रसिद्ध साहित्यिक, समीक्षक, व्याख्याते डॉ.शिवानंद भानुसे यांनी सर्वांसमोर मांडले. आणि त्यांचे वडील नारायणराव भानुसे, विवाहित बहिणी शिवगंगा सुभाष म्हस्के, शिवकन्या दिनेश पडघान, सुशीला अशोक नरवाडे, काका भगवान भानुसे, काकू सुनिता भानुसे आणि कुटुंबीयांनी दुजोरा दिला. त्यामुळे अशा प्रकारचा सर्वांना सोयीचा अत्याधुनिक असा निर्णय या ठिकाणी घेण्यात आला. यावेळी मराठा सेवा संघाचे संस्थापक ॲड.पुरुषोत्तम खेडेकर यांच्यासह आजी-माजी मंत्री, आजी-माजी आमदार, आजी-माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, त्याचप्रमाणे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, साहित्यिक, अशा विविध क्षेत्रतील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.

डॉ.शिवानंद भानुसे याप्रसंगी म्हणाले की जोपर्यंत व्यक्ती जिवंत आहे. तोपर्यंत त्यांची पुरेपूर काळजी घेतली पाहिजे. त्यांना प्रेम दिले पाहिजे. त्यांना जपले पाहिजे. तेच महत्वाचे आहे. व्यक्ती गेल्यानंतर फार काही महत्वाचं नसतं. त्यामुळे जिवंतपणीच काळजी घेतली पाहिजे. आणि गेल्यानंतर लोकांना अडचणीत आणण्यापेक्षा चौथ्या किंवा पाचव्या दिवशीच हे सर्व विधी आपण पूर्ण करून त्यांची आठवण म्हणून वृक्षारोपण केले पाहिजे. असे डॉ.शिवानंद भानुसे यांनी सांगितले.

## छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्याची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**जानेफळ दि.२७ :** खामगाव-शेगांव या महामार्गावर मोठ्या लोकवस्तीचे गाव आहे अनेक इंग्रज कालीन वास्तू या ठिकाणी अजूनही स्थित आहेत छत्रपती शिवरायांना मानणारा मोठा वर्ग या गावांमध्ये असून येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यासाठी जानेफळ येथे शिवसैनिक आणि शिवप्रेमी यांनी गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्न केला होता. परंतु पोलीस प्रशासनाने पुतळा अवैध्य ठरवून गुन्हे दाखल करत सर्वांची तुरुंगात रवांनगी केली होती त्यामुळे सातत्याने या चौकात शिवरायांचा पुतळा उभारण्यासाठी प्रयत्न होत असताना कायदेशीरपणे हा पुतळा उभारून छत्रपती शिवरायांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी स्थानिक शिवसेनेने कंबर कसली असून माननीय खासदार तथा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव माजी आमदार डॉ. संजय रायमुलकर यांनी सहकार्य करत त्यांच्या मार्ग दर्शनात कायदेशीरपणे छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. हा पुतळा उभारण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायतीने सुद्धा पुढाकार घेतला असून माजी आमदार संजय रायमुरकर यांनी निधी मंजूर केल्याची माहिती मिळाली आहे. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या जानेफळ गावात छत्रपती शिवरायांचा पुतळा उभारण्यात युवकांना स्वाभिमानाने धडे आपोआप मिळतील जानेफळ शिवसेनेचे शहर प्रमुख ग्रामपंचायत सदस्य सचिन राजूरकर, विशाल फितवे, विजय काळे ,आकाश सवडकर यांनी निवेदन जिल्हाधिकारी महोदया यांच्याकडे शासकीय सर्व अटी व शर्ती यांची पूर्तता करून अधिकृत अश्वारूढ पुतळा उभारण्याची परवानगी देण्यात मागणी केली आहे. या निवेदनावर सचिन राजूरकर ज्ञानेश्वर लिंबेकर, सतीश केदारे, बाळू अग्रोया, सागर मोरे यांचे मेहकर तालुक्यातील जानेफळ येथे जानेफळ हे गाव मेहकर, खामगाव, शेहगाव या महामार्गावर मोठ्या लोकवस्तीचे गाव आहे अनेक इंग्रज कालीन वास्तू या ठिकाणी अजूनही स्थित आहेत. छत्रपती शिवरायांना मानणारा मोठा वर्ग या गावांमध्ये असून येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्यासाठी जानेफळ येथे जानेफळ शिवसैनिक आणि शिवप्रेमी यांनी गेल्या अनेक वर्षापासून प्रयत्न केला होता.

अजिंक्य भारत

# आपलं खामगांव

खामगाव, बुधवार, दि.२८ जानेवारी २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### पिंपळगाव काळे येथे घरफोडी

**जळगाव जामोद :** तालुक्यातील पिंपळगाव काळे येथे घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी रोख रक्कम तसेच सोन्याचे दागीने असा ७४ हजार रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना २६ जानेवारीच्या रात्री घडली. बंडू भगवान पाटील (४९) रा. पिंपळगाव काळे यांच्या बंद घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन घरातील कपाट उघडून त्यामधून सोन्याचे पोथ, सोन्याचे कारले मनी पोथ, कानातले बेलवजन व नगदी ४ हजार असा एकूण ७४ हजाराचा मुद्देमाल लंपास केला. बंडू पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरुन जळगाव जामोद पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३०५ (अ), ३३१ (४) बीएनएस नुसार गुन्हा दाखल केला आहे. तपास जळगाव जामोद पोस्टेचे पीएसआय अमोल पंडीत करीत आहे.

### जागतिक सूर्य नमस्कार दिन साजरा

**खामगाव :** स्थानिक श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालयात खेळ व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने, भारतीय तिथी माग महिन्यातील रथसप्तमी शुक्ल सप्तमी या दिवशी जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा केला गेला. अंकशास्त्र व ज्योतिष शास्त्रानुसार २०२६ हे सूर्याचे वर्ष बांधले जाते. सूर्यनमस्कार हे प्रभावी व्यायाम प्रकार आहे. तेवढे जास्त सूर्यनमस्कार घालता येतील तेवढे चांगले. सूर्यनमस्कार हा बहुआयामी व्यायाम प्रकार संपूर्ण शरीराला यामुळे व्यायाम होतो. खेळ व शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. डॉ. सौ.सीमा देशमुख यांनी सूर्यनमस्काराची महती विद्यार्थिनी समोर कथन करून बारा आवर्तनात विद्यार्थिनींकडून सूर्यदेवतेचे वेगवेगळे नाव घेऊन सूर्यनमस्कार काढून जागतिक सूर्यनमस्कार दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्राचार्य प्रा. हेमा जंवजाळ सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वृंद बहुसंख्येने या कार्यक्रमास हजर होते.

### मलकापूर येथे गळफास घेवून आत्महत्या

**मलकापूर :** तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथे व अजय संजय इंगळे यांनी वडोदा पान्हेरा येथील संजय प्रल्हाद पवार वय ५० यांनी गळफास घेतल्याची घटना काल सायंकाळी ७.३० वाजता दरम्यान प्रजासत्ताक दिनी घडली. संजय पवार यास त्यांचे नातेवाईक उमेश गणेश पवार आणले. यावेळी डॉक्टरांनी तपासणी करुन संजय पवार यांना मृत घोषीत केले. याप्रकरणी पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास एएसआय उल्हास मुके हे करीत आहेत.

### जर्मन युनिव्हर्सिटी प्रतिनिधी मंडळाची भेट

**खामगाव:** स्थानिक हर्ष इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग येथे उद्या २८ जानेवारी २६ रोजी जर्मन युनिव्हर्सिटी प्रतिनिधी मंडळ भेट देणार आहे. या भेटीमुळे नर्सिंग शिक्षण प्रशिक्षण व संशोधन तसेच विद्यार्थी व प्राध्यापक आदान प्रदानाच्या संधींना चालना मिळणार आहे. तसेच शैक्षणिक सहकार्य, सामंजस्य करार, इंटर्नशिप व आंतरराष्ट्रीय स्तरावरील करीअर संधी बाबत चर्चा होणार आहे. ही भेट संस्थेच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी एक महत्वपुर्ण पाऊल ठरणार आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष जनार्दन हेड पाटील यांनी दिली.

### श्री अग्रवाल युवक मंडळातर्फे प्रजासत्ताक दिन साजरा

**खामगाव:** श्री अग्रवाल युवक मंडळ, खामगाव यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी श्री अग्रसेन भवन, खामगाव येथे भारतमातेच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली. त्यानंतर श्री अग्रसेन भवन परिसरात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रगीत गायन करून देशभक्तीची भावना व्यक्त केली. यानंतर श्री अग्रसेन चौक येथे विशेष उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. खामगाव शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना चॉकलेटचे वाटप करून त्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला. लहान मुलांच्या मनोरंजनासाठी डीजेच्या माध्यमातून देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

## विकसित भारतासाठी आत्मनिर्भर बुलडाण्याचा संकल्प करुया : जिल्हाधिकारी

अजिंक्य भारत / प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२७:** विकसित भारत २०४७ च्या विकासगाथेत बुलढाणा जिल्ह्याचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले जावे आणि प्रशासन, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी 'आत्मनिर्भर बुलडाणा' घडवण्यासाठी एकजुटीने काम करण्याचा संकल्प करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी आज केले.

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त पोलीस कवायत मैदानात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, विभाग प्रमुख, स्वातंत्र सेनानी, वीरमाता, वीरपत्नी, ज्येष्ठ नागरिक, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी पालक, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील पुढे म्हणाले की, भारत हा परिवर्तन, प्रगती आणि आत्मविश्वासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. आज प्रत्योक भारतीयाने 'विकसित भारतचा संकल्प करण्याचा क्षण आहे. आज भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश तर आहेच, पण त्याचबरोबर जगातील प्रमुख अर्थव्यवस्थेपैकी एक राष्ट्र बनला आहे. हे यश कोट्यवधी भारतीयांच्या प्रामाणिक श्रमांचे फळ आहे. महाराष्ट्र हे देशाच्या विकासाचे ग्रोथ इंजिन मानले जाते आणि या विकासयात्रेत बुलढाणा जिल्हाही आत्मविश्वासाने पुढे जात आहे. शेती, उद्योग, शिक्षण, सहकार, डिजिटल सेवा, महिला सक्षमीकरण आणि युवक विकास या सर्व क्षेत्रांत जिल्हा उल्लेखनीय प्रगती करीत असल्याचे ते म्हणाले. पारंपरिक शेतीसोबत फळबाग लागवड काळाची गरज जिल्हाधिकारी डॉ. पाटील पुढे म्हणाले, यावर्षी जिल्ह्यात खरीप हंगामात ७ लाख २९ हजार हेक्टर व रब्बी हंगामात ३ लाख ७९ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. खरीप हंगामात विविध पिकांचे उल्लेखनीय उत्पादन झाले असून रब्बीमध्ये हरभरा, गहू व मक्याची मोठ्या प्रमाणात लागवड झाली आहे. पारंपरिक शेतीसोबत फळबाग लागवड काळाची गरज आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजना व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत २२ हजार हेक्टरवर फळबाग लागवड झाली असून चालू वर्षी आणखी अडीच हजार हेक्टरवर लागवड करण्यात आली आहे.

## रस्त्यासाठी टोकाचे आंदोलन; मोताळ्यात उद्धव सेनेच्या नेत्यांचा आत्मदहनाचा प्रयत्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मोताळा दि.२७ :** तालुक्यातील शेलापूरसांगद शेतरस्त्याचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असताना प्रशासनाकडून होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ प्रजासत्ताक दिनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख सुनील घाटे व गणेश घाटे यांनी तहसील कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न करून टोकाचे आंदोलन केले.

रस्त्याच्या मागणीसाठी लोकशाही मार्गाने वारंवार निवेदने देऊनही प्रशासनाने दखल घेतली नसल्याने आंदोलनकर्त्यांनी अंगावर पेट्रोल ओतून तीव्र आंदोलन छेडले. या प्रकारामुळे तहसील कार्यालयात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच उपस्थित कर्मचारी व पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रशासनाकडून तत्काळ उपाययोजना करण्यात आल्या. दरम्यान, रस्त्याच्या प्रश्नावरून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून लोकप्रतिनिधी व प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळेच टोकाचे पाऊल उचलावे लागल्याचा आरोप उद्धव सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.



**तहसीलदारांवर गंभीर आरोप; पुढील आंदोलन महसूल मंत्र्यांच्या बंगल्यासमोर**

आंदोलनानंतर उपजिल्हाप्रमुख सुनील घाटे यांनी सांगितले की, शेलापूरसांगद शेतरस्ता खुला करण्याबाबत त्यांनी वेळोवेळी मोताळा तहसीलदारांकडे निवेदने सादर केली. तसेच महसूल विभागाने शेतरस्ते खुले करण्यासाठी राबविलेल्या विशेष पंधरवड्यातही या रस्त्याचा प्रश्न मांडण्यात आला होता. मात्र तहसीलदारांनी या गंभीर प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला. ''२५ डिसेंबर २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात एक महिन्यात रस्त्याचे काम न झाल्यास २६ जानेवारी रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. तरीही प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळेच आम्हाला आत्मदहनाचा प्रयत्न करावा लागला. पोलिसांनी ताब्यात घेतल्याने तो पूर्ण होऊ शकला नाही,'' असे घाटे यांनी स्पष्ट केले. रस्त्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यात न आल्यास आता थेट महसूल मंत्र्यांच्या बंगल्यासमोर आत्मदहन करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

## स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या राष्ट्रीय खेळाडूंचा गौरव



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मलकापूर दि.२७ :** प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात स्कूल ऑफ स्कॉलर्स, मलकापूर शाळेच्या राष्ट्रीय खेळाडू कु. लावण्या ज्ञानेश्वर बडगुजर व कु.आरोही देविदास दरेगावे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सत्कार मलकापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चैनसुख संचेती, उपविभागीय दंडाधिकारी(एस.डी.एम.) शिंदे तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करून शाळा व तालुक्याचे नाव उज्वल केल्याबद्दल दोन्ही खेळाडूंचे यावेळी कौर्तक करण्यात आले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर,शाळेचे संचालक ॲड.अमरकुमार संचेती, मुख्याध्यापिका डॉ. सुदीप्ता सरकार, शिक्षकवृंद,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किड्स किंगडम इंग्लिश स्कूलमध्ये विविध कार्यक्रम उत्साहात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२७:** स्थानिक किड्स किंग्डम इंग्लिश स्कूल, घाटपुरी नाका येथे शनिवार, २४ जानेवारी २०२६ रोजी कला आणि विज्ञान प्रदर्शनीसह प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे शानदार आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला पालकांचा व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मान्यवरांची उपस्थिती आणि उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कांचनताई भारसाकळे होत्याा. प्रमुख पाहुणे म्हणून महिला आर्थिक विकास महामंडळ शेगाव च्या व्यवस्थापिका योगिता पाटील, वैष्णवी इकडे व शाळेच्या माजी शिक्षिका सौ. रुपाली वाघ उपस्थित होत्या. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मीनाक्षी भारसाकळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व फीत कापून कार्यक्रमाचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. प्रश्नमंजुषा स्पर्धेचा निकाल कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अतिशय चुरशीने सहभाग नोंदवला. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे राहिला:प्रथम क्रमांक: लोटस ग्रुप द्वितीय क्रमांक: चंपा ग्रुप तृतीय क्रमांक: लिली ग्रुप कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. मीनाक्षी भारसाकळे यांनी केले.




## पिंपरी गवळी येथे प्रजासत्ताक दिन साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२७:** दि.२६ जानेवारी प्रजासत्ताक दीन साजरा करण्यात आला यावेळी शाळेच्या अध्यक्षा सौ राजकुमार तेजेंद्रसिंह चौहान यांनी ध्वजारोहण केले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्ती वरील गाणे सादर केले .तसेच मुलानी देशावरील घोष व शायरी सादर केलेलीयांमध्ये केजी १ध्रुवास चव्हाण, अनुश्री चव्हाण,केजी २ श्रीनय मारके, अभिश्री डोंगरे, वर्ग १ ली मयूर कोरडे,राशी टिकार,वीर इंगळे इत्यादी मुलानी म्हटले.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी मुलांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्या दिल्या. यावेळी कार्यक्रमाला शाळेच्या उपमुख्याध्यापिका सबा अंजुम, सौ. प्रिया अवथळे, सौ. दिपाली बोराडे, प्रगती मोरखडे, अश्विनी तायडे, विक्रमसिंह ठाकूर लक्ष्मीनारायण कॉलेज ऑफ फार्मसीचे कर्मचारी शिवप्रसाद चौहान, मॉडेल स्कूलचे प्राचार्य सुदाम जाधव, विद्यार्थ्यांचे पालक व शाळेच्या सेविका सौ.नंदा हिवराळे, सौ मनिषा बोदडे, सौ.वर्षा वाघमारे इत्यादी उपस्थित होते.



## गो. से. महाविद्यालयात ३० जानेवारी रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**खामगाव दि. २७ :** विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारा संचालित गो. से. महाविद्यालय खामगाव येथे भव्य राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य सेनानी, स्वर्गीय सुखलालजी पिरामलजी झुनझुनवाला यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दिनांक ३० जानेवारी सकाळी १०.३० सकाळी वाजता ही स्पर्धा महाविद्यालयात घेण्यात येईल.

स्वर्गीय सुखलालजी झुनझुनवाला हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील निर्भय स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांच्या कार्याची आठवण म्हणून दरवर्षी स्पर्धा घेण्यात येते. या स्पर्धेसाठी ''आर्टिफिशियल इंटेलिजन्सची उच्च शिक्षणात भूमिका'' हा विषय ठेवण्यात आला आहे. आज संपूर्ण जगात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर होतो आहे. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. या क्षेत्रात विद्यार्थ्यांना कोणत्या संधी उपलब्ध होत आहेत आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून त्या कशा फायद्याच्या ठरतील या अनुषंगाने चर्चा व्हावी. असे अद्ययावत विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थी कसे विचार करतात हे जाणून घेण्याच्या हेतूने महाविद्यालयांने ही स्पर्धा भरवण्याचे ठरविले आहे. विद्यार्थ्यांना या तंत्रज्ञानाचा कसा फायदा होऊ शकतो. यावर विचारमंथन करण्यासाठी वक्तृत्व स्पर्धेचे व्यासपीठ विद्यार्थ्यांना खुले करण्यात आले आहे. ही स्पर्धा राज्यभरातील महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठीच ठेवण्यात आलेली आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रतची काय भूमिका असू शकते या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे विचार जाणून घेण्याच्या उद्देशाने ही स्पर्धे होत आहे. या राज्यस्तरीय स्पर्धेचे हे दहावे वर्ष आहे. याआधी महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थ्यांनी ही स्पर्धा जिंकून आपला सन्मान वाढविला आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात.

## जि.प.शाळा मंगरूळ नवघरेची लोक सहभागातून उत्तुंग भरारी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मंगरूळ नवघरे दि.२७ :** जि. प. कें.म. प्रा. शाळा मंगरूळ नवघरे ता. चिखली ही शाळा मा. आमदार सौ. श्वेताताई महाले पाटील माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबरावजी खरात साहेब यांच्या मार्गदर्शनाने पटसंख्या ही २०२५- २६ साठीअवघी ६३ वर आली असता ती पटसंख्या १७३ पर्यंत वाढली.बंद पडलेल्या अवस्थेत असलेली शाळा ही आता उंचीवर लोकप्रतिनिधी व अधिकारी यांच्या मदतीने गेली आहे.

गाव करी ते राव ना करी, या उक्तीप्रमाणे जि. प. कें.म. प्रा. शाळा मंगरूळ नवघरे शाळेसाठी गावकरी यांनी पुढाकार घेऊन सहा लक्ष रुपये वर्गणी शाळेसाठी दिली त्यामधून शाळेला नवीन रूप प्राप्त झाले. शाळेमध्ये त्या वर्गणीतून सर्व सुविधा वाचनालय खेळ सुविधा इंटरॅक्टिव्ह पॅनल, आरो फिल्टर, पीव्हीसी रूम, रंगरंगोटी कम्प्युटर, बचत बँक, इंटरॅक्टिव्ह बोर्ड, माइक, आणि सर्वच सुविधा शाळेत उपलब्ध झाल्या आहेत. तसेच विशेष बाब म्हणजे शाळेला नुकताच दर्जा प्राप्त झाला आहे.शाळेमध्ये त्यामुळे भेट देणाऱ्याची संख्या वाढली आहे. ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने पेव्हर ब्लॉक, साऊंड सिस्टम, कम्प्युटर व इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मुलांची गुणवत्ता मुलाची गुणवत्ता चांगली सुधारली असून, स्कॉलरशिप, मंथन स्पर्धा परीक्षांचे क्लास होतात.वर्ग एक ते चार च्या मुलांना वर्ग, घन, पाढे, राज्य राजधानी, इंग्रजी मराठी वाचन, सुंदर हस्ताक्षर, भाषण कला, नृत्य कला आणि चित्रकला हे सर्व मुलांना चांगल्या प्रकारे येतं.शाळेमध्ये यावर्षी प्रवेशोत्सव साठी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबरावजी खरात उपस्थित होते.



**दखल** वरवट बकाल शहराचा मुख्य रस्ता अंधारमय

## लाखो रुपये खर्च करून लावण्यात आलेले पथदिवे बंद

**संग्रामपूर दि. २७:** तालुक्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या व तालुक्याची मुख्य बाजारपेठ असलेल्या वरवट बकाल शहरात एक ते दीड वर्षा आधी लाखो रुपये खर्च करून सौंदर्यीकरणाच्या नावावर शहरातील मुख्य रस्त्यावर पथदिवे लावण्यात आले होते मात्र पथदिवे लावण्याला काही महिने होतात न होतात अशातच हे पथ दिवे सद्यस्थितीत बंद पडलेले आहेत त्यामुळे वरवट बकाल शहराचा मुख्य रस्ता हा रात्रीच्या वेळी संपूर्णपणे अंधारमय झालेला आहे.

संग्रामपूर तालुक्याची मुख्य बाजारपेठ म्हणून वरवट बकाल शहराची ओळख आहे. या ठिकाणी दीड ते दोन वर्षांपूर्वी सौंदर्यीकरणाच्या नावावर लाखो रुपये खर्च करून वरवट बकाल ते सोनाळा रस्त्यावर रस्त्याचे सौंदर्यीकरण करण्यात आले. तसेच शहराचा मुख्य रस्ता सिमेंट काँक्रीट मध्ये बांधण्यात आला. तसेच रस्त्याच्या मध्ये डिव्हायडर टाकून मध्यभागी झाडे सुद्धा लावण्यात आली तसेच लाखो रुपये खर्च करून पथदिवे सुद्धा लावण्यात आले. काही महिने हे पथदिवे सुरू असल्यामुळे शहराच्या सौंदर्यात वाढ झाली होती. मात्र काही महिने होतात ना होतात शहराच्या मुख्य रस्त्यावरील पथदिवे हे बंद पडल्यामुळे शहरातील मुख्य रस्त्यावरील पथदिव्यांचा झगमगाट बंद पडल्यामुळे पुन्हा आता वरवट बकाल शहरातील मुख्य रस्ते हे आता पुन्हा अंधारमय झाले आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी रस्त्यावर चालणाऱ्या नागरिकांना रात्रीच्या वेळी अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. तसेच याच मुख्य रस्त्याला लागून ग्रामीण रुग्णालय असल्यामुळे या ठिकाणी सातपुडा परिसरातून तसेच तालुक्यातील गावांमधून असंख्य गोरगरीब रुग्ण उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात येत असतात तसेच त्यांना याच रस्त्यावरून ग्रामीण रुग्णालयात जाण्यासाठी जावे लागते. त्यामुळे रुग्णांना सुद्धा याच अंधारमय रस्त्यावरून जावे लागते. त्यामुळे रुग्णांना सुद्धा आपली वाट या अंधारमय रस्त्यातूनच काढावी लागते. तसेच येथे दर शनिवारला गुरांचा मोठा बाजार असतो त्यामुळे या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात रात्रीच्या वेळी वर्दळ असते त्यामुळे बाहेरगावावरून येणाऱ्या शेतकऱ्यांना सुद्धा या गोष्टीचा त्रास सहन करावा लागत आहे. वरवट बकालच्या बस स्टॉप वरूनच याचमुख्य रस्त्यावरून शेगाव, अकोला, अकोट, एसटी बसेसची तसेच मोठमोठ्या वाहनांची वर्दळ या रस्त्यावरून रात्रीच्या वेळी असते . त्यामुळे अंधारात जर एखादा चालणारा पादचारी नागरिक न दिसल्यामुळे एखादा मोठा अपघात सुद्धा होऊ शकतो. त्यामुळे तात्काळ संबंधित विभागाने शहरातील मुख्य रस्त्यावर बसवलेले पथदिवे हे तात्काळ सुरू करावे अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.



## संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याच्या निषेधार्थ शेगावात एकदिवसीय धरणे आंदोलन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**शेगाव दि. २७:** नाशिक येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शासकीय कार्यक्रमात ग्राम विकास मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण संपन्न झाले. या कार्यक्रमादरम्यान मंत्री महाजन यांनी आपल्या भाषणात विविध महामानवांचा उल्लेख केला, मात्र भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जाणीवपूर्वक टाळल्याने समाजातील विविध संघटनांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

या कृतीतून मंत्री गिरीश महाजन यांची संविधानविरोधी व मनुवादी विचारधारा उघड झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. ज्या संविधानाला साक्ष मानून मंत्री महाजन यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली, त्याच संविधानाच्या निर्मात्याचा अवमान करणे हे लोकशाही मूल्यांना धरून नसल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. या घटनेच्या निषेधार्थ शेगाव तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. मंत्री गिरीश महाजन यांच्यावर ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करावा, त्यांना तत्काळ मंत्रिपदावरून पायउतार करावे तसेच त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनाच्या माध्यमातून भारताचे राष्ट्रपती, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व मुख्यमंत्री यांना तहसीलदारांमार्फत निवेदन पाठविण्यात आले.

सदर आंदोलन भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, वंचित बहुजन आघाडी शहर व तालुका, वंचित बहुजन युवा आघाडी, वंचित बहुजन महिला आघाडी तसेच सम्यक विद्यार्थी आंदोलन शेगाव शहर व तालुका यांच्या वतीने करण्यात आले. आंदोलन शांततेच्या मार्गाने पार पडले.



## महत्त्वाचे

### शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी चर्चासत्र

**जालना :** जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आर्थिक सुबत्ता येण्यासोबतच राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेती व शेतीपूरक व्यवसायातून क्रीयाशील होऊन प्रगती करणे गरजेचे असल्याचे मत विविध तज्ज्ञांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी आयोजित चर्चासत्रातून व्यक्त केले. कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथे दि. २४ जानेवारी २०२६ रोजी शेतकरी उत्पादक कंपनीच्या संचालकांसाठी आणि सभासदांसाठी एक दिवसीय शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी कृषी अधिकारी उद्योग व्यवसाय या विषयावर चर्चासत्र आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमास प्रमुखअतिथी म्हणून नाबार्डचे प्रमुख तेजल क्षीरसागर, अध्यक्ष म्हणून कृषी विज्ञान केंद्र खरपुडीचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. एस व्ही सोनूने तसेच कृषी अभियंता पंडित वासरे, गृहविज्ञान प्रमुख डॉ. संगीता कराळे आणि मृद शास्त्रज्ञ राहुल चौधरी आणि कार्यक्रमाचे आयोजक अन्नतंत्र विभागाचे प्रमुख प्रा.शशिकांत पाटील हे उपस्थित होते. नाबार्डच्या सहकाऱ्याने शेतकरी उत्पादक कंपन्यांनी विविध योजनेचा फायदा घेऊन शेतकरी उत्पादक कंपनी वाढवाचे असे मत क्षीरसागर यांनी व्यक्त केले. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना या शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी आहे.

### राज्य सबज्युनियर स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणी

**जालना :** महाराष्ट्र राज्य सबज्युनियर क्रीडा स्पर्धा ७ व ८ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव येथे होणार आहे. त्यानिमित्ताने जालना जिल्हा निवड चाचणीचे आयोजन २५ जानेवारी रविवार रोजी जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रबोधिनी, जालना या ठिकाणी सकाळी ९ वाजता करण्यात आले आहे. तरी जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव प्रा. बाबू यादव, विकास काळे एकनाथ सुरुशे, संतोष मोरे यांनी केले आहे.

### खरेदी केंद्रावर तूर नोंदणी सुरू

**जालना :** सन २०२५-२६ हंगामासाठी नाफेडद्वारे तूर नोंदणी सुरू झाली आहे. यावर्षी अभिनव उपक्रमाद्वारे नाफेडने थेट खरेदी केंद्र मंजूर केले असून जालना ते घनसावंगी हायवेवरील रोहनवाडी येथील पहिले खरेदी केंद्र जडाई फार्मर्स प्रोड्यूसर कंपनीला मंजूर झाले आहे. या खरेदी केंद्राला नाफेड मॉडेल सेंटर असेही संबोधले जात आहे. शेतकऱ्यांसाठी तूर नोंदणी सुरू झाली असून लवकरच खरेदीही सुरू होणार आहे. यावर्षी तुरीसाठी नाफेडने ८,००० रुपये प्रतिक्विंटल हमीभाव दिला आहे.

# ‘तारीख पे तारीख’ हे दुष्टचक्र भेदण्याची वेळ आली आहे - ॲड. महेश धन्नावत

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २७ :** ‘‘न्यायव्यवस्थेमध्ये तब्बल ५० टक्क्यांपर्यंत भ्रष्टाचार मुरला असून अनेक न्यायाधीश हे आता न्यायाधीश न राहता केवळ फाईल पुढे ढकलणारे नोकरशहा बनले आहेत. खुर्ची-टेबल आणि साधा स्टेनोग्राफरही नसलेल्या न्यायालयांकडून न्यायाची अपेक्षा कशी करणार? हे विदारक सत्य मी नाही, तर एका माजी मुख्य न्यायमूर्तींनीच मांडले आहे. आता या व्यवस्थेविरोधात पीडित पक्षकारांनीच आवाज उठवण्याची वेळ आली आहे,‘‘ अशा स्फोटक शब्दांत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी देशभरातील पक्षकारांना संघटित होण्याचे आवाहन केले आहे.

जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती बशीर अहमद खान यांनी एका मुलाखतीत भारतीय न्यायव्यवस्थेच्या ढासळलेल्या स्तरावर आणि त्यातील गंभीर त्रुटींवर बोट ठेवले आहे. त्यांच्या या मुलाखतीचा आधार घेत ॲड. धन्नावत यांनी न्यायव्यवस्थेच्या सद्यस्थितीवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. ॲड. धन्नावत म्हणाले, ‘‘माजी मुख्य न्यायमूर्ती खान यांनी जे सांगितले, ते प्रत्येक पक्षकार आणि वकील दररोज अनुभवत आहे. न्यायमूर्ती खान स्पष्टपणे सांगतात की, न्यायव्यवस्थेत भ्रष्टाचार आहे आणि तो २० ते ५० टक्क्यांपर्यंत असू शकतो. ‘कुणीही दुधाने धुतलेले नाही,’ हे त्यांचे विधान व्यवस्थेतील कीड किती खोलवर पसरली आहे, हे दाखवते. जेव्हा न्यायमूर्तीच भ्रष्टाचाराची कबुली देतात, तेव्हा सामान्य माणसाने न्यायासाठी कोणाकडे पाहावे?‘‘ न्यायमूर्ती खान यांनी आपल्या मुलाखतीत न्यायालयांच्या दुरवस्थेचे वर्णन केले आहे. अनेक कनिष्ठ न्यायालयांमध्ये न्यायाधीशांना बसायला खुर्ची नाही, ते कापसाच्या बॉक्सवर बसून निकालपत्र लिहितात. स्टेनोग्राफर नसल्याने पाच तासांत एक निकाल लिहिला जातो, तेवढ्या वेळेत पाच खटले निकाली काढता आले असते. यावर ॲड. धन्नावत यांनी म्हटले की, ‘‘सरकार न्यायव्यवस्थेला प्राधान्य देत नाही. अर्थसंकल्पात सर्वात कमी तरतूद न्यायव्यवस्थेसाठी असते. जर न्यायाधीशांनाच मूलभूत सुविधा मिळत नसतील, तर ते पक्षकारांना जलद न्याय कसा देणार? या असुविधांचा थेट फटका सामान्य पक्षकाराला बसतो, ज्याचा खटला वर्षानुवर्षे केवळ अशा कारणांमुळे प्रलंबित राहतो.‘‘ ‘‘आज ८० ते ९० टक्के न्यायाधीश हे नोकरशहा झाले आहेत. ते फक्त फाईल इकडून तिकडे ढकलतात. त्यांना पक्षकाराच्या वेदनेशी काहीही देणेघेणे नाही,‘‘ या न्यायमूर्ती खान यांच्या विधानावर जोर देत ॲड. धन्नावत यांनी सांगितले की, ‘‘आज न्यायालयांमध्ये न्यायिक दृष्टिकोनाचा अभाव आहे. केवळ दिवसाला दहा प्रकरणे निकाली काढली म्हणजे न्यायाधीश कार्यक्षम ठरत नाही. त्या निकालाने न्याय झाला की नाही, हे महत्त्वाचे आहे. मात्र, आजकाल फक्त तारखा दिल्या जातात. मोठ्या वकिलांचे इंग्रजी ऐकून न्यायाधीश प्रभावित होतात, पण सामान्य माणसाची बाजू ऐकून घेतली जात नाही. ही नोकरशाही वृत्तीच न्यायदानाला लागलेली सर्वात मोठी कीड आहे.‘‘ ॲड. धन्नावत यांनी शेवटी पक्षकारांना भावनिक आवाहन करताना म्हटले की, ‘‘आतापर्यंत तुम्ही शांत राहिलात, व्यवस्थेवर विश्वास ठेवलात. पण आता माजी मुख्य न्यायमूर्तींनीच व्यवस्थेचे वस्त्रहरण केले आहे. भ्रष्टाचार, सुविधांचा अभाव आणि न्यायाधीशांची उदासीनता यांमुळे तुमचे आयुष्य पणाला लागले आहे. तुमच्या पिढ्यानपिढ्या न्यायालयाच्या पायऱ्या झिजवत आहेत. त्यामुळे आता गप्प बसू नका. आपल्या हक्कांसाठी आवाज उठवा. या ‘तारीख पे तारीख’च्या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी आणि जलद व निःपक्षपाती न्यायासाठी संघटित व्हा. नोटरी असोसिएशन तुमच्या या लढ्यात तुमच्यासोबत आहे.‘‘

# सिंचन क्षमतेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना, दि. २७ :** केंद्र शासनाकडून आलेल्या शासन निर्णयान्वये राष्ट्रव्यापी लघु सिंचन योजनांची (० ते २ हजार हेक्टर) सिंचन क्षमता ७ वी प्रगणना आणि जलसाठ्यांची २ री प्रगणना करण्यात येत आहे त्यामध्ये खालील योजनेचा समावेश होणार आहे.

भूपृष्ठाखालील जलसाठ्याच्या वापरासाठी योजनाः साध्या विहिरी, उथळ, मध्यम व खोल कुपनलिका. भूपृष्ठावरील जलसाठ्याच्या वापरासाठी योजनाः: ०-२००० हेक्टर सिंचन क्षमतेचे लघु सिंचन योजना, धरण, कालवे, बंधारे, विमोचक, बंद नलिका वितरण प्रणाली इत्यादिमुळे केले जाणारे प्रवाही सिंचन आणि नदी, नाले, बंधारे, जलाशय इत्यादिवरील उपसा सिंचन योजना.

नागरी आणि ग्रामीण भागातील जलसाठे (वॉटर बॉडीज) व २००० हेक्टर वरील सिंचन क्षमतेचे मोठे व मध्यम प्रकल्प आणि उपसा सिंचन योजना इत्यादि.कृषि व मृदसंधारण विभागाकडील सिमेंट बंधारे, शेततळे, सिंचन विहीरी इत्यादि. भूजल सर्वेक्षण यंत्रणे संबंधित कुपनलिका इत्यादि.

सदरील प्रगणनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जालना जिल्ह्यामध्ये काम करण्याकरिता इच्छुक संस्थानी दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २:०० वाजेपर्यंत आपले प्रस्ताव जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग जालना या कार्यालयास सादर करण्यात यावे.

तद्नंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत. तसेच अनुभवी संस्थांना प्राधान्य देण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.तसेच उपरोक्त शासन निर्णयाचे अवलोकन करण्यात यावे सदरील प्रगणना दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

प्राप्त प्रस्तावा वरती साधक बाधक चर्चा करून संस्थेची निवड करण्यात येईल व अंतिम निर्णय हे जिल्हा सनियंत्रण समिती प्रगणना जालना यांच्याकडे राखीव राहतील.अधिक माहितीसाठी कार्यालयास संपर्क साधाण्याचे आवाहन जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.




**जालना शहरातील मुख्य बाजारपेठेत असलेल्या अंबिका मार्केटची जुनी इमारत पाडण्याचे आदेश शासनाने दिले असून अशाच प्रकारच्या धोकादायक इमारती शहरात अनेक असून त्यांच्या बाबतीतही हाच निर्णय व्हावा ही जालनेकरांना आशा आहे.**

# निर्व्यसनी जीवनशैलीच कलावंताला तारते - शाहीर नानाभाऊ परिहार

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २७ :** ‘‘कलावंत हा केवळ स्वतःसाठी घडत नसून तो समाजासाठी घडत असतो. समाजाचे देणे फेडण्यासाठी आणि आपली कला दीर्घकाळ टिकवण्यासाठी केवळ कलेवर प्रेम करून चालणार नाही, तर कलावंताने आपल्या शरीरावर, आरोग्यावर आणि जीवनशैलीवरही प्रेम करणे गरजेचे आहे. सुदृढ शरीर आणि निर्व्यसनी जीवनशैलीच कलावंताला खऱ्या अर्थाने तारते,’’ असे प्रतिपादन ज्येष्ठ शाहीर नानाभाऊ परिहार यांनी केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिरात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना त्यांनी शाहिरी परंपरेसोबतच चारित्र्य संवर्धनाचाही मोलाचा सल्ला दिला.



शाहिरी ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती लोकजागृतीची प्रभावी परंपरा असल्याचे नमूद करत शाहीर परिहार पुढे म्हणाले की, ‘‘शाहिरांच्या खांद्यावर समाजप्रबोधनाची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे शाहिराने आपल्या कवनातील शब्दांइतकीच आपल्या जीवनपद्धतीची शुद्धताही जपली पाहिजे. स्वच्छ आचार आणि विचार यावरच कलेचे अधिष्ठान उभे राहते.’’

शिबिरात सराव सत्रावर भर व्याख्यानानंतर शिबिरात सहभागी झालेल्या शाहिरांकडून प्रात्यक्षिके करून घेण्यात येत आहेत. यामध्ये शाहिरीची लय, ठेका, स्पष्ट शब्दोच्चार आणि प्रभावी सादरीकरण यावर विशेष भर दिला जात आहे. या सराव सत्रांचे मार्गदर्शन व निरीक्षण प्रा. कल्याण उगले हे करीत आहेत. त्यामुळे राज्यातील विविध भागांतून आलेल्या शिबिरार्थींना केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर शाहिरीचे प्रत्यक्ष शास्त्र शुद्धरीतीने आत्मसात करण्याची संधी मिळत आहे.

# ग्रंथभेट योजनेसाठी ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २७ :** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने समान निधी ग्रंथभेट योजने अंतर्गत सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात.

या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथांची निवड करण्यासाठी तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिध्द होणाऱ्या शासनमान्य ग्रंथ निवड यादी मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने सन २०२५ या कॅलेंडर वर्षात (दि. १ जानेवारी, २०२५ ते दि. ३१ डिसेंबर, २०२५) प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

दि. २८ फेब्रुवारी, २०२६ नंतर प्राप्त झालेल्या ग्रंथांचा ग्रंथ निवड यादीसाठी विचार केला जाणार नाही. या योजनेसाठी सन २०२६ या वर्षात प्रकाशित झालेले ग्रंथ जर यापूर्वी संचालनालयास पाठविले असल्यास पुन्हा पाठविण्याची आवश्यकता नाही. तसेच, मुद्रण व नोंदणी अधिनियम, १८६७ अन्वये मुद्रकाने व ग्रंथ प्रदान अधिनियम, १९५४ अन्वये प्रकाशकाने सदर ग्रंथाची प्रत्येकी एक प्रत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई, शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे व शासकीय विभागीय ग्रंथालय, नागपूर येथे पाठविणे आवश्यक आहे. सदर ग्रंथ पोहोचल्याची पोच पावती संबंधीत ग्रंथालयांकडून घ्यावी. ग्रंथालय संचालनालयास संबंधित ग्रंथ पाठवितांना वरीलप्रमाणे ग्रंथ पाठविल्याची पोच पावती ग्रंथांसोबत टपालामार्फत वा समक्ष पाठविण्यात यावी. सर्व लेखक, प्रकाशक यांनी ग्रंथ पाठविण्याचे आवाहन ग्रंथालय संचालक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# स्वस्त धान्य दुकानदारांचा संपाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**अंबड, दि. २७ :** तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांचे धान्य वाटप कमिशन तत्काळ देण्यात यावे. याचबरोबर ई-पॉस मशीनची तांत्रिक अडचण तत्काळ दूर करावी, अन्यथा तालुक्यातील धान्य दुकानदार संघटना फेब्रुवारीपासून दुकान बंद करून संप करणार आहेत, असा इशारा अंबड तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्यावतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांना देण्यात आला आहे.

सर्व स्वस्त धान्य दुकानदारांचे सहा ते सात महिन्यांचे तर काही स्वस्त धान्य दुकानदारांची एक वर्षाचे धान्य वाटप कमिशन प्रलंबित आहे. मागील दोन महिन्यांपासून सतत सर्व्हर समस्या येत आहे. सर्व ई-पॉस मशीनमध्ये जे स्कॅनर नवीन टाकण्यात आलेले आहेत ते अजिबात चालत नाही. त्यामुळे धान्य वाटपासाठी कार्ड, बाकीचे मोबाइल ओटीपी आणि आय स्कॅनरचा उपयोग करावा.

## परंपरा — महिलांकडून हळदी-कुंकूच्या माध्यमातून पारंपरिक उत्सव

# जालना पीपल्स बँकेच्या महिला शाखेत संक्रांतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जाफराबाद, दि. २७ :** जालना पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या महिला शाखेत महिला संचालिका सुनंदा नंदकिशोर अग्रवाल आणि वर्षा महेश भक्कड यांच्या पुढाकाराने संक्रांतीच्या निमित्ताने भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी सुनंदा अग्रवाल, वर्षा भक्कड यांनी उपस्थित महिलांचे स्वागत केले. याप्रसंगी तिळगुळ, हळदी-कुंकू आणि सांस्कृतिक सादरीकरणाचा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.



हळदी-कुंकूच्या माध्यमातून पारंपरिक उत्सव साजरा करत महिलांनी एकमेकांना तिळगुळ दिला. बँकेच्यावतीने वाण स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या. पारंपरिक पोशाख परिधान करून महिलांनी उत्सवाचे सौंदर्य वाढवले. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे वातावरण रंगतदार झाले. महिला संचालकांच्या नेतृत्वाखाली आयोजित या उपक्रमाने सामाजिक एकता आणि परंपरांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी कल्पना लाहोटी, संतोष पंच, ममता भक्कड़, शैला भक्कड़, निर्मला करवा, अनिता अग्रवाल, ज्योती अग्रवाल, सीमा पित्ती, अनीता पित्ती, मंगल मालपानी, निशा पंच, श्रद्धा नागोरी, प्रियंका कामड, कांता दायमा, संगीता बियानी, उज्वला सेठी, मंजू जोशी, शोभा पंचारिया यांच्या सम महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मतदार होणे ही जबाबदारी; जालन्यात जनजागृती पदयात्रेद्वारे संदेश

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना, दि. २७ :** राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने मेरा युवा भारत, तहसील कार्यालय व युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्था, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृतीसाठी शहरात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. ही पदयात्रा मोतीबाग येथून सुरू होऊन तहसील कार्यालयापर्यंत काढण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला प्रारंभ करण्यात आला. या पदयात्रेत ‘‘मतदार होणे ही आपली जबाबदारी’’ व ‘‘लोकशाही मजबूत करूया’’ असे संदेश देण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांना मतदार शपथ देण्यात आली. तसेच नवीन मतदारांचा सन्मान करून त्यांना लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. यावेळी विष्णू घुगे नायब तहसीलदार निवडणूक जालना, प्रणीत सांगवीकर, जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, जालना, डॉ. सोमनाथ खडे, संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, सतिष पडघन स्वीप समन्वयक निवडणूक, रवी मगरे महसूल सहाय्यक जिल्हाधिकारी कार्यालय जालना,जयपाल राठोड, अध्यक्ष-युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्था, जालना अमोल गायकवाड, सुशील म्हस्के जालना व शिक्षक वृंद तसेच विविध शाळांमधील विद्यार्थी, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाचे विध्यार्थी, राष्ट्रमाता करिअर अकॅडमीचे विध्यार्थी, युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. युवकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमामुळे मतदार जनजागृतीला प्रभावी चालना मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, बुधवार दि. २८ जानेवारी २०२६

## थोडक्यात

### तरोडा शिवारातून नागर लंपास

अंजनगाव सुर्जी : तालुक्यातील तरोडा शिवारातून ८० हजार रूपये किंमतीचा हायड्रोलिक नांगर अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी शेतकरी दीपक काकड यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्याविरूध्द रहिमापूर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

### पतीची पत्नीला काठीने मारहाण

ब्राम्हणवाडा थडी : कुणासोबत मोबाईलवर बोलत असल्याचा संशय घेत पतीने पत्नीला काठीने जबर मारहाण करून जखमी केल्याची घटना रेडवा येथे घडली. याप्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून राजकुमार जाधव याच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### कारच्या धडकेत कुत्रा ठार

आसेगाव पूर्णा : कारची धडक बसल्याने यात कुत्रा ठार झाल्याची घटना असदपूर येथे घडली.याप्रकरणी पशुप्रेमी उषा पानसरे यांच्या तक्रारीवरून कार चालक आबीद शेख याच्याविरूध्द आसेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

### वाळुची वाहतूक करणारा ट्रक जप्त

चांदूर रेल्वे : वाळुची चोरटी वाहतूक करणारा ट्रक जप्त करून त्यातील चार वाळूसह वाहन असा २०.८० लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला. अमरावती बायपासवर ही कारवाई चांदूररेल्वे पोलिसांनी केली. पोहेकॉ योगेश नेवार यांच्या फिर्यादीवरून शेख शारीक शेख युसूफ, संकेत ठाकरे यांच्याविरूध्द चांदूररेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

### थुगाव खानापूर येथून ट्रॉली लंपास

अमरावती : वलगाव पोलीस ठाणे हद्दीतील थुगाव खानापूर येथून ४० हजार रूपये किंमतीची ट्रॅक्टरची ट्रॉली अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ९ ते २१ जानेवारी दरम्यान घडली. याप्रकरणी अविनाश गवई यांच्या तक्रारीवरून वलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### बांधकामावरून साहित्य चोरून नेले

अमरावती : गणेडीवाल लेआऊट परिसरात बांधकाम स्थळाहून ईलेक्ट्रिक कॉपर वायर, कटर मशीनसह इतर साहित्य मिळून २.८ लाखांचा माल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना २३ जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी श्याम छुटलानी यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

### साईनगरात युवक चाकूसह ताब्यात

अमरावती : साईनगरात एक युवक चाकू घेवून फिरत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी गस्तीदरम्यान त्याला ताब्यात घेत चाकू जप्त केला. प्रीतम मनोज घोरमोडे याच्याविरूध्द राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

### इंदिरानगरात गळफास घेऊन आत्महत्या

अमरावती : इंदिरानगरात एका ५८ वर्षीय इसमानेदारूच्या नशेत घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली.विजय तातोबा खोब्रागडे असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे.

# जिल्हा परिषदेचा कारभार म्हणजे 'प्रायव्हेट लिमिटेड' कंपनी

## जिल्हा नियोजनच्या बैठकीत सीईओ सहित अधिकाऱ्यांना धरले धारेवर | अखर्चित निधीवरून पालकमंत्री बावनकुळे संतापले

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती,दि.२७ :** जिल्हानियोजन मधील अखर्चित निधीवरून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. विकास कामासाठी आलेला निधी वेळेवर का खर्च करत नाही? काम करताना आमदारांना, पदाधिकाऱ्यांना विश्वासात का घेत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. येत्या १५ फेब्रुवारी पर्यंत डीपीडीसी मधील जर पैसे खर्च केले नाही तर ते पैसे शासनाकडे जमा करण्यात येईल. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यावर ठपका ठेवून सेवा पुस्तकात नोंद झेडपी सीईओंच्या कार्यपद्धतीवर नाराजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकारी संचिता मोहपात्रा यांच्या कार्यपद्धतीवर ही ना. बावनकुळे यांनी नाराजी व्यक्त केली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद प्रायव्हेट लिमिटेड प्रमाणे चालवत आहे का? अशा शब्दात त्यांनी मंत्री बावनकुळेयांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. आलेला निधी वेळेवर खर्च करा अन्यथा कारवाई करू असा अधिकाऱ्यांना निर्वाणीचा इशारा यावेळी ना. बावनकुळेंनी दिला.

.... तर आमच्या बोलण्याला अर्थ काय ? जिल्ह्याच्या वार्षिक नियोजन आराखड्याचे प्रभावीपणे अनुपालन करण्याची जबाबदारी ही जिल्हा नियोजन विभागाची असतांना सुद्धा वारंवारच्या कुचराई व दिरंगाईमुळे जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन बिघडले असल्याचे निदर्शनास आले आहे. मंजूर आराखड्यानुसार लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासही विलंब लागत असल्याने अपेक्षित खर्च होत नसतांनाचे दिसत आहे. जिल्हा नियोजनाच्या प्रत्येक बैठकीत आमदारांनी मांडलेल्या सूचनांचे अनुपालन होत नसेल तर आमच्या बोलण्याला अर्थ काय? असा प्रश्न उपस्थित करून आ. संजय खोडके यांनी जिल्हानियोजन विभागाच्या कामकाजातसुधारणा करण्याची नितांत






गरज असल्याची सुचना केली. ५० कोटींचा निधी सहा महिने रोखला

इतकेच नाही तर तत्कालीन डीपीओ अभिजित मस्के यांनी तर त्यांच्या कार्यकाळात अमरावती महापालिका क्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करण्यासाठी मिळालेला ५० कोटींचा निधी पाच ते सहा महिने रोखून धरला व दिरंगाई केली. त्यांनी जिल्हा नियोजनाचा निधी बँकेत जमा ठेवून विकासकामांचे पैसे रोखून धरले. जिल्हा नियोजन विभाग हा एखाद्या एजन्सी प्रमाणे काम करत असल्याचा आरोप आ. संजय खोडके यांनी करीत आपला रोष व्यक्त केला. राजकमल उड्डाणपुलाची टोलवाटोलवी गेल्या सात महिन्यांपासून राजकमल रेल्वे उड्डाणपुल बंद असल्यामुळे शहरातील नागरिकांना मोठे हेलपाटे सहन करावे लागत आहे. मात्र अजूनही कोणतेच काम सुरु झाले नाही. याबाबत खा. बळवंत वानखडे यांनी प्रश्न उपस्थित करून सामाजिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली. या उड्डाणपुलावरून बीअँडसी व

**आदिवासींना पूजा का करू देत नाही?**

मेळघाटच्या प्रलंबित मुद्यांवरून उपवनसंरक्षक सिपना वन्यजीव विभाग परतवाडा यांना चांगलेच खडसावले, आदिवासींना त्यांच्या देवदेवतांची पूजा करण्यापासून का रोखले ? असा सवाल उपस्थित केला. आदिवासींच्या देवदेवतांची जंगलात मंदिरे आहेत. त्या ठिकाणी पूजा करण्यासाठी आदिवासी जातात. मात्र वनविभागाचे अधिकारी त्यांना पूजा करण्यासाठी जावू देत नाही. त्यामुळे हा मुद्दा खा. वानखडे यांनी बैठकीत उपस्थित करून वनविभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

आदिवासी हिंदू नाहीत का ? त्यांना पूजा करण्यापासून का रोखले जाते ? असा प्रश्न या बैठकीत खा. बळवंत वानखडे यांनी उपस्थित केला.

**कुचराई व दिरंगाईचा मुद्दा उपस्थित**

बैठकीमध्ये आ. संजय खोडके यांनी जिल्हा नियोजन विभागाच्या कुचराई व दिरंगाई संदर्भात बैठकीत मुद्दा उपस्थित केला. लोक प्रतिनिधी जिल्हा नियोजनच्या बैठकीत वारंवार प्रश्न उपस्थित करत असून कुठलीही कार्यवाही होत नाही, पैसे रिलीज केले जात नाही.

पालकमंत्री तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे सुद्धा पाठपुरावा केल्या जात नसल्याने जिल्हा नियोजनातील विकास कामे प्रलंबित राहत असल्याचे आ. संजय खोडके यांनी सांगितले.महारेल टोलवाटोलवी करीत असल्याचा आरोप यावेळी खा. वानखडे यांनी केला. त्यावर पालकमंत्र्यांनी महारेल अधिकाऱ्यांना फोन लावून काम सुरु करण्याचे सूचित केले.

### विभागीय चौकशीचे आदेश

अत्यंत गंभीरतेने घेऊन पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी तत्कालीन डीपीओ अभिजित म्हस्के यांची विभागीय चौकशी तसेच त्यांच्या संलग्नित अधिकाऱ्यांचे सुद्धा ऑडिट तपासण्याचे आदेश दिले. त्याबरोबर जिल्हा नियोजनाच्या बैठकीत आमदारांनी मांडलेल्या प्रश्नाचे तातडीने अनुपालन करून संबंधित विभाग प्रमुखाच्या स्वाक्षरीनिशी त्यांना सर्व कार्यवाहीबाबतची माहिती अवलोकनार्थ सादर करण्याचे आदेश पालकमंत्री ना. बावनकुळे यांनी दिले.

# सिंचन कार्यालयात राष्ट्रध्वजाचा अवमान

## परिसर स्वच्छ न करताच प्रजासत्ताक दिन साजरा

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि.२७ :** स्थानिक सिंचन व्यवस्थापन शाखा शहानुर कार्यालयात दिनांक २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी ध्वजारोहनाच्या ठिकाणी साफसफाई न करता आणि ध्वजस्तंभाला सुशोभित न करता अत्यंत लाजीरवाण्या परिस्थित ध्वजारोहन केल्याने अंजनगाव सुर्जी येथील स्थानीक नागरिकांनी याबाबात संबधित अधिकाऱ्यांवर कारवाहीची मागणी होत आहे.

याबाबत माहिती अशी की, संपूर्ण देशात प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन समारंभ संपुर्ण देशभरभर उत्साहात साजरा होत असताना येथील शहानुर कार्यालय येथे दिनांक २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक ध्वजारोहण कार्यक्रम झाला. परंतु ध्वजारोहण समारंभ ज्या ठिकाणी पार पडला ते ठिकाण अतिशय अस्वच्छ आणि ध्वज स्तंभाजवळील असलेलेले गवत



थातूरमातूर गवत काढण्यात आले. परंतु ध्वजारोहण्याच्या परिसरात सर्वत्र अस्वच्छता आढळून आली.सर्वात महत्वाची बाब म्हणजे ध्वजारोहणाच्या आधार स्तंभाला साधा चुना सुद्धा मारलेला नव्हता. तसेच आधारस्तंभ च्या खाली शेवाळ धरले होते.

ध्वज फडकवलेल्या ठिकाणी स्वच्छता राखणे अप्रत्यक्षपणे ध्वजाच्या प्रतिष्ठेसाठी गरजेचे असते. ध्वजाची प्रतिष्ठा राखण्यासाठी स्पष्ट दृश्यमान आणि सन्मान जनक वातावरण आवश्यक असल्याने त्या ठिकाणी परिसरात स्वच्छता असणे अतिशय गरजेचे असते. परंतु शहानुर कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी ध्वजारोहणाच्या आसपास असलेल्या अस्वच्छतेच्या ठिकाणी ध्वजारोहण करून आपले कर्तव्य पार पाडल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. शहानुर कार्यालयात प्रजासत्ताक दिनी सर्वत्र स्वच्छता असलेल्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी ध्वजारोहण केल्याची माहिती पत्रकारांना काही नागरिकांनी सांगितल्यावर पत्रकारांनी संबंधित संबंधित ठिकाणी भेट दिली असता ध्वजारोहणाच्या ठिकाणी अस्वच्छता असल्याचे प्रामुख्याने पत्रकारांना सुद्धा दिसून आले. हा एक राष्ट्रध्वजाचा ध्वजसंहिताच्या नियमाप्रमाणे अवमान असल्याची चर्चा आहे. ही अतिशय गंभीर बाब असून ध्वजसंहिताच्या नियमाप्रमाणे अस्वच्छता अनिवार्य आहे.

# किन्नरांच्या दोन गटात सशस्त्र राडा; सात जण अटकेत

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२७ :** शहरातील दोन ट्रान्सजेंडर गटांमधील वाद आज सकाळी ११ वाजता पुन्हा उफाळून आला, या संघर्षात आम्रपाली गटातील तीन ट्रान्सजेंडर सदस्य गंभीर जखमी झाल्याचे वृत्त आहे. या घटनेनंतर, जखमी झालेल्या तीन ट्रान्सजेंडर व्यक्तींना जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर गाडगे नगर पोलिस ठाण्यात ट्रान्सजेंडर व्यक्तींचा मोठा जमाव जमला. वृत्त लिहिण्याच्या वेळी, गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू होती.वृत्तानुसार, मधु सनातन कर्माकर (२४, निंभोरा), रितू विनोद सरकटे (२७, राजापेठ) आणि किंजल पाटील (३०, राजापेठ) हे तीन ट्रान्सजेंडर व्यक्ती शेगाव नाका येथील आशियाड कॉलनी येथून प्रवास करत होते. दुसऱ्या गटातील काही ट्रान्सजेंडर लोक आले आणि त्यांनी प्रथम त्यांना चिथावणी दिली, नंतर तलवारी आणि चाकूने हल्ला केला, असा आरोप आहे. या हल्ल्यात





मधु, रितू आणि किंजल गंभीर जखमी झाल्या. त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले.दरम्यान, आम्रपाली गटाला कळताच, ती आणि तिच्या साथीदारांनी गाडगे नगर पोलिस ठाण्यात धाव घेतली. तेथे मोठ्या संख्येने ट्रान्सजेंडर लोक जमले होते. त्यांनी आरोप केला की दुसऱ्या गटाने त्यांच्या साथीदारांवर प्राणघातक हल्ला केला आहे. त्यांनी कडक पोलिस कारवाईची मागणी करत गोंधळ घातला. एखाद्या ट्रान्सजेंडर व्यक्तीला मारामारीत जीव गमवावा लागला तरच पोलिस हस्तक्षेप करतील का असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. वृत्त लिहिण्याच्या वेळी, परिस्थिती तणावपूर्ण होती आणि पोलिस गुन्हा नोंदवण्याच्या प्रक्रियेत होते. जखमी झालेल्या तीन ट्रान्सजेंडर लोकांची प्रकृती गंभीर असल्याचे रुग्णालयातील सूत्रांनी सांगितले. शहरात ट्रान्सजेंडर लोकांमधील वाद वारंवार समोर येत आहेत. गंभीर दुखापत करण्यासाठी प्राणघातक शस्त्राचा वापर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. सर्वांचे लक्ष पोलिसांच्या कारवाईवर आहे. शहरातील ट्रान्सजेंडर गटांमध्ये सुरू असलेल्या भांडणादरम्यान, शेगाव नाका परिसरातील आशियाद कॉलनीत मंगळवारी दुपारी झालेल्या प्राणघातक हल्ल्याप्रकरणी पोलिसांनी मंगळवारी संध्याकाळी सात ट्रान्सजेंडर व्यक्तींना ताब्यात घेतल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यात तीन ट्रान्सजेंडर व्यक्ती गंभीर जखमी झाले आहेत आणि सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेनंतर, ट्रान्सजेंडर व्यक्तींनी राजकमल चौकात अचानक रस्ता रोको केला.

**उपक्रम** प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्यातर्फे हिरवी झेंडीने रॅलीचा शुभारंभ

# रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त अमरावतीत जनजागृती रॅली







अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२७ :** रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहरात भव्य रस्ता सुरक्षा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीमती उर्मिला पवार यांच्या उपस्थितीत आयोजित या रॅलीला त्यांनी स्वत: हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ केला.

या उपक्रमात शहरातील सर्व मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक व चालक आपल्या प्रशिक्षण वाहनांसह सहभागी झाले होते. ही रॅली प्रादेशिक परिवहन कार्यालय, जिल्हाधिकारी चौक, गर्ल हायस्कूल चौक,एसटी बस स्थानक, रेल्वे स्टेशन चौक, मालवीय चौक, इरविन चौक, पंचवटी चौक, वेलकम पॉईंट परत अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालय या मार्गाने रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.रॅलीमध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच शासकीय वाहनचालक मोठ्या संख्येने सहभागी झाले. वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादा, मोबाईल वापर टाळणे, मद्यपान करून वाहन न चालवणे याबाबत जनजागृती करण्यात आली. रस्ते अपघात टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाची जबाबदारी महत्त्वाची असल्याचे संदेश फलक व घोषणांद्वारे देण्यात आले. प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे चालक व संचालकांना मार्गदर्शन करताना, प्रशिक्षण अधिक प्रभावी व शिस्तबद्ध पद्धतीने देण्याचे आवाहन केले. वाहनांची फिटनेस तपासणी, फिटनेस ट्रॅकचा योग्य वापर आणि सुरक्षित वाहनचालनाबाबतही माहिती देण्यात आली.या रॅलीत जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर, मोटार वाहन निरीक्षक आशिष जयसिंगपुरे, निलिमा काळबांडे, सचिन बडगे, सतीश राठोड, शोएब शेख, अमोल बोरे, सिद्धार्थ दहिकर, राहुल सरकटे, ऋषिकेश पाटील, निलेश जाधव, कांचन जाधव, सोहन हेमने, मोहम्मद अथर, अमोल गावनेर, श्रीकांत पाटील, चंद्रशेखर राऊत, नकुल चिखलकर तसेच इतर अधिकारी व वाहनचालक सहभागी झाले होते.रॅलीद्वारे नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण होत असून, अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

आपल्या लेखणीच्या जोरावर गावातील समस्या सोडविणारे सजग पत्रकार व मनमिळाऊ व्यक्तीमत्त्व
श्री साहेबराव राऊत
पत्रकार-अंजनगाव बारी
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा





-: शुभेच्छुक :-
अंजनगाव सुर्जी, मित्र परिवार

## थोडक्यात

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

शिरखेड : किराणा सामान घेवून घराकडे परतणाऱ्या अल्पवयीन मुलीला एका परिचिताने दुचाकीने घरी सोडून देण्याची बतावणी केली. त्याने तिला दुचाकीवरू बसवून गावाबाहेरील शाळेजवळ आणले. तेथे तिच्यासोबत असभ्य संवाद साधत तिचा विनयभंग केला. मुलीच्या तक्रारीवरून शिरखेड पोलिसांनी युवकाविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा नोंदवला.

### क्षुल्लक कारणावरून पत्नीला मारहाण

चांदूर रेल्वे : भल्या सकाळी पतीने पत्नीला शेकोटी करून मागितली. मात्र तिने उठण्यास व शेकोटी करण्यास नकार दिला. चिडलेल्या पतीने तिला काठीने मारले. शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना चांदूरवाडी येथे घडली. पत्नीच्या तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी पती, संजय शंकर वरकड (५०) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### गाडीचा कट मारल्याने युवकास मारहाण

चांदूर बाजार : गाडीला कट मारल्याच्या कारणावरून एकाने युवकाच्या तोंडवर बुक्की मारली. त्यात त्याचा दात पडून जखम झाली. ही घटना चांदूर बाजार येथे घडली. जखमी नयन किशोर पटेल (२१, रा. तळवेल) याच्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### बंद घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने लंपास

कुऱ्हा : लमाची खरेदी करण्यासाठी फिर्यादी मोतीलाल मोहनलाल शाहू (६०, रा. कुऱ्हा) कुटुंबासह गेले होते. दरम्यान घरी कुणी नसल्याची संधी साधून अज्ञाताने कपाटात ठेवलेले रोख ५९ हजार ४५० रुपये व २९ हजार 525 रुपयांचा ऐवज असा एकूण ८८ हजार ९७५ रुपयांचा ऐवज चोरून नेला. फिर्यादीच्या तक्रारीवरून कुऱ्हा पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवला.

### हुंड्यासाठी विवाहितेचा छळ

दर्यापूर : लग्नात माहेरहून आंदन मिळाले नाही म्हणून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ सुरू केला. दरम्यान गाडी घेण्यासाठी ५ लाख रुपये आणण्याचा तगादा विवाहितेकडे लावला. त्यासाठी तिला त्रास देणे सुरू केले. याबाबत तिने दर्यापूर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी पती अनुप भागवत तायडे (३४), भागवत शेपुजी तायडे (६५), रवींद्र रुपरावजी शिरसाठ (५०) यांच्यासह दोन महिला अशा एकूण पाच जणांविरुद्धा कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा नोंदवला. या घट्नेचा पुढील तपास दर्यापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली दर्यापूर पोलीस करीत आहे.

### दाम्पत्याकडून पैशांची पिशवी हिसकली

अंजनगाव सुर्जी : मुलीच्या ॲडमिशनसाठी बँकेतून काढलेले १ लाख ३० हजार रुपये घेवून दाम्पत्य घराकडे जात होते. तेवढ्यात दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञातांनी महिलेच्या हातातील रोख व मोबाईल असलेली पिशवी हिसकावून पळ काढला. ही घटना अंजनगाव सुर्जी शहरात घडली. फिर्यादी सदानंद विश्वनाथ (५२, रा. मुऱ्हादेवी) हे मुलीच्या ॲडमिशनसाठी बँकेतून पैसे काढण्यासाठी पत्नीसह शहरात आले होते.

त्यांनी पत्नीच्या खात्यातून ३० हजार व स्वत:च्या खात्यातून १ लाख रुपये काढले. ते त्यांनी जवळील पिशवीत टाकले. त्यातच पत्नीने अंदाजे १० हजारांचा मोबाईदेखील ठेवला होता. ते दुचाकीने गावाकडे जाण्यासाठी निघाले. रस्त्यात भरधाव दोन दुचाकीस्वार आले.

# धनेगाव ग्रामपंचायत टेंडर प्रक्रियेत घोळ

## पारदर्शकतेसाठी अजय येवले याचे आमरण उपोषण; प्रशासनाकडून चौकशी व पुर्ननिविदेचे आश्वासन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि.२७ :** धनेगाव ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेतील टेंडर प्रक्रियेत गंभीर घोळ झाल्याचा आरोप करत माजी तंटामुक्ती अध्यक्ष अजय येवले यांनी आज दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी पंचायत समिती अंजनगाव सुर्जी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते.

या उपोषणाचा मुख्य उद्देश म्हणजे वादग्रस्त ठरलेली टेंडर प्रक्रिया रद्द करून पारदर्शक पद्धतीने नव्याने टेंडर प्रक्रिया राबवावी, अशी ठाम मागणी होती.

धनेगाव ग्रामपंचायत अंतर्गत दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत नुकतीच पार पडलेली टेंडर प्रक्रिया संशयास्पद असून त्यात नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप अजय येवले यांनी केला. तसेच गुणवंतराव येवले यांच्या प्लॉटजवळील छोट्या नालीचे काम ग्रामविकास अधिकारी श्री. साखरे यांनी दोन महिन्यांपासून ठेकेदारांना कार्यारंभ आदेश न देता जाणूनबुजून रखडवले, असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. बुद्धविहार अभ्यासिकेचा मुद्दाही ऐरणीवर;



बुद्धविहार येथे सुरू असलेल्या मुलांच्या अभ्यासिकेवर टिन पत्रांचे शेड उभारण्यात आले असून, त्या ठिकाणी माकडांचा त्रास असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत असल्याचे सांगत तो ठराव रद्द करून नवीन ठराव मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच आधीच पूर्ण झालेल्या, कामांचे पेमेंट अडवून ठेवलेअसल्याचा गंभीर आरोपही उपोषणकर्त्यांनी केला.

आपल्या मागण्या मान्य न झाल्यास आणि संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाने मागण्यांबाबत जर ,तर केल्यास बुद्ध विहारा जवळ नवीन रपटा व जुनी नाली केलेल्या ठिकाणीच पुन्हा उपोषणाला बसणार असल्याचा इशारा धनेगाव येथील तंटामुक्तीचे माजी अध्यक्ष अजय गुणवंतराव येवले यांनी दिला आहे. यावेळी महेंद्र दिपटे, महेश खारोडे, रमेश सावळे, दिनेश उघडते, देवानंद गायगोले यांच्यासह अनेक ग्रामस्थ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आमदार व तहसीलदारांची मध्यस्थी; उपोषणाची सांगता

उपोषणाची दखल घेत गजानन भाऊ लवटे (दार्यापूर विधानसभा) यांनी घटनास्थळी भेट दिली. तसेच पुष्पाताई सोळंके (तहसीलदार, अंजनगाव सुर्जी) यांनी उपोषणकर्त्यांना लेखी व तोंडी आश्वासन दिले. टेंडर प्रक्रिया वादग्रस्त असल्याचे आढळल्यास ती रद्द करून नव्याने टेंडर काढण्यात येईल. संबंधित सर्व विषयांची सखोल चौकशी करून नियमानुसार न्याय दिला जाईल, असे स्पष्ट आश्वासन तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी दिले. या आश्वासनानंतर अजय येवले यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले.

# संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात घोडसगाव जिल्ह्यात प्रथम

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२७ :** संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा सन २०२५-२६ मधील 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धे ' चा जिल्हास्तरीय निकाल जाहीर करण्यात आला आहे. जिल्हयातील अंजनगाव सुर्जी तालुक्यातील घोडसगावं ग्रामपंचायतीने या स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र व उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) बाळासाहेब बायस तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पापुस्व) बाळासाहेब रायबोले यांनी पुरस्कार विजेत्या गावांचे अभिनंदन केले आहे. पाणी व्यवस्थापन, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता व्यवस्थापन आणि लोकसहभाग या चतु:सुत्री प्रमाणे गावाने एकजुटीने काम केल्यास आदर्श गावाकडे वाटचाल करण्याची क्षमता सर्व ग्रामपंचायींकडे असून यामध्ये उत्कृष्ट काम करण्याची संधी आहे. १५ व्या वित्त आयेगातील ६० टक्के निधी हा पाणी व स्वच्छतेच्या कामांसाठीच असून यामुळे गाव स्वच्छ व सुंदर होण्यास मदत झाली आहे. व्दितिय पुरस्कार - दर्यापूर तालुक्यातील सांगवा ला तर तृतिय पुरस्कार अमरावती तालुक्यातील केकतपुर ला प्राप्त झालेला आहे. तसेच तिवसा तालुक्यातील करजगाव ला स्व. वसंतराव नाईक विशेष पुरस्कार, अचलपुर तालुक्यातील देवगावला डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेष पुरस्कार तर नांदागांव खं. तालुक्यातील माहुली चोर ला स्व. आबासाहेब खेडकर विशेष पुरस्काराची घोषणा करण्यात आली. जिल्हयातून प्रथम पुरस्काराची राशी रु. ६.०० लक्ष, व्दितिय पुरस्कारची राशी रु. ४.०० लक्ष व तृतिय पुरस्काराची राशी रु. ३.०० लक्ष आहे. तरे विशेष पुरस्कार राशी प्रत्येकी ५० हजार ऐवढी आहे.

# बार्टीतर्फे उत्कृष्ट जिल्हा प्रकल्प अधिकारी म्हणून अनिता गवई सन्मानित

## महाड येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय समतादूत कार्यशाळा



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२७ :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत क्षेत्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या समतादूत प्रकल्प अंतर्गत अमरावती जिल्हा प्रकल्प अधिकारी समाजभूषण अनिता गवई (राऊत) यांचा उत्कृष्ट जिल्हा प्रकल्प अधिकारी म्हणून बार्टीतर्फे सत्कार करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणेद्वारा दोन दिवसीय राज्यस्तरीय समतादूत कार्यशाळा ऐतिहासिक क्रांतीभूमी महाड, जि.रायगड येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन दूरस्थ प्रणालीद्वारे सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे यांनी केले. यावेळी विशेष उपस्थिती म्हणून बार्टीचे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे तसेच कार्यशाळेचे मुख्य संयोजक व विभागप्रमुख डॉ.बबन जोगदंड तसेच प्रकल्प व्यवस्थापक सुमेध थोरात, प्रकल्प अधिकारी तेजस्वी सोनाने तसेच बार्टी मुख्यालय अधिकारी व राष्ट्रीय स्मारक महाड येथील कर्मचारी तसेच संपूर्ण महाराष्ट्रमधील समतादूत व प्रकल्प अधिकारी उपस्थित होते. अनिता गवई (राऊत) यांना यापूर्वी सुद्धा महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय विभागांतर्गत दिला जाणारा सन्मानाचा पुरस्कार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. समाजभूषण पुरस्काराने सन्मानित असलेल्या महाराष्ट्रातील त्या सर्वात लहान पुरस्कारार्थी ठरल्या आहेत, तसेच यापूर्वी राज्य व राष्ट्रीय स्तरावर ५० पेक्षा जास्त पुरस्कार त्यांना प्राप्त झालेले आहे. वंचित, दुर्बल व शेवटच्या घटकापर्यंत बार्टी, सामाजिक न्याय विभाग, शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे पोहचविण्याचे कार्य अनिता गवई या सतत करीत असतात. व्यावसायिक मार्गदर्शन व प्रशिक्षण देऊन बेरोजगार व्यक्तींना व्यवसाय उभा करण्यास मदत करणे, वृक्षारोपण, जातपडताळणी शिबिर, महिला सक्षमीकरण, संविधान जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन, महापुरुषांचे विचार व कार्य, मार्गदर्शनाच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य त्या सतत करत असतात. विविध कार्यक्रमाचे आयोजन, उत्कृष्ट सूत्रसंचालन असे विविध अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या त्या धनी आहेत. त्यांच्या या गुणवत्तापूर्ण कार्याची दखल घेऊन बार्टीच्या राज्यस्तरीय कार्यशाळेत त्यांना उत्कृष्ट जिल्हा प्रकल्प अधिकारी म्हणून सन्मानित करण्यात आल्याने सर्वत्र त्यांची कौतुक होत आहे.

# ७२० लाभार्थ्यांना मिळणार हक्काचे घर

## घरकुलासाठी ७.२० कोटींचा निधी मंजूर

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.२७ :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत वैयक्तिक घरे (बीएलसी) बांधण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील १६ महानगरपालिकांमधील २ हजार ५८१ लाभार्थ्यांना एकूण २५.८१ कोटी निधी वितरित केला जाणार आहे. यात अमरावती महानगरपालिकेला तब्बल ७.२० कोटींचा निधी मिळणार आहे.

७२० लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न लवकरच साकार होणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.०अंतर्गत केंद्र सरकारने राज्यातील १६ महानगरपालिकांमधील २ हजार ५८१ लाभार्थ्यांना घरे बांधण्यासाठी एकूण२५८.१ दशलक्ष निधीस मंजुरी दिली आहे. हा निधी केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त सहभागातून वितरित केला जाणार आहे. या योजने अंतर्गत केंद्र सरकारने १५.४८ कोटी मंजूर केले असून, हा केंद्रीय हिश्श्याच्या ६० टक्के हिस्सा आहे.



उर्वरित ४० टक्के राज्य हिश्श्यापोटी राज्य सरकारने १०.३२ कोटीमंजूर केले आहेत.

केंद्र व राज्य सरकारकडील हा निधी विविध जिल्ह्यांमधील महानगरपालिकांमध्ये वितरित केला जाणार आहे. अमरावती महानगरपालिका क्षेत्रात या योजनेअंतर्गत ७२० लाभार्थ्यांचा समावेश असून, त्यांना एकूण ७.२० कोटींचा निधी मिळणार आहे. यामध्ये केंद्र सरकारचा वाटा (४.३२ कोटी तर राज्य सरकारचा वाटा २.८८ कोटी इतका आहे. हा निधी टप्प्याटप्प्याने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केला जाणार आहे.

**सन्मानाने जगण्याचे स्वप्न पूर्ण**

राज्यातील इतर महानगरपालिकांमध्येही निधी वितरण सुरू झाले आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० ही गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना स्वत:चे घर उभारण्यासाठी मोठा आधार ठरत आहे. सरकारकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीच्या जोरावर लाभार्थी स्वत:ची घरे बांधू शकतील आणि सुरक्षित, सन्मानाने जगण्याचे स्वप्न पूर्ण करू शकतील. अमरावतीसह संपूर्ण राज्यात या योजनेमुळे हजारो कुटुंबांना दिलासा मिळणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ अंतर्गत सन २०२४-२५ करीता २० लाख घरकुलांच्या उद्दीष्टापैकी सुमारे १५ लाख ३८ हजार घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे.

तसेच १४ लाख ७१ हजार लाभार्थीना पहिल्या हप्त्यासाठी २ हजार २०० कोटी रुपये वितरीत करण्यात आले आहेत. ही योजना राबविण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. लोकप्रतिनिधी आणि लाभार्थींच्या मागणीला प्रतिसाद म्हणून राज्य शासनाकडून या योजनेच्या अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ करण्यात येणार आहे. या सर्व घरकुलांच्या छतावर सौर उर्जा संच बसविण्यात येणार आहेत.

**निधी वितरण तपशील**

**लाभार्थी- ७२०**

**केंद्रीय निधी- ४३२.०० लाख**

**राज्य निधी- २८८.०० लाख**

# अपूर्ण सेवेचा वाद चाकूहल्ल्यात

**अमरावती, दि.२७ :** राजापेठ पोलीस स्टेशन हद्दीतील बडनेरा रोडवरील बेनाम चौकात असलेल्या एका लक्झरी स्पामध्ये शनिवारी दुपारी हंगामा झाला. पूर्ण सेवा न मिळाल्याने नाराज झालेल्या एकातरुणाने चायनीज चाकू बाहेर काढून धमकावले. ही घटना दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडल्याचे वृत्त आहे. पोलिसांनी या प्रकरणी प्रीतम मनोज घोरपडे (२०, दापोरी, मोर्शी) याला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी तरुण शनिवारीदुपारी मसाज करण्यासाठी स्पामध्ये आला होता. काउंटरवर पैसे देऊन त्याला अपेक्षित असलेली फुल्ल सर्व्हिस न मिळाल्याने तो चांगलाच संतापला आणि वाद घालू लागला. आरोपीने अचानक सोबतआणलेला चायनीज चाकू बाहेर काढला, त्यामुळे स्पा कर्मचाऱ्यांमध्येभीतीचे वातावरण निर्माण झाले. स्पामध्ये काम करणाऱ्या दोन तरुणी सुद्धा घाबरल्या आणि त्यांनीतात्काळ पोलिस नियंत्रण कक्षाला माहिती दिली. माहिती मिळताच राजापेठ डीबी स्कॉडची एक टीम घटनास्थळी पोहोचली आणि आरोपी तरुणाला ताब्यात घेतले. प्रीतम मनोज घोरपडे (२०, दापोरी, मोशी) असे आरोपीचे नाव आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.२७ :**

जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळा, अंजनगाव बारी येथे दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेच्या परिसरात रांगोळ्या, फुगे, तोरणे व फुलांच्या सजावटीने शाळेला आकर्षक स्वरूप देण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व विद्यार्थिनी शिस्तबद्ध रांगेत उभ्या राहिल्या. पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम महात्मा गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन व हारार्पण शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोपाल भाऊ हटवार, उपाध्यक्षा प्रगतीताई श्रीखंडे, तसेच ग्रामपंचायत सरपंच शोभाताई खडसे, उपसरपंच अरविंदभाऊ निंबर्ते, सदस्य बंडू डकरे, जगदीश भाऊ अंबाडकर, ग्रामसेवक विनोद इसळ, केंद्रप्रमुख मोहन जाधव, शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या दुर्गा उइके, ज्योत्स्ना लोखंडे व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यानंतर शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोपाल हटवार यांच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत, राज्यगीत तसेच संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन घेण्यात आले.

संगीतमय कवायत कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये देशभक्तीची भावना जागृत झाली.कार्यक्रमात इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थिनींनी अत्यंत सुंदर, मार्मिक व आत्मविश्वासपूर्ण भाषणे सादर केली. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थितांची मने जिंकली.शाळेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थिनी, पालक व उपस्थित सदस्यांना सोनपापडी व चॉकलेटचे वाटप करण्यात आले. तसेच मान्यवरांसाठी चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे, तसेच शिक्षक रामेश्वर स्वर्गीय, किशोर मालोकार, संगीता मंडे, रेशमा वांगे व सर्व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर मालोकार यांनी केले.

**उत्साह** शैक्षणिक सहलीला विद्यार्थीनी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# पालकांच्या पुढाकारातून विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक सहल

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.२७ :** जिल्हा परिषद प्राथमिक मुलींची शाळा, अंजनगाव बारी येथे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सर्व सदस्य व पालकांच्या पुढाकारातून विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीत शाळेतील सर्व विद्यार्थिनी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.पालकांनी पालकसभा आयोजित करून सहलीचा प्रस्ताव मांडला व शिक्षकांशी याबाबत चर्चा केली. शिक्षकांनी सहमती दर्शविल्यानंतर दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी सहल आयोजित करण्यात आली. सहलीचे ठिकाण ताईचा मळा , तालुका देवळी, जिल्हा वर्धा असे होते.सर्व पालक, विद्यार्थिनी व शिक्षक सकाळी आनंदी व उत्साही वातावरणात ताईचा मळा येथे पोहोचले. ताईचा मळा हा नैसर्गिक शेतीवर आधारित मळा असून तेथे विद्यार्थिनींना ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला. बैलगाडी, घोडागाडी,



घोडेस्वारी, विविध खेळणी, जम्पिंग, झुले, दोरीच्या जाळ्यावर चढणे, रोप वॉकिंग, तसेच घोड्याचा तबेला, गुराढोरांचा गोठा, विविध प्राण्यांचे पुतळे, फळझाडे व फुलझाडे यांचा विद्यार्थिनींनी मनमुराद आनंद घेतला. दिवसभर सर्वांनी मळ्याचा आनंद लुटला. त्यानंतर सर्वांनी एकत्रित भोजनाचा आस्वाद घेतला व वॉटर पार्कमध्ये जलक्रीडा तसेच संगीताच्या तालावर नृत्याचा आनंद अनुभवला. संपूर्ण दिवस आनंद, उत्साह व शिकण्याचा अनुभव देणारा ठरला.सायंकाळी पाच वाजता परतीचा प्रवास सुरू करण्यात आला व सर्वजण सायंकाळी सात वाजता सुखरूप गावात पोहोचले. या सहलीत शाळेच्या मुख्याध्यापिका विजया झाडे, तसेच शिक्षक रामेश्वर स्वर्गीय, संगीता मंडे, किशोर मालोकार, रेशमा वांगे, वृषाली ठाकरे सहभागी झाले होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोपाल भाऊ हटवार, उपाध्यक्षा प्रगती ताई श्रीखंडे, सदस्य मनीष बेरड, नीलिमा बेरड,शीतल संभे, प्रियंका दुधे, सौ. बारंगुळे तसेच शाळेच्या सर्व विद्यार्थिनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकांच्या पुढाकारामुळे विद्यार्थिनींना शैक्षणिक, मनोरंजनात्मक व अनुभवात्मक सहलीचा आनंद घेता आला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## थोडक्यात




### यवतमाळ अर्बन बँकेत गणतंत्र दिन उत्साहात

**यवतमाळ :** दि यवतमाळ अर्बन को-ऑप. बँकेच्या मुख्य कार्यालयात २६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा गणतंत्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या सोहळ्याचे औचित्य साधून बँक कर्मचारी संघटना व संस्कार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने भारत माता पूजन आणि 'पर्यावरण' विषयावर भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एका ५ वर्षीय चिमुकलीने सलग दोन तास रांगोळी काढून सर्वांचे लक्ष वेधले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष आनंद पांडे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. नितीन खर्चे यांनी, रांगोळी ही लुप्त होत चाललेली परंपरा असून ती पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते डॉ. महेश सारोळकर यांनी 'पंच परिवर्तन' विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर बक्षीस वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमात सौ. रमा कुटे यांनी गीत गायन केले, तर सूत्रसंचालन कविता राठोड यांनी आणि आभार प्रदर्शन कु. संस्कृती तिवारी हिने केले. कार्यक्रमाची सांगता संतोष भोयर व संचाच्या भारत माता आरतीने झाली. यावेळी मंचावर उपाध्यक्ष अजिंदरसिंह चावला, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीधर कोहरे, संस्कार भारतीच्या जिल्हाध्यक्षा सौ. प्राचीताई बनगिनवार तसेच कार्यक्रमाला संचालक प्रमोद धुर्वे, परिमलजी देशपांडे, श्रीमती मिराताई घाटे, विवेक कवठेकर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मंगरुळ येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**मंगरुळ :** मंगरुळ येथील उच्च प्राथमिक मराठी शाळेत २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे ध्वजारोहण अध्यक्ष संघपाल गंगादास मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत प्रांगणात सरपंच पुजाताई प्रेमदास डोंगरे यांनी ध्वजारोहण केले. कार्यक्रमाला पोलीस पाटील,ग्रामपंचायत सचिव निकिता इंगोले, कर्मचारी प्रभुदास नंदा गवळी आणि ऑपरेटर नवनीत बाराशे यांची उपस्थिती होती. तसेच ग्रामपंचायतीचे उपसरपंच व सर्व सदस्य, गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांचे यावेळी स्मरण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला. भारताला महान बनवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. शाळेतील या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक कोरे सर आणि गवळी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी अंगणवाडी सेविका, मदतनीस आणि गावातील महिला व पुरुष मोठया संख्येने उपस्थित होते. मुख्याध्यापक कोरे सर यांच्या नियोजनामुळे कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद मिळाला.



### जखमी विद्यार्थ्यासोबत रुग्णालयात साजरा केला आनंद

**यवतमाळ :** येथील विवेकानंद विद्यालयातील इयत्ता आठवीचा विद्यार्थी प्रेम साळुंके याचे कबड्डीच्या सरावादरम्यान डाव्या हाताची दोन्ही हाडे मोडल्याने त्याला वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले होते. वडील नसल्याने आणि घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने जामडोह येथे मामाकडे राहणाऱ्या प्रेमवर सुट्ट्यांमुळे आणि कागदपत्रांच्या अभावी शस्त्रक्रिया रखडली होती. यामुळे प्रेम आणि त्याचे कुटुंब प्रचंड मानसिक तणावात होते. ही बाब लक्षात येताच शाळेतील शिक्षकांनी २६ जानेवारी रोजी ध्वजवंदन आटोपून थेट रुग्णालय गाठले. शिक्षकांनी प्रेमला कागदी तिरंगा व खाऊ देऊन त्याच्यासोबत गणराज्य दिन साजरा केला. केवळ भेटच दिली नाही, तर शिक्षक व कर्मचाऱ्यांनी जमा केलेली ५ हजार रुपयांची रोकड आर्थिक मदत म्हणून दिली आणि शस्त्रक्रियेसाठी रक्ताची व्यवस्थाही केली. शिक्षकांच्या या तत्परतेमुळे डॉक्टरांनीही सकारात्मक प्रतिसाद देत मंगळवारी, २७ जानेवारीला दुपारी त्याच्यावर शस्त्रक्रिया केली. विद्यार्थ्याला मानसिक आणि आर्थिक बळ देऊन शिक्षकांनी खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक दिन साजरा केल्याची भावना यावेळी रुग्णांच्या नातेवाईकांनी व्यक्त केली.

### दुचाकीची धडक; पादचारी गंभीर

**आर्णी :** भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने पादचाऱ्याला जोरदार धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. ही घटना १८ जानेवारी रोजी सायंकाळी ७.३० वाजता दत्तरामपूर येथील आदर्श वाईन बारसमोर घडली. २४ जानेवारी रोजी याप्रकरणी गुन्हा दाखल झाला. संजय मुकुंदराव तीरपुडे (४३, रा. दत्तरामपूर) असे जखमीचे नाव आहे. ते रस्त्याने पायी जात असताना आरोपी संजय शेषराव कुडवे (४५, रा. परसोडा) याने आपल्या दुचाकीने (एमएच २९ एएस ०७१४) त्यांना ठोस मारली. यात संजय तीरपुडे गंभीर जखमी झाले. त्यांचे भाऊ गजानन तीरपुडे यांच्या तक्रारीवरून आर्णी पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# आर्णीचा दळणवळणाचा प्रश्न सुटणार

## लोणी-जवळा सर्कलमध्ये विकासाचे पर्व, ४८ लाखांच्या रस्ते कामांचे भूमिपूजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २७ :** तालुक्यातील लोणी-जवळा सर्कलमध्ये शनिवारी (ता. २४) विकासाचे एक नवे पर्व सुरू झाले. आर्णी-केळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम यांच्या हस्ते ४८ लाख रुपयांच्या रस्ते सुधारणा कामांसह विविध प्रकल्पांचे भूमिपूजन करण्यात आले. ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात प्रशासकीय अधिकारी आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती, ज्यामुळे लोणी आणि खेड परिसरातील विकासाला आता खऱ्या अर्थाने गती मिळणार आहे.

गेल्या काही काळापासून प्रलंबित असलेल्या विकासकामांना अखेर मुहूर्त मिळाला आहे. आमदार प्रा. राजूभाऊ तोडसाम यांनी शनिवारी लोणी, खेड, शिरपूर आणि जांब या गावांचा झंझावाती दौरा केला. यावेळी गव्हणा येथे आयोजित सत्कार समारंभात ग्रामस्थांनी त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. या दौऱ्याचे मुख्य आकर्षण ठरले ते रस्ते सुधारणेचे काम. जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र. २ (यवतमाळ) अंतर्गत लेखाशीर्ष ३०५४-३५७८ मधून मंजूर झालेल्या निधीतून या कामाचा श्रीगणेशा करण्यात आला. विशेषतः आरंभी - खेड - लोणी - देऊरवाडी-वागद-सावळा-मोझर या जिल्हा मुख्य मार्ग क्र. ६२ च्या सुधारणेसाठी ४८ लाख रुपयांची भरीव तरतूद करण्यात आली आहे. साखळी क्रमांक ८/०० ते १०/०० मधील या कामाचे भूमिपूजन आमदारांच्या हस्ते पार पडले. या कामामुळे पावसाळ्यात होणारी चिखलफेक थांबणार असून, शेतकऱ्यांना आपला शेतमाल बाजारपेठेत नेणे सोपे होणार आहे. परिसरातील दळणवळणाचा जिव्हाळ्याचा प्रश्न सुटल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. विकासकामांच्या सोहळ्याला कामगार उप-आयुक्त राजेश आडे, गटविकास अधिकारी श्री. खराडे यांच्यासह संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि विकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवसा विकासाचा ध्यास आणि संध्याकाळी अध्यात्माचा प्रवास, असा दुहेरी संगम यावेळी पाहायला मिळाला. दिवसभराच्या धावपळीनंतर सायंकाळी जवळा येथे ह.भ.प. शिवलीलाताई पाटील यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तनाला पंचक्रोशीतील भाविकांनी अलोट गर्दी केली होती.

### आता रस्तेही उजळणार!

**ग्रामपंचायत खेड (बिड) येथे 'दलित वस्ती सुधार कार्यक्रम २०२५-२६' अंतर्गत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. गावात ४.५० लाख रुपये खर्चून 'सोलार हायमास्ट लाईट' बसविण्यात येणार आहेत. या कामाचे भूमिपूजनही यावेळी करण्यात आले. विजेची बचत आणि रात्रीच्या वेळी प्रकाश, असा दुहेरी उद्देश यातून साध्य होणार असून गावातील अंतर्गत रस्ते आता प्रकाशाने उजळून निघणार आहेत.**

**"मतदारसंघातील ग्रामीण भागाचा कायापालट करणे हेच आमचे अंतिम ध्येय आहे. रस्ते आणि वीज या केवळ सुविधा नसून त्या विकासाच्या धमन्या आहेत. त्यामुळे या मूलभूत समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."**



**- प्रा. राजूभाऊ तोडसाम**
**(आमदार, आर्णी-केळापूर विधानसभा)**

### रेती तस्करांवर एलसीबीची धाड

**पांढरकवडा, दि. २७ :** स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने पांढरकवडा परिसरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारी वाहने पकडली. २४ जानेवारी रोजी ही कारवाई करण्यात आली. पहिल्या कारवाईत दहेली तांडा रोडवर विलास शालिक आगिलकर (३०, रा. घाटंजी) आणि प्रवीण याडगुरे (रा. रामनगर) यांच्या ताब्यातील ६ लाखांचा ट्रॅक्टर आणि रेती जप्त केली. तर दुसऱ्या कारवाईत पारवेकर कॉलेजसमोर अखिल प्रभाकर चव्हाण (३२) आणि रोशन दीपक मडावी (२८) यांच्याकडून पिकअप आणि बडा दोस्त ही वाहने व रेती असा ७ लाख १२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. दोन्ही कारवायांमध्ये एकूण १३ लाखांवर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाईमुळे रेती तस्करांचे घाबे चांगलेच दणाणले असून, या कारवाईबाबत नागरिकांमधून कौतुक केल्या जात आहे.

CAPTION **करटे प्रशिक्षण...**



**यवतमाळ : आजच्या काळात मुलांचे शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहावे आणि त्यांना लहानपणीच स्वसंरक्षणाचे बाळकडू मिळावे, यासाठी पालकांचा कल कराटे प्रशिक्षणाकडे वाढला आहे. येथील नेहरू क्रीडा मैदानावर चिमुकल्या खेळाडूंना कराटेचे बारकावे शिकवताना आणि त्यांच्याकडून शिस्तबद्ध सराव करवून घेताना ब्लॅक बेल्टधारक प्रशिक्षक रुचिता रामटेके (वानखेडे).**

### दिग्रस येथे वालजी लढ्ढा जिनिंगला आग

#### अग्निशमन दलाच्या तत्परतेने अनर्थ टळला

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. २७ :** शहराच्या मध्यवस्तीत असलेल्या वालजी लढ्ढा जिनिंगमध्ये सोमवार, दिनांक २६ जानेवारी रोजी रात्री अंदाजे आठ वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेचे गांभीर्य ओळखून माजी नगराध्यक्ष तथा स्वीकृत नगरसेवक रवींद्र अरगडे आणि नगरसेवक राम नरळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी त्वरित दिग्रस नगरपरिषद प्रशासनाला घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच नगर परिषदेच्या अग्निशमन दलाचे वाहन तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून वेळीच आगीवर नियंत्रण मिळवल्याने मोठा अनर्थ टळला आहे. मध्यवस्तीत ही घटना घडल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकले नसून याबाबतचा पुढील तपास सुरू आहे.

### चालगणी जिल्हा परिषद शाळेला आमदार किसनराव वानखेडे यांची आकस्मिक भेट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २७ :** येथील चालगणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांनी आकस्मिक भेट दिली. यावेळी त्यांनी यवतमाळ जिल्हा परिषदेंतर्गत घेण्यात आलेल्या 'महादीप' परीक्षेत घवघवीत यश संपादन करून विमानवारीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थिनी श्रेया प्रशांत कदम आणि दिव्या दीपक नरवाडे यांचा सत्कार करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. चालगणीसारख्या ग्रामीण भागातील शाळेने गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देऊन एकाच वेळी दोन विद्यार्थी उच्च गुणांसह उत्तीर्ण केल्याबद्दल आमदारांनी शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले.

यावेळी त्यांच्यासोबत उपस्थित असलेले भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनीही यशस्वी विद्यार्थिनींचा गौरव करत शाळेच्या एकूणच कामकाजावर समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान माजी आमदार विजयराव खडसे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रमेश चव्हाण, ॲड. अनिल माने, सुदर्शन रावते, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संतोष काटे, ग्रामपंचायत सदस्य बाबाराव कदम व पंजाब कदम उपस्थित होते. या आकस्मिक भेटीने भारावलेल्या शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षकांच्या वतीने आमदार वानखेडे, नितीन भुतडा व इतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

### वसंतराव नाईक विद्यालयात 'ऐतिहासिक शौर्य गाथा' हस्तलिखिताचे विमोचन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**पुसद, दि. २७ :** पुसद युवक मंडळ संचालित वसंतराव नाईक विद्यालयात २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून 'ऐतिहासिक शौर्य गाथा' या हस्तलिखित पुस्तकाचे विमोचन संस्थेचे सचिव विजयभाऊ जाधव व सौ. पूजाताई जाधव यांच्या हस्ते संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षभरापासून अथक परिश्रम घेऊन हे हस्तलिखित तयार केले असून, यात मोहेजोदारोपासून ते गेट वे ऑफ इंडियापर्यंतच्या ऐतिहासिक वास्तू, मुघल व ब्रिटिशकालीन रचना आणि भारतीय संस्कृतीची माहिती चित्रांसह मांडली आहे.

या सोहळ्यास अक्षताताई आडे, मुख्याध्यापिका वंदना पोले व श्री. सरडे सर प्रामुख्याने उपस्थित होते. या हस्तलिखिताचे संपादक म्हणून कलाशिक्षक विजय जीवा राठोड, सहसंपादक विष्णू शांताराम इंगळे यांनी जबाबदारी सांभाळली. तसेच संपादक मंडळात आर. डी. बुरबुरे, एन. टी. राठोड, ए. टी. राठोड, ए. बी. राठोड, एस. जी. राठोड व बी. एस. कऱ्हाळे यांचा समावेश आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ व प्रस्तावना विजय राठोड यांनी, तर मनोगत मुख्याध्यापिका वंदना पोले यांनी लिहिले आहे. या उपक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष देवभाऊ जाधव, माजी मुख्याध्यापक अनिल कुरमे, प्रा. एस. एल. राठोड, प्रा. आर. के. डेकाटे, बी. एन. डोक, महेश चव्हाण तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## गणोरी ते अंतरगाव पांदण रस्त्याचा प्रश्न मार्गी

### उपोषणाला बसलेल्या शेतकऱ्यांना प्रशासनाचा दिलासा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**बाभूळगांव, दि. २७ :** बाभूळगाव तालुक्यातील गणोरी ते अंतरगाव या रखडलेल्या पांदण रस्त्याच्या प्रश्नावर शेतकरी २६ जानेवारी रोजी उपोषणाला बसले होते. मात्र, हा रस्ता आता जिल्हा नियोजन समिती आणि मनरेगा अभिसरणमधून नव्याने मंजूर झाल्याची माहिती गटविकास अधिकाऱ्यांनी दिल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले आहे. प्रशासनाच्या या तत्परतेमुळे सिद्धार्थ भितकर व इतर शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सविस्तर वृत्त असे की, गणोरी येथील शेतकरी श्री. सिद्धार्थ हरिदास भितकर आणि इतर ४ शेतकऱ्यांनी पांदण रस्त्याच्या दुरवस्थेबाबत प्रशासनाला वारंवार निवेदने दिली होती. गणोरी ते अंतरगाव हा दोन किलोमीटरचा रस्ता 'रोजगार हमी योजने' (रोहयो) अंतर्गत २०२२-२०२३ मध्येच मंजूर झाला होता. त्यावेळी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नारळ वाढवून आणि जेसीबीने साफसफाई करून कामाचा शुभारंभही झाला होता; परंतु दुर्दैवाने हे काम अवघ्या काही तासांतच बंद पडले. गेल्या दोन वर्षांपासून रस्ता नसल्याने शेतकऱ्यांना शेतमाल घरी आणण्यासाठी किंवा खते शेतात नेण्यासाठी बैलबंडी व ट्रॅक्टर चालवताना प्रचंड कसरत करावी लागत होती. या त्रासाला कंटाळून अखेर शेतकऱ्यांनी २६ जानेवारी २०२६ रोजी बाभूळगाव तहसील कार्यालयासमोर उपोषणाला सुरुवात केली. उपोषण सुरू होताच प्रशासनाने तात्काळ दखल घेतली. बाभूळगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी शेतकऱ्यांची समजूत घालत सांगितले की, आता हा रस्ता 'जिल्हा नियोजन समिती' आणि 'मनरेगा अभिसरण' या दोन्ही योजनांच्या माध्यमातून नव्याने मंजूर करण्यात आला आहे. याबाबतचा अहवाल ग्रामपंचायत सचिवांनी सादर केला आहे. हे काम मंजूर असून ते लवकरच सुरू करण्याचे निर्देश बाभूळगावच्या तहसीलदारांना आणि गणोरी ग्रामपंचायतीच्या सरपंचांना देण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेमुळे आणि कामाच्या हमीमुळे शेतकऱ्यांनी आपले आंदोलन मागे घेतले आहे.

### दारव्हा येथे टेनिस बॉल क्रिकेट सामन्यांचे उद्घाटन



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी


**दारव्हा, दि. २७ :** सहकार महर्षी, माजी आमदार लोकनेते बाळासाहेब घुईखेडकर फाउंडेशन, यवतमाळ आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे उद्घाटन मंगळवारी (दि. २७) मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर होते, तर उद्घाटक म्हणून पोलीस निरीक्षक शिवप्रसाद मुळे लाभले होते.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोरी (अरब) कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विराज घुईखेडकर, नानाभाऊ गाडबैले, सलीम सोलंकी, नानाभाऊ राऊत, किशोर चारोळे, प्रा. चरण पवार, प्रा. सुभाष गावंडे, प्राचार्य डॉ. सुनील चकवे, माजी प्राचार्य डॉ. विलास राऊत, रणजित झोंबाडे, ईश्वर राठोड आणि रामदास राऊत उपस्थित होते. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. सुनील डंभारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

# विरोधी नगरसेवकांना धुळीने माखलेल्या खुर्च्या

## यवतमाळ पालिकेत प्रजासत्ताक दिनी राडा, मुख्याधिकाऱ्यांच्या पक्षपाती कारभाराने विरोधक आक्रमक

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २७ :** नगरपरिषदेत प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहण सोहळ्याला प्रशासकीय अनास्थेमुळे गालबोट लागले. मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांनी प्रोटोकॉल बाजूला ठेवत सत्ताधारी भाजपला 'रेड कार्पेट' आणि विरोधी नगरसेवकांना धुळीने माखलेल्या खुर्च्यांची वागणूक दिल्याने काँग्रेस, शिवसेना आणि वंचितच्या नगरसेवकांनी संताप व्यक्त केला. हा अपमान सहन न झाल्याने विरोधकांनी थेट प्रशासनाच्या चहापानावर बहिष्कार टाकत नगरपरिषदेच्या पायऱ्यांवर निषेध नोंदविला.

देशभरात ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा उत्साह असताना, यवतमाळ नगरपरिषदेच्या आवारात मात्र लोकशाही मूल्यांची पायमल्ली झाल्याचा गंभीर प्रकार घडला. पालिकेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्या कार्यपद्धतीमुळे या पवित्र महोत्सवात मानापमानाचे नाट्य रंगले. ध्वजारोहण समारंभासाठी आलेल्या लोकप्रतिनिधींमध्ये प्रशासनाने उघडपणे दुजाभाव केल्याचे चित्र पाहायला मिळाले. सत्ताधारी भाजपच्या नगरसेवकांसाठी विशेष बडदास्त आणि सुसज्ज आसनव्यवस्था असताना, जनतेतून निवडून आलेल्या विरोधी बाकांवरील नगरसेवकांसाठी मात्र धुळीने माखलेल्या खुर्च्या ठेवण्यात आल्या होत्या. प्रशासनाच्या या कृतीमुळे विरोधकांचा पारा चढला. या वादात 'फेटे' प्रकरणाने आणखी भर घातली. नगरभवनात सर्व नगरसेवकांसाठी फेटे बांधण्याची व्यवस्था असल्याचे सांगण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात विरोधकांना त्यापासून वंचित ठेवण्यात आले. दुसरीकडे, मुख्याधिकारी आणि नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके यांनी परिधान केलेले फेटे अगदी एकसारखे असल्याने, "हे फेटे प्रशासनाचे आहेत की भाजप कार्यालयातून आलेले?" असा सवाल विरोधकांनी उपस्थित केला. मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या पदाची गरिमा न राखता केवळ सत्ताधाऱ्यांचे लांगूलचालन केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. प्रशासकीय अधिकारी हे तटस्थ असायला हवेत, परंतु क्यातमवार हे उघडपणे भाजपच्या इशाऱ्यावर काम करत असल्याची भावना विरोधकांनी व्यक्त केली. कारण मुख्याधिकारी क्यातमवार यांनी व नगराध्यक्ष ॲड. उईके यांच्यासह भाजपाच्या सर्व नगरसेवकांनी परिधान केलेले फेटे हे एकाच रंगाचे असल्याने क्यातमवार यांनी भाजपाचे सदस्यत्व स्विकारले का, अशी बोचरी टिका याप्रसंगी विरोधकांनी केली. "शासकीय खुर्चीवर बसून एका विशिष्ट पक्षाची चाकरी करणाऱ्या अधिकाऱ्याला लोकशाहीची चाड उरली नाही," अशा शब्दांत विरोधी नगरसेवकांनी संताप व्यक्त केला. सन्मानाची वागणूक मिळत नसेल, तर प्रशासनाचा चहा पिणे हे स्वाभिमान विकण्यासारखे आहे, अशी भूमिका घेत काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट) आणि वंचित बहुजन आघाडीच्या सर्व सदस्यांनी चहापानावर बहिष्कार टाकला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीच घडलेल्या या प्रकारामुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून, जिल्हाधिकारी यावर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नियोजनाचा पुरता बोजवारा!

**केवळ खुर्च्यांच्या स्वच्छतेचाच नव्हे, तर एकूणच आसनव्यवस्थेच्या नियोजनाचा बोजवारा उडाला होता. प्रशासनाने निमंत्रण देऊनही अनेक माजी नगरसेवक आणि विद्यमान ज्येष्ठ सदस्यांना कार्यक्रमात उभे राहावे लागले. निमंत्रितांचा मान राखणे ही मुख्याधिकाऱ्यांची नैतिक जबाबदारी असताना, ढिसाळ नियोजनामुळे अनेक प्रतिष्ठितांचा अपमान झाला. व्यासपीठाखालील गोंधळामुळे पालिकेचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.**



**"तुम्ही भाजप कार्यालयातून फेटे बांधून आलात यावर आमचे दुमत नाही, पण शासकीय पदावर बसलेले मुख्याधिकारीही भाजपचेच झाले आहेत का? विरोधी गटाच्या नगरसेवकांसाठी कोणतीही व्यवस्था नसल्याने आम्ही चहापानावर बहिष्कार टाकला आहे."**

**-नीरज वाघमारे,**
**गटनेते (वंचित बहुजन आघाडी)**



**"नगरपरिषदेचा हा कार्यक्रम अत्यंत नियोजनशून्य होता. निमंत्रण दिल्यानंतर योग्य व्यवस्था करणे ही मुख्याधिकाऱ्यांची जबाबदारी आहे, पण त्यांच्या ढिसाळ कारभारामुळे माजी व विद्यमान नगरसेवकांना ताटकळत उभे राहावे लागले. हा लोकप्रतिनिधींचा अवमान आहे."**

**- बिपीन चौधरी,**
**नगरसेवक (प्रहार जनशक्ती पक्ष)**

---

**CAPTION** **आंबा मोहरला...**



**यवतमाळ : थंडी ओसरून उन्हाळ्याची चाहूल लागताच निसर्गात होणारे आल्हाददायक बदल... शहरातील धामणगाव रोडवर पिवळ्याधमक मोहराने लच्छ लगडलेले आणि सर्वांचे लक्ष वेधून घेणारे हे आंब्याचे झाड. 'फळांचा राजा' असलेल्या आंब्याच्या आगमनाची चाहूल देणारा हा बहर, त्यातून दरवळणारा मंद सुगंध आणि आगामी काळात रसाळ आंब्याची चव चाखायला मिळणार असल्याची साक्ष देणारे हे निसर्गरम्य आणि मनमोहक दृश्य. (छायाचित्र : संजीव भीतकर)**

## २ लाखांची ट्रॅक्टर ट्रॉली चोरीला

**दिग्रस, दि. २७ :** घराशेजारील खुल्या जागेत उभी केलेली २ लाख रुपये किमतीची ट्रॅक्टर ट्रॉली अज्ञात चोरट्याने पळवून नेली. ही घटना आरंभी (ता. दिग्रस) येथे २५ ते २६ जानेवारी दरम्यान घडली. फिर्यादी संतोष भीमराव चव्हाण (२५, रा. आरंभी) यांनी आपली लाल रंगाची आणि पिवळी पट्टी असलेली ट्रॉली नितेश चव्हाण यांच्या खुल्या जागेत उभी केली होती. अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. २६ जानेवारी रोजी सकाळी ही बाब लक्षात आल्यानंतर संतोष यांनी दिग्रस पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे., दिग्रस तालुक्यात चोरी, जबरी चोरी अशा घटनांमध्ये वाढ झाली आहे.

## आर्णीत विद्यार्थिनीच्या आत्महत्येप्रकरणी खळबळ; चार शिक्षकांसह एका तरुणावर गुन्हा दाखल


**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. २७ :** येथील दत्तनगर परिसरात बारावीत शिकणाऱ्या स्नेहा पवार या अल्पवयीन विद्यार्थिनीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या प्रकरणात धक्कादायक वळण आले आहे. लग्नासाठी तगादा लावणारा एक तरुण आणि मोबाईल चोरीच्या कारणावरून मानसिक छळ करणारे महाविद्यालयाचे चार शिक्षक अशा एकूण पाच जणांविरुद्ध आर्णी पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

दिग्रस तालुक्यातील माळहिवरा येथील स्नेहा बंडू पवार (वय १७) ही आर्णी येथील देवराव पाटील कला व वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य शाखेत शिक्षण घेत होती. तिने १६ जानेवारी रोजी आपल्या भाड्याच्या खोलीत गळफास घेतला होता. सुरुवातीला पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. मात्र, शुक्रवारी तिचे वडील बंडू फुलसिंग पवार (वय ५८) यांनी दिलेल्या तक्रारीनंतर या प्रकरणाचे गांभीर्य समोर आले. फिर्यादीनुसार, आरोपी शेख फारूक शेख जब्बार (रा. मोमीनपुरा, आर्णी) हा स्नेहाला फोनवर लग्नासाठी त्रास देत होता. यासोबतच महाविद्यालयातील शिक्षक शिंदे, परगने, मुंडे आणि वानखडे सर यांनीही तिला नाहक त्रास दिल्याचे उघड झाले आहे. घटनेपूर्वी स्नेहाने वडिलांना सांगितले होते की, शाळेत एका मुलीचा मोबाईल चोरीला गेला होता, ज्याचा आळ तिची मैत्रीण श्वेता जाधव हिच्यावर आला होता. तो मोबाईल तीन दिवसांनी प्रसाधनगृहात सापडला, तरीही या शिक्षकांनी स्नेहाला यावरून मानसिक त्रास दिला. १४ जानेवारीला मकर संक्रांतीला घरी जाऊन १५ जानेवारीला परतलेल्या स्नेहाने १६ जानेवारीला सकाळी १०:३० वाजता जीवन संपवले. या मानसिक व शारीरिक छळास कंटाळून तिने हे पाऊल उचलल्याने पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८ नुसार गुन्हा दाखल केला आहे. ठाणेदार निलेश सुरडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दुर्योधन राठोड पुढील तपास करत आहेत.

## चिंतामणी ट्रॅव्हल्सला मध्यरात्री भीषण आग, २७ प्रवासी सुखरुप

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २७ :** पुण्याहून यवतमाळकडे येत असलेल्या 'चिंतामणी ट्रॅव्हल्स'च्या (एमएच २९ एडब्ल्यू ४४४४) खासगी बसला सोमवारी मध्यरात्रीनंतर जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यात भीषण आग लागली. या बसमध्ये यवतमाळ, आर्णी आणि दिग्रस येथील एकूण २७ प्रवासी प्रवास करत होते. सुदैवाने, चालकाच्या प्रसंगावधानामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र बस पूर्णपणे जळून खाक झाली आणि तिचा केवळ सांगाडा उरला.

२६ जानेवारीला निगडी येथून निघालेली ही बस जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावर सेलगाव परिसरात असताना अचानक मागील बाजूचा टायर फुटला आणि बसमधून धूर येऊ लागला. हे लक्षात येताच चालक भीमराव घोडे यांनी तत्परता दाखवत बस रस्त्याच्या कडेला उभी केली आणि गाढ झोपेत असलेल्या प्रवाशांना तातडीने खाली उतरवले. काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले. अग्निशमन दलाच्या गाड्यांनी आग आटोक्यात आणली, पण तोपर्यंत प्रवाशांचे सर्व सामान आणि बस भस्मसात झाले होते. या घटनेत पल्लवी भडंग, यश चौधरी, प्रतीक्षा, निखिल राठोड यांसह सर्व प्रवासी सुखरूप बचावले आहेत.

## वणीत गुटखा तस्करीविरोधात युवासेनेचा एल्गार

### आमदार संजय देरकरांचा पोलिसांना आठ दिवसांचा अल्टीमेटम

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**वणी, दि. २७ :** शहरात राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू तस्करीविरोधात आणि पोलिसांच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यासाठी युवासेनेने २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताकदिनी वणी पोलीस प्रशासनाविरोधात आक्रमक धरणे आंदोलन केले. युवासेना उपजिल्हाप्रमुख अजिंक्य शेंडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात बनावट कारवाई करणाऱ्यांना पाठीशी घालण्याऐवजी पंचशील नगर प्रकरणातील मुख्य आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी लावून धरण्यात आली.

शासनाने बंदी घातलेला गुटखा शहरात खुलेआम विकला जात असून पोलीस केवळ देखावू कारवाई करत असल्याचा आरोप युवासेनेने केला आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख संजय निखाडे, राजू तुराणकर, आयुष ठाकरे, बंडू चांदेकर, दिलीप काकडे, गणपत लेडांगे, सुधीर थेरे, पुरुषोत्तम बुटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे दिलीप भोयर, लढा संघटनेचे प्रवीण खानझोडे, नगरसेवक अजय धोबे, शत्रुघ्न मालेकर, अनिकेत बदखल, गुलाम रंगरेज, दत्ता बोबडे, समीर लेनगुरे, अभय चौधरी, मिलिंद बावणे, विनोद दुमणे, सुरेश शेंडे, अजय चन्ने, सचिन पचारे, किशोर ठाकरे, संतोष कुचनकर, संदीप गोहकार, विजय अवताडे, अमृत फुलजले, श्री. बदखल, आशिष रिंगोले, अमोल झोटिंग, मोरेश्वर उज्ज्वलकर, चेतन उलमले, गुड्डू घाटोळे, राजू पाटील, मनीष बत्रा, विशाल देवतळे, शंकर देरकर, संस्कार हेपट, रवी कांबळे, अक्षय लाडे, रोशन जाधव, श्री. धोटे, मोहम्मद अन्सार, योगेश उपरे, गणेश काळे, नारायण गोडे आणि अभिजीत चालकुळे यांच्यासह अनेक शिवसैनिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार संजय देरकर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदारांशी सविस्तर चर्चा केली. त्यांनी पोलिसांना आठ दिवसांच्या आत सर्व अवैध धंदे बंद करून तस्करांना अटक करा, अन्यथा यापेक्षा उग्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट 'अल्टीमेटम' दिला. पोलिसांच्या लेखी व तोंडी आश्वासनानंतर हे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याची माहिती अजिंक्य शेंडे यांनी दिली.

# सिंचन प्रकल्पांमुळे यवतमाळ जिल्ह्याचे लवकरच नंदनवन होईल

## पालकमंत्री : सिंचन आणि कृषी क्षेत्राला बळ, शहिदांच्या कुटुंबियांचा पालकमंत्र्यांकडून सन्मान, पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर भर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २७ :** "बेंबळा आणि निम्न पैनगंगा यांसारख्या महत्त्वाकांक्षी सिंचन प्रकल्पांमुळे यवतमाळ जिल्ह्याचे लवकरच नंदनवन होईल," असा ठाम विश्वास राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केला. यवतमाळ येथील समता मैदानावर ७७ व्या प्रजासत्ताक दिनी त्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला. यावेळी त्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेत पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाचा संकल्प बोलून दाखविला.

समता मैदानावर आयोजित या राष्ट्रीय सोहळ्यात बोलताना पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्ह्याच्या विकासाची ब्लूप्रिंट जनतेसमोर मांडली. "यवतमाळ जिल्हा आज तंत्रज्ञान, कृषी आणि सिंचन क्षेत्रात मोठी झेप घेत आहे. आपल्या जिल्ह्याचे नंदनवन करण्याचे स्वप्न आपण पाहत असून, ते लवकरच सत्यात उतरेल," असे प्रतिपादन त्यांनी आपल्या भाषणात केले. यावेळी प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, विद्यार्थी आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती. ध्वजारोहणानंतर पालकमंत्र्यांनी पोलीस दलाच्या परेडचे निरीक्षण करून मानवंदना स्वीकारली. महिला सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना ना. राठोड यांनी जिल्ह्याच्या कामगिरीचे कौतुक केले. ते म्हणाले, "१.९५ लाख महिलांना 'लखपती दीदी' बनवून आपण महिला सक्षमीकरणाचा एक नवा आणि आदर्श पायंडा पाडला आहे." तसेच प्रशासनाच्या 'मिशन उभारी' आणि 'योजना पोर्टल'च्या प्रभावी अंमलबजावणीचा उल्लेख करत त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांची पाठ थोपटली. विकासाच्या गप्पांसोबतच सामाजिक भानही या सोहळ्यात जपले गेले. उपस्थित नागरिक आणि विद्यार्थ्यांना 'बालविवाह प्रतिबंधक शपथ' देण्यात आली. सोहळ्याचे वातावरण तेव्हा भावूक झाले, जेव्हा देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या शूरवीरांच्या कुटुंबियांचा सन्मान करण्यात आला. पालकमंत्र्यांनी वीरमाता आणि वीरपत्नींचा गौरव करून त्यांच्या त्यागाला वंदन केले. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणारे कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके, जिल्हाधिकारी विकास मीना, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की, पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### पोलीस दल झाले 'हायटेक'

**जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी आणि प्रशासकीय कामाला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या पुढाकारातून ६२ नवीन वाहने मंजूर झाली आहेत. त्यापैकी प्राप्त झालेल्या २४ अत्याधुनिक वाहनांचे पालकमंत्र्यांनी हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण केले. दुर्गम भागात तातडीने पोहोचण्यासाठी आणि गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी या वाहनांची मोठी मदत होणार आहे.**

### १ मे रोजी एक लाख घरांचे स्वप्न!

**पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत प्रशासनाने महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवले आहे. २६ जानेवारी ते १ मे या कालावधीत जिल्ह्यात तब्बल १ लाख घरे पूर्ण करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. येत्या १ मे रोजी, अर्थात महाराष्ट्रदिनी लाभार्थ्यांचा भव्य गृहप्रवेश सोहळा साजरा केला जाईल. या मोहिमेचा शुभारंभ म्हणून 'येत्या १ मे, महाराष्ट्र दिनी आपल्या घरी' या विशेष संकल्पनेचे आणि फलकाचे अनावरण पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.**

---

## महत्वाचे

### लग्नाला गेलेल्या कुटुंबाचे घर फोडले

**यवतमाळ :** भोसा रोडवरील रेणुका पेट्रोल पंपासमोर राहणाऱ्या कुटुंबाचे घर फोडून चोरट्यांनी २ लाख ४ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना २५ जानेवारी रोजी रात्री ८.३० ते ११.४५ दरम्यान घडली. फिर्यादी मोहम्मद युसुफ शेख हसन (५१) आणि त्यांचे कुटुंबीय नातेवाईकाच्या लग्नासाठी बाहेरगावी गेले होते. ही संधी साधत अज्ञात चोरट्याने घराच्या दरवाजाचा कडीकोंडा तोडून आत प्रवेश केला. कपाटातील १ लाख ५० हजार रुपये रोख आणि ५४ हजार ८७४ रुपयांचे सोन्याचे दागिने असा एकूण २ लाख ४ हजार ८७४ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मोटर आणि केबल चोरीला

**दारव्हा :** दारव्हा तालुक्यातील दहेली शिवारातून शेतकऱ्याच्या तीन पाण्याच्या मोटर आणि केबल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली. ही घटना २६ जानेवारी रोजी सकाळी ६ वाजता उघडकीस आली. फिर्यादी लक्ष्मण ज्ञानेश्वर कठाने (७५, रा. रामगाव रामेश्वर) यांच्या शेतातून ही चोरी झाली. चोरट्याने २० हजार रुपये किमतीच्या ३ पाण्याच्या मोटर आणि १६ हजार रुपयांची केबल असा एकूण ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल लांबवला. याप्रकरणी दारव्हा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास करत आहेत.

## निधन

### चंद्रकांताबाई जाजू

**यवतमाळ :** नेहरूनगर येथील रहिवासी चंद्रकांताबाई जगदीशचंद्र जाजू (८०) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर पांढरकवडा रोडवरील मोक्षधाम येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती जगदीशचंद्र, तीन मुले - संजय, अजय, राजेश, दोन मुली - सविता, संगीता, तसेच सुना - जयश्री, सपना, नातवंडे आणि मोठा आप्त परिवार आहे.

### वैशाली अलोणे

**दारव्हा :** दारव्हा येथील मूळ रहिवासी आणि हिंगोली जिल्हा परिषदेच्या सहायक शिक्षिका वैशाली शशांक अलोणे (पूर्वाश्रमीच्या वैशाली वसंतराव लांभाटे, वय ४८) यांचे २६ जानेवारीच्या रात्री दीर्घ आजाराने निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी दुपारी हिंगोली येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. वैशाली अलोणे या मूळच्या दारव्हा येथील असल्याने त्यांच्या निधनाचे वृत्त कळताच शहरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, आई, तीन भाऊ आणि एक बहीण असा मोठा आप्त परिवार आहे.